# ।। मना सज्जना ।।



संकल्पना

**चंद्रकांत अनंत भोसेकर**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

**संकल्पना**
श्री. चंद्रकांत अनंत भोसेकर
१ला मजला, यशोदा सीताराम को.हौ.सो.लि.
समाजमंदिर हॉलजवळ
टिळकनगर विद्यामंदिर मार्ग
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), ४२१२०१
दूरभाष - २४५४३८२, २४४१९८०

**प्रकाशक**
सौ. श्रुती सुहास फाटक
२, जय सरस्वती को.हौ.सो.लि.
टिळकनगर विद्यामंदिर मार्ग
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), ४२१२०१
दूरभाष - २४३५८७३

**मुद्रक**
श्री. अभय मुरलीधर टिळक
१५, मातृस्मृती, २रा मजला,
जिजाईनगर, डोंबिवली (पूर्व), ४२१२०१

**मुहूर्त**
प्रथमावृत्ती, गुढी पाडवा, २१ मार्च, २००४

(खाजगी वितरणासाठी मुद्रित व प्रकाशित)





माऊलीच्या मायेने सामान्य
माणसांच्या मनाची जडणघडण
करण्यासाठी आमच्या मनाला उपदेश
करणाऱ्या समर्थ रामदासाना
कृतज्ञतापूर्वक सादर व सप्रेम समर्पण

**चंद्रकांत**





# ऋणनिर्देश

❋ सौ. सुनेत्रा चंद्रकांत भोसेकर

❋ सौ. श्रुती सुहास फाटक

❋ श्री. सुहास हरिश्चंद्र फाटक

❋ श्री. दत्तात्रेय किसन म्हेत्रे

❋ श्री. अभय मुरलीधर टिळक

❋ कु. सुवर्णा सुरेश वाणी



# प्रस्तावना



'मनाचे श्लोक' फक्त एवढंच म्हटलं की लहान मुलांपासून ते वयोवृध्दांपर्यंत सगळ्यांसमोर एकच चित्र उभं राहतं आणि ते म्हणजे आपले 'समर्थ रामदास'. त्यांचं इतर वाङ्मय प्रचंड असलं तरी या मनाच्या श्लोकांमुळे त्यांच्यात आणि आपल्यात एकदम घनिष्ठ संबंध निर्माण झाले आहेत. त्यामुळे ते आपल्याला अगदी जवळचे, जणू काही आपल्याच घरातील एक आहेत असं वाटतं.

लहानपणापासूनच मुलांना शाळेत, संस्कारवर्गात आणि घरीसुध्दा काही स्तोत्रं, काही श्लोक शिकवले जातात. त्यामध्ये 'मनाच्या श्लोकांचा' ही समावेश आहे. लहान मुलांना अर्थ कळो न कळो पण मनाचे श्लोक म्हटलं म्हणजे त्यांची एकदा का म्हणायला सुरूवात झाली की जेवढे शाळेत किंवा घरी शिकवले आहेत, तेवढं म्हणून संपेपर्यंत त्यांची गाडी काही थांबत नाही. अगदी उत्साहाने ते म्हणत असतात. गुणगुणत असतात.

जसंजसं त्या लहान मुलांचं वय वाढू लागतं, तसतशी त्यांची बुध्दीही वाढत जाते, विचार करण्याची क्षमता वाढते आणि मग हळूहळू या मनाच्या श्लोकांचा भावार्थ थोडाफार कळू लागतो. मग या श्लोकांचा गर्भितार्थ कळण्यासाठी आपण अजून काही पुस्तकं वाचतो. मग प्रत्येक लेखक आपापल्या शैलीने समर्थांना काय म्हणायचं आहे ते वेगवेगळी उदाहरणं देऊन स्पष्ट करत असतो.

ज्या मनाच्या श्लोकांसंबंधी आपण चर्चा करीत आहोत, ते श्लोक म्हणजे नक्की आहेत तरी काय? त्यांचा आपल्या जीवनात, व्यवहारात, परमार्थात काही उपयोग आहे का? असे असंख्य प्रश्न आपल्या मनात निर्माण होतील. 'मनात निर्माण होतील' हे वाक्य फार महत्वाचं आहे कारण याचा संबंध आपल्या मनाशी आहे. मनाशी संबंधीतच हे श्लोक असल्यामुळे याला 'मनाचे श्लोक' असं संबोधलं जातं. या मनाच्या २०५ श्लोकांची रचना कशी झाली? यासंदर्भात एक कथा आहे.

सज्जनगडावर रामनवमीचा मोठा उत्सव होत असे. त्यासाठी दरवर्षी शिवाजी महाराजांकडून देणगी येत असे. पण एके वर्षी त्या उत्सवापर्यंत ती देणगी येऊ शकली नाही. त्यामुळे सज्जनगडावरील समर्थांचे सर्व शिष्यगण संभ्रमात पडले की आता हा रामनवमीचा उत्सव कसा काय साजरा होणार? प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ते प्रश्नचिन्ह दिसत होतं. पण समर्थांचा चेहरा मात्र कमालीचा शांत दिसत होता. म्हणूनच त्यांच्यातील एका शिष्याने मोठी हिंमत करून समर्थांना प्रश्न विचारला की आपला रामनवमीचा उत्सव कसा काय होणार? यावर समर्थ म्हणाले की शिवाजी महाराज देणगी देतात म्हणून रामनवमीचा उत्सव साजरा होतो, असं जर तुम्हाला वाटत असेल तर ते चुकीचं आहे.

'आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो रे ।' शिवाजी महाराज हे फक्त निमित्तमात्र आहेत. पण कर्ता-करविता तर तो प्रभू श्रीराम आहे. त्याच्याच इच्छेने आपला रामनवमीचा उत्सव साजरा होतो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही तो तसाच उत्साहाने, आनंदाने साजरा होईल. त्यांच्या या उत्तरावर सर्व शिष्यांना मात्र आश्चर्य वाटलं. समर्थांनी त्यांच्या एका शिष्याला सांगितलं की मी जे सांगतो ते तू लिहून काढ व त्याच्या प्रती काढ. आणि आपल्या सर्व शिष्यांमध्ये वाट. त्याप्रमाणे समर्थांनी श्लोक सांगितले. त्यांच्या शिष्यानेही ते श्लोक लिहून काढले. हां हां म्हणता २०५ श्लोक झाले आणि तेच हे 'मनाचे श्लोक'. या श्लोकांच्या त्या शिष्यानी रातोरात प्रती काढून इतर शिष्यगणांत वाटल्या. दुसऱ्यादिवशी भिक्षा मागताना घरोघरी एकेक श्लोक यांप्रमाणे हे २०५ श्लोक त्यांनी लोकांना ऐकवले. त्यावर लोकांनी अत्यंत प्रसन्न होऊन त्यांना भरपूर भिक्षा दिली आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिवाजी महाराजांनी दिलेल्या देणगीपेक्षा दसपटीने अधिक भिक्षा जमा झाली. मार्गात

काही अडथळा आल्यामुळे न आलेली शिवाजी महाराजांची देणगी थोडी उशीरा आली. आणि मग काय सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि मग सर्वांनी मिळून रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला.

अशाप्रकारे उत्स्फूर्ततेनं लिहीलेलं २०५ श्लोकांचं हे लहानसं प्रकरण संपूर्ण समर्थ साहित्याचं सार आहे. त्यांचं साहित्य खूप व्यापक आणि विशाल आहे. अत्यंत रसाळ व मधूर अशी त्यांची भाषाशैली आहे. त्यामुळे जसं अमृत आटवून अर्ध करता येत नाही, तसंच याचा आणखी सारांश काढणं अवघड जातं. श्रीविनोबाजी भावे यांनी मनाच्या श्लोकांच्या संदर्भात सुंदर उल्लेख केला आहे. ते म्हणतात की समर्थ साहित्य ही सोन्याची खाण आहे. त्यांतून पुष्कळ सोनं निघालं. पण मनाचे श्लोक ही सोन्याची खाण नसून जणू सोन्याची लगड आहे. हल्लीच्या भाषेत त्याला सोन्याचं बिस्कीट म्हणता येईल. श्रीविनोबाजींचा हा अभिप्राय अगदी सार्थ आहे. आपण जितक्या वेळा हे श्लोक वाचू, तितक्या वेळा ते आपल्याला सरस, आशयघन आणि बोधप्रद वाटतात. हे श्लोक वाचल्यावर असं वाटतं की समर्थ आपल्या सर्व सामर्थ्यानिशी येथे उभे आहेत. शिवाय यांत आपली ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज आणि कबीर यांचीही भेट ठिकठिकाणी होते. म्हणूनच मनाच्या या श्लोकांची गोडी काही निराळीच आहे.

'मनाचे श्लोक' या प्रकरणांतील भाषेत एक प्रकारचं उसळतं चैतन्य आहे, ओज आहे, आवेश आहे. साक्षात्काराचं तेज आहे, जनहिताची तळमळ आहे. व सर्व प्रकारच्या मार्गदर्शनाचा नेमकेपणा आहे. हे प्रकरण अतिशय मनोवेधक आणि प्रभावी आहे. आपल्यासारख्या सर्वसामान्य लोकांचा विचार करूनच त्यांनी हे श्लोक लिहीले आहेत. कारण सामान्य माणसाची बुध्दी हवी तितकी कुशाग्र नसल्यामुळे त्याला थोडक्यात सांगून भागत नाही. म्हणूनच या २०५ श्लोकांची गरज आहे. मनाचे श्लोक वाचण्याचा, ऐकण्याचा परिणाम म्हणजे एका ठराविक कालावधीनंतर ते हळूहळू आचरणात येऊ लागतात आणि त्यामुळे माणसांच्या मनातील दोष हळूहळू नाहीसे होतात. इतकंच नाही तर आपली काय चूक झाली आहे, आपण नेमकं कोठे चुकतो? तसंच त्यांना दोष का म्हणावं? हेही लक्षात येतं. आणि हे दोष टाळायचे उपायही लक्षात येतात. त्यांची आवश्यकताही पटू लागते. म्हणूनच समर्थ म्हणतात,

मनाची शते ऐकता दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती ।<br>
चढे ज्ञानवैराग्य सामर्थ्य अंगी । म्हणे दास विश्वासता मुक्ती भोगी ।।

ज्याची बुध्दी मंद आहे त्यांनाही हे साधू लागतं, त्याचं ज्ञान वाढू लागतं आणि ते टिकविण्यासाठी वैराग्यही वाढू लागतं. हे सर्व घडत जातं यात शंकाच नाही, पण त्यासाठी माणसाचा दृढविश्वास असावा लागतो.

ज्या मनाच्या श्लोकांचा आपण वारंवार उल्लेख करत आहोत, ते श्लोक आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना समजावून देण्यासाठी कोणीतरी सामर्थ्यवान व्यक्तीच पाहिजे आणि ती व्यक्ती म्हणजे स्वतः समर्थ असणारे श्रीरामांचे दास म्हणजेच आमचे प.पू.व आदरणीय भोसेकर सर. त्यांच्याबद्दल काही लिहीणं किंवा काही सांगणं म्हणजे ज्योतीने तेजाची आरती करण्यासारखं आहे. चंदन जसं स्वतः झिजून दुसऱ्याला सुगंध देतं ना, अगदी तसंच आमच्या सरांचंही जीवन आहे. स्वतःचा विचार न करता सतत ते दुसऱ्यांसाठी झटत असतात. सतत काहीना काही करत असतात. त्यांच्या उत्साहाबद्दल विचाराल तर आमच्यासारख्या तरूण मंडळींनासुध्दा लाजवेल असं त्यांचं उत्साही, कर्तृत्ववान व्यक्तीमत्व. दुसऱ्यांना मदत करणं, त्यांच्या शंकांचं निरसन करणं, कोणत्याही अवघडात अवघड गोष्टींची अगदी सहजपणे उकल करून ती समजावून सांगणं ही त्यांच्या दृष्टीने ईश्वरीसेवाच आहे.

या ईश्वरीसेवेचाच एक भाग म्हणजे या 'मना सज्जना' ची निर्मिती. सार्थ मनाचे श्लोक अनेक लेखकांनी लिहीले आहेत. पण दिवसाला एक पान म्हणजे दैनंदिन मनाचे श्लोक हे लिहीणारे आपले सर म्हणजे पहिलेच लेखक असावेत. समर्थांना मनाच्या श्लोकांच्या द्वारे नेमकं काय म्हणायचं आहे? हे सरांनी 'मना सज्जना' या पुस्तकाद्वारे आपल्यासमोर मांडलं आहे.आपल्यासारख्या लोकांचा विचार करता सरांनी 'मना सज्जना'च्या द्वारे ज्ञानाचं भांडारच खुलं करून ठेवलं आहे. काय घ्यायचं, किती घ्यायचं हे सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून आहे.

'मना सज्जना' ही एक दैनंदिनी असल्यामुळे वाचायला कंटाळा येत नाही. आपल्या भाषेतच सांगायचं झालं तर 'बोअर' होत नाही. कारण या श्लोकांचा अर्थ समजावून सांगताना प.पू. सरांनी अधूनमधून काही कथांचाही येथे उल्लेख केला आहे. या पुराणांतील कथा आपल्यासारख्या तरूण पिढीला वाचायला, ऐकायला खूप छान वाटतात. त्यामुळे एक-एक पान जर नित्यनियमाने न चुकता वाचलं तर निश्चितच या श्लोकांचा अर्थ आपल्याला कळण्यास मदत होईल.

'मनाचे श्लोक' हे दिसायला जरी सोपे व साधे वाटत असले तरी ते समजून आचरणात आणण्यास फार कठिण आहेत. म्हणूनच आमच्यासारख्या तरूण पिढीला समजेल अशा साध्या व सोप्या भाषेत सरांनी 'मना सज्जना' हे पुस्तक लिहीलं आहे. कोणतीही गोष्ट गांभीर्याने करण्यापेक्षा हसत-खेळत केली की पटकन समजते असं म्हणतात. म्हणूनच निरनिराळ्या कथांचा समावेश करून सरांनी येथे काही उपदेशपर बोध केला आहे. त्यामुळे कथांच्या मार्फत केलेला उपदेश हा सहज लक्षात राहायला मदत होते. हीच आमच्या सरांची खासियत आहे की समोरची व्यक्ती कोणत्याही पातळीवर असली तरी ते तिच्या पातळीवर जाऊन त्या व्यक्तीला समजेल अशा सोप्या भाषेत समजावून सांगू शकतात. 'मना सज्जना' हे तरूण पिढीच्या पातळीवर येऊन, त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत लिहीलेलं पुस्तक असल्यामुळे आम्हां तरूण पिढीवर सरांनी फार मोठे उपकार केले आहेत. त्यासाठी आम्ही शतशः त्यांचे ऋणी आहोत.

दुसऱ्यांवर सतत कृपेचा वर्षाव करणाऱ्या सरांबद्दल एवढंच म्हणता येईल -

स्वार्थ सांडून प्रपंचाचा ।
हव्यास धरिला परमार्थाचा ।
अंकित होईन सज्जनाचा ।
म्हणे तो मुमुक्षु ।।

माझ्यासारख्या अनभिज्ञ मुलीला 'मना सज्जना' या पुस्तकाची प्रस्तावना लिहीण्याची संधी दिल्याबद्दल मी सरांची अत्यंत ऋणी आहे.


।।श्रीराम।।

कु. सुवर्णा सुरेश वाणी
१७/२, जय नवनाथ हौ.सो.
संत नामदेव पथ, वसंतवाडी,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१

दूरभाष - २४२३१०१



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।**
**नमू शारदा मूळ चत्वार वाचा । गमू पंथ आन्नंत या राघवाचा ।।१।।**

मनोबोध या मनाला केलेल्या २०५ श्लोकातील उपदेशाचा आपण अभ्यास करणार आहोत. प्रथम मनालाच हा उपदेश का केला ते समजावून घेऊया. कृती व मूळ विचार आणि तो करण्याची जागा म्हणजे मन. हे मन अतीशय चंचल असतं कारण त्यात वेगवेगळे विचार येत असतात. आपल्या मनाला सर्व काही हवंहवंसं वाटतं आणि ते कसं मिळवावं याचा ते विचार करत बसतं व त्याप्रमाणे ते आपल्याला कृती करायलाच लावतं. तसंच या मनाला काही केल्या आहे त्या स्थितीत समाधान वाटत नाही. त्याला नवीन गोष्टींची सतत ओढ असते. त्याला नव्याचा हव्यासच असतो म्हणाना. पण नवी वस्तू मिळवल्यावर मात्र तिची गोडी कालांतराने कमी होऊ लागते व ती वस्तू जुनी झाल्यावर तर मनाला तिचा कंटाळाच येऊ लागतो व दुसरी वस्तू हवीशी वाटते. हे रहाटगाडगं सतत चालूच रहातं. तेव्हा अशा या चंचल मनाला ईश्वराच्या ठिकाणी स्थिर करण्यासाठी समर्थांनी हे २०५ श्लोक लिहिले आहेत.

यात समर्थांनी सांगितलं आहे की आपण जर या मनाला आपल्या ताब्यात ठेवू शकलो तर मग कोणतीही कृती आपण योग्य विचारानंतरच करु. म्हणजे कोणत्याही प्रसंगाचं आपल्याला ज्ञान झालं की आवश्यक असल्यास आपण त्यावर सर्व बाजूनी साधकबाधक विचार करुन मगच योग्य तो निर्णय घेऊन त्याप्रमाणे आपण अचूक कृती करू शकतो. पण यासाठी सतत या मनाचे गुणधर्म कोणते व त्यात कसले विचार येतात याचं क्षणोक्षणी न कंटाळता चिकाटीने निरीक्षण करावं लागतं. त्यांचा नीट अभ्यास करून मगच त्यातले नको ते विचार सोडून देण्याची व योग्य विचारांचा पाठपुरावा करुन त्याप्रमाणे वागण्याची सवय अंगी बाणवावी लागते. हा अभ्यास सतत केला तर मनाचा चंचलपणा कमी होऊन ते हळूहळू ईश्वरमय होऊ लागतं. यासंबंधी तुकाराम महाराज म्हणतात,

'असाध्य ते साध्य । करिता सायास । कारण अभ्यास । तुका म्हणे ।।

तर अशा मनावर विजय मिळवलेल्या माणसासंबंधी ते म्हणतात.

शूर एक भूमंडळी । जो अपुल्या मनाते गिळी ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## मंगळवार

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।**
**नमू शारदा मूळ चत्वार वाचा । गमू पंथ आनंत या राघवाचा ॥१॥**

मनाच्या या पहिल्या श्लोकात प्राचीन परंपरेप्रमाणे समर्थांनी मंगल आचरण असण्यासाठी आवश्यक असलेलं ईश्वरस्मरणाचं मंगलाचरण केलं आहे. त्यासाठी त्यानी प्रथम गणेश व शारदा यांचं स्वरूप सांगून त्यांना मनोभावे नमन केलं आहे. नमन करण्याचा परिणाम न मन म्हणजे मन नाहीसं करण्यात होतो. म्हणजेच नमनाने मन निर्विचार होतं. नंतर त्यानी या श्लोकांचा हेतू सांगितला तो म्हणजे अनंत अशा राघवांच्या भक्तींच्या मार्गाने जाणं. **''गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा''**, गणाधीश म्हणजे शंकराच्या गणांचा किंवा इंद्रिय-गणांचा अधिपती असलेला असा गणपती. हा सर्व गुणांचा सुद्धा ईश म्हणजे स्वामी आहे. या गुणांमध्ये सजीवांचे, निर्जीवांचे आणि प्रकृतीचे तीन गुण (सत्व, रज, तम) यांचा समावेश होतो. तर अशा गजाननास समर्थांनी वंदन केलं आहे. ते पुढे म्हणतात, **''मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा''** विश्वातील एका गोष्टीचा आरंभ दुसऱ्या गोष्टीपासून होत असला तरी सर्वच वस्तूंचं मूळ गणपती हा (ईश्वर) आहे आणि हाच गणपती दुसऱ्या बाजूने निर्गुण, निराकार अशा आत्मस्वरुपाचंही मूळ म्हणजे आरंभ आहे.

गणेशाचं वर्णन केल्यानंतर समर्थांनी त्याची पत्नी शारदा, जिला आपण विद्येची देवी, सरस्वती असं मानतो, अशा शारदेला वंदन केलं आहे. बुद्धीची देवता गणपती व विद्या आणि कला यांची देवता सरस्वती, या दंपतीला सामान्य माणसांच्या वतीने वंदन करण्यात समर्थांच्या बुद्धीचं खरोखर कौतुक वाटतं. कारण पतीचा मोठेपणा ऐकताना पत्नीला आणि तिच्या गुणांची प्रशंसा ऐकताना पतीला आतून गुदगुल्या होतात. हे व्यावहारिक सत्य समर्थांनी उभयतांच्या वंदनातून प्रकट केलं आहे. ते पुढे म्हणतात ''चत्वार वाचा'' परा, पश्यंती मध्यमा, वैखरी या चार वाणी किंवा वाचा यातून सरस्वतीचं अस्तित्व प्रकट होत असतं. आपण दुसऱ्याला समजावं म्हणून मोठ्याने बोलतो त्याला वैखरी म्हणतात. पण आपण स्वतःशीच जेव्हा बोलतो तेव्हा त्याला मध्यमा किंवा उपांशु म्हणतात. आपण जेव्हा विचार करतो तेव्हा त्याला पश्यंती म्हणतात आणि हा विचार मनात येण्याच्या अगोदर ज्या अव्यक्त स्थितीत असतो तिला पलीकडची म्हणजे परा वाणी असं म्हणतात.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।**
**नमू शारदा मूळ चत्वार वाचा । गमू पंथ आनंत या राघवाचा ।।१।।**

अशा तऱ्हेने गणपती व शारदा यांना वंदन करून पुढे समर्थ म्हणतात. "गमू पंथ आनंत या राघवाचा", येथे राघव म्हणजे राम, म्हणजे समर्थांचं उपास्य दैवत व सद्गुरू असा सगुण दाशरथी राम असा अर्थ होतो. पण या सगुण रामाचं अवतारी अस्तित्व काही कालापुरतंच मर्यादित आहे. पण समर्थांनी "अनंत राघव" असा शब्द वापरला आहे. म्हणजे माणसाने सगुण अशा रामाची उपासना करुन त्याची कृपा संपादन केल्यावर त्याच्या निर्गुण स्वरूपाशी म्हणजे आत्मारामाशी एकरूप होण्याचा अभ्यास करावा असं ते म्हणतात. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात, 'राम राम राम अवघेची म्हणती । कोणी न जाणती आत्माराम ।। आत्माराम म्हणजे जो मर्यादेच्या पलीकडे आहे असा ईश्वर. सगुण साकार अशा दाशरथी रामाची भक्तीच आपल्याला निर्गुण निराकार अशा आत्मारामापर्यंत घेऊन जाऊ शकेल अशी समर्थांची पूर्ण खात्री आहे. म्हणूनच आपण सर्वांनी हा आत्मस्वरूपी राघवाकडे जाण्याचा मार्ग आक्रमावा अशी समर्थांनी आमच्या मनाला कळकळीची विनंती केली आहे. यावरून आपल्या असं लक्षात येईल की आत्मसुखाइतकं दुसरं उच्च आणि श्रेष्ठ असं सुख नाही. तरी प्रत्येकाने ते सुख मिळवण्यासाठी जास्तीत जास्त साधना करावी व आत्मानंद लुटावा. कारण अध्यात्म हे दुसऱ्याला सांगण्यापेक्षा किंवा दुसऱ्याकडून ऐकण्यापेक्षा स्वतःच त्याचा अनुभव घ्यावा हे सगळयात उत्तम. आत्मानंद हा अलौकिक असून त्याचा स्वतः अनुभव घेतल्याशिवाय तो कळणारा नसतो.

इतर अज्ञानी जीवाना आत्मज्ञान होईपर्यंत किती अवस्थामधून जावं लागतं व मार्ग किती दुष्कर, खडतर आहे याची समर्थांना पूर्ण जाणीव आहे. म्हणून समर्थांनी मनाला कोणत्याही प्रकारची बळजबरी केली नाही किंवा हुकूम केला नाही वा आदेश दिला नाही तर त्याला समजावून ते म्हणतात की हे मना, आपण दोघे म्हणजे मी व तू असे या मार्गाने प्रवास करूया. यासाठी त्यांनी गमू म्हणजे जाऊया हे क्रियापद वापरलं आहे. यातूनच आपल्याला समर्थांच्या प्रेमळपणाची जाणीव होते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।**

या श्लोकात समर्थांनी मनाला समजावून सांगितलं आहे की हे सज्जन मना, तू भक्तीच्याच मार्गाने जा. या मार्गाने तू जाशील तर तुझ्या भावानुसार तुला ईश्वराची प्राप्ती होईल. यासाठी प्रथम तुला सज्जनानी ज्यांची निंदा केली आहे अशा गोष्टी तुला सोडून द्याव्या लागतील व त्यानी ज्या गोष्टी कराव्याच असं आवर्जून सांगितलं असेल त्या सर्व तुला श्रद्धेने कराव्या लागतील.

राघवाचा पंथ म्हणजे आत्मारामाला जाणण्याचा मार्ग. त्यासाठी मनाने भक्तीच्या मार्गाचाच स्वीकार करावा असं समर्थ म्हणतात. आपल्याला जेव्हा एखाद्या ठिकाणी जायचं असतं तेव्हा तिथे जाण्यासाठी आपल्याला अनेक छोट्या मोठ्या वाटा लागतात. त्यातल्या काही सुखदायक तर काही त्रासदायक असतात. अशा वेळी पुढचा विचार करून आपण योग्य त्या मार्गाचाच स्वीकार करतो. तसंच जर आपल्याला ईश्वरप्राप्तीची खरंच तीव्र ओढ असेल तर आपल्याला त्यासाठी भक्तिमार्गाचाच अवलंब करावा लागेल.

या मार्गावरील मुक्कामाचं शेवटचं ठिकाण असेल राघवाची प्राप्ती. राघव म्हणजे रघूच्या वंशातील श्रीराम या नावाचा विष्णूचा म्हणजे श्रीहरीचा एक अवतार. हा श्रीराम मानवदेहधारी असल्यामुळे तो व त्याचे गुण हे सीमित, मर्यादित आहेत व ते काही काळापुरतेच आहेत. पण श्रीराम या शब्दाचा आत्माराम हा दुसराही अर्थ समर्थांना अभिप्रेत आहे. हा आत्माराम हा असीम स्वरूपाचा आहे हे सांगण्यासाठी त्यांनी पहिल्या श्लोकात आनंत हा शब्द वापरला आहे. अनंत (अन् + अंत) म्हणजे ज्याला सीमा, मर्यादा किंवा अंत नाही. हे विश्व सांत (स + अंत) म्हणजे मर्यादित आहे पण त्याचा निर्माता आत्माराम हा अनंत आहे. तसेच हा कालातीत म्हणजे कालाच्या पलीकडचा आहे. त्याला वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ या तीन काळांची बाधा होत नाही. म्हणून याला त्रिकालाबाधित असंही म्हणतात. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात 'राम तो कालचा सुत दशरथाचा । अनंत युगींचा आत्माराम ।।

वास्तविक हे तीनही काळ यानेच निर्माण केलेले आहेत. विश्वातील घडणाऱ्या घटनांच्या रुपाने ते आपल्याला जाणवत असतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।**
**जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।**

या श्लोकात समर्थांनी मनाला सज्जन म्हटलं आहे. सज्जन म्हणजे सत् जन. ज्यांच्या अंगी चांगले गुण आहेत, जे अतिशय सरळ, साध्या स्वभावाचे आहेत, ज्यांच्या ठिकाणी द्वेष, मत्सर, क्रोध इत्यादि दुर्गुणांचा लवलेशही नसतो, त्यांना आपण सज्जन असं म्हणतो. त्यांचं एकच ध्येय असतं ते म्हणजे साधनेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती व आत्मारामाची अनुभूती. त्यासाठी ते ईश्वराच्या ठिकाणी आपलं मन स्थिर करतात. ईश्वराची अनुभूती झाल्यावर ते इतराना निरपेक्ष भावनेने मदत करतात. साधकाना उपदेश करतात व सर्वांशी प्रेमाने वागतात.

आपलं मानवी मन हे सुद्धा मुळात शुद्ध, निर्मळ, पवित्र निरामय, मृदु आणि कोमल आहे. पण त्यावर जन्मोजन्मीचे चांगले वाईट संस्कार इतके प्रबळ झालेले आहेत की मुळात आपलं मन इतकं शुद्ध, स्वच्छ आणि मोकळं आहे याचा आपण विचारसुद्धा करू शकत नाही. त्यामुळे मनाच्या या मूळ स्वरूपाची जाणीवसुद्धा त्याला होऊ शकत नाही. म्हणूनच समर्थांनी मोठ्या प्रेमाने मनाला त्याच्या मूळच्या सज्जनपणाची जाणीव करून दिली आहे. आपल्या मानवी मनाचा चंचलपणा किती आहे हे आपल्या सर्वांना चांगलंच ठाऊक आहे. अशा या चंचल मनाला जर आपल्या ताब्यात ठेवायचं असेल तर त्याला गोड गोड शब्दानी प्रसन्न ठेवून, त्याचे गुण गावून, त्याला प्रोत्साहन देऊनच आपण त्याला भक्तिमार्गाकडे वळवू शकतो. जर आपलं मन प्रसन्न असेल तरच त्याला आपण कोणतीही कठीण गोष्ट करण्यास भाग पाडतो व त्यात आपण यशस्वी होऊ शकतो.

सत् या शब्दाचा आणखी एक अर्थ आहे. सत् म्हणजे ज्यात कसलाही बदल होत नाही असं अस्तित्व, म्हणजे असणेपणा. म्हणून सज्जन म्हणजे ज्याचं लक्ष सत् वर म्हणजे सदैव अस्तित्वावर केंद्रित झालेलं असतं असा माणूस.

या सर्व गोष्टींसाठी समर्थांनी मनाला सज्जन म्हटलं आहे. तर यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात,

मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।
जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।

समर्थांनी मनाला भक्तीच्याच मार्गाने जावं असं सांगितलं आहे कारण इतर मार्गापेक्षा भक्तिमार्ग हा अतिशय सोपा आहे. तो मनाला यत्किंचितही कष्ट किंवा त्रास देत नाही. आपल्या शास्त्रात ईश्वरप्राप्तीसाठी चार मार्ग सांगितले आहेत. १) कर्मयोग २) राजयोग ३) ज्ञानयोग आणि भक्तियोग.

१) कर्मयोग - कर्मयोग म्हणजे कर्माच्या फळाचा मानसिक त्याग करून निरपेक्ष भावनेने कर्म करणं. म्हणजे केलेल्या कर्माचं फळ आपल्या मनासारखं किंवा मनाविरुद्ध कसंही मिळालं तरी मनाचा समतोल किंवा शांती ढळू न देणं. भगवान् श्रीकृष्णानी गीतेत सांगितलं आहे की कर्मणि एव अधिकारः ते मा फलेषु कदाचन ।

याचा अर्थ तुझा फक्त कर्म करण्यावर अधिकार आहे पण त्याचं फळ काय मिळावं हे तुझ्या हातात नाही. माझ्या हातात आहे. आता कर्मयोगात मी कर्म करतो ही भावना असल्यामुळे अत्यंत सूक्ष्म प्रमाणात का होईना पण मीपणा हा शिल्लक उरतोच. पण भक्तियोगात हे कर्म मी करीत नसून ईश्वरी संकल्पानुसार ते माझ्याकडून करवून घेतलं जातं आणि कर्मातून ईश्वरी शक्तीचंच प्रकटीकरण होत असतं असा भाव असल्यामुळे त्यात मी पणाला थोडासाही शिरकाव मिळत नाही.

२) राजयोग - राजयोगात जीव (द्रष्टा) आणि ईश्वर (स्वरूप) याचं मीलन अष्टांगयोगाच्या अभ्यासाने म्हणजे स्वतःच प्रयत्नाने घडवून आणायचं असतं. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी ही राजयोगाची आठ अंगं आहेत. याची सुरवात 'अथ योग अनुशासनम्'' या सूत्राने होते. अनुशासन म्हणजे प्रयत्न. आता यातही मी व माझे प्रयत्न हे आलेच. शिवाय योगमार्गाच्या अभ्यासात खूपच कष्ट असतात. मनावर खूप बळजबरी करावी लागते. त्यामुळे सामान्य माणसं योगाचा अभ्यास करू शकत नाहीत आणि सुरवात केलीच तरी त्यात शेवटपर्यंत पोहोचणं कठीण असतं. पण भक्तियोगात ईश्वरी संकल्पात असल्यास शक्तीचं एक मर्यादित रूप (जीव) तिच्या अनंत रूपाशी (स्वरूप) मीलन पावतं असा साधकाचा मीपणाविरहीत भाव असतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।**
**जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।**

३) ज्ञानयोग - ज्ञानयोग हा 'ब्रम्ह सत्य जगन्मिथ्या' या तत्वावर आधारलेला आहे. यात ज्ञानेंद्रियांच्या मदतीने भासणारे हे जग मिथ्या म्हणजे खोटं मानून, ज्यामुळे ही बुद्धी कार्य करु शकते ते ब्रह्म सत्य आहे असं मानून तशी साधना करावी लागते. पण अशी साधना करणं सामान्य संसारी माणसाना, विशेषतः स्त्रियांना अशक्यच आहे. कारण नऊ मास उदरी वाहून व पदरी वाढवून लहानाचा मोठा केलेल्या पोटच्या गोळ्याला मिथ्या म्हणजे खोटं (भ्रम) असं मानायला त्यांचं मन धजत नाही. त्यामुळे सामान्य माणसं अशा साधनेच्या वाट्याला सहसा जात नाहीत. पण भक्तिमार्गात हे जग, त्यातील सर्व सजीव व निर्जीव वस्तू ही ईश्वरी शक्तीचीच रूपं आहेत असं समजल्यामुळे भक्ताला ते जग ईश्वराइतकंच सत्य आहे असं मानायला काहीच अडचण येत नाही.

अशा तऱ्हेने तीनही योगातील उणीवा या भक्तियोगात भरून काढल्या जातात. म्हणून समर्थ मनाला हे सज्जन मना तू भक्तिमार्गानेच जा असा प्रेमळ आग्रह करतात.

**'तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।'**

या ओळीत स्वभावे म्हणजे स्वतःच्या मनात जसा भाव असेल त्या भावानुसार तुला ईश्वरप्राप्ती होईल असं समर्थ म्हणतात. उदा. माणसाला जर डोळे मिटून देवाच्या मूर्तीचं ध्यान करता आलं तर त्या ध्यानानेच त्याला ईश्वरदर्शन होऊ शकेल. पण त्याला जर नामाची आवड असेल तर नामाने त्याची चित्तशुद्धी होऊन त्यातून त्याला ईश्वरप्राप्ती होईल व सर्वत्र ईश्वर जाणवू शकेल. त्यासाठी तो देवाचं नाम अगोदर वैखरी वाणीत घेऊन नंतर मग तो ते पश्यंती वाणीत घेऊ शकेल.

जर एखाद्या बुद्धिवान माणसाला चिंतन, मनन, याची आवड असेल तर तर्कशास्त्राच्या आधाराने पायरीपायरीने विचार करून सर्वत्र ईश्वरच आहे म्हणजे विश्व हे ईश्वराने धारण केलेलं रूप आहे असं तो प्रथम समजून घेईल व तसा क्षणोक्षणी विचार करून मग त्याच्या मनाला सर्वत्र ईश्वराचीच अनुभूती येईल.

म्हणजेच या भक्तिमार्गात जेथे जेथे आपलं मन रमेल तिथला ईश्वरभाव आपल्या जाणीवेत येईल व असं क्षणोक्षणी घडलं की आपल्याला सदैव ईश्वराची अनुभूती येत राहील म्हणून समर्थ मनाला भक्तिमार्गानेच जायला सांगतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।**
**जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।**

**''जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे.''**

इथे जनी याचा अर्थ सामान्य प्रापंचिक माणसं असा न करता सज्जन, सत्पुरुष संत, भक्त असा घेतला पाहिजे. म्हणून अशा लोकांना जे निंद्य असं वाटतं ते सर्व मनाने सोडून द्यावं असं समर्थ त्याला सांगत आहेत. यात शरीर, मन व बुद्धी दुषित करणारे सर्व विचार व आपल्याला आणि दुसऱ्याला त्रास देणारी सर्व कर्मं यांचा समावेश होतो. उदा. शरीर स्वच्छ न ठेवणं. होळीत एकमेकांच्या अंगावर विषारी व घाणेरडे रंग उडवणं. सिगरेट, तंबाखू, गुटका, जर्दा, दारु, गांजा, चरस, अफू, कोकेन, हेरॉइन इत्यादि अमली पदार्थांचं सेवन करणं, दुसऱ्याची शारिरिक हिंसा करणं, या गोष्टी निंद्य आहेत. तसंच दुसऱ्याची निंदा करणं त्याला लागेल असं बोलणं, भांडण करणं या वाचेच्या पातळीवर निंद्य आहेत. दुसऱ्याचं वाईट कसं करता येईल याचा सतत विचार करणं हे मनाच्या व त्याच्या नाशाचा बेत आखणं हे बुद्धीच्या पातळीवर निंद्य आहे. तेव्हा या व अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टी मनाने करू नयेत असं समर्थ मनाला बजावीत आहेत.

**'जनी वंद्य ते सर्व भावे करावे'**

जसं एखादा मार्ग प्रवासासाठी तयार करायचा असेल तर प्रथम त्यातील खड्डे बुजवावे लागतात व तो मार्ग सपाट करावा लागतो. नंतर त्यावर डांबर किंवा सिमेंट पसरून तो गुळगुळीत करावा लागतो. मग त्यावरून मजेत प्रवास करता येतो, किंवा ज्याप्रमाणे एखाद्या भांड्यात पाणी साठवायचं असल्यास प्रथम त्या भांड्याला पडलेली भोकं अगोदर बुजवावी लागतात. मग त्या भांड्यात पाणी भरता येतं. त्याप्रमाणे सज्जनाना निंद्य असलेल्या सर्व गोष्टींचा त्याग केल्यावर ताबडतोब समर्थ सांगतात, सज्जनाना वंद्य असलेल्या गोष्टी मोठ्या प्रेमाने कराव्या. यात परोपकार, दुसऱ्याचं हित करणं, त्याला मदत करणं, आपल्या षड्विकाराना ताब्यात ठेवणं, समाजाच्या उत्कर्षासाठी तळमळ असणं, महान व्यक्तीविषयी आदर असणं, निरपेक्ष बुद्धीने ज्ञानदान करणं, रोगी माणसाची सेवा करणं, ईश्वरप्राप्तीची तीव्र ओढ असणं, नम्र व निरहंकारी असणं व ईश्वरभक्ती करणं वगैरे अनेक इतराना वंदनीय म्हणजे वंद्य गोष्टींचा समावेश असतो. म्हणून या सर्व गोष्टी सतत आवर्जून म्हणजे मोठ्या प्रेमाने कराव्यात असं समर्थ म्हणतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## मंगळवार

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढै वैरवरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।**

**"प्रभाते मनी राम चिंतीत जावा"**

प्रभात म्हणजे पहाट, दिवसाची सुरवात. प्रभा म्हणजे सूर्याचं तेज. म्हणून सूर्याची प्रभा क्षितिजावर यायच्या सुमारास पहाट होते असं म्हणतात.

या ओळीत समर्थ म्हणतात की माणूस दिवसभर कुठल्याही उद्योगात कितीही व्यग्र असला तरी त्याने पहाटेच्या वेळी रामाचं चिंतन करावं. पहाटे का? तर आदल्या रात्रीची झोप पूर्ण झाल्यामुळे त्याचं मन पहाटेच्या वेळी प्रसन्न असतं. ते ताजंतवानं व प्रफुल्लित असतं. कारण त्यावेळी त्याच्यासमोर कोणताही न सुटलेला प्रश्न नसतो. कोणत्याही प्रकारच्या विचाराला सुरवात झालेली नसते. कोणत्याही प्रकारच्या कामाला प्रारंभ झालेला नसतो. मनावर कसलही दडपण नसतं. म्हणून अशा वेळी तो प्रसन्न चित्ताने, आनंदाने व एकाग्रतेने जास्तीत जास्त वेळ रामाचं चिंतन करू शकतो.

याचा अर्थ फक्त पहाटेच्या वेळेसच रामाचं चिंतन करावं व इतर वेळी त्याला विसरून जावं असं समर्थांना म्हणायचं नाही. जसं प्रभात, दुपार व रात्र असे दिवसाचे तीन भाग असतात तसं कोठल्याही कामाचे सुरवात, मध्य व शेवट असे तीन भाग असतात. म्हणजे कोठल्याही कामाची सुरवात ही त्याची प्रभातच असते. म्हणून दिवसभरात आपण जी काही अनेक प्रकारची कामं करत असतो त्या प्रत्येक कामाच्या सुरवातीला आपल्याला रामाचं स्मरण असलं पाहिजे. त्यावेळी आपण मनाशी असं म्हणावं की "हे रामा, मी तुझाच अंश आहे. तुझ्या कृपेनेच या क्षणी मी जिवंत व निरोगी आहे आणि तुझ्या इच्छेनुसारच मी या कामाला सुरवात करीत आहे. या कामात यश देणं किंवा हे काम पूर्ण करुन घेणं हे तुझ्याच हातात आहे. श्रीराम" आपल्याकडे जागे झाल्यावर 'कराग्रे वसते लक्ष्मी । करमध्ये सरस्वती । करमूले तु गोविंद । प्रभाते करदर्शनं । हा श्लोक म्हणण्याची प्रथा आहे. याचा अर्थ उठल्यावर प्रथम हाताचं दर्शन घ्यावं. कारण दिवसभर ते काम करतात. सर्व कामांच्या सुरवातीला प्रथम गोविंदाचं स्मरण करावं (मूल) त्यानंतर सरस्वतीच्या मदतीने त्या कामाचं योग्य असं ज्ञान करुन घ्यावं (मध्य) आणि नंतर ते काम पूर्ण करुन त्यातून लक्ष्मीच्या कृपेने आवश्यक तेवढी संपत्ती मिळवावी.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।**

पहाटे ४-४० च्या ब्राह्ममुहूर्तावर आपण रामाचं असं चिंतन करावं. हे रामा, तू सर्वनिर्माता, सर्व-नियंता, सर्वज्ञानी, सर्व-व्यापक, सर्वशक्तिमान आणि आमच्यासारख्या भक्तांसाठी परमप्रेममय असा आहेस. तूच आम्हाला सदगुरु रूपाने मार्गदर्शन करतोस. तुझे उपकार कसे फेडावे? फेडणं अशक्यच आहे.

हे श्रीरामा, तूच मला आईच्या उदरात ९ महिने वाढवलंस व सुखरूपपणे या जगात प्रवेश दिलास. जन्मानंतर आईच्या शरीरात माझ्यासाठी दुधाची सोय केलीस व तिच्या मनात माझ्याविषयी प्रेमपान्हा निर्माण केलास. तूच मला तिच्या रूपाने लहानाचं मोठं केलंस. आईवडीलांच्या रूपाने तूच मला योग्य शिक्षण दिलंस. माझ्यावर सुसंस्कार केलेस व माझ्या अन्नोदकाची व कपड्यांची सोय केलीस.

हे राघवा, माझं जीवन तुझ्या कृपेने ओतप्रोत भरलेलं आहे. फार काय, माझा श्वासदेखील तुझ्याच कृपेने चालतो. मी खाल्लेल्या अन्नाचं पचन देखील तुझ्याच किमयेमुळे होत असतं. मी तुझा अपार ऋणी आहे. हे रघुराया, जगातील सर्व बुद्धिमान शास्त्रज्ञांची मती गुंग व्हावी असं सुंदर शरीर आणि कुशाग्र बुद्धी तू मला दिली आहेस. तूच मला इंद्रियांच्याद्वारा सुखदायक संवेदनांचा रसिकपणे आस्वाद घेण्याची वृत्तीही दिली आहेस. ज्ञान मिळवून ते लोकांना वाटावं, तसंच इतरांना मदत करून जगाचं कल्याण करावं असा सुविचार करणारं मन तूच मला दिलंस. तूच मला दया, शांति, आनंद वगैरे भाव निर्माण करणारं हृदय दिलं आहेस. तसंच तूच मला कलांचा आस्वाद घेणारं रसिक व्यक्तिमत्व दिलं आहेस. मी तुझ्याबद्दल वाटणारी कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करू?

हे रामराया, तूच माझं सर्वस्व आहेस. माझं तुझ्यावर अलोट व निःसीम प्रेम आहे. व्यावहारिक प्रेमाला विरहाचं ग्रहण कधी ना कधी लागतंच. पण तू नाहीस असं कधीच होत नाही. म्हणून माझ्या तुझ्यावरच्या परिपूर्ण प्रेमाची सदैव पौर्णिमाच असते. जसा सूर्याला अंधार अज्ञात असतो तसं माझ्या तुझ्यावरच्या प्रेमाला विरह माहितच नसतो. म्हणून या विश्वातल्या तुझ्याच शक्तीने धारण केलेल्या सर्वच सजीव व निर्जीव रूपांवर माझं विलक्षण प्रेम आहे. ही तुझी सर्वच रूपं मला एक आगळावेगळा व अनोखा आनंद मिळवून देतात तेव्हा तूच आनंदाची खाण आहेस, म्हणून तुझं सदैव स्मरण करावं असा मला ध्यास लागतो.

अशा प्रकारे किंवा आपल्याला आवडेल तसं रामाचं चिंतन रोज पहाटे करीत जावं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।**

**"पुढे वैखरी राम आधी वदावा"**

दुसऱ्या ओळीत समर्थ सांगत आहेत की याप्रमाणे रामाचं चिंतन झाल्यावर मग पहाटेचा उरलेला वेळ आपण वैखरी वाणीने रामाचं स्मरण करण्यात घालवावा. पहाटेची वेळ अत्यंत शांत असते. भोवतालच्या आवाजाच्या दुनियेला अजून जाग आलेली नसते. रस्त्यावरील वाहनांची रहदारी सुरु झालेली नसते. पक्ष्यांची किलबिल सुरू व्हायला अजून अवकाश असतो. म्हणून अशा सुयोग्य वेळेला संस्कृत भाषेमध्ये ब्राह्ममुहूर्त असं नाव असलं तरी हीच वेळ रामाच्या स्मरणाला योग्य असते म्हणून आपण त्याला रामप्रहर असं उचित नाव दिलं आहे. हे रामप्रहरी केलेलं रामाचं स्मरण मनातल्या मनात न करता त्यासाठी वैखरी वाणीचा उपयोग करावा. म्हणजे कुटुंबातील इतर माणसांवरही त्याचा परिणाम होतो व दिवसभराच्या गडबडीत केलेल्या साधनेपेक्षा पहाटे केलेल्या साधनेचा परिणाम आपल्यावरही कित्येक पटीनी होतो. म्हणून आपल्या शास्त्रात ब्राह्ममुहूर्तावर केलेल्या साधनेला अनन्य साधारण महत्त्व आहे.

हे रामस्मरण कसं करावं? तर हे अनेक प्रकारानी करता येतं. आपल्याला रामनामाचा जप करायचा असल्यास राम, श्रीराम, जय राम, जय श्रीराम, जय जय श्रीराम, श्रीराम जय राम जय जय राम, रघुपति राघव राजाराम, पतीत पावन सीताराम, राम लक्ष्मण जानकी । जय बोलो हनुमानकी' असे अनेक मंगल व पवित्र मंत्र आहेत. यापैकी आपल्याला जो आवडेल तो मंत्र निवडावा व त्याचा वैखरीने जप करून आपली वाणी पवित्र व पावन करावी. किंवा आपल्याला स्तोत्र किंवा गीतं आवडत असल्यास मनाचे श्लोक (मनोबोध) रामरक्षा, रामहृदय स्तोत्र, वाल्मिकी रामायणातील श्लोक, तुलसीरामायणातील दोहे, भावार्थ रामायणातील ओव्या किंवा गीतरामायणातील गीतं म्हणावीत.

समर्थांनी या ओळीत आधी हा शब्द वापरला आहे. आधी म्हणजे आधि-व्याधि. म्हणजेच रोग. तेव्हा आधी-व्याधीच्या आधी म्हणजे कोठल्याही रोगाचा प्रादुर्भाव होणाऱ्या आधी म्हणजे लहानपणीच, समजायला लागल्यावर सहाव्या वर्षापासून रामस्मरण करावं असं समर्थ या ओळीत सांगत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।**

यानंतर जर आपल्याला आवड असेल तर आपण सगुण रामरायाच्या सद्‌गुणाचं चिंतन करावं.

१) रामाचं पित्याच्या आज्ञेचं पालन - कैकयीने राजा दशरथाकडे दोन वरांची मागणी केली. त्यात एका वराने रामाला चौदा वर्ष वनवास व दुसऱ्या वराने भरताला राज्याभिषेक होणार होता. हे ऐकून राजा दशरथ दुःखी झाले. राम महालात आल्यावर कैकयीनेच रामाला या दोन वरांची हकीकत सांगितली.. त्यावेळी राजा दशरथ दुःखाने खाली मान घालून स्वस्थ बसले. त्यांची करुण व दुःखी अवस्था पाहून रामाने कैकयीला सांगितलं, माते, एवढ्या क्षुद्र गोष्टींसाठी तू महाराजाना का त्रास दिलास? नुसतं मला सांगितलं असतंस तरी मी वनात गेलो असतो. असं म्हणून राम वनात गेला.

२) रामाचं बंधुप्रेम - रामाचं आपल्या भावांवर खूप प्रेम होतं वनवासाची चौदा वर्ष पूर्ण झाल्यावर राम अयोध्येला यायला निघाला. तेव्हा त्याने परमप्रिय हनुमंताला सांगितलं की तू नंदिग्रामाला जा आणि भरताला जाऊन भेट. त्याच्या मनात राज्याविषयी यत्किंचितही इच्छा निर्माण झाली असेल तर मला तसं सांग म्हणजे आपण अयोध्येला परत न जाता आपण पुन्हा वनात जाऊ.

३) रामाची सावत्र मातांवरची ममता - चौदा वर्षांचा वनवास संपवून राम जेव्हा अयोध्येला परत आला तेव्हा सर्वांना असं वाटलं की तो प्रथम कौसल्या मातेकडे जाईल. पण रामाने असा विचार केला की कैकेयीमाता ही सर्वात जास्त दुःखी आहे. माझ्या वनवासाला ती निमित्तमात्र झाल्यामुळे तिच्या मनात अपराधाची भावना आहे व सर्व गोष्टींना आपण कारणीभूत आहोत असं समजल्यामुळे ती स्वतःलाच दोषी मानत आहे. तेव्हा तिच्या दुःखाचा प्रथम परिहार करावा म्हणून कौसल्या व सुमित्रामाता यांच्याकडे न जाता राम प्रथम कैकेयीमातेकडे गेला व त्याने चार गोष्टी सांगून तिचं सांत्वन केलं व तिचं दुःख दूर केलं.

४) रामाचं प्रजेवरचं प्रेम - रामाने प्रजेवर पुत्रवत् प्रेम केलं. महाराणी सीता ही रावणाच्याजवळ राहिली असताना रामाने तिचा स्वीकार कसा काय केला? हे प्रजेच्या मनातील विचार समजल्यावर राजा रामाने प्रजेच्या प्रेमासाठी आपल्या प्रियतम निष्कलंक सीतेचा त्याग केला. अशाप्रकारे रामाच्या सर्व गुणांचं आपण अखंड चिंतन प्रेमाने करावं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ।**
**सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।**

**'सदाचार हा थोर सांडू नये तो ।'**

सदाचार म्हणजे सत् असा आचार. म्हणजेच चांगला आचार. संत सज्जनांचा जो आचार असतो त्याला सदाचार असं म्हणतात. हा आचार, असतो तरी कसा? तर असा आचार आदर्श असतो. 'आत्मनो मोक्षार्थं जगद्हिताय च' या एकाच वाक्यात त्याचं वर्णन करता येईल. हे लोक कोणत्याही प्रकारे स्वतःचा स्वार्थ न पाहता दुसऱ्याच्या कल्याणाचाच विचार करतात. त्याच्या हिताचंच चिंतन करतात. हे कधीही भेदभाव करीत नाहीत. हा उच्च, हा नीच, हा गरीब, हा श्रीमंत, हा काळा, हा गोरा, हा सुंदर, हा कुरूप, हा हुशार, हा मठ्ठ, असा कोणत्याही प्रकारचा भेद न करता सर्वांकडे ते एकाच ईश्वरी शक्तीची रूपं या दृष्टीने पहातात. म्हणून ते सर्वांवर प्रेम करतात. सर्वांशी आपुलकीने वागतात. त्याना अडीअडचणीच्या वेळी मदत करतात. संकटात सापडलेल्यांना आधार देतात. अशा तऱ्हेने संत सज्जन सर्वांशी एक अतूट असं प्रेमभावाचं नातं निर्माण करतात. म्हणून त्याला सदाचार असं म्हणतात. असा सदाचार अत्यंत श्रेष्ठ असतो हे सांगण्यासाठी समर्थांनी 'थोर' हा शब्द वापरला आहे.

घन पदार्थासाठी आपण सोडणे आणि प्रवाही द्रव पदार्थासाठी सांडणे असे शब्द वापरतो. उदा. मी बर्फ हातातून सोडला व मी पाणी सांडलं असं आपण म्हणतो. तसं सदाचार ही गोष्ट थोडा वेळ करण्याची नसून एखाद्या प्रवाहाप्रमाणे ती खंडित होता कामा नये हे सांगण्यासाठी समर्थांनी सांडू नये असा शब्द वापरला आहे.


म्हणून जो सकाळी लवकर उठून रामाचं चिंतन व स्मरण करतो व दिवसभर सदाचाराने वागतो त्याचंच जीवन धन्य होतं. यासंबंधी महात्मा कबीर म्हणतात, हे माणसा,

जब तू आये जगतमे तू रोये जग हसे ।
ऐसी करनी कर (जाते समय) जग रोये तू हसे ।।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## रविवार

**मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।**
**मना धर्मता नीति सोडू नको हो । मना अंतरी सार विचार राहो ।।४।।**

**'मना वासना दुष्ट कामा न्‍येरे'**

वासना म्हणजे काय याचा आपण मुळापासून विचार करूया. वासना म्हणजे तीव्र इच्छा. ही संस्कारांतून निर्माण होते. माणसाच्या मनावर जन्मोजन्मींचे झालेले प्रबळ संस्कार असतात. त्यांचा नायनाट करण्यासाठी वर्षानुवर्ष साधना करावी लागते. पण सामान्य माणसाला साधनेपेक्षा या संस्कारातून येणाऱ्या वासना अधिक महत्वाच्या वाटतात, आणि म्हणून यांच्या पूर्तीसाठी तो सतत कर्म करत असतो. यातूनच मग त्या कर्मांच्या फळासंबंधी अपेक्षा निर्माण होतात. पूर्ण झाल्या की आपल्याला सुख होतं व त्या अपुऱ्या राहिल्या की दुःख होतं. या प्रबळ वासना पुऱ्या करण्यासाठी तो नीतीच्या सर्व मर्यादा ओलांडतो. यातूनच मग गुन्हेगारी, अत्याचार, हिंसाचार, खून, दरोडे वगैरे दुष्ट वासना निर्माण होतात. म्हणून समर्थ म्हणतात या वासनांमुळे माणसाच्या जीवनाचा पूर्णपणे नाश होतो. म्हणून हे मना, तुझ्या ठिकाणी अशा तऱ्हेच्या दुष्ट वासना येता कामा नयेत. त्या तुझ्या कोणत्याही कामाला येणार नाहीत.

**'मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।'**

या ओळीत समर्थ म्हणतात की म्हणून हे मना तुझ्या ठिकाणी कोणतीही पापबुद्धी म्हणजे पाप करण्याची इच्छा नसावी. पाप म्हणजे स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला त्रास देणं, त्याचं दुःख वाढवणं व सुख कमी करणं हे तीन प्रकारचं असतं.

१) कायिक :- दुसऱ्याच्या वस्तू चोरणं किंवा बळजबरीने हिसकावून घेणं, दुसऱ्याच्या शरीराला इजा करणं, त्याची विनाकारण हत्या करणं.

२) वाचिक : स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याशी खोटं बोलणं त्याची निंदा करणं, इतरांकडे त्याची नालस्ती करणं.

३) मानसिक :- दुसऱ्याचं वाईट चिंतणं, मत्सर करणं, त्याचा राग येणं, त्याचा द्वेष करणं इत्यादि. स्वाभाविकपणे वाटणारी विषयांची आसक्ती, त्यात इंद्रिय-संयमाचा अभाव, त्यामुळे विषय हस्तगत कशाही प्रकारे करावे असं वाटायला लावणारे काम, लोभ, मोह आदि विकार या सर्वांचं मूळ कारण एकच ते म्हणजे पापबुद्धी. म्हणून समर्थ या ओळीत मनाला सांगतात,

**मना, सर्वथा पापबुद्धी नको रे ।**

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



**सोमवार**

**मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।**
**मना धर्मता नीति सोडू नको हो । मना अंतरी सार विचार राहो**
**।।४।।**

**''मना धर्मता नीति सोडू नको हो ''**

धर्मता म्हणजे धर्म किंवा कर्तव्य. इथे धर्म म्हणजे हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख वगैरे धर्म नसून, धर्म म्हणजे आपलं इतरांच्या बाबतीतील कर्तव्य असा अर्थ आहे. म्हणून यात पितृधर्म, मातृधर्म, पुत्रधर्म, पतिधर्म, पत्नीधर्म, शिष्यधर्म असे अनेक प्रकारचे धर्म येतात. हा अर्थ समर्थांना अभिप्रेत आहे. म्हणून समर्थ या ओळीत म्हणतात की हे मना, तुझं इतरांच्या संबंधातील जे कर्तव्य असेल ते चुकवू नको. जेवढं तुला जमेल तेवढं पार पाडत रहा. त्यात कसूर करू नको.

समर्थ मनाला नीती सोडू नको असाही उपदेश करत आहेत. नीती म्हणजे काय तर दुसऱ्याने आपणाशी जसं वागावं असं आपल्याला वाटतं तसं आपण त्याच्याशी वागणं. उदा. दुसऱ्याने आपणाला फसवू नये असं आपल्याला वाटत असेल तर आपणही दुसऱ्याला फसवू नये. तसंच दुसऱ्याने आपणावर प्रेम करावं असं आपल्याला वाटत असेल तर आपणही दुसऱ्यावर प्रेम केलं पाहिजे. इतरानी आपल्या चुकांबद्दल क्षमा करावी असं आपल्याला वाटत असेल तर आपणही सर्वांना क्षमा करावी. थोडक्यात जशास तसं हा नियम नीतीनियमाना लागू आहे.

म्हणून आपल्या शास्त्रात धर्म आणि नीती यांच्याबद्दल काटेकोरपणे विचार केला आहे. आणि त्यांचे नियमही घालून दिले आहेत.

**''मना अंतरी सार विचार राहो ।''**

सार विचार म्हणजे विचारांचं मूळ किंवा मूळ व महत्वाचा विचार. हा मूळ विचार एकच असू शकतो तो म्हणजे मानवी जीवनाचं साफल्य ज्यात आहे अशी ईश्वरभक्ती. ईश्वरभक्तीचं ध्येय डोळयासमोर ठेवून माणसाने आपलं जीवन घालवावं. एक ना एक दिवस त्याला ईश्वरप्राप्ती होईलच. यासाठीच समर्थ या श्लोकात सांगतात हे मना, तुझ्या ठिकाणी दुसऱ्याला त्रास देण्याची दुष्ट वासना व त्याला त्रास देऊन आपला फायदा करून घेण्याची पापबुद्धी याना थारा देऊ नकोस. त्याऐवजी धर्म (कर्तव्य) व नीती याचं पालन कर, ईश्वरभक्तीचा मूळ विचार तुझ्या अंतरात सदैव असू दे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**मना पापसंकल्प सोडूनि द्यावा । मना सत्य संकल्प जीवी धरावा**
**मना कल्पना ते नको विषयांची । विकारे घडे हो जनी सर्व ची ची ।।५।।**

**"मना पापसंकल्प सोडूनि द्यावा"**

या श्लोकातील तीनही ओळीत संकल्प, कल्पना हे शब्द आल्यामुळे प्रथम त्यांचा अर्थ पाहूया. भविष्यकाळातील वस्तुस्थिती कशी असेल याची माहिती नसल्यामुळे ती कशी असावी, तसंच एखादी वस्तू किंवा माणूस आपल्या दृष्टीआड असल्यास तो आत्ता कसा असेल यासंबधी माणसाच्या मनाने केलेला विचार म्हणजे कल्पना. हा विचार योग्य असल्यास त्याला सम्यग् कल्पना म्हणजे संकल्प असं म्हणतात आणि हा विचार अनिश्चित आणि अयोग्य असल्यास त्याला विकल्प म्हणतात. गेल्या श्लोकात समर्थांनी पापबुद्धी नको असं सांगितलं. पाप म्हणजे स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला त्रास देणं अशी प्रवृत्ती नको. पण प्रत्यक्षात असे विचार मनात आले तर? कारण मन हे विचारांचं उगमस्थान असल्यामुळे मनात बरेवाईट, बरोबरचूक असे सर्व प्रकारचे विचार येणारच. तेव्हा असा पापसंकल्प मनात आलाच तर त्याप्रमाणे काही कृती न करता तो तसाच सोडून द्यावा. व त्याच्याऐवजी सत्यसकंल्प करावा असं समर्थ पुढील ओळीत सुचवीत आहेत.

**'मना सत्यसंकल्प जीवी धरावा'**

सत्य म्हणजे सदैव असणारं व आपलं स्वरूप कधीही न बदलणारं तत्व. व्यवहारात सत्य म्हणजे खरं. खरेपणाने वागल्यास आपला फायदाच होतो. नुकसान होत नाही आणि भक्तिमार्गात सत्य म्हणजे ईश्वर. याला स्मरून वागल्यास आपलं कल्याणच होतं. ईश्वर सर्वत्र आहे. तो या सृष्टीच्या कणाकणामध्ये लपला आहे. तो चराचराला व्यापून उरलेला आहे. 'स्थिरचर व्यापुनि अवघा तो जगदात्मा दशांगुळे उरला.' म्हणून ईश्वर अनंत आहे. शिवाय तो सर्वज्ञानीही आहे. त्याला या सृष्टीत प्रत्येक ठिकाणी प्रत्येक क्षणी काय घडतं याचं ज्ञान होतं. म्हणून माझ्या मनात जर पापसंकल्प आला तर तो त्याला नक्कीच समजेल. त्याने आपल्याला हे जीवन त्याची भक्ती करण्यासाठीच दिलं आहे आणि आपल्या पापसंकल्पाने त्या भक्तीत अडथळा येईल म्हणून हा पापसंकल्प आपण सोडून द्यायला पाहिजे. हा पापसंकल्प आपण कृतीत आणला तर भक्तिमार्गात आपली पीछेहाट किंवा परागती होईल व आपण ईश्वराला अप्रिय होऊ असा 'सत्यसंकल्प' मनात करावा आणि पापसंकल्प सोडून द्यावा. उदा. मंबाजीने बेदम मार दिल्यावरसुद्धा आपल्याला मारून त्याचे हात दुखले असतील म्हणून त्याचे हात चेपायला आपले तुकाराम महाराज गेले होते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**मना पापसंकल्प सोडूनि द्यावा । मना सत्यसंकल्प जीवी धरावा ।**
**मना कल्पना ते नको विषयांची । विकारे घडे हो जनी सर्व ची ची ।।५।।**

**'मना कल्पना ते नको विषयांची ।'**

विषय म्हणजे आपल्याला सुख देणाऱ्या वस्तू. समर्थ आपल्याला तू विषयातील सहज मिळणारं सुख उपभोगू नको असं कधीच सांगत नाहीत तर हे सुख आपल्याला भविष्यकाळात सतत क्षणोक्षणी मिळत राहील अशी कल्पना करू नकोस. त्या सुखाची आसक्ती ठेवू नकोस. तशी अपेक्षाही ठेवू नकोस. समजा उद्या तुझ्या सुदैवाने ही तुझी अपेक्षा पुरी झाली तर त्यातून आणखीन जास्त अपेक्षा निर्माण होतील व त्या पुऱ्या झाल्या नाहीत की मग त्यातून अपेक्षाभंगाचं दुःख निर्माण होईल म्हणजे शेवटी अपेक्षांचा अंत दुःख निर्मितीतच होतो. ईश्वरच या जगाचा नियंता असल्यामुळे आपली अपेक्षापूर्ती किंवा अपेक्षाभंग होणं ही त्याच्या इच्छेनुसार होणारी गोष्ट आहे. ती आपल्या हातातली गोष्ट नाही. म्हणून आपण अपेक्षा किंवा कल्पना केली तर त्यातून नाहक विकारांची निर्मिती होते व हे विचार लोकांत आपली फजीती करतात असं समर्थ पुढील ओळीत सांगतात.

**विकारे घडे हो जनी सर्व ची ची ।**

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता वगैरे वृत्तीना विकार म्हणतात. उदा. माणसाला सुख देणारा एखादा विषय दिसला की त्याची मालकी मिळावी अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात येते. (काम). त्याच्याविषयी आकर्षण, मोह निर्माण होऊन कोठल्याही परिस्थितीत भल्याबुऱ्या, चांगल्यावाईट अशा कोठल्याही मार्गाने तो विषय मिळवलाच पाहिजे असं वाटतं (लोभ) पण भगीरथ प्रयत्न करूनही जर तो विषय मिळाला नाही तर ज्याच्यामुळे तो त्याला मिळाला नाही त्याच्या विषयी प्रचंड राग येतो (क्रोध) व ज्याच्याकडे तो विषय आहे त्याचा हेवा वाटतो (मत्सर). जर तो विषय त्याला मिळाला तर त्याच्या मालकीचा त्याला गर्व वाटतो (मद) तसंच हा विषय आपल्यापासून कोणी हिरावून तर नेणार नाही ना या विचाराची त्याला भीती (भय) वाटते व तो विषय जवळ असेपर्यंत चिंता वाटते. अशा तऱ्हेने या विकारांचा उगम होतो. मग ते मनात ठाण मांडून बसतात व माणसाची ची ची म्हणजे फजीती करतात. हत्ती जेव्हा भीतीने ओरडतात तेव्हा ते ची ची असा चीत्कार करतात. इथे समर्थांनी हा शब्द फजीती या शब्दासाठी वापरला आहे. आपला सर्वांचा अनुभवही विकार फजीती करतात असाच आहे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नाना विकारी ।**
**नको रे मना लोभ हा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभभारू ।।६।।**

**'नको रे मना क्रोध हा खेदकारी ।'**

या ओळीत समर्थ सांगतात की, हे मना तू कधीही रागावू नकोस कारण रागातून नेहमीच फक्त खेद निर्माण होतो. इतर काहीही मिळत नाही.

प्रथम राग कशामुळे येतो ते पाहूया. आपल्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट घडली की त्याला जो जबाबदार असतो त्याचा किंवा आपण सांगितलेलं दुसऱ्याने ऐकलं नाही की त्याचा आणि आपल्या हातून जर काही मोठी चूक झाली तर स्वतःचाच खूप राग येतो. थोडक्यात आपली अपेक्षापूर्ती झाली नाही की राग येतो. राग हा लहानमोठ्याना स्त्रीपुरुषाना, अडाणी-विद्वानाना, सर्वानाच येतो. आपलंच बरोबर आहे व इतराचं चुकतं असं वाटल्यामुळे दोघानांही राग येतो. राग आल्यावर चेहरा लाललाल होतो. आवाज आपोआप चढतो. श्वास जोरात चालू होतो. तोंडातून वाईट शब्द येऊ लागतात. प्रसंगी दुसऱ्याला तो लहान किंवा अशक्त असल्यास मारहाण करण्यापर्यंत सुद्धा मजल जाते. एखाद्या प्रसंगात जर आपलीच चूक असेल तर आपलाच राग येऊन आपण स्वतःलाच शिक्षा करवून घेतो. या रागामुळे आपल्या प्रकृतीवर परिणाम होतो. आपली व दुसऱ्याची मनःशांती ढळते कारण दुसऱ्याचं मन आपण दुखावलेलं असतं. चांगले असलेले संबंध बिघडतात. आपण दुसऱ्याचं तोंडही पहात नाही. राग येऊन गेल्यानंतर मात्र काही वेळाने आपण असे मूर्खासारखे का वागलो असा विचार मनात येऊन आपल्याला खेद किंवा पश्चात्ताप होतो. म्हणून समर्थांनी राग हा खेदकारी आहे असं म्हटलं आहे. अर्थात या पश्चात्तापाचा पुन्हा राग न येण्यासाठी काही उपयोग होत नाही. रागामुळे आपली प्रचंड शक्ती वाया जाते. रागावर नियंत्रण असेल तर ही प्रचंड शक्तीच इतर योग्य ठिकाणी वापरता येते. म्हणून या क्रोधाचे दुष्परिणाम आपल्याला अगदी आतून समजले पाहिजेत. राग हा नैसर्गिक नसून ती एक विकृति आहे. असं आपल्याला पटलं पाहिजे. म्हणून या रागाच्या स्वाधीन होऊ नये म्हणून आपण आपल्या मनाविरुद्ध घटना घडत असतानाच क्षणोक्षणी अत्यंत जागरुक, सावध असलं पाहिजे. तरच आपल्याला राग जिंकता येतो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नाना विकारी ।**
**नको रे मना लोभ हा अंगिकारू । नको रे मना मत्सरु दंभभारू।।६।।**

**'नको रे मना काम नाना विकारी ।।**


या ओळीत समर्थ मनाला सांगतात की हे मना, ज्या कामातून अनेक विकार निर्माण होतात अशा कामाला तू थारा देऊ नकोस. काम या शब्दाचे अनेक अर्थ होतात. मराठीत हात, पाय, वाणी, गुद, उपस्थ या पाच कर्मेंद्रियानी जगाच्या स्थितीत केलेला बदल म्हणजे काम किंवा कर्म. उदा. हातानी लिहिण्याचं, पायानी चालण्याचं, वाचेने बोलण्याचं वगैरे काम केलं जातं. अशी कामं आवश्यक असतीत तरच करावी पण जी कामं विकार निर्माण करतील अशी कामं करू नयेत. उदा. दुसऱ्याला संताप येईल अशा शिव्या तोंडाने देऊ नये. काम या शब्दाचा दुसरा अर्थ कोणतीही इच्छा होणं, वस्तू पाहिल्यावर ती हवीहवीशी वाटणं असा होतो. जिवंत राहण्यासाठी अन्न-वस्त्र, हवा-पाणी या गोष्टींची नितांत गरज असल्यामुळे या वस्तू हव्याशा वाटणं हे स्वाभाविक आहे आणि या इच्छा मनात विकार निर्माण करीत नाहीत. उदा. माणसाला एका ठिकाणी शुद्ध हवा मिळाली नाही तर तो दुसऱ्या ठिकाणी न चिडता शांतपणे जातो.

पण ज्या गोष्टी माणसाला मानसिक किंवा शारीरिक सुख देतात अशा गोष्टीबद्दल त्याच्या मनात आकर्षण निर्माण होतं आणि मग हे सुख आपल्याला भविष्यात सतत मिळत रहावं म्हणून ती वस्तू आपल्या मालकीची व्हावीच अशी तीव्र इच्छा मनात निर्माण होते. या इच्छेला कामना किंवा वासना किंवा ईषणा असं म्हणतात. तसंच स्त्रीपुरुषांमध्ये एकमेकाबद्दल असलेल्या स्वाभाविक आकर्षणालाही कामवासना म्हणतात. या कामनांपूर्तीसाठी आजच्या अर्थव्यवस्थेला अनुसरून माणसाला अर्थप्राप्ती करुन घ्यावी लागते म्हणजे पैसा मिळवावा लागतो. यातून प्रचंड पैसा मिळवावा अशीही कामना निर्माण होते. या सर्व इच्छांच्या पूर्तीसाठी माणसाला प्रचंड प्रयत्न व काबाडकष्ट करावे लागतात. या प्रयत्नाना मिळणाऱ्या अनुकल किंवा प्रतिकूल फळातून म्हणजे यश किंवा अपयशातूनच क्रोध, मोह लोभ, मत्सर, गर्व, भीती, चिंता असे अनेक विकार निर्माण होतात. म्हणून समर्थ मनाला बजावून सांगतात की ज्यातून अनेक त्रासदायक आणि फजीती करणाऱ्या विकारांची निर्मिती होते अशा कामाला हे मना, तू जवळ करू नकोस.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नाना विकारी ।**
**नको रे मना लोभ हा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभभारू ।।६।।**

**'नको रे मना लोभ हा अंगिकारू ।**

या ओळीत समर्थ मनाला निक्षून सांगतात की हे मना, तू या लोभाचा स्वीकार करू नकोस. पण हा लोभ म्हणजे काय? तो कसा निर्माण होतो ते पाहूया. माणसाला एखादी वस्तू दिसते. तिने त्याला पूर्वी सुख दिलेलं असतं. म्हणून त्याला तिने आत्ताही व पुढेही हे सुख द्यावं असं वाटतं. म्हणून त्या वस्तूचं त्याच्या मनात आकर्षण निर्माण होतं. याला मोह असं म्हणतात. मग त्या वस्तूची मालकी आपल्याकडे असावी अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण होते. याला काम असं म्हणतात. मग ती वस्तू मिळवण्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. आता या वस्तूचं आकर्षण दिवसेंदिवस वाढत जातं. त्यामुळे त्याच्या मनात लोभ निर्माण होतो. त्याचा परिणाम म्हणून कोठल्याही मार्गाने, कायदेशीर वा बेकायदेशीर, नीतीच्या किंवा अनीतीच्या मार्गाने, दुसऱ्याला त्रास देऊन सुद्धा ती वस्तू मिळालीच पाहिजे असं त्याला वाटू लागतं. सीतेच्या जबरदस्त आकर्षणामुळे रावणाला तिच्या सौंदर्याचा लोभ सुटला. म्हणून त्याने तिला फसवून लंकेला पळवून नेली व परिणामी रामाबरोबर झालेल्या युद्धात स्वतःचे प्राण गमवावे लागले. शिवाय लंकेचा नाश झाला तो वेगळाच.

**'नको रे मना मत्सरु दंभभारू ।'**

शेवटच्या ओळीत समर्थ मत्सर आणि दांभिकपणा यांचा त्याग मनाला करायला सांगत आहेत. आपल्याला हवीहवीशी वाटणारी गोष्ट ज्याच्याकडे असते, त्याच्याबद्दल आपल्या मनात मत्सर वाटू लागतो. किंवा जे आपल्यापेक्षा उच्च पातळीवर आहेत अशांचाही आपण मत्सर करू लागतो व विनाकारण आपण त्यांच्यावर जळत राहतो. त्याचा अनादर करतो व प्रसंगी त्यांचा द्वेषही करतो. मत्सराच्या पुढची पायरी म्हणजे दांभिकपणा. दंभ म्हणजे जे आपल्याकडे नाही ते आहे असं भासवणं. उदा. कीर्ती, प्रतिष्ठा, मान, प्रसिद्धी यातलं आपल्याकडे काहीही नसताना या सर्व गोष्टी आपल्याकडे असल्याचा दिखाऊपणा करणं. तो करीत असता त्यासाठी पैशाचा अपव्यय करणं. मत्सर आणि दंभ यामुळे आपला प्रत्यक्षात काहीच लाभ होत नाही. सारांश या श्लोकात समर्थ आपल्या मनाला, काम, क्रोध, लोभ, दंभ आणि मत्सर या विकाराना सोडचिठ्ठी देण्याची कळकळीची विनंती करीत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे । मना बोलणे नीच सोशीत जावे ।**
**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकासी रे नीववावे ।।७।।**

या श्लोकात समर्थांनी भक्तीमार्गाला उपयुक्त अशा सद्‌गुणांचा अभ्यास करण्याचा मनाला उपदेश केला आहे.

**'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे'**

धारिष्ट म्हणजे धैर्य. जीवनात माणसाला अनुकूल प्रसंगातून उत्साह निर्माण होतो. तर प्रतिकूल प्रसंगात श्रेष्ठ धारिष्ट म्हणजे उच्च प्रतीच्या धैर्याची आवश्यकता असते. 'आघाती उपजे धारिष्ट ते श्रेष्ठ धारिष्ट' असं एका कवीने म्हटलं आहे. म्हणून जिथे शक्य आहे तिथे संकटाचा प्रतिकार करून व हे शक्य नसल्यास संकटाचे परिणाम शांतपणे सहन करून हे उच्च प्रतीचं धैर्य प्रकट करता येतं.

माणूस रामाच्या भक्तीला सुरवात करतो. यात हळूहळू जसजसा तो पुढे जाऊ लागतो तसतसं इतर माणसाना ते सहन होत नाही. मग ते याची निंदा करू लागतात. त्याचं पाऊल मागे खेचण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांची ही कृती या भक्ताला शांतपणाने खंबीर राहून सहन करावी लागते. यासाठी श्रेष्ठ धारिष्ट अंगी बाणण्याची गरज असते.

**'मना बोलणे नीच सोशीत जावे'**

दुसऱ्याचं बोलणं कितीही कटु असलं, कितीही नीच म्हणजे खालच्या पातळीवरचं असलं, आपल्या मनावर घाव घालणारं असलं तरी ते आपण सहन करावं असं समर्थ म्हणतात. या सहनशक्तीसाठी एक चांगला उपाय आहे. तो म्हणजे शांतपणे पहावं, शांतपणे ऐकावं आणि त्यावर शांतपणे विचार करून अत्यंत आवश्यक असेल तरच बोलावं. आपण असा प्रयत्न सुरु केला तर त्यात आज ना उद्या केव्हातरी आपल्याला नक्कीच यश येईल. यात शंका नाही. एखादा माणूस आपल्याशी बोलतो तेव्हा त्याच्या बोलण्यात वस्तुस्थिती व त्यातून निघालेली एखादी तीव्र भावना याचं बेमालूम मिश्रण झालेलं असतं. म्हणून त्याचं म्हणणं आपण शांतपणे ऐकलं तर त्यातली वस्तुस्थिती आणि भावना वेगळी करून समजावून घेता येते आणि मग त्यातल्या भावनेला प्रत्युत्तर म्हणून आपल्या अहंकारातून निर्माण होणारा प्रतिभावनेचा उद्रेक आपण मुळातूनच थांबवू शकतो व जरूर असल्यास त्यातल्या वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारं व प्रश्नकर्त्याची भावना शांत करणारं प्रत्युत्तर आपण देऊ शकतो. पण याला खूप आंतरिक, सामर्थ्याची गरज असते. यालाच समर्थ 'सोशीत जावे' असं म्हणतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे । मना बोलणे नीच सोशीत जावे ।**
**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसी रे नीववावे ।।७।।**

**'स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे'**

या ओळीत समर्थ आपल्याला सांगत आहेत की आपण नेहमीच नम्रता धारण करुन प्रसन्न वाणीने बोलावं. सर्व साधारणतः माणसाचं बोलणं आपलं कसं बरोबर आहे व मी कसा मोठा आहे हे सांगण्यासाठी आणि आपल्या विविध भावना शब्दांत व्यक्त करण्यासाठी असतं. म्हणून अनेक वेळेला शब्दांच्या जोडीला त्याच्या चेहऱ्यावर पूरक भाव उमटतात व त्याचे हातवारे त्याना मदत करत असतात. पण अशा बोलण्याला प्रत्युत्तर देताना आपण मात्र नेहमी नम्रपणाने, शांत मनाने, स्पष्ट सौम्य गोड व आश्वासक शब्दात बोलावं, आपलं बोलणं दुसऱ्याची निंदा करणारं, दुसऱ्याच्या मनाला लागेल असं, दुसऱ्याला दुःख देणारं, दुसऱ्याला कमी लेखणारं असं नसावं. आपल्या बोलण्यात स्वतःची प्रौढी, गर्व व अहंकार नसावा. तर आपलं बोलणं हे सर्वदा म्हणजे नेहमी दुसऱ्याच्या लहानात लहान गुणाचं सुद्धा कौतुक करणारं, त्याला प्रोत्साहन देणारं व त्याच्या ज्ञानात भर टाकणारं व त्यामुळे ऐकत रहावं असं, दुसऱ्याला वाटावं असं असावं. विनम्रपणा हा आपल्या जीवनाचा स्थायीभाव असावा. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात, नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।'' म्हणजे अनंत अशा ईश्वराला सुद्धा कोंडून ठेवण्याचं सामर्थ्य नम्रपणात आहे. ईश्वराच्या अनंत गुणांचं स्मरण केलं की आपल्या अंगात आपोआपच नम्रपणा येतो व तो वाणीतून प्रकट होऊ लागतो.

**'मना सर्व लोकांसी रे नीववावे।'**

आपला या जीवनात अनेक लोकांशी संबंध येतो. काही आपल्याच वयाचे असतात, काही आपल्यापेक्षा मोठे असतात तर काही आपल्यापेक्षा लहान असतात. काही प्रेमळ असतात तर काही रागीट असतात. काही संतसज्जन असतात तर काही दुर्जन असतात. काही शिकलेले असतात तर काही अज्ञानी, अडाणी असतात. काही तरुण असतात काही प्रौढ असतात तर काही वृद्ध असतात. काही स्त्रिया, काही मुलं तर काही पुरुष असतात. हे सर्व प्रकारचे लोक आपल्या शांतपणाने, आपल्या नम्र व मधुर वाणीने आपल्यावर प्रसन्न होतात. गरम पाणी काही वेळ नुसतं उघड्यावर ठेवलं की ते निवतं तसं आपल्या सहवासात आलेल्या सर्व लोकाना आपण आपल्या सहनशीलतेने, शांततेने, धैर्याने, नम्रतेने 'नीववावे' म्हणजे शांत करावं असं समर्थ आपल्या मनाला सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## मंगळवार

**'देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी । मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।**
**मना चंदनाचे परी त्वा झिजावे । परी अंतरी सज्जना नीववावे ।।८।।**

**'देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी । मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।'**

प्रत्येक माणसाला या नश्वर देहाचा त्याग कधी ना कधी करावाच लागणार आहे. कोठल्याही जिवंत प्राण्याला मृत्यू हा अटळ आहे. सर्वच माणसांच्या आयुष्यात निश्चितपणे घडणारी ही एकमेव घटना आहे. फक्त या घटनेचा काल अनिश्चित असतो व तो माणसाला माहित नसतो. म्हणून ही घटना जीवन संपवणारी असल्यामुळे आपण ती अशुभ मानतो. इतकी की आपण तिचा उच्चारसुद्धा करायला धजत नाही. पण केव्हातरी या घटनेला सर्वांना तोंड द्यावं लागतंच. तो कोणालाही चुकवता येत नाही. "जिवासवे जन्मे मृत्यू जोड जन्मजात । दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत।" असं महाराष्ट्र वाल्मिकी गदिमा म्हणतात. स्वतः समर्थांनी दासबोधात एक अख्खा समास या मृत्यूवर खर्ची घातला आहे. तेव्हा कळायला लागल्यापासून माणसाचा मृत्यू होईपर्यंत जो काळ जातो त्याला माणसाचं जीवन असं म्हणतात. हा काळ प्रत्येकाचा कमी जास्त असा असतो. ज्ञानेश्वर २१ वर्षे तर शंकराचार्य ३३ वर्षे, विवेकानंद ३८ वर्षे, शिवाजी महाराज ५० वर्ष तर स्वतः समर्थ ७३ वर्ष जगले. पण या सर्वांनी मिळवलेल्या कीर्तीचा सुगंध अजून सर्वत्र दरवळत आहे. माणूस गेल्यावर त्याने कुटुंब, इतर माणसं, समाज, राष्ट्र आणि जग यांच्या कल्याणासाठी जे काही केलं असेल त्यावर त्याची कीर्ती मागे शिल्लक उरते. समर्थ पहिल्या श्लोकापासून मनाला भक्तीमार्गाने जाऊन ईश्वरप्राप्ती करून घेण्याचा उपदेश करत असल्यामुळे याही श्लोकात त्याना मनाला असं सांगायचं आहे की हे मना, तू अशा तऱ्हेने तुझं भक्तीमय जीवन घालव की तुझ्या देहाचा त्याग झाल्यानंतर एक महान रामभक्त, संत, मार्गदर्शक देवमाणूस म्हणून तुझी कीर्ती सर्वत्र पसरेल. त्याकरता या जीवनात तुझं ज्ञान, विचार, कर्म, तुझे सद्गुण हे सर्व या मानवजातीच्या कल्याणासाठी वापरले जाऊ देत. तुझं शरीर, वाणी, बुद्धी या सर्व गोष्टी जगाच्या प्रगतीसाठी झिजू देत. या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारे ।" तर कबीर म्हणतात, 'जब तू आया जगतमे, तू रोये जग हसे । ऐसी करनी कर, जग रोये, तू हसे ।।"

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी**
**मना चंदनाचे परी त्वां झिजावे । परी अंतरी सज्जना नीववावे ॥८॥**

**'मना चंदनाचे परी त्वा झिजावे । परी अंतरी सज्जना नीववावे ।'**

माणसाला आपलं जीवन दोन प्रकारानी व्यतीत करता येतं. पहिला प्रकार म्हणजे जीवनातील प्रत्येक क्षण जास्तीत जास्त सुखात घालवण्याचा प्रयत्न करणं. त्यासाठी सुख देणाऱ्या सर्व वस्तूंवर मालकीचा हक्क मिळवणं. ही मालकी मिळवण्यासाठी आवश्यक असलेला पैसा एकसारखा मिळवीत रहाणं. हा मिळवण्यासाठी सतत शारीरिक व मानसिक कष्ट करीत रहाणं. ज्ञान मिळवीत रहाणं. हे सुख भोगताना इतरांचा विचार न करणं. दुसरा प्रकार म्हणजे स्वतःच्या जगण्यासाठी आवश्यक इतक्याच गरजा भागतील एवढाच पैसा मिळवणं. यातून मिळणाऱ्या वस्तूंतून जेवढं सुख मिळेल तितकंच सुख आनंदाने उपभोगणं. त्यात सर्वांना सहभागी करुन घेणं आणि उरलेला सर्व वेळ आणि शक्ती ही इतरांना मदत करण्यात, त्यांचं कल्याण करण्यात, त्यांचं दुःख सुसह्य करण्यात कमी करण्यात वापरणं. व हे सर्व करत असता क्षणोक्षणी त्या रामाचं स्मरण करणं. व समाधानात जीवन घालवणं. समर्थांना हा दुसरा प्रकार अभिप्रेत आहे. ते मनाला सांगतात, हे मना, जसं चंदनाचं खोड स्वतः झिजून दुसऱ्याला सुवास देतं व त्याचं मन प्रसन्न व शरीर शीतल करतं, तसं तुझं जीवनही दुसऱ्याला आनंद देण्यात झिजू दे. 'आत्मनो मोक्षार्थं जगद्हिताय च' हे तुझं ध्येय असू दे'. 'तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता।' गुरुसेवेतच झिजलेजीवन । विलेपनार्थे त्याचे चंदन । असं गदिमांची शबरी म्हणते. याला दुसरी उपमा म्हणजे आजच्या काळातील साबणाची देता येईल. साबणही स्वतः झिजून वापरणाऱ्याचं शरीर स्वच्छ करतो व त्याला निर्मळ सुगंध देतो. यासाठी त्याला निर्मळ पाण्याची (जीवनाची) गरज लागते. 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।' तुकाराम महाराज. एखादा आधुनिक कवी म्हणेल, 'मना टोक रे पेन्सिलीचे झिजावे । तयासारिखे सज्जना नीववावे । असं जीवन घालवल्यावर इतराना सुख तर मिळतंच पण संतसज्जनाना विशेष प्रसन्नता प्राप्त होते. म्हणून हा माणूस आता भक्तीच्या वाटेवर यशस्वी रीतीने मार्गक्रमणा करीत आहे. स्वतःचा उद्धार करीत असता इतरानाही मार्गदर्शन करीत आहे. हे पाहून त्यांना आनंद होतो.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# || मना सज्जना ||



## गुरुवार

**नको रे मना द्रव्य ते पुढीलांचे । अति स्वार्थ बुद्धी न रे पाप साचे ।**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे । न होता मनासारखे दुःख मोठे ।।१।।**

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ।**

या श्लोकाच्या पहिल्या ओळीत समर्थ आमच्या मनाला असा उपदेश करीत आहेत की हे मना, "पुढीलांचे" म्हणजे तुझ्या समोर असलेल्या माणसाचं म्हणजेच दुसऱ्याचं द्रव्य घेऊ नकोस, म्हणजे दुसऱ्याचा पैसा आपल्याला फुकट मिळावा असं वाटणं हे अति स्वार्थ बुद्धीचं लक्षण आहे. समर्थाचा हा आदेश कळण्यासाठी प्रथम स्वार्थ म्हणजे काय ते समजलं पाहिजे. स्वार्थ = स्व+अर्थ म्हणजे स्वतःला काहीतरी हवं असणं आणि स्वार्थ साधणं म्हणजे हवं असलेलं मिळवणं. या जगात सर्वांनाच जगण्यासाठी अन्न-वस्त्र-निवारा याची गरज असतेच व या तीन गोष्टीशिवाय फार काळ रहाणं कोणालाही शक्य नाही. पण माणसाचं मन असं विचित्र आहे की शरीराच्या गरजांची सोय झाली की मग त्याला सुख देणाऱ्या वस्तूंचा संग्रह करावा, त्यांच्यावर कायमची मालकी मिळावी असं वाटतं. आजच्या जगात सर्वच वस्तूच्या मालकीसाठी त्याच्या बदल्यात पैसा द्यावा लागतो. हा खर्च करण्यासाठी तो प्रथम मिळवावा लागतो. पैसा मिळवण्यासाठी कष्ट करावे लागतात. नोकरी किंवा धंदा किंवा आपलं ज्ञान वापरून द्रव्य संपादन करावं लागतं. आता कष्ट करायचा कंटाळा येत असेल तर कष्टाशिवाय पैसा मिळवण्याचा मार्ग मन शोधू लागतं. हा मार्ग म्हणजे ज्याच्याकडे पैसा आहे त्याचा तो पैसा आपणाकडे आणणं. हा चोरी करुन किंवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून लाच खाऊन, तसंच शस्त्राचा धाक दाखवून दुसऱ्याचा जीव घेण्याची भीति घालणं व त्याच्याकडचा पैसा बळजबरीने हिसकावून घेऊन (खंडणी वसूल करणं) इत्यादि अनीतीच्या व बेकायदेशीर मार्गांनी मिळवता येतो व त्या पैशातून आपल्या सर्व चैनी पुरवता येतात. उदा. परदेशात जाऊन तिथली सर्व सुखं उपभोगता येतात. यालाच समर्थांनी अती स्वार्थ बुद्धी असं म्हटलेलं आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे । अति स्वार्थबुद्धी न रे पाप साचे ।**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे । न होता मनासारिखे दुःख मोठे ।।९।।**

समर्थांच्या मते माणसाने लोभी वृत्ती सोडली पाहिजे व चैनीच्या मागे न लागण्याची व जे मिळतंय त्यात संतुष्ट असण्याची वृत्ती अंगिकारली पाहिजे कारण अनीतीने पैसा मिळवत असताना माणसाच्या हातून सतत पाप होत असतं व ते पाप त्यालाच भोगावं लागतं. ज्या कुटुंबाला सुखात ठेवण्यासाठी माणूस, हे पाप करतो ती कुटुंबातील माणसं वाल्या कोळ्याच्या नातेवाईकाप्रमाणे पापाचा वाटा स्वीकारायचं मात्र नाकारतात. म्हणून हे सांगण्यासाठी समर्थ म्हणतात, "अती स्वार्थबुद्धी न रे पाप साचे" याचं कारण प्रत्येकालाच आपला पैसा प्रिय असतो व ज्याचा पैसा आपण हिसकावून घेतो त्याला अत्यंत दुःख होतं व त्याचे तळतळाट किंवा शापवाणी आपल्याला पापातून निर्माण होणाऱ्या दुःखाच्या रुपाने भोगावी लागते. हे पाप म्हणजे काय? पहिली गोष्ट म्हणजे पाप व पुण्य हा दुसऱ्याच्या संबंधात आपण केलेल्या कृतीचा परिणाम असतो. उदा. आपण दुसऱ्याला पैशाची मदत केली किंवा दान दिलं तर तितक्या पैशातून मिळणाऱ्या सुखाचा आपल्याला त्याग करावा लागतो व ती सुखं आता दान घेणाऱ्या माणसाला मिळतात व तो आपल्याला त्याच्या बदल्यात तोंड भरून आशिर्वाद देतो. त्या त्यागाचं आणि आशिर्वादाचं रुपांतर आपल्या ठिकाणी पुण्य निर्माण होण्यात होतं व या पुण्याचा परिणाम आपल्याला भविष्यकाळात सुख मिळण्यात होतो. या उलट जर आपण अती-स्वार्थबुद्धीने लाच खाऊन, चोरी करुन, लुबाडणुकीने, प्राण घेण्याची धमकी देऊन दुसऱ्याकडून पैसे वसूल केले तर जरी त्या पैशाने आपल्याला सुख मिळणार असलं तरी त्या माणसाचे शाप आणि तळतळाट आपल्याला पापाच्या रूपात भोगावे लागतात आणि या पापाचा परिणाम म्हणून आपल्याला भविष्यकाळात दुःखच भोगावं लागतं. उदा. राजा दशरथाने शब्दवेधी बाण सोडून, बाळ श्रावणाची हत्या करुन त्याच्या आई-वडिलाना दुःख-सागरात लोटून दिलं. त्याचा परिणाम म्हणून त्याला स्वतःला पुत्र वियोगाने मृत्यू पत्करावा लागला. म्हणून समर्थ या श्लोकात म्हणतात की हे मना तू अन्यायाने दुसऱ्याचा पैसा लुबाडू नकोस. ते पापकर्म आहे व त्यामुळे तुला दुःख भोगावं लागेल.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।




## शनिवार

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे । अति स्वार्थ बुद्धी न रे पाप साचे ।**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे । न होता मनासारखे दुःख मोठे ।।१।।**

पाप-पुण्याचा एक विशेष असा आहे की पैशासारखी पापपुण्याची वजाबाकी होत नाही तर दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणे भोगाव्या व उपभोगाव्या लागतात. म्हणून माणसाचं जीवन सुख-दुःखानी भरलेलं असतं. यासाठी समर्थ म्हणतात "घडे भोगणे पाप ते कर्म खोटे । ज्या कर्माचं फळ पापात आणि दुःखात मिळतं ते कर्म खोटं म्हणून त्याज्य किंवा निषिद्ध असतं. म्हणून हे मना, तू हे अन्यायाचं कर्म कधी करू नकोस. त्याचा परिणाम दुःखातच होईल. हे दुःख माणसाच्या जीवनात कशा प्रकारे प्रकट होतं. तर त्याच्या जीवनातील प्रसंगातच मनाविरूद्ध घडण्यामध्ये या दुःखाची निर्मिती असते. यासाठी दुःख म्हणजे काय ते पाहूया. दुर् म्हणजे वाईट, प्रतिकूल, नकोशी वाटणारी संवेदना आणि ख म्हणजे आकाश. इथे याचा अर्थ चित्तातील आकाश म्हणजे पोकळी असा आहे. म्हणून दुःख म्हणजे चित्ताच्या पोकळीत निर्माण होणारी व नकोशी वाटणारी प्रतिकूल अशी संवेदना. एखादं काम आपण काही हेतूने करायला घेतलं की त्यातून तो हेतू पुरा व्हावा अशी आपली नेहमीच अपेक्षा असते. म्हणून त्या हेतूच्या विरुद्ध असं फळ आपल्याला मिळालं की आपण त्याला मनाविरुद्ध घडलं असं म्हणतो उदा. हुशार व मेहनती विद्यार्थी परिक्षेत नापास होतो तेव्हा त्याला अत्यंत दुःख होतं, कारण त्याची अपेक्षा विशेष प्राविण्य मिळवण्याची असते. पण 'ढ' विद्यार्थी नापास होऊन त्याला शेवटचा क्रमांक मिळाला तरी त्याला दुःख होत नाही. असाच एक 'ढ' मुलगा आपल्या वडिलांना म्हणाला 'बाबा, या वर्षीही नापास होऊन मला शेवटचा क्रमांक मिळाला, पण गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी माझी प्रगती आहे." ती कशी काय, बाबा?" बाबा डोक्याला हात लावून म्हणाले. मुलगा म्हणाला, अहो गेल्या वर्षी मी साठ मुलांत साठावा आलो होतो. पण यावर्षी मी 'पन्नास मुलात पन्नासावा आलो आहे म्हणजे माझी दहा क्रमाकांनी प्रगती आहे की नाही." म्हणून समर्थ या श्लोकात मनाला म्हणतात की हे मना, तू अन्यायाने दुसऱ्याचा पैसा लुबाडू नकोस. ते पापकर्म आहे. त्यामुळे तुला दुःख भोगावं लागेल.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**सदा सर्वदा प्रीती रामी धरावी । दुखाची स्वये सांडी जीवी करावी**
**देहेदुःख ते सूख मानीत जावे । विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ।।१०।।**

गेल्या श्लोकात दुःखाचा उल्लेख केल्यावर या श्लोकात समर्थ दुःखावरचा उपाय सांगत आहेत. सुखाची प्राप्ती हाच दुःखावरचा उपाय असतो व प्रेम केल्याने अत्युच्च सुख लाभतं. गीतरामायणात महाराष्ट्र वाल्मिकी गदिमा असंच काहीसं म्हणतात. 'सुख-दुःखांकित जन्म मानवी । दुःख सुखावे प्रीति लाभता । या जीवनात सुखामागुन दुःख व दुःखामागुन सुख येणारच. अगदी सागरात जसं भरती व ओहोटी पाठशिवणीचा खेळ खेळत असतात तसं.

माणसाला जशी अन्न, वस्त्र आणि निवारा याची गरज असते तशीच या गरजा भागल्यावर प्रेमाची ही गरज असते. म्हणतात ना, अन्न वस्त्र, निवारा आणि प्रेमाचा फवारा । त्यात ईश्वरप्रेमाचा वारा । मग खेळ पूर्ण होई सारा । म्हणून माणसाला कोणावर तरी प्रेम केल्याशिवाय चैन पडत नाही. पण प्रेम कोणावर करावं? समर्थ म्हणतात, विश्वातील वस्तूंवर व माणसांवर प्रेम करण्यापेक्षा ते सरळ विश्वनिर्मात्या व विश्वव्यापक अशा रामावरच करावं. रामचरित्रावर प्रेम करावं. रामाच्या सद्गुणांवर प्रेम करावं. रामाने आई, वडील, भाऊ, गुरू, पत्नी यांच्यावर जसं व जे प्रेम केलं तसं आपण प्रेम करावं.

माणसांवर केलेलं प्रेम हे देवाणघेवाणीतून, मालकीच्या भावनेवर आधारलेलं असतं. पण रामावर केलेलं प्रेम पूर्ण निरपेक्ष असतं आणि हा राम सर्वत्र व सर्वदा असतोच असतो. त्यामुळे या राम-प्रेमाला कधीच विरहाचं ग्रहण लागत नाही. म्हणून या प्रेमाची 'सदा सर्वदा पौर्णिमाच असते. याकरता आपण ईश्वराने निर्माण केलेल्या विश्वावर ते ईश्वराचं प्रतीक आहे या भावनेने प्रेम करावं. मग या जीवाला या प्रेमाच्या बळावर स्वतःच दुःखापासून अलिप्त होता येतं. व दुःख शांतपणे सहन करता येतं. यातील मानसिक दुःखाचा भाग हा अपेक्षा-भंगामुळे निर्माण होतो. म्हणून जर माणसाने अपेक्षाच केली नाही, तर त्याला मानसिक दुःखाची बाधा होणार नाही. इतकंच काय पण हे दुःख निर्माणच होणार नाही. म्हणून समर्थ म्हणतात.

**'दुखाची स्वये सांडि जीवी करावी ।**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**सदा सर्वदा प्रीती रामी धरावी । दुखाची स्वये सांडि जीवी करावी**
**देहेदुःख ते सूख मानीत जावे । विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ।।१०।।**

**'देहेदुःख ते सूख मानीत जावे'**

दुःखाचे मानसिक व शारीरिक असे दोन भाग होतात. त्यातील शारीरिक दुःखाबद्दल समर्थ सांगत आहेत. शरीरदुःख म्हणजे शरीराला होणाऱ्या वेदना. आपल्या शरीराची रचनाच अशी आहे की हे शरीराचं यंत्र जोपर्यंत सुरळीत चालू आहे, तोपर्यंत त्याच्या असण्याची आपल्या मनाला जाणीवच होत नाही. म्हणून त्याच्यासाठी काही आणखीन केलं पाहिजे असं आपल्याला वाटत नाही. याला आपण शरीराची निरोगी अवस्था म्हणतो व या अवस्थेत आपण भरपूर श्रम करतो. अनेक प्रसंगी आपण त्याची ओढाताण करूनसुद्धा त्याच्याकडून जादा काम करून घेतो. तरीसुद्धा ते बिचारं कुरकुर करीत नाही. पण त्याच्याही क्षमतेला मर्यादा असतातच. ही क्षमता ओलांडली, पुन्हा पुन्हा तिचा दुरुपयोग केला की मग शरीरात वेदना सुरू होतात. त्याला आपण डोकेदुखी, पोटदुखी, पाठदुखी, वगैरे नावं देतो व तीवर काहीतरी औषध घेतो. त्याने ती तात्पुरती बरी होते पण हे अतिश्रम थांबवणं हा त्यावरचा कायमचा उपाय आहे.

तसंच अनेकवेळा शरीरावर अनेक प्रकारचे रोगजंतू हल्ला करतात. त्यामुळे शरीराची कार्यक्षमता बिघडते तर काही वेळा शरीराचं अस्तित्वच धोक्यात येऊ शकतं. याची माणसाला सूचना मिळण्यासाठी शरीरात दुःखदायक वेदना सुरू होतात. या वेदना म्हणजे शरीरात काहीतरी बिघाड झाला आहे. त्यावर ताबडतोब इलाज केला पाहिजे असं सांगणाऱ्या धोक्याच्या सुचना देणाऱ्या घंटाच असतात. म्हणून त्या अंती सुखाच्याच ठरतात. कर्क रोगात या वेदना सुरवातीच्या काळात होत नसल्यामुळेच तो झाला आहे असं माणसाला समजत नाही. म्हणून त्यावर उपाय करता येत नाही. पण जेव्हा त्याच्या वेदना सुरू होतात तेव्हा उशीर झालेला असतो.

या वेदना नसत्या तर माणूस कोठल्याही सामान्य रोगाला बळी पडला असता. कापणं, भाजणं, मार लागणं या साध्या गोष्टीनी त्याचा प्राण घेतला असता.

माणसाला दुःखातच देवाची आठवण होते. कारण त्याला दुःख नको असल्यामुळे औषधाबरोबरच तो, हे देवा, यातून आता सोडव रे बाबा, अशी देवाची कळवळून प्रार्थना करीत असतो. त्यानं यातून सोडवावं म्हणून त्याला नवसही करतो (पण नंतर नवस फेडायचं तो सोयीस्करपणे विसरतो ही गोष्ट वेगळी)

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## मंगळवार

**सदा सर्वदा प्रीती रामी धरावी । दुखाची स्वये सांडी जीवी करावी**
**देहेदुःख ते सूख मानीत जावे । विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ।।१०।।**

**'विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ।'**

आपण आपली विवेकबुद्धी वापरून नेहमी आपल्या मूळ स्वरूपाच्या विचारानी आपलं मन भरून टाकावं असं समर्थ आपल्याला या ओळीत सांगत आहेत. पण विवेक म्हणजे काय? आपल्याकडे विवेक हा शब्द सारासारविवेक, नित्यानित्यवस्तुविवेक आणि आत्मानात्मविवेक असा वापरला जातो. या विश्वात असंख्य वस्तू आहेत. पण त्यातली नित्य म्हणजे कायम आहे तशीच रहाणारी वस्तू कोणती व सतत बदलणाऱ्या वस्तू कोणत्या हे ओळखणं. तसंच जीवनात सार म्हणजे घेण्यासारखं काय आहे आणि असार म्हणजे टाकण्यासारखं काय आहे हे ठरवणाऱ्या बुद्धीला विवेकबुद्धी असं म्हणतात. थोडक्यात विवेकाची व्याख्या अशी करता येईल की एखाद्या घडलेल्या घटनेतील परिस्थितीचा सर्व बाजूनी विचार करून, त्यासंबंधी आपल्याला हवं असलेलं सर्व ज्ञान मिळवून व ते उपयोगात आणून आपल्या अहंकाराला बाजूला ठेवून घेतलेला निर्णय व त्यासंबंधी सर्व बाजूनी सर्वांचा मुळापासून केलेला विचार म्हणजे विवेक. यासाठी माणसाने आपल्या विवेकबुद्धीचा वापर करून भरकटणाऱ्या विचारांच्या मागे धावू नये तर त्याऐवजी स्वतःच्या मूळ स्वरूपाचं स्मरण करावं असं समर्थांना म्हणायचं आहे. रूप या शब्दात सर्व गुणधर्म (स्पर्श, शब्द, वगैरे) येतात. स्वरूप म्हणजे आपले व्यक्त होणारे गुणधर्म म्हणजेच आपलं व्यक्तिमत्व असं म्हणता येईल. आता स्वस्वरूप म्हणजे ज्या रामाच्या कृपेने आपल्याला हे सुंदर व्यक्तिमत्व मिळालं त्याचेच आपण अंश आहोत. आपण मूळचे आत्माराम आहोत. अनंत व नित्य असं आत्मस्वरूप आहोत. आपण शरीर व बुद्धी आहोत व यांचा इच्छेप्रमाणे उपभोग घेणारे जीवही आपणच आहोत. पण हे आपलं तात्पुरतं व बदलतं म्हणजे अनित्य स्वरूप आहे. आपलं नित्य स्वरूप म्हणजे स्वस्वरूप परमशांत, नित्य, अनंत व सर्वव्यापक असं आहे हे विवेकबुद्धी वापरून जाणून घ्यावं व सदैव त्याच्याच संबंधीच्या विचारानी आपलं मन भरून आणि भारून टाकावं. त्याचंच नेहमी स्मरण असावं म्हणजे मग दुःखाची बाधा होत नाही असं समर्थ या श्लोकात सांगतात. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात

**'राम राम राम अवघेची म्हणती । कोणी न जाणती आत्माराम ।।'**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**जनी सर्व सुखी असा कोण आहे । विचारे मना तूचि शोधूनि पाहे ।**
**मना त्वांचि रे पूर्वसंचित केले । तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।।११।।**

**'जनी सर्वसुखी असा कोण आहे । विचारे मना तूचि शोधोनि पाहे ।'**

या दोन ओळीत समर्थ मनाला सांगत आहेत की हे मना, या माणसाच्या जगात ज्याला सर्व सुखं मिळाली आहेत असा कोणीतरी आहे का हे तूच विचाराने शोधून काढ. यासाठी प्रथम सुख म्हणजे काय ते पाहूया. माणसाच्या मनात एक पोकळी असते. तिला चिदाकाश असं म्हणतात. चिदाकाश म्हणजे चित्+आकाश. चित् = चैतन्यमय जिवंतपणा, आकाश = पोकळी. ख म्हणजे सुद्धा आकाश या चिदाकाशात क्षणोक्षणी ज्ञानाची, सुखदुःखाची, विचारांची संवेदना उमटत असते. यातील काही संवेदना सु म्हणजे चांगल्या म्हणजेच भविष्यात हव्याहव्याशा वाटणाऱ्या अशा असतात. या संवेदनाना आपण सुखाच्या संवेदना असं म्हणतो व त्या आपण मुद्दाम निर्माण करतो. याउलट काही संवेदना दुर् म्हणजे वाईट म्हणजेच नकोनकोशा वाटणाऱ्या अशा असतात व त्या आपण टाळत रहातो. याना आपण दुःख असं म्हणतो. आता या चांगल्या व वाईट संवेदना सापेक्ष असतात, म्हणजे कशाच्या तरी संबंधात त्या चांगल्या किंवा वाईट असतात. उदा. विषारी साप माणसाला चावला तर ते विष त्याचा प्राण घेतं म्हणून आपण सापाच्या जवळ जात नाही. पण हेच सापाचं विष काही रोगांवर औषध असतं. त्यामुळे अशा रोगाना बळी पडलेली माणसं मुद्दाम हे विष विकत घेऊन त्याचा या रोगांवर औषध म्हणून वापर करतात. किंवा माणसाच्या मृत्यूचं आपल्याला अत्यंत दुःख होतं. पण अंत्यविधीचं सामान विकणाऱ्या माणसांच्या दृष्टीने ती घटना अतीव सुखाची असते. माणसाला आपल्या जीवनात प्रत्येक क्षणी सुखच मिळावं असं वाटतं व त्यासाठी तो सदैव प्रयत्न करत रहातो. त्याला कशाकशात सुख वाटतं? १) पैसा मिळणं, २) सुखदायक वस्तूंची मालकी असणं, ३) कीर्ती, प्रसिद्धी मिळणं, ४) अनुरुप जोडीदार मिळणं, ५) कामवासनेची तृप्ती होणं, ६) आपल्या मनाविरुद्ध इतरानी न वागणं, ७) आपलं सर्वांनी ऐकणं, ८) आपल्यावर इतरांनी व आपण त्यांच्यावर प्रेम करणं, ९) आपलं सर्वांनी कौतुक करणं वगैरे. आता इतकी सगळी सुखं माणसाला एकदम मिळतील का हे आपण विचाराने शोधून पहावे असं समर्थ म्हणतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**जनी सर्व सुखी असा कोण आहे । विचारे मना तूचि शोधूनि पाहे ।**
**मना त्वांचि रे पूर्वसंचित केले । तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।।११।।**

**मना त्वांचि रे पूर्व संचित केले । तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।**

या ओळीत समर्थ मनाला कर्मविपाकाचा सिद्धांत समजावून देत आहेत. हा सिद्धांत असं सांगतो की माणसाची भूतकालीन कर्मच या सुखदु:खाना जबाबदार असतात. 'करावं तसं भरावं' असं आपण म्हणतोच. माणसाला नेहमी असं वाटतं की दुसऱ्याच्या चुकांमुळे त्याला दु:ख भोगावं लागतं. पण ही समजूत चुकीची आहे. खरी गोष्ट अशी आहे की माणूस भूतकाळात जी काही चांगली व वाईट कर्म करतो त्यातील चांगल्या कर्मांचा परिणाम पुण्याचा संचय करण्यात होतो, तर त्याच्या वाईट कर्मांमुळे पापाचा साठा तयार होतो. आता हा भूतकाळ अनेक जन्माचा सुद्धा असू शकतो. याला समर्थांनी पूर्वसंचित असा शब्द वापरला आहे. आता यातील पुण्याचं रूपांतर भविष्यकाळातील सुखात होतं व पापामुळे माणसाला दु:ख भोगावं लागतं. त्यामुळे साहजिकच जितकं सुख उपभोगायला मिळेल तितका पुण्यांचा साठा कमी होत जातो व जितकं दु:ख भोगावं लागतं त्याप्रमाणात पापही कमी कमी होत जातं. आश्चर्य म्हणजे या पापपुण्याची वजाबाकी होऊ शकत नाही तर दोहोंचाही परिणाम जे सुखदु:ख ते स्वतंत्रपणे भोगून संपवावं लागतं. म्हणूनच माणसाचं जीवन १००% सुखाचं किंवा १००% दु:खाचं असत नाही तर ते नेहमीच सुखदु:खानी भरलेलं असतं म्हणून गदिमा म्हणतात 'सुखदु:खांकित जन्म मानवी'. म्हणून या जन्मी आपण, परोपकाराची कृत्यं केली तर त्यामुळे भविष्यकाळात आपण सुखाचा उपभोग घेऊ शकू. पण या जन्मी आपण दुसऱ्याला त्रास देणारी कर्मं केली तर त्याचा परिणाम म्हणून पुढील जन्मात दु:ख भोगावं लागेल. उदा. राजा दशरथाच्या हातून तरुणपणी श्रावणाचा वध नदीच्या किनाऱ्यावर झाला म्हणून त्याच्या आंधळ्या आईवडिलांनी मरताना त्याला शाप दिला की तूही आमच्यासारखाच पुत्रवियोगानेच मरशील याचा परिणाम म्हणून त्याच्याच आज्ञेमुळे प्रभू रामचंद्र १४ वर्षांसाठी वनवासाला निघाले असता राजा दशरथाला लाडक्या पुत्राच्या वियोगाच्या आवेगाने राम राम म्हणत आपला प्राण सोडावा लागला.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार


**मना मानसी दुःख आणू नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।**
**विवेके देहेबुद्धी सोडूनि द्यावी । विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ।।१२।।**

**'मना मानसी दुःख आणू नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।'**
या जीवनात कोणालाही दुःख नको असतं पण ते टाळण्याचा उपाय तर त्याला माहित नसतो. पण भक्तीमार्गावर प्रवास करणाऱ्या साधकाला दुःखाचा वारासुद्धा लागू नये म्हणून ९, १० व ११ या श्लोकात समर्थांनी दुःखावर सांगोपांग चर्चा केली आहे आणि या श्लोकात दुःखाकडे पहाण्याचा दृष्टीकोन विशद केला आहे. या दृष्टीकोनातून दुःखाकडे पाहिलं तर दुःखाचा लेशही शिल्लक रहात नाही. मानसिक दुःख हे तुलनेतून निर्माण होतं. उदा. शेजाऱ्याकडे असलेली चैनीची वस्तू आपल्याकडे नसली की त्याचं आपल्याला दुःख होतं किंवा समजा एखाद्या माणसाचा एक पाय अपघातात तुटला आहे. आता कुबड्यांच्या मदतीने तो आपले रोजचे व्यवहार व्यवस्थित करत असला तरी आसपासच्या दोन्ही पाय असलेल्या माणसांशी त्याने स्वतःची तुलना केली की माझ्याच वाट्याला या कुबड्या का आल्या याचं त्याला दुःख होऊ लागतं. आता अपेक्षाभंग हे दुःखाचं दुसरं कारण असतं. दुःखाची व्याख्याच 'प्रतिकूल वेदनीयं दुःखम् ।' अशी केली आहे. माणूस एखादा हेतू पुरा व्हावा म्हणून काही काम करतो व काम झाल्यावर आपल्या हेतूप्रमाणे त्याचं फळ मिळावं अशी अपेक्षा करतो. आता हे फळ मिळणं हे काही सर्वस्वी त्याच्या हातातलं नसतं. तेव्हा प्रतिकूल फळ मिळालं की त्याला दुःख होऊ लागतं. म्हणून कोठलीही तुलना व अपेक्षा न करणं हा दुःख न होऊ देण्याचा उपाय आहे. माणसाला भूतकाळात होऊन गेलेल्या दुःखाबद्दल शोक निर्माण होतो. पण जे होऊन गेलेलं आहे त्यात आता कसलाही बदल करणं शक्य नसल्यामुळे हा शोक करणं व्यर्थ आहे. तसंच भूतकाळात झालेलं दुःख भविष्य काळात झालं तर काय करायचं याची माणूस चिंता किंवा काळजी करत बसतो. पण भविष्यकाळात काय दडलं आहे याची माणसाला कल्पना नसते. म्हणून अशी चिंता करणं हेही व्यर्थच असतं. कारण अशी गोष्ट प्रत्यक्ष वर्तमान काळात घडेपर्यंत ती माणसाला माहित नसते. आता शोक, चिंता व दुःख या तीनही गोष्टी करण्यात प्रचंड शक्ती वाया जाते म्हणून त्या करू नयेत असं समर्थ आपल्या मनाला पुन्हा पुन्हा सांगत आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## शनिवार

**मना मानसी दुःख आणू नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।**
**विवेके देहेबुद्धी सोडूनि द्यावी । विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ।।१२।।**

**'विवेके देहेबुद्धी सोडून द्यावी । विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी ।।'**

सामान्य माणसाची खात्री असते की आपण म्हणजे हे शरीर व बुद्धी. कारण त्याला शरीर दिसतं आणि बुद्धीचं कार्य हे जाणवत असतं. म्हणून मी फक्त देहच आहे अशी त्याची बुद्धी असते. याचा परिणाम म्हणून आपणच या देहाच्या द्वारा सर्व कर्म करतो असं त्याला वाटतं आणि म्हणून मग त्यांच्या फळांच्या अपेक्षेतून सुखदुःखाची निर्मिती होत रहाते. याला समर्थ देहबुद्धी असं नाव देतात. पण खरी गोष्ट अशी आहे की आपण या देहाच्या पुरतेच मर्यादित नाही तर आपण जीव आहोत आणि त्या ईश्वराचे (रामाचे) एक अंशसुद्धा आहोत आणि आपण जी कर्मं करतो असं आपल्याला वाटत असतं ती सर्व कर्म ईश्वराच्या (रामाच्या) कृपेने आणि त्याच्या पूर्वनियोजित संकल्पानुसारच घडत असतात. यासंबंधात कवी म्हणतो.


डोळ्यानी बघतो ध्वनी परिसतो कानी पदी चालतो ।
जिव्हेने रस चाखतो मधुरही वाचे आम्ही बोलतो ।
हातानी बहुसाल काम करतो विश्रांतिही घ्यावया ।
घेतो झोप सुखे फिरुनि उठतो ही ईश्वराची दया ।

पण ही वस्तुस्थिती माणसाने विवेकबुद्धी वापरली तरच त्याच्या लक्षात येऊ शकते. नाहीतर एरवी माणसाची बुद्धी त्याच्या अहंकाराच्या ताब्यात असते आणि 'अहं करोमि' म्हणजे मीच या कर्मांचा कर्ता आहे या विचारातून त्याचा मीपणा वाढू लागतो. म्हणून विवेकाने आपण देहच आहोत ही बुद्धी सोडून द्यावी असं समर्थ आपल्या मनाला सांगतात. ही बुद्धी सोडून दिल्यावर मग आपण देहच आहोत ही आपली जाणीव नाहीशी होते. त्यातून आपण ईश्वराचे अंश आहोत व आपल्या हातून घडणाऱ्या कर्मांचा कर्ता आपण नसतो तर ती पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसारच घडत असतात अशी आपली खात्री होते. याला समर्थांनी विदेहीपणा असं म्हटलं आहे. हा आपल्या अंगी बाणला की मग आपल्याला दुःख, शोक व चिंता या नको असलेल्या विकारांपासून कायमची मुक्ती मिळते व आपलं मन फक्त आनंदाचाच भोग घेत रहातं हे सांगण्यासाठी समर्थांनी "भोगीत" हा शब्द वापरला आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

मना मानसी दुःख आणू नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।
विवेके देहेबुद्धी सोडूनि द्यावी । विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ।।१२।।

**'विवेके देहेबुद्धी सोडून द्यावी । विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी ।।'**

सामान्य माणसाची खात्री असते की आपण म्हणजे हे शरीर व बुद्धी. कारण त्याला शरीर दिसतं आणि बुद्धीचं कार्य हे जाणवत असतं. म्हणून मी फक्त देहच आहे अशी त्याची बुद्धी असते. याचा परिणाम म्हणून आपणच या देहाच्या द्वारा सर्व कर्म करतो असं त्याला वाटतं आणि म्हणून मग त्यांच्या फळांच्या अपेक्षेतून सुखदुःखाची निर्मिती होत रहाते. याला समर्थ देहबुद्धी असं नाव देतात. पण खरी गोष्ट अशी आहे की आपण या देहाच्या पुरतेच मर्यादित नाही तर आपण जीव आहोत आणि त्या ईश्वराचे (रामाचे) एक अंशसुद्धा आहोत आणि आपण जी कर्मं करतो असं आपल्याला वाटत असतं ती सर्व कर्म ईश्वराच्या (रामाच्या) कृपेने आणि त्याच्या पूर्वनियोजित संकल्पानुसारच घडत असतात. यासंबंधात कवी म्हणतो.

डोळ्यानी बघतो ध्वनी परिसतो कानी पदी चालतो ।
जिव्हेने रस चाखतो मधुरही वाचे आम्ही बोलतो ।
हातानी बहुसाल काम करतो विश्रांतिही घ्यावया ।
घेतो झोप सुखे फिरुनि उठतो ही ईश्वराची दया ।

पण ही वस्तुस्थिती माणसाने विवेकबुद्धी वापरली तरच त्याच्या लक्षात येऊ शकते. नाहीतर एरवी माणसाची बुद्धी त्याच्या अहंकाराच्या ताब्यात असते आणि 'अहं करोमि' म्हणजे मीच या कर्मांचा कर्ता आहे या विचारातून त्याचा मीपणा वाढू लागतो. म्हणून विवेकाने आपण देहच आहोत ही बुद्धी सोडून द्यावी असं समर्थ आपल्या मनाला सांगतात. ही बुद्धी सोडून दिल्यावर मग आपण देहच आहोत ही आपली जाणीव नाहीशी होते. त्यातून आपण ईश्वराचे अंश आहोत व आपल्या हातून घडणाऱ्या कर्मांचा कर्ता आपण नसतो तर ती पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसारच घडत असतात अशी आपली खात्री होते. याला समर्थांनी विदेहीपणा असं म्हटलं आहे. हा आपल्या अंगी बाणला की मग आपल्याला दुःख, शोक व चिंता या नको असलेल्या विकारांपासून कायमची मुक्ती मिळते व आपलं मन फक्त आनंदाचाच भोग घेत रहातं हे सांगण्यासाठी समर्थांनी "भोगीत" हा शब्द वापरला आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**मना सांग पां रावणा काय झाले । अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले**
**म्हणोनी कुडी वासना सांडि वेगी । बळे लागला काळ हा पाठिलागी ।।१३।।**


**'मना सांग पां रावणा काय झाले । अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले।'**

समर्थ मनाला उपदेश करताना प्रसिद्ध अशा रावणाचं उदाहरण देत आहेत. रावण हा पुलस्ती ऋषीचा पुत्र होता. तो जन्माने ब्राह्मण असून अत्यंत विद्वान होता. त्याने वेदांचाही गाढा अभ्यास केला होता. त्याने आपल्या उग्र तपश्चर्येने भगवान् ब्रह्मदेवालाही प्रसन्न करून घेतलं होतं व माणूस सोडून इतर सर्व योनींकडून त्याला मरण येणार नाही असा वर त्याने प्राप्त करून घेतला होता कारण माणूस त्याच्या खिजगणतीतच नव्हता. तो अतुल पराक्रमी होता. त्याला सर्व अस्त्रांचं ज्ञान होतं. त्याने आपल्या सामर्थ्याने सर्व देवांना जिंकून त्याना बंदिवान् केलं होतं व आपल्या लंकानगरीतील प्रासादात त्यांच्याकडून नोकरांसारखी कामं करवून घेतली होती. त्याने पाताळात जाऊन नागराज तक्षकाला हरवून त्याची बायको पळवून आणली होती. तसंच त्याने कुबेराला पराभूत करून त्याचं पुष्पक विमान लंकेत आणलं होतं. हा मनात आल्यास सूर्यचंद्रानासुद्धा अडवू शकत होता. हा अत्यंत कपटी, मायावी व निर्दयी असा राक्षस होता. त्यामुळे त्याने हजारो निष्पाप लोकांचा वध केला. यज्ञांमध्ये विघ्न आणून त्यांचा विध्वंस करणं हा त्याचा आवडता छंद. त्याच्याजवळ लंका नगरीचं राज्य, त्यात ऐश्वर्याने भरलेले प्रासाद, शोभिवंत उद्याने, अपार संपत्ती, हजारो सुंदर स्त्रियानी भरलेलं अंतःपुर, विपुल संतती, वगैरे सर्व काही होतं. त्याच्याजवळ नव्हती फक्त विवेकबुद्धी. त्यामुळे प्रभू श्रीरामांच्या सुंदर पत्नीवर, सीतामाईंकडे त्याची वाकडी नजर वळली. तिच्या सौंदर्याचा त्याला मोह पडला आणि आपल्या कपटी बुद्धीला साजेल असं कपट कारस्थान त्याने रचलं आणि सीतेला बंदिवान करुन तिला लंकेतील अशोकवनात राक्षसीणींच्या पहाऱ्यात कोंडून ठेवलं. नंतर प्रभू रामचंद्रानी वानरांच्या मदतीने सीतेचा शोध लावला व तिला परत पाठवावी असा रावणाला निरोप पाठवला. तो रावणाने अमान्य करताच पराक्रमी प्रभू श्रीरामांनी वानर व अस्वलं यांच्या मदतीने रावण व त्याचे राक्षस सहकारी यांच्याशी घनघोर युद्ध केलं. हजारो राक्षसांचा संहार केला व कुटिल अशा रावणाचा वध केला आणि राज्य विभीषणाला दिलं. अकस्मात म्हणजे अवघ्या दोन महिन्यात लंकेच्या राज्याचा व रावणाचाही पूर्ण नाश झाला.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मना सांग पां रावणा काय झाले । अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले**
**म्हणोनी कुडी वासना सांडि वेगी । बळे लागला काळ हा पाठिलागी ।।१३।।**

**'म्हणोनी कुडी वासना सांडि वेगी । बळे लागला काळ हा पाठिलागी ।'**

समर्थ म्हणतात की केवळ कुडी म्हणजे दुष्ट वासना ठेवल्यामुळेच बलाढ्य व पराक्रमी रावणाचा संपूर्ण नाश झाला. म्हणून हे मना, तुझ्या मनात जर वाईट वासना डोकावली तर तू तिचा त्वरित म्हणजे वेगाने (वेगी) त्याग कर. तिला क्षणभरासाठीसुद्धा जवळ बाळगू नकोस. माणसाच्या मनात अनेक वासना, इच्छा एकामागून एक अशा येत असतात. त्यातल्या काही चांगल्या असतात तर काही वाईट असतात. वाईट इच्छा म्हणजे दुसऱ्याला त्रास झाला तरी चालेल पण स्वतःची इच्छा पूर्ण झाली पाहिजे असं वाटणं. अशी वासना एकदा आपण पूर्ण केली की मग तिची पूर्तता पुन्हा पुन्हा विनाश्रम करावी असं वाटू लागतं व मग अशा वागण्याची सवयच होऊन बसते. यात दुसऱ्याला जो नाहक त्रास होत असतो त्याचं पाप मात्र आपल्यालाच भविष्यकाळात भोगावं लागतं. शिवाय ज्या कुटुंबासाठी आपण ही वासना पूर्ण करतो ते कुटुंब मात्र या आपल्या पापात वाटेकरी होऊ इच्छित नाही. यासाठी आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।' उदा. प्रामाणिक प्रयत्न करून कमी पैसा मिळवण्यापेक्षा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन लाच खाऊन विनाश्रम पैसा मिळवणं म्हणजे वाईट वासना पुरवणं. समर्थ म्हणतात अशा वासनांचा ताबडतोब त्याग झाला पाहिजे. त्यात दिरंगाई अजीबात उपयोगाची नाही, कारण माणसाच्या मागे काळ सतत बळजबरीने लागलेला असतो. त्याचा पाठलागच करत असतो म्हणातात. 'जिवासवे जन्मे मृत्यू जोड जन्मजात ।' असं गदिमांच्या गीतरामायणात श्रीराम भरताला म्हणतात. हा मृत्यू माणसाच्या जीवनावर केव्हा झडप घालील सांगता येत नाही. त्यामुळे गेलेला क्षण परत मिळत नाही. पुढचा क्षण मिळेल की नाही ते सांगता येत नाही. म्हणून मिळालेला क्षण हा आपण शुभ वासनांची पूर्ती करून सार्थकी लावला पाहिजे. म्हणून समर्थ म्हणतात, 'बळे लागला काळ हा पाठिलागी'. काळ आपला सतत पाठलाग करीत आहे याचं भान ठेवावं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



मंगळवार

**जिवा कर्मयोगे जनी जन्म झाला । परी शेवटी काळमूखी निमाला ।**
**महा थोर ते मृत्युंपथेचि गेले । किती येक ते जन्मले आणि मेले**
**।।१४।।**

**'जिवा कर्मयोगे जनी जन्म झाला'**

प्रत्येक माणसाला हा प्रश्न पडतो की या जगात माझा जन्म कशामुळे झाला? मी या जगात का आलो? माझ्या इथे येण्याचं प्रयोजन काय? आणि माझा शेवट कशात होणार आहे? आणि त्यांच्या नंतर काय होणार आहे? त्याने कितीही डोकं खाजवलं तरी या जन्मातील ज्ञानाच्या आधारावर त्याला या प्रश्नाचं बरोबर उत्तर मिळत नाही म्हणून समर्थांनी त्याला या प्रश्नाचं उत्तर 'कर्मयोगे' या शब्दात दिलं आहे. ते म्हणतात की पूर्वजन्मात केलेल्या कर्मांच्या फळांमुळे जीवाला हा जन्म मिळतो. आपलं तत्वज्ञान असं सांगतं की परम शांत अशा शिवाच्या किंवा ब्रह्माच्या आधारावर कार्यरत असलेल्या अनंत अशा शक्तीचा एक अंश जेव्हा या शक्तीच्या प्रवाहापासून स्वतःला वेगळा मानू लागला तेव्हा साहजिकच त्याच्या ठिकाणी शक्तीच्या गुणधर्माविषयी अज्ञान निर्माण होतं. तेव्हा हा अंश जीव म्हणून शरीरासह या जगात पहिला जन्म घेतो. तेव्हा त्याला फक्त स्वतःचा जीव कसा जगवायचा याचंच नैसर्गिक ज्ञान असतं. त्यासाठी त्याला कर्म करावं लागतं. यातून त्याला कर्म करण्याची गोडी लागते. तसंच या कर्मांमुळे आपल्या इच्छा पूर्ण करता येतात असं समजल्यावर तो जीव जगवण्यापलीकडे आणखी स्वतःच्या सुखप्राप्तीसाठी जास्त जास्त इच्छा करू लागतो व त्यासाठी वेगवेगळी कर्मं करू लागतो. या कर्मातून मग काही इच्छा पुऱ्या होतात तर बऱ्याच वासना अपुऱ्या रहातात. तसंच दुसऱ्यासाठी केलेल्या शुभकर्मातून पुण्य निर्माण होतं तर स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला त्रास देऊन केलेल्या कर्मातून पापाची निर्मिती होते. पण बरीच कर्मं ही पापपुण्यमिश्रित असतात. पुण्याचा परिणाम सुख मिळण्यात व पापाचा परिणाम दुःख देण्यात होतो. अशा रितीने एका जन्मात केलेल्या कर्मांमुळे पुढील दहा जन्म पुरतील इतक्या अपुऱ्या वासना व पाप-पुण्य यांची निर्मिती होते. अशा रितीने जीवन आनंदाने जगत असताच एका क्षणी हे जीवन काळाच्या मुखात शांत होतं व शरीराचा मृत्यू होतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**जिवा कर्मयोगे जनी जन्म झाला । परी शेवटी काळमूखी निमाला ।**
**महा थोर ते मृत्युंपथेचि गेले । किती येक ते जन्मले आणि मेले ।।१४।।**

यापुढील तीन श्लोकात समर्थानी मृत्यूची अपरिहार्यता मनाला समजावून सांगितली आहे. माणसाचं जीवन जन्म आणि मृत्यू यानी सीमित झालेलं असतं. जीवनात कोठल्या घटना घड्याव्या हे अनिश्चित असलं तरी त्याचा मृत्यू ही एक सुनिश्चित व अटळ अशी घटना आहे. फक्त हिचा काळ अनिश्चित आहे एवढंच. मुलाच्या जन्माने त्याच्या नातेवाइकाना आनंद होतो. तर मृत्यूमुळे मरणाऱ्या जीवाला विलक्षण वेदना होत असतात व आता हे जग सोडून जावं लागणार त्याच दाहक दुःखही होत असतं. हे पाहून त्याच्या नातेवाइकानाही दारुण दुःख होत असतं. म्हणून एकूणच मृत्यूचा प्रसंग हा प्रचंड दुःखनिर्मिती करत असतो. कारण जीवनात निर्माण झालेली सुव्यवस्था मृत्यूमुळे पार कोलमडून जाते. इतकंच नव्हे तर अनेक नवीन समस्या निर्माण होतात, ज्या तातडीने सोडवाव्या लागतात. या गोष्टींमुळे माणसाला दुसऱ्याच्या मृत्यूचं प्रचंड दुःख होतं. मृत माणूस जितका जवळचा व सुखदायक तितका दुःखाचा चटका जास्त. शिवाय मृत माणसाच्या जीवंतपणी त्याच्या सहवासात असताना इतरानी जे सुख उपभोगलेलं असतं, त्याच्या आनंददायक आठवणी त्यांच्या स्मृतीत साठवलेल्या असतात, पण माणसाच्या मृत्यूनंतर मात्र याच आठवणी तो आज या जगात नसल्यामुळे अत्यंत दुःखदायक बनतात. त्या विसरायला कठीण असल्यामुळे त्या जितक्या विसरायचा आपण प्रयत्न करू तितक्या त्या जास्त जास्तच आठवत जातात आणि विशेष म्हणजे महान् कीर्ती मिळवलेली मोठी माणसंसुद्धा मृत्यूच्याच मार्गाने या शरीराचा त्याग करून पुढे जातात तर बहुतेक सामान्य माणसं जन्माला येतात आणि जीवनात नाव घेण्यासारवं काही विशेष न करताच मरुन जातात. 'आला आला प्राणी जन्मासी आला । गेला गेला बापुडा व्यर्थ गेला.' असं कवी म्हणतो, तर दोन माणसांच्या संबंधात महाराष्ट्रवाल्मिकी गदिमा म्हणतात 'दोन ओंडक्याची होते सागरात भेट । एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही
गाठ । क्षणिक तेवि आहे बाळा मेळ माणसांचा ।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**मना पाहता सत्य हे मृत्युभूमी । जिता बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव ते सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।।१५।।**

समर्थ या श्लोकात या मृत्यूभूमीवरील आणखी एक आश्चर्यकारक सत्य सांगतात. माणसं या जगात जोपर्यंत जिवंत असतात तोपर्यंत ती स्वतःला मी म्हणवून घेत असतात. आता व्याकरणातील 'मी' हे प्रथमपुरुषी एकवचनी सर्वनाम स्वतःचा उल्लेख करण्यासाठी व्यवहारात आवश्यक आहे ही गोष्ट खरी आहे. माणूस या जगाचे नेहमीच दोन भाग करतो. एक मी व दुसरा उरलेलं जग म्हणजे मी वेगळा व उरलेलं जग वेगळं. माणसाची बहुतेक सर्व कर्मं या उरलेल्या जगातच होत असतात. आता उरलेल्या जगापेक्षा मी मोठा आहे व माझ्या सुखासाठी सुखदायक वस्तू उरलेल्या जगातून मिळवून मी त्या माझ्या मालकीच्या करीन, ज्यामुळे मला हव असलेलं सुख मी हवं तेव्हा उपभोगू शकेन अशी माणसाची प्रवृत्ती होते. तेव्हा या 'मी' चं रूपांतर मीपणात म्हणजे अहंकारात होतं. बरं, या सुखदायक वस्तूंची ओढ संपता संपत नाही. आणि हव्या असलेल्या सर्वच वस्तू प्रयत्नाने मिळतात असंही नाही. मग जो माणूस ही वस्तू मिळण्याच्या आड येतो, त्याच्याविषयी माणसाच्या मनात राग उत्पन्न होतो. शिवाय या सुखाची ओढ अनावर झाली की सुखदायक वस्तू अनीतीच्या मार्गाने म्हणजे दुसऱ्याला त्रास देऊन सुद्धा व तशीच परिस्थिती असल्यास बेकायदेशीरपणे सुद्धा मिळवावी असं वाटू लागतं. तसंच त्याच्याकडे असलेल्या शक्तीचा उपयोग करून इतर माणसानाही तो आपल्या मनाप्रमाणे वागायला लावतो. अशा रीतीने या अहंकाराचं रूपांतर गर्विष्ठपणा, उद्धटपणा व रागीटपणात होतं. आणखीन् आश्चर्य म्हणजे सर्व माणसाना आपल्याला मृत्यू कधीच येणार नाही असं वाटतं. ही जणू स्वतःला अमर व चिरंजीवच समजत असतात. सर्वजण सात चिरंजीवाच्या जोडीला आपण आठवे चिरंजीव आहोत असं समजत असतात. मृत्यूचा विचारसुद्धा ही माणसं मनात येऊ देत नाहीत. इतकंच काय पण त्याविषयी बोलणंसुद्धा अशुभ मानतात. पण वास्तविक आत्म्याचं अमरत्व ते देहावर लादत असतात. धर्मराजाला यक्षाने प्रश्न केला की या जगात सर्वात मोठं आश्चर्य कोठलं? त्यावर सत्यप्रिय धर्मराजाने अचूक उत्तर दिलं की प्रत्यही इतर माणसं समोर मरत असताना दिसत असली तरी प्रत्येक माणसाला आपण मात्र मरणार नाही असंच वाटत असतं हीच आश्चर्याची गोष्ट आहे. पण कधीही उशीर न करणारा मृत्यू ठरल्यावेळीच सर्वाच्या समोर येऊन रहातो व आकस्मिक रीतीने सर्वानाच हे प्रिय जग सोडून जावं लागतं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**मना पाहता सत्य हे मृत्युभूमी । जिता बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव ते सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।।१५।।**

समर्थ म्हणतात, हे मना, सर्व गोष्टींचा नीट विचार केल्यावर तुझ्या एक सत्य लक्षात येईल की हे जग म्हणजे एक मृत्यूभूमी आहे. म्हणजे या जगावर फक्त मृत्यूचा ताबा आहे. या जगातील प्रत्येक गोष्ट क्षणोक्षणी बदलत असते. तिचं रूपांतर होत असतं आपल्या शरीरातील पेशीसुद्धा मरण पावतात व सात वर्षात जुन्या पेशी बदलून, तिथे पूर्णपणे नवीन पेशी येतात. याला फक्त मेंदूच्या पेशींचा अपवाद आहे. तिथल्या पेशी मृत झाल्या तर त्या जागी नवीन पेशी निर्माण होत नाहीत. माणसाच्या जीवनात सतत ज्ञान, विचार, कर्म, त्याचं फल, सुख-दुःख, विकार व भावना यापैकी काहीतरी प्रत्येक क्षणी घडत असतं. पण हे घडण्यासाठी तो जिवंत व जागा किंवा स्वप्नात, असावा लागतो. त्यांच्या जिवंतपणाच्या आधारावर तो त्याचं जीवन जगत असतो. झोपेत त्याच्या नकळत फक्त त्याचा जिवंतपणा त्याच्या सोबतीला असतो. पण एका दुर्दैवी क्षणी त्याचा हा जिवंतपणाच संपतो. मग त्याच्या शरीरात कसलीही हालचाल जी त्याचा जिवंतपणा दर्शवत असते ती आता होईनाशी होते. त्याला आता कोठलीही बाह्य किंवा अंतर् संवेदना जाणवत नाही. त्याची बुद्धी व इंद्रियं आता कसलंही कार्य करीत नाहीत. या स्थितीला मृत्यू असं म्हणतात. हा मृत्यू फक्त शरीर व बुद्धीचा असतो, जीवाचा नसतो. कारण जीव हे निकामी झालेलं शरीर सोडून दुसऱ्या लोकात (स्वर्ग, नरक, पितर वगैरे) रहायला जातो. मग कालांतराने तो दुसरं शरीर धारण करतो. इकडे या मृत शरीराचं रूपांतर होत असतं. ते आता कोठलाही प्रतिकार करण्याच्या अवस्थेत नसल्यामुळे यापुढे इतर सजीव प्राण्याचं अन्न बनतं. त्यामुळे घुबड, पक्षी, प्राणी वगैरे या शरीराचे लचके तोडून ते शरीर छिन्नभिन्न करतात. अशा रीतीने शरीरावरचं सर्व मास खाऊन झाल्यावर फक्त हाडाचा सापळा शिल्लक रहातो. आणखी काही काळपर्यंत फक्त कुत्र्याना हाडं चघळण्यासाठी याचा उपयोग होतो. नंतर एकेक करुन सर्व हाडांचा चुरा होतो व मातीतून निर्माण झालेलं हे शरीर मातीतच विलीन होतं. कवी म्हणतो, 'माती अससी, मातीत मिळसी' ।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे ।**
**पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्याते । म्हणोनी जनी मागुता जन्म घेते ।।१६।।**

**'पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्याते । म्हणोनि जनी मागुता जन्म घेते ।'**

माणसाचा मृत्यू झाल्यावर नातेवाईकाना दुःख होणं सहाजिकच आहे. पण त्याचं रूपांतर शोकामध्ये का होतं याच उत्तर समर्थांनी या दोन ओळीत दिलं आहे. मेलेला माणूस जिवंत असताना त्याच्यापासून नातेवाईकाना जे सुख मिळत होतं, ज्या सुविधा, सुखसोयी मिळत होत्या त्यांची त्याना इतकी सवय झालेली असते की कधीतरी या सुखसोयी बंद होतील याची त्यांना कल्पनाच करवत नाही. आपण कधीतरी या सुखाना मुकू असं त्यांच्या स्वप्नातही येत नाही. म्हणून मृत्यूचा विचारसुद्धा करणं त्यांना अशुभ अमंगल वाटतं. पण कितीही म्हटलं तरी मृत्यू त्याच्या यायच्या वेळी येतोच. त्याच्या येण्यात कधीही क्षणाचा देखील उशीर होत नाही, की क्षणाची चूकही होत नाही. तो आल्यानंतर मात्र सर्व चित्र बदलून जातं. पूर्वी मिळत असलेल्या सर्व सुखसोयी एका क्षणात मिळायच्या थांबतात. थांबतात म्हणजे कायमच्या थांबतात. पुष्पशय्येवरचं मखमली जीवन आता काट्याकुट्यानी रक्तबंबाळ होतं. या सुखसोयींचा त्याच्या मनात जणू लोभ उत्पन्न झालेला असतो. जिवंतपणी त्याच्यापासून मिळणाऱ्या सुखसोयी अपुऱ्या वाटतात म्हणून त्यांची मागणी सतत वाढत असते. आता या वाढलेल्या मागण्या पुऱ्या व्हायच्या ऐवजी मृत्यूमुळे पूर्वी मिळत असलेल्या मागण्यासुद्धा अचानकपणे पुऱ्या व्हायच्या थांबतात तेव्हा या नातेवाईकांच्या मनात आता शोकामुळे लोभाचं रुपांतर क्षोभात होतं. म्हणून त्यांचं मन आता क्षुब्ध होऊ लागतं. म्हणजे लोभामुळे शोक व शोकातून क्षोभ अशी साखळी तयार होते व त्यामुळे एरवी शांत असलेलं त्याचं मन प्रक्षुब्ध होतं. या प्रक्षुब्धतेच्या अविवेकातून त्यांची कर्मं होऊ लागली की या सर्वांचा परिणाम अपुऱ्या वासना, त्या पुऱ्या करण्यासाठी होणारी कर्मं, त्यातून निर्माण होणारं पाप व पुण्य, या सर्वामुळे त्या जीवाला पुन्हा पुन्हा या जगात जन्म घ्यावा लागतो व हे जन्म-मरणाचं राहटगाडगं त्याच्या मागे कायमचं लागतं. या संबंधात शंकराचार्य म्हणतात, पुनरपि जननं, पुनरपि मरणं । पुनरपि जननी जठरे शयनं ।, तर समर्थ म्हणतात, **'म्हणोनी जनी मागुता जन्म घेते।'**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे ।**
**पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्याते । म्हणोनी जनी मागुता जन्म घेते ।।१६।।**

**'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे'**

माणसाचा मृत्यू हा नेहमीच अकस्मात होतो आणि हा मृत्यू मरणाऱ्या माणसासाठी वेदनादायक तर असतोच पण त्याच्या आसपासच्या माणसानाही या वेदना पहावत नाहीत याचं त्यानाही दुःख होत असतं. मरणाऱ्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याचं दुःख थांबतं व आता त्याच्या जीवाचा परलोकाचा प्रवास सुरू होतो पण त्याच्या मृत्यूमुळे त्याच्या नातेवाईकाना प्रचंड दुःख होतं. मरणारा माणूस जितका जवळचा, जितका सुख देणारा आणि जितका महान् तितकं त्याच्या मरणाचं दुःखही जास्त. याचा मृत्यू म्हणजे काही काळापुरतं असण्याचं रुपांतर, त्याच्या नातेवाईकांच्या दृष्टीने कायमचं नसण्यात होणं. त्यामुळे जिवलगाचा मृत्यू हा सामान्य माणसाच्या आयुष्यात प्रचंड वादळ, मानसिक उत्पात, खळबळ, पडझड, झंझावात घडवून आणतो. विशेषतः प्रिय पतीचा मृत्यू झाल्यावर, त्याच्या दुःखी बायकोची अवस्था अगदी पहावत नाही. पतीच्या छातीवर तिने डोकं ठेवून केलेला आक्रोश, लोक प्रेत घरातून बाहेर नेताना तिनं फोडलेल्या हृदयद्रावक किंकाळ्या यानी ऐकणाऱ्याच्या कानाचे पडदे फाटून जातात व हृदय विदीर्ण होईल की काय असं त्याला वाटू लागतं. साऱ्या घरालाच स्मशानकळा आलेली असते. पतीचा मृत्यू होताच एका क्षणात त्या बाईची सर्व कळाच पालटून जाते. कारण त्या अभद्र क्षणी ती सुखाच्या शिखरावरून दुःखाच्या खोल गर्तेत फेकली जाते. आता पुढचं सर्व जीवन तिला तिच्या जिवलग व प्राणप्रिय पतीशिवाय त्या दरीतच एकाकीपणाने काढायचं असतं. दुःखाच्या लाटानी तिला वेड लागायचंच फक्त बाकी राहिलेलं असतं. त्यांच्या बदली आपण का गेलो नाही हा विचार तिच्या मनात हजार वेळा तरी येऊन गेलेला असतो. पण प्रत्यक्षात तोच गेलेला असतो व 'ती' तिच्या भग्न हृदयासह, जिवंत असूनही प्रेतवत् राहिलेली असते, ही अत्यंत कटू व तिला न पेलणारी वस्तुस्थिती असते. या कटु वस्तुस्थितीपासून दूर जाऊन तिच्या दुबळ्या मनाने असंख्य कल्पना केल्यामुळे तिला सतत दुःख होत रहातं. पण आश्चर्य म्हणजे आपणही असेच अकस्मात् आपल्या लेकी सुनाना व मुलानातवंडाना या दुःखसागरात लोटून हे जग व त्यातील आपल्याला आवडणारी माणसं व वस्तू सोडून जाणार आहोत याची तिला अजीबात आठवण होत नाही. याकरता समर्थ म्हणतात **'अकस्मात तोही पुढे जात आहे'.**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मनी मानव व्यर्थ चिंता वहाते । अकस्मात होणार होऊनि जाते ।**
**घडे भोगणे सर्व ही कर्मयोगे । मतीमंद ते खेद मानी वियोगे ।।१७।।**

**'मनी मानव व्यर्थ चिंता वहाते । अकस्मात होणार होऊनी जाते ।'**

माणसाला चिंता करीत बसण्याची सवयच असते. माणूस एखाद्या हेतूने काहीतरी गोष्ट मिळवायची असं ठरवतो आणि त्याप्रमाणे प्रयत्नही करतो. आता त्या कर्माचं फळ मिळायला अवकाश असेल तर दरम्यानच्या मधल्या काळात आपल्या हेतूप्रमाणे आपल्याला फळ मिळेल की नाही याची चिंता करू लागतो. आता त्याने केलेला प्रयत्न हा पुरेसा योग्य अचूक व कौशल्याने केलेला असेल तर त्याचं अनुकूल असं फळ मिळायला काही हरकत नसते. पण बहुधा तसं नसतं. प्रयत्नात कुठेतरी कमतरता असते. पण तरीही त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे फळ, हवं असतं आणि म्हणून ते फळ आपल्याला हवं तसं मिळेल की नाही याची तो चिंता करीत बसतो. विद्यार्थ्यांची परिक्षा, अभ्यास व मिळालेले गुण हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. अर्थात ही काळजी, चिंता व्यर्थ असते पण ती सतत माणसाचं मन पोखरत रहाते. म्हणून 'काळजी घ्यावी पण काळजी करू नये असं एका सत्पुरुषाने म्हटलं आहे.

या विश्वातील सर्वच घटना पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पानेच घडत असल्यामुळे माणसाला त्याने केलेल्या कोठल्याही कर्माचं फळ हे त्या ईश्वरी संकल्पानुसारच मिळत असतं. फक्त ते भविष्यकाळात मिळणार असल्यामुळे ते फळ वर्तमानकाळात येईपर्यंत माणसाला समजत नाही. म्हणून मधल्या काळात तो चिंता करीत बसतो. वर्तमानातलं त्याच्या कर्माचं फळ जर त्याला प्रतिकूल असेल तर ते अकस्मात घडलं, अचानक ध्यानी मनी नसताना गोष्ट घडून गेली असं त्याला वाटतं. पण ती गोष्ट ईश्वरीसंकल्पानुसारच घडलेली असते.

पहिल्या ओळीत समर्थांनी चिंता करणाऱ्या माणसाचा उल्लेख नपुसकलिंगी केलेला आहे. तो त्याच्या दुर्बलतेचं द्योतक आहे. आपण जसं काही कळत नसलेल्या माणसाचा उल्लेख ते येडं का खुळं असा करतो तसं. तुकाराम महाराजाचा उल्लेख त्यांची बायको जिजाई 'आमचं येडं, खुळं' असा प्रेमाने करीत असे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



मंगळवार

**मनी मानव व्यर्थ चिंता वहाते । अकस्मात होणार होऊनि जाते ।**
**घडे भोगणे सर्व ही कर्मयोगे । मतीमंद ते खेद मानी वियोगे ।।१७।।**

**'घडे भोगणे सर्वही कर्मयोगे । मतीमंद ते खेद मानी वियोगे ।'**

माणसाच्या जीवनात सदैव घटना घडत असतात. त्यातल्या काही सुखमय असतात तर काही दुःखमय असतात. सुखमय घटना पुन्हा पुन्हा घडाव्यात तर दुःखमय घटना अजीबात घडू नयेत असं त्याला सतत वाटतं. म्हणून मी सुखाचा उपभोग घेतला व मला दुःख भोगावं लागलं असं तो म्हणतो. सुखाची संवेदना त्याला हवीहवीशी वाटते व दुःखाची वेदना त्याला नकोशी वाटते. आपल्या शास्त्रात 'प्रतिकूल वेदनीय दुःखं' अशी दुःखाची व्याख्या केली आहे. म्हणजे मनात असलेल्या व हव्याहव्याशा वाटणाऱ्या विचाराला प्रतिकूल म्हणजे त्या विचाराच्या विरुद्ध अशी वेदना म्हणजेच दुःख. याचा अर्थ हवी हवीशी वाटणारी घटना घडली नाही तरी दुःख होतं व नकोशी वाटणारी घटना घडली तर दुःख हे होतंच. याच्याच जोडीला शारिरिक दुःख किंवा वेदना ही असतेच.

आता ही दुःखदायक घटना घडल्यावर माणूस ती का घडली व या घटनेला जबाबदार कोण याचा शोध घेऊ लागतो. मग त्याला हिला कारण असलेला कोणीतरी माणूस सापडतो व काहीतरी विशिष्ट परिस्थिती जबाबदार आहे असंही त्याला समजतं. आता परिस्थिती काही बदलता येत नाही म्हणून तो त्या माणसालाच जबाबदार धरतो व त्याला कशी शिक्षा करता येईल याचा विचार करू लागतो. पण समर्थांनी याचं उत्तर या ओळीत दिलं आहे. ते म्हणतात की दुःख देणारा माणूस हा कारण नसतो तर तो फक्त निमित्त असतो व माणसाने पूर्वजन्मी केलेलं पापच त्या दुःखाला कारणीभूत असतं व ते पापच हे दुःखदायक फल निर्माण करीत असतं. पण हे लक्षात न आल्यामुळे मती मंद म्हणजे कमी बुद्धीचा माणूस कोठल्याही दुःखदायक वियोगाचा खेद मानत असतो. मग तो वियोग मालकीच्या वस्तूंचा असो की माणसांच्या मृत्यूतून निघालेला असो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



बुधवार

**मना राघवेवीण आशा नको रे । मना मानवाची नको कीर्ती तू रे ।**
**जया वर्णिती वेद, शास्त्रे, पुराणे । तया वर्णिता सर्वही श्लाध्यवाणे ।।१८।।**

अशा तऱ्हेने शोक, खेद, चिंता, मृत्यूचं भय वगैरे सोडण्यासाठी अभ्यास केल्यानंतर माणसाच्या मनाला समर्थ या श्लोकात काही विधायक सूचना करीत आहेत. जितक्या प्रमाणात माणसाच्या मनातील विकार व अनावश्यक विचार नाहीसे होतात तितक्या प्रमाणात त्याचं मन मोकळं होऊ लागतं आणि मग ते विधायक विचारानी भरता येतं. म्हणून समर्थ सांगतात की हे मना, एका राघवाशिवाय तू इतर कोणाचीही आशा बाळगू नकोस. इतर कोणाचाही भरवसा धरू नकोस. फक्त त्याच्याच कीर्तीचं वर्णन कर. त्याच्याशिवाय इतर माणसांच्या कीर्तीचं, श्रीमंतीचं, सत्तेचं व प्रतिष्ठेचं वर्णन अजीबात करू नकोस. कारण साधारणतः स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी आपला स्वार्थ साधण्यासाठीच मोठ्या माणसांची स्तुतिस्तोत्रं गाइली जातात. बहुधा ती लाचारीपोटी केलेली व म्हणून अनाठायी असतात. म्हणून तू माणसांच्या सद्‌गुणांबद्दल जरुर आदर बाळग. त्यांचं योग्य कौतुक जरूर कर. पण त्यांची खोटी स्तुती करण्याच्या फंदात तू पडू नकोस. त्या ऐवजी चार वेद, सहा शास्त्रं व अठरा पुराणं ही ज्या गुणांचा सागर असलेल्या ईश्वराचं वर्णन करताना थकून गेली त्या ईश्वराचं गुणगान करणं, त्याला पूर्णपणे समजावून घेणं, त्याची भक्ती अनन्यभावाने करणं व ती करताकरताच त्याच्याशी एकरूप होऊन जाणं हेच तुझ्या जीवनाचं ध्येय असू दे. आपल्या प्रापंचिक सुखाना प्राधान्य देऊन ती पुरवण्याचं साधन म्हणून तू ईश्वराची भक्ती करू नकोस. आपल्या आशा पुऱ्या करण्यासाठी ईश्वराला प्रसन्न करण्याचा व्यर्थ खटाटोप तू करू नकोस. त्याच्या गुणांचं तुझ्याकडून चिंतन होईल. मग त्यातूनच ते गुण काही प्रमाणात तरी वागणूकीत दिसू लागतील आणि मग तुझं सर्वच जीवन श्लाध्यवाणे म्हणजे पवित्र, मंगल, पावन व इतर सामान्य माणसानी तुझी स्तुती करावी असं आदर्श बनेल. तुझं सर्वच जीवन त्याना अनुकरणीय असं होईल. यासाठी कवी म्हणतात, 'स्तुती करावी परमेश्वराची । करू नये व्यर्थ कधी नराची''

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**मना सर्वथा सत्य सांडू नको रे । मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।**
**मना सत्य ते सत्य वाचे वदावे । मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ।।१९।।**

**'मना सर्वथा सत्य सांडू नको रे । मना सवर्था मिथ्य मांडू नको रे ।'**

या दोन ओळीत समर्थ सांगतात की हे मना, तू कधीही कोठल्याही प्रकाराने सत्य सोडू नकोस. त्याचा त्याग करू नकोस, आणि कोणत्याही पद्धतीने, केव्हाही मिथ्या गोष्टीचा, वस्तूचा व प्रसंगांचा देखावा मांडू नकोस. येथे समर्थांनी सत्य आणि मिथ्या असे दोन शब्द वापरले आहेत. व्यवहारात सत्य हा शब्द खरं या अर्थाने व मिथ्या हा शब्द खोटं, भ्रामक या अर्थाने वापरला जातो. आता कोर्टात सत्य तेच सांगेन अशी शपथ घेऊन मग पैशासाठी सराईतपणे खोटं बोलणारे साक्षीदार असतात. त्यांच्यासाठी समर्थ मिथ्या हा शब्द वापरतात. पण तत्वज्ञानात मात्र या दोन्ही शब्दांचा अर्थ वेगळा आहे. आपण व्यवहारात समजतो तसा तो नाही. सत्य हा शब्द सत् या शब्दापासून बनला आहे. सत् म्हणजे जे सदैव अस्तित्वात असतं व ज्याच्यात कधीही व कसलाही बदल होत नाही असं तत्व. आता हा शब्द फक्त ईश्वरालाच उद्देशून वापरता येतो. म्हणून सत्य म्हणजे ईश्वर किंवा त्याचं प्रतीक असलेला राघव. त्याला तू कधीही सोडू नकोस असं समर्थ मनाला बजावून सांगतात. मिथ्या हा शब्द मिथ् या संस्कृत धातूपासून झाला आहे. मिथ् या शब्दाचा अर्थ दोन गोष्टी एकमेकाना जोडणे असा आहे किंवा त्या जुळून एकत्र येणे असाही त्याचा अर्थ होतो. त्यामुळे शंकराचार्य म्हणतात की ब्रह्म सत्य जगत् मिथ्या म्हणजे ज्यात कधीही बदल होत नाही असं सत्य ब्रह्म किंवा ईश्वर आणि जिच्यात नेहमीच बदल होतो, जिचं क्षणोक्षणी रूपांतर होत असतं अशी त्याची मायाशक्ती, या दोन गोष्टी एकत्र जुळून आल्या की मिथ्या असलेलं जग निर्माण होतं. मग सामान्य अज्ञानी जीव बदलत्या मायाशक्तीला जास्त महत्व देतात व सत्य ईश्वराला ते ओळखतही नाहीत. मग ते मिथ्या अशा जगातील मिथ्या वस्तूंचा पसारा मांडून त्याचं प्रदर्शन करतात, पण काळाचं बोलावणं आलं की पसारा खालीच रहातो. म्हणून समर्थ म्हणतात की 'मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।'

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

मना सर्वथा सत्य सांडू नको रे । मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।
मना सत्य ते सत्य वाचे वदावे । मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ।।१९।।

**मना सत्य ते सत्य वाचे वदावे । मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ।**

या दोन ओळीत समर्थ मनाला सत्य आणि मिथ्या या शब्दांच्या व्यावहारिक अर्थाचा उपदेश करत आहेत. आता त्यांच्या दृष्टीने सत्य म्हणजे खरं आणि मिथ्य म्हणजे खोटं म्हणून ते मनाला उपदेश करीत आहेत की हे मना तू नेहमी तोंडाने खरं आहे तेच बोल. खोटं भाषण कधीही करू नकोस. खोटं बोलण्यापेक्षा बोलला नाहीस, मौन पाळलंस तरी चालेल. पण खोटं बोलू नकोस.

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यं अप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयात एष धर्म सनातनः ।।

हे सुभाषित सांगतं की खरं आणि लोकाना आवडेल असं बोलावं पण जे त्याना आवडणार नाही ते खरं असलं तरी बोलू नये आणि लोकाना आवडतं ते खोटं असेल तर बोलू नये. कारण बोललंच पाहिजे अशी माणसावर कोणी सक्ती केलेली नसते.

स्वतःचा स्वार्थ साधावा, स्वतःचा फायदा व्हावा यासाठी माणूस खोटं बोलून दुसऱ्याची फसवणूक जेव्हा करतो तेव्हा त्यातून निःखळ पापाचीच निर्मिती होते व त्याचा परिणाम म्हणून त्याला भविष्यकाळी किंवा पुढील जन्मात दुःखच भोगावं लागतं. म्हणजेच कोठल्याही दुःखाच्या निर्मितीसाठी याने इतरांची भूतकाळात किंवा मागील जन्मी केलेली फसवणूकच जबाबदार असते याची त्याला कल्पनाही नसते. माणूस मात्र या दुःखाचं खापर कोणातरी निमित्त झालेल्या माणसाच्या डोक्यावर फोडत असतो व त्याला शिक्षा करण्यासाठी धडपड करीत असतो.

म्हणून खोटं बोलण्याच्या मागचा हेतू हा नेहमी लक्षात घेतला पाहिजे. तो जर दुसऱ्याच्या हिताचा कल्याणाचा असेल तर प्रसंगी थोडंसं खोटं बोलणं क्षम्य ठरतं. उदा. असाध्य रोग झालेल्या माणसाला सत्य सांगण्यापेक्षा प्रसंगी तुझं दुखणं बरं होऊ शकेल असं सांगून त्याची रोगप्रतिकारशक्ती वाढवणं हे रोग्याच्या हिताचं ठरतं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**बहू हिंपुटी होइजे मायपोटी । नको रे मना यातना तेचि मोठी ।**
**निरोधे पचे कोंडिले गर्भवासी । अधोमुख रे दुःख त्या बाळकासी ।।२०।।**

मुलाने आईच्या गर्भातून या जगात प्रवेश करण्यापूर्वी त्याला प्रथम कमीतकमी ९ महिन्याची अंधारकोठडी तीही त्याच्याच आकाराची मातेच्या उदरात भोगावी लागते. त्यात त्याला स्वतःच्या पालन पोषणासाठी नाळ या नावाच्या नळीच्याद्वारे आईच्या शरीरावरच अवलंबून राहावं लागतं. शिवाय जागा अत्यंत अरुंद व लहान असल्यामुळे त्याला अजिबात हालचाल करता येत नाही. बहुतेक वेळ त्याला आपल्या हातानी शरीराला मिठी मारून व आपले पाय पोटाशी घेऊन रहावं लागतं. अशा स्थितीत तो आईच्या गर्भात गटांगळ्या खात असतो. त्यामुळे अनेक वेळा खाली डोकं वर कंबर अशा स्थितीत बराच काळ काढावा लागतो. शिवाय याच अवस्थेत त्याला या जगात प्रवेश मिळण्यासाठी कित्येक तास काढावे लागतात. या नऊ महिन्यात त्याचं शरीर आणि जीव यांची अक्षरशः उकडहंडी होते इतका तो जठराग्नीच्या जवळीकीने शिजत असतो. या सर्व गोष्टींमुळे त्या लहानग्या जीवाला फारच दुःख आणि यातना भोगाव्या लागतात. त्यामुळे तो फारच कष्टी आणि कासावीस होतो आणि या यमयातनातून आपली सुटका केव्हा होईल याची वाट पहात बसण्यापलीकडे त्याच्या हातात काहीच नसतं. बरं, या नऊ महिन्यात इतर सर्व गोष्टी सुरळित झाल्या तरच त्याला या जगात सुखरूप प्रवेश मिळणार असतो. एखादी गोष्ट जरी बिनसली तरी त्याचा मृत्यू हा हमखास ठरलेलाच. उदा. नाळ शरीराभोवती गुंडाळली गेली व जन्माला येताना मूल आडवं आलं की सर्व संपलंच. या शिवाय त्याच्या आईलासुद्धा या यातनेच्या आवर्तातून जावं लागतं. सुरवातीला डोहाळ्याचा त्रास, उलट्या, पोट बिघडणं यानी तिचा जीव बेजार होतो. नंतरच्या काळात वजन पोटात घेऊन तिला सगळीकडे वावरावं लागतं. आणि शेवटी तर प्रसुतीच्या वेळेस तिच्या गर्भात वेदनांचा हलकल्लोळ माजलेला असतो. प्रत्येक कळ सहनशक्तीच्या दृष्टीने शेवटचीच असं वाटत असताना पुढची कळ पहिल्यापेक्षा जास्त त्रासदायक असते. ही वस्तुस्थिती या श्लोकांत वर्णन केली आहे. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात "कितीक जन्मा यावे । कितीक व्हावे फजीत ।"

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**मना वासना चूकवी येरझारा । मना कामना सांडि रे द्रव्य दारा ।**
**मना यातना थोर हे गर्भवासी । मना सज्जना भेटवी राघवासी ।।२१।।**

या श्लोकात समर्थांनी वापरलेला 'येरझारा' हा शब्द फारच बोलका व वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. जन्मानंतर जीवन आणि शेवटी मरण आणि मरणानंतर इतर लोकांत (स्वर्ग, नरक, पितर इत्यादि) काही काळ वसती आणि त्यानंतर पुन्हा जन्म हे जीवाच्या मागे लागलेलं कायमचं चक्र, हे 'येरझारा' या शब्दाने समर्थांनी सुचवलेलं आहे. यातील जीवाचा मातेच्या गर्भाशयातील मुक्काम हा फारच वेदना देणारा असतो हे समर्थांनी तिसऱ्या ओळीत सांगितलं आहे आणि आई व मूल या दोघानाही या यातना भोगाव्या लागतात हे त्यातलं वैशिष्ट्य आहे, जन्मानंतरच्या जीवनातही 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे.' मरणाच्यावेळी जीवालाही व त्याच्या नातेवाईकांना प्रचंड यातना भोगाव्या लागतात. आता या जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळवणं व दुःखातून आपली कायमची सुटका करून घेणं हे माणसाचं आद्य कर्तव्य ठरतं म्हणून त्याने सतत तशी इच्छा मनात बाळगली पाहिजे. या मुक्तीसाठी समर्थांनी पैसा व स्त्री (किंवा पुरुष) यांच्या आकर्षणाचा त्याग व राघवाची भेट म्हणजे त्याचं सतत स्मरण असे दोन उपाय सांगितले आहेत. ते म्हणतात, 'हे मना, तू संपत्तीच्या व भिन्नलिंगी आकर्षणाच्या मोहजालात गुरफटून जाऊ नकोस. या वासनापूर्तीची जेव्हा आसक्ती निर्माण होते व ती जेव्हा मर्यादेबाहेर जाते तेव्हा या वासनांचं रूपांतर कामनांमध्ये होतं. मग त्यांची अगणित वेळा तृप्ती झाली तरी या कामना शमत नाहीत. त्या तशाच राहतात. म्हणून या वासना मुळातूनच सोडून देण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच या वासनांचा तू गरजेपुरताच उपभोग घे व अनावश्यक कामनांचा त्याग कर. शिवाय, हे सज्जन मना, तू याच्याच जोडीला सदैव राघवाचं स्मरण कर. त्याच्या सदगुणांचं चिंतन कर. त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न कर. तू मूळचा सज्जन असल्यामुळे तुला या जीवाची व राघवाची भेट यातूनच घडवून आणता येईल. तितकं तुझ्या ठिकाणी निश्चितपणे सामर्थ्य आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मना सज्जना हीत माझे करावे । रघूनायका दृढ चित्ती धरावे ।
महाराज तो स्वामि वायू सुताचा । जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ।।२२।।**

या श्लोकात समर्थ मनाला कळवळून सांगत आहेत. त्याची प्रार्थना करीत आहेत की हे मना, तू मूळचा सज्जन आहेस आणि दुसऱ्याचं कल्याण करणं हे सज्जनाचं कर्तव्यच असतं. म्हणून तू माझं म्हणजे या जीवाचं हित कर. या जगात जीवाला हितकारक अशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे त्या रघूनायकाला चित्तामध्ये दृढपणे धारण करण्यासाठी या जीवाला मदत करणं ही होय. आता तू हे कसं करू शकशील? तर त्यासाठी त्या रघुरायाचं क्षणोक्षणी स्मरण करण्याचं काम तुला करावं लागेल. जास्त नाही तर प्रत्येक क्षणी एकच क्षण त्या राघवाचं तुला स्मरण करावं लागेल. केव्हा ते नाम घेऊन तुला करता येईल तर कधी त्याची सुंदर मूर्ती तुला तुझ्या डोळ्यासमोर (मनःचक्षु) आणून त्याच्या लावण्याचा आनंद तुला लुटता येईल. शिवाय सर्व घटना रामरायाच्याच इच्छेने घडतात असं म्हणून घडलेल्या कोठल्याही घटनेतून तुला त्याची आठवण करता येईल तर कधी त्याच्या जीवनचरित्रातल्या दिव्य सद्गुणांचं वर्णन तुला आठवता येईल. अशा तऱ्हेने त्या श्रीरामाला तू तुझ्या ठिकाणी धरून ठेवू शकशील.

समर्थ पुढे हा श्रीराम कसा आहे याचं वर्णन करतात. ते म्हणतात, 'बा मना, तू स्वतःला अतिशय वेगवान् समजतोस ना! पण तुझ्या इतकाच वेगवान् असणारा जो वायू त्याचा त्याच्याइतकाच वेगवान् असणारा जो त्याचा पुत्र हनुमान त्याचेही स्वामी महाराज रामप्रभूच आहेत. ते या तीनही लोकांचे नाथ आहेत. ते विश्वनियंता आहेत. इतकंच नव्हे तर त्यांची भक्ती करणाऱ्या रामभक्तांचा उद्धार करण्याचं व्रतच त्यानी जणू काही घेतलेलं आहे. हे त्याचं व्रत हा त्यांच्या श्रेष्ठत्वाच्या मुकुटातील दिव्य, दैदीप्यमान व अद्भुत असा मणीच आहे. हे श्रीराम विश्वनिर्माता, विश्वनियंता, विश्वव्यापक, विश्वज्ञानी व सर्वशक्तिमान आणि रामभक्तांसाठी परमप्रेममय व त्यांच्या उद्धाराचं कंकण हातात परिधान केलेले असे आहेत. शिवाय त्यांच्या पूर्वनियोजित संकल्पानुसारच या विश्वात प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक क्षणी विविध प्रकारच्या घटना घडत असतात. तेव्हा अशा रघुनाथाला अत्यंत दृढ भावनेने तुझ्या ठिकाणी धरून ठेवावं हे तुझं आद्य आणि परमश्रेष्ठ कर्तव्य आहे आणि ते तू जाणतेपणाने करशील अशी मला खात्री आहे.'

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**न बोले मना राघवेवीण काही । जनी वाऊगे बोलता सूख नाही ।**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो । देहांती तुला कोण सोडू पहातो ।।२३।।**

माणूस आपल्या बोलण्यामुळे इतरांशी संबंध साधू शकतो. गोड बोलून तो इतरांची मनं जिंकू शकतो. म्हणून समर्थ म्हणतात की राघव प्रसन्न व्हावा असं तुला वाटत असेल तर वाचेने तू सदैव त्याचं स्मरण ठेव. म्हणजे तोंडाने नेहमी त्याचं नाव घेत जा. हे घेतलेलं नावच तुला त्याची प्राप्ती करून देईल. आपल्याला त्याचं नाव जास्तीत जास्त वेळ कसं घेता येईल याचाच तुला सदैव ध्यास असू दे.

आपण आपल्या रोजच्या बोलण्याचं निरिक्षण केलं तर आपल्या असं लक्षात येईल की आपला बराचसा वेळ स्वतःची स्तुती करण्यात व दुसऱ्याचे दोष उगाळत बसण्यात जातो. तसंच वर्तमानपत्रातल्या व दूरदर्शनवरील बातम्या, राजकारण व महागाई, शिवाय चित्रपट, नाटकं, नटनट्या, याबद्दल आपण अखंड बोलत असतो. आपला हा सर्वच वेळ वाया जात असतो कारण यातून काहीच निष्पन्न होत नाही. म्हणून समर्थ म्हणतात की हे मना, हा सर्व वेळ तुला श्रीरामाचं नाव घेण्यासाठी उपयोगात आणता येईल. चारचौघात बसून वायफळ गप्पा मारण्यात क्षणभर सुख वाटलं तरी ते शाश्वत सुख नाही, याची तुला सदैव जाणीव असू दे.

माणसाच्या जीवनाचं हे वैशिष्ट्य आहे की त्यातील प्रत्येक क्षण हा मोलाचा व महत्वाचा आहे. तसंच कितीही किंमत मोजली तरी त्यातील गेलेला क्षण परत येत नाही. गेलेला पैसा, गमावलेली कीर्ती, हरवलेलं प्रेम या सर्व गोष्टी प्रयत्नानी परत मिळवता येतात. पण धनुष्यातून सुटलेला बाण व जीवनातून निसटलेला क्षण हा पुन्हा परत येत नाही. क्षणाक्षणानी, दिवसानी, महिन्यानी, वर्षानी आपली वाटचाल मृत्यूच्या दिशेत चालू असते आणि शेवटी तो क्षण येतो. या जगात आपण केलेली कमाई, स्थावर-जंगम मिळकत सर्व इथेच सोडून पुढील प्रवासासाठी माणूस या जगाचा, त्यातील आपल्या लोकांचा निरोप घेतो. या मृत्यूच्या क्षणातून आपली कोणीही सुटका करू शकत नाही. आपल्याला कोणीही आपल्या देहांताच्या वेळी सोडवू शकत नाही. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात. काळाचीही उडी पडेल बा जेव्हा । सोडविना तेव्हा मायबाप।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**रघुनायकावीण वाया शिणावे । जनासारिखे व्यर्थ का वोसणावे ।**
**सदासर्वदा नाम वाचे वसो दे । अहंता मनी पापिणी ते नसो दे ।।२४।।**

सामान्य माणसाच्या जीवनाचं ध्येय क्षणोक्षणी जास्तीत जास्त सुखप्राप्ती हे असतं. त्यासाठी तो आयुष्यभर काबाडकष्ट करत असतो. सुख देणाऱ्या वस्तू मिळवण्यासाठी तो जन्मभर शिणत रहातो. पण मरणानंतर या वस्तूंपैकी त्याला काहीच म्हणजे एखादी बारिकशी सुईसुद्धा, बरोबर नेता येणार नसल्यामुळे मिळवलेलं सर्व इथेच रहातं. त्यामुळे जन्मभर केलेले श्रम वाया जातात आणि ज्यासाठी एवढी धडपड केली ते मिळालेलं सुख तर क्षणिक असतं. त्यामुळे सारं जीवन म्हणजे सुखाच्या आसक्तीच्या मृगजळाच्यामागे केलेली व फुकट गेलेली व्यर्थ धावपळच ठरते. हे असं कां होतं? तर त्या जीवनात श्रीरामाचं स्मरण, त्या रघूनायकाच्या सदगुणांची, त्याच्या मोठेपणाची, त्याच्या भक्तांचा उद्धार करण्याच्या ब्रीदाची यत्किंचितही आठवण नसते म्हणून. म्हणून समर्थ मनाला तळमळीने समजावून सांगत आहेत की मना, तुला जर कष्ट केल्याशिवाय सुखशांती हवी असेल तर तू सदैव तोंडाने रामाचं नाव म्हणजे रामनाम घेत चल. हा अगदी बिनखर्चाचा बिनश्रमाचा उपाय आहे. यासाठी इतर कोणत्याही गोष्टींची गरज लागत नाही. हे मना, या नामस्मरणात तुझी एकाग्रता साधली की महासुख तुझ्यासमोर हात जोडून उभं राहील व या महासुखात तू बुडून जाशील. या सुखाला फक्त एकाच गोष्टीची दृष्ट लागते. ती म्हणजे पापिणी अहंता. या पापिणी अहंतेला तू जवळपाससुद्धा फिरकू देऊ नकोस. तिला अजिबात थारा देऊ नकोस. म्हणजे मी ईश्वराचं नाम घेतो त्याचं स्मरण करतो म्हणजे इतर सामान्य माणसांपेक्षा मी श्रेष्ठ आहे व म्हणून बाकी सर्व सामान्य माणसानी माझा उपदेश ऐकला पाहिजे, सल्ला घेतला पाहिजे, माझं म्हणणं मानलं पाहिजे अशा अहंकारातून निघालेल्या विचाराना अजिबात प्रवेश देऊ नकोस, कारण हा पाप निर्माण करणारा अहंकार अंती दुःखदायक ठरतो. कारण अयोग्य तुलना व चुकीच्या अपेक्षा ही या अहंतेची अस्त्रं असतात. म्हणून हे मना, तू अहंकाररहित होऊन नामस्मरण कर. समर्थ एका ठिकाणी म्हणतात **'जयासि वाटे सुखचि असावे । तेणे रघुनाथभजनी लागावे'.**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**मना वीट मानू नको बोलण्याचा । पुढे मागुता राम जोडेल कैचा ।**
**सुखाची घडी लोटता सुख आहे । पुढे सर्व जाईल काही न राहे ।।२५।।**

माणसाला दोन प्रकारच्या बोलण्याचा कंटाळा येतो. एक उपदेश आणि दुसरी निंदा. माणसाला आपली स्तुती ऐकण्याचा कधीच वीट येत नाही. पण ज्याची योग्यता नाही, ज्याला अधिकार नाही आणि ज्याचा काही संबंध नाही अशा माणसाने कितीही उपदेश केला आणि तो जरी बरोबर असला तरी तो त्याला ऐकावासा वाटत नाही. तसंच दुसऱ्याने केलेली निंदा ही आपले दोष दाखवणारी असल्यामुळे तीही ऐकायला नकोशी वाटते. पण निंदेतून आपले दोष काय आहेत ते सांगितलेलं असल्यामुळे साधक या दोषांवर साधकबाधक विचार करून ते असल्यास ते काढून टाकण्याचा प्रयत्न करु शकतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'निंदकाचे घर असावे शेजारी'. याकरिता समर्थ मनाला सांगतात की हे मना, मी तुला पुन्हा पुन्हा सांगतो म्हणून माझ्या बोलण्याचा वीट येऊ देऊ नकोस बरं. तू माझ्या सांगण्याप्रमाणे जर वागला नाहीस तर तुझ्या जीवनात पुढून मागून सर्व बाजूनी श्रीराम कसा बरं जोडला जाईल? तुला श्रीरामाची प्राप्ती कशी बरं होईल? व त्याशिवाय तुझी जन्ममरणाची परंपरा कशी बरं चुकेल? हे मना, ज्या सुखाची प्राप्ती करून घेण्यासाठी तुझी एवढी धडपड चालते ते सुख तर क्षणिक असतं. ती क्षणिक सुखाची घडी निघून गेल्यावर ते सुख फक्त तुझ्या आठवणीतच शिल्लक राहील आणि प्रत्यक्ष जीवनात तुझ्यासमोर दुःख येऊन उभं राहिलेलं असेल. सुखानंतर दुःख असाच जीवनात सुखदुःखांचा क्रम असतो. त्यामुळे पुढे यातील काहीही शिल्लक रहाणार नाही. सुख देणारं साधन नाहीसं होईल. ते सुख अनुभवणारं तुझं शरीर उद्या टिकणार नाही. त्याची सुख भोगण्याची क्षमता क्षीण होईल. या जगात कोठलीच गोष्ट जशी आहे तशी रहात नाही ती सदैव बदलत रहाते. त्यामुळे भोवतालची परिस्थितीही बदलत जाईल. म्हणून हे मना, तू क्षणिक सुखाला महत्त्व देण्यापेक्षा ईश्वरप्राप्तीला जास्त महत्व दे बरं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**देहेरक्षणाकारणे यत्न केला । परी शेवटी काळ घेऊनि गेला ।**
**करी रे मना भक्ति या राघवाची । पुढे अंतरी सोडि चिंता भवाची ।।२६।।**

कोठल्याही सामान्य माणसाला आपल्याला कधीही मृत्यू येऊ नये असंच वाटतं. कारण त्याच्या आशा, आकांक्षा, इच्छा, वासना, कामना, ध्येयं या सर्व गोष्टी तो जिवंत राहिला तरच पुऱ्या होणार असतात म्हणून आपलं शरीर जिवंत ठेवण्यासाठी व त्याचं रक्षण करण्यासाठी त्याला प्रयत्न करावे लागतात. पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी त्याला दिवसभर कष्ट करावे लागतात. कारण पोटाला अन्नाची गरज असते व त्यासाठी त्याला पैसा मिळवावा लागतो. त्याकरता त्याला शिक्षण घ्यावं लागतं. शिवाय शरीराला रोगांची बाधा झाली तर पथ्य पाळून काही काळ औषध घ्यावं लागतं ते वेगळंच. तर प्रथम शरीराची काळजी घ्यावी लागते. म्हणून सुभाषितकारानी 'शरीरं आद्यं खलु धर्मसाधनम्' असं म्हटलं आहे. पण इतकं सगळं केलं तरी कालांतराने या शरीराला दुबळेपणा येतोच. ते आपली कार्यक्षमता गमावून बसतं. इंद्रियं दुर्बल होतात. 'नन्ना, करिते मान । दंताजींचे ठाणे उठले फुटले दोन्ही कान' अशी स्थिती होते. असह्य वेदना सहन कराव्या लागतात. त्यांच्यापेक्षा मृत्यू बरा असं वाटू लागतं आणि शेवटी एका दिवशी एका क्षणी काळ म्हणजे मृत्यू खरोखरच येतो आणि माणसाची वेदनांतून सुटका करतो आणि जीवाला पुढच्या प्रवासासाठी घेऊन जातो. शरीराची मात्र तीन चिमट्या राख होते आणि मातीतून निर्माण झालेलं हे शरीर शेवटी मातीलाच मिळून जातं. तिच्यातच पूर्णपणे मिसळून जातं. हे मना, म्हणून जर तुला हे जन्ममरण मुळातूनच टाळायचं असेल तर तू राघवाची भक्ती कर. त्याचं नाम घे. ध्यान कर. त्याच्या सद्‌गुणांचं चिंतन कर. त्याच्या प्रेमाचा अनुभव घे. त्याच्या सर्वव्यापकपणाशी एकरूप होऊन जा. आणि भविष्यकाळात या संसाराची चिंता अजिबात करू नकोस, कारण ईश्वरी संकल्पात जसं असेल तसा तुझा संसार चालणार आहेच. मग तुला जसं हवं असेल तसाच तुझा संसार चालला पाहिजे अशी अपेक्षाच करू नकोस. जे जसं घडतं ते रामाच्याच इच्छेने घडतं असं समज आणि या संसाराची काळजी करू नकोस. पण त्याची नीट काळजी घे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**भवाच्या भये काय भीतोसि लंडी । धरी रे मना धीर धाकासी सांडी ।**
**रघूनायकासारिखा स्वामी शीरी । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ।।२७।।**

समर्थ या श्लोकात म्हणतात, हे भित्र्या मना, या संसारातील भीती निर्माण करणाऱ्या घटनाना तू अजिबात भिऊ नकोस बरं. त्यांची बिलकुल धास्ती बाळगू नकोस. तू भक्ती केल्यावर श्रीरामासारखा समर्थ मालक तुला लाभेल. उद्या साक्षात यमधर्म जरी तुझ्यावर रागावला तरी तो राम तुझी उपेक्षा करणार नाही. तो तुझं रक्षण करील. तो तुझी त्या मृत्यूच्या भयापासून सुटका करील. त्याचा वरदहस्त सदैव तुझ्या मस्तकावर असेल. फक्त तू त्याचं स्मरण सदैव करत जा. माणसाला या जगात कशाकशाची भीती वाटते? तर माणसाला मृत्यूची, अपघाताची, अपंगत्वाची, रोगांची, दुसऱ्याच्या प्रतिकूल वागण्याची भीती वाटते. तसंच त्याला अवचित येणाऱ्या संकटांची, भविष्यकालीन दुःखांची, निसर्गाच्या रौद्रस्वरुपाची, चूक झाल्यावर होणाऱ्या शिक्षेची, भूतकालीन दुःखाच्या पुनरावृत्तीची, एकांताची, गळा घोटणाऱ्या गर्दीचीसुद्धा भीती वाटते. यावर समर्थ उपाय सांगतात, 'हे मना, या गोष्टीना न घाबरता धैर्य धर व ताठ मानेने त्यांना सामोरे जा. त्यांच्याशी बिनधास्तपणे सामना कर. तुझा मालक, श्रीरघुनायक तुला सदैव मदत करील. तोच तुला त्यांच्याशी झगडण्यासाठी लागणारं बळ देईल. माणसाला सगळ्यात जास्त भीती मृत्यूची वाटते आणि साक्षात यमधर्म जर आपल्यावर रागावला तर तो आपल्याला मृत्युदंड देईल व मग आपण या जीवनातील सुखांचा आस्वाद घेऊ शकणार नाही व आपण साक्षात् जीवनालाच मुकू असं त्याला वाटत असतं. पण तो जर श्रीरामाची भक्ति करत असला, त्याचं नाम घेत असला, ध्यान धरत असला, त्याच्या गुणांचं चिंतन करत असला तर तो श्रीराम आपला स्वामी असून आपल्यासारख्या भक्ताचं रक्षण करणं हे त्याचं ब्रीद आहे. म्हणून तो आपली कधीही उपेक्षा करणार नाही याची त्याला जाणीव होते. मग त्याला हेही समजतं की या आपल्या शिरावर बसलेल्या स्वामीने संतुष्ट होऊन आपली जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्तता केली आहे. आता जीवनात फक्त त्याची भक्ती करायची व त्याची इच्छा झाली की हे जीवन संपवून त्याच्याकडेच जायचं ते या पृथ्वीवर पुन्हा पाय न ठेवण्यासाठी. हे निश्चितपणे समजल्यावर मग त्याची मृत्यूची भीती पळून जाते व तो मृत्यूचं स्वागतच करतो व त्याच्या सोबतीने तो श्रीरामाकडे त्याच्यात विलीन होण्यासाठी जातो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**दिनानाथ हा राम कोदंडधारी । पुढे देखता काळ पोटी थरारी ।**
**जना वाक्य नेमस्त हे सत्य मानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२८।।**

या श्लोकात समर्थ म्हणतात, हे मना, हा धनुर्धारी श्रीराम खरोखरच दीन-अनाथांचा कैवारी, नाथ व रक्षक आहे. हा इतका सामर्थ्यवान् आहे की हा समोर दिसताच प्रत्यक्ष कळिकाळाच्यासुद्धा पोटात थरथरू लागतं व अंगात भयाने कापरं भरतं. माझं हे वाक्य सर्व जनाच्या उपयोगी पडणारं असं आहे म्हणून ते निश्चितपणे सत्य आहे. तसंच हेही त्रिवार सत्य आहे की भक्तवत्सल श्रीराम हा आपल्या दासाची कधीच उपेक्षा करत नाही. त्याचा आपलेपणाने सांभाळ करतो.

समर्थांनी या श्लोकात रामाला कोदंडधारी म्हणजे धनुर्धारी या शब्दाने गौरविलं आहे. रामाचे धनुष्यबाण हे जरी राक्षसांचा संहार करणारे असले तरी त्याच्या भक्तांसाठी ते कृपेचं वरदानच असतं. भक्ताला रामाचं धनुष्य व बाण कसे दिसतात? तर श्रीरामाचं सरळ धनुष्य हे भगवंताच्या सरळ, समदृष्टीचं द्योतक आहे. 'समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः । पण भक्ताने आपल्या प्रेमाची दोरी त्याला लावली की मग ते भगवंत कृपा करण्यासाठी वापरू शकतो. भक्ताने दोरीच्या एका टोकाला प्रेमाची व दुसऱ्या टोकाला समर्पणाची गाठ मारून ती धनुष्याला अडकवलेली असते. भगवंताने त्यावर आपल्या कृपेचा बाण चढवला की दोरी ताणली जाते व तिचा कोन तयार होतो म्हणजेच भक्ताच्या प्रेमाला ईश्वराच्या प्रेमाचा दृष्टिकोन लाभतो. हरिकृपेच्या बाणाच्या मागच्या बाजूला मऊमऊ पिसांच्या रूपाने भगवंताची प्रेममयता लावलेली असते तर पुढच्या बाजूला भक्ताला आपलंसं करण्यासाठी भगवंताच्या कृपेची एकाग्रता तीक्ष्ण टोकाच्या रूपाने लाभलेली असते. हा बाण भक्ताच्या अंतःकरणात घुसला की मग प्रभूची कृपा पूर्ण होते. म्हणून हा बाण आपल्या अंतःकरणात कायमचाच घुसलेला असावा. तो कधीच बाहेर येऊ नये असं भक्ताला वाटत असतं. कारण या शर-वरदानामुळे भक्ताची अवस्था अणूमाजी राम रेणूमाजी राम । तृणकाष्ठी राम वर्ततसे ।बाहेरी भीतरी राम चराचरी । विश्वी विश्वाकारी वर्ततसे । अशी झालेली असते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार


**पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे । बळे भक्तरीपुशिरी कांबी वाजे ।**
**पुरी वाहिली सर्व जेणे विमानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।२९।।**

ब्रीद या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ तोडर किंवा पायातला दागिना आणि दुसरा अर्थ प्रतिज्ञा किंवा व्रत. मी माझ्या भक्ताचं सदैव रक्षण करीन अशी भगवंताची प्रतिज्ञाच असते असं श्रीरामाच्या पायातला तोडर जगाला गर्जून सांगत असतो. भक्त जरी कोणाचाही शत्रू नसला तरी त्याचं अकारण शत्रुत्व करणारे दुर्जन असतातच. अशी सामान्य माणसांच्या मनाची रचनाच असते. मग हे दुर्जन भक्ताचा नाहक छळ करू लागतात. मग राघव या भक्ताच्या मदतीला न बोलावताच येतात आणि आपल्या धनुष्याला दोर लावून त्यावर बाण चढवण्याचीसुद्धा वाट पहात नाहीत. त्यांना तेवढाही वेळ घालवावासा वाटत नाही. तर आपल्या हातातल्या धनुष्याच्या कांबीचाच प्रहार जोराने त्या दुर्जनाच्या, भक्ताच्या शत्रूच्या टाळक्यात करतात व त्यांचा नाश करतात. प्रभू श्रीराम हे इतके भक्तवत्सल आहेत की त्यानी अयोध्या कायमची सोडताना आपली भक्ती करणाऱ्या सर्वच नागरीकांना आपल्या बरोबर विमानात बसवून त्याना वैकुंठलोकास नेले. ह्या भक्ताना कायमची मुक्ती मिळाल्यामुळे परतीचं तिकीट काढून पुन्हा पृथ्वीवर येऊन इथली सुखदुःख भोगण्याची इच्छाच उरली नाही. वास्तविक मुक्ती ही वैयक्तिक असते पण दासांचा अभिमान असलेल्या श्रीरामानी ती सामुदायिक करून टाकली. म्हणून समर्थ मनाला समजावून सांगतात की हे मना, तू जर श्रीरामाची भक्ती केलीस तर दासांचा अभिमानी असलेला श्रीराम तुझा निश्चितपणे सांभाळ करील. तो तुझी कधीही उपेक्षा करणार नाही. तू त्याच्या दिशेने एक पाऊल टाकलंस तर तो तुझ्या दिशेने शंभर पावलं टाकेल. तू त्याच्याकडे चालत गेलास तर तो तुझ्याकडे धावत येऊन तुला मिठी मारील. यासाठी त्याला दोन हात पुरेसे वाटत नाहीत म्हणून त्याने चार भुजा धारण केल्या आहेत. तू त्याचे चरण धरण्यासाठी वाकलास तरी तो तुला उठवून आपल्या हृदयाशी कवटाळील. फक्त तू त्याचं क्षणोक्षणी स्मरण ठेव म्हणजे झालं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



**मंगळवार**

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ।**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥३०॥**

हा एक सुपरिचित आणि अतिशय प्रसिद्ध असा श्लोक आहे. सर्वशक्तिमान अशा समर्थ भगवंताच्या दासाकडेसुद्धा वक्रदृष्टीने पाहील, त्याच्याशी शत्रुत्व करील असा माणूस या जगात असणं शक्य नाही. मग भगवंताशी शत्रुत्व करणं तर दूरच राहिलं. कारण ज्यानी असा प्रयत्न केला ते सर्व धुळीला मिळाले. या बाबतीत रावणाचं उदाहरण बोलकं आहे. सीतेच्या सौंदर्याच्या आकर्षणामुळे रावणाने तिला पळवून लंकेला नेलं व तिथे तिला कैदेत ठेवलं. यातून त्याने अकारण रामाचं शत्रुत्व पत्करलं व परिणामी सवर्स्व गमावून बसला आणि स्वतःचा व सर्व लंकेचाही नाश ओढवून घेतला. समर्थाघरचे श्वान । त्यासी देती सर्वही मान । असं सुभाषित आहे. पण रावणाच्या भावाने मात्र रामाची निस्सीम भक्ती केली आणि लंकेचं राज्य रावणानंतर तो एकटाच जिवंत राहिल्यामुळे रामाने त्याच्याच हवाली केलं.

अशा या भगवंताची लीला वर्णन करण्यात तीनही लोक (पृथ्वी, स्वर्ग, आणि पाताळ) स्वतःला धन्य मानतात. खेळ, क्रीडा व लीला यात सूक्ष्म असा थोडा थोडा फरक आहे. खेळामध्ये विशिष्ट नियम असतात व त्यांचं पालन करावं लागतं. शिवाय त्यात स्पर्धा असते. त्यामुळे जिंकणाऱ्याला आनंद तर हरणाऱ्याच्या वाट्याला दुःख येतं पण क्रीडा ही मात्र सर्वांना नेहमीच आनंद देते. पण ती कार्यकारण भावाने बांधलेली आहे. पण लीला मात्र आनंददायक असून ती कार्यकारण भावाच्या पलीकडे म्हणजे अतर्क्य ही असू शकते. म्हणून अशी लीला फक्त भगवंतच करु शकतो व ती इतकी अद्भुत असते की या लीलेचं वर्णन करण्यातच तीनही लोकांतील लोकाना धन्यता वाटते. म्हणून समर्थ म्हणतात की दासाचा अभिमान बाळगणारा श्रीराम हा आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करत नाही. त्याचा सदैव सांभाळ करतो म्हणून अशा भक्ताकडे कोणीही वाकड्या नजरेने पाहू शकत नाही. कोणी तसं धाडस केलंच तर ताबडतोब त्याचा श्रीरामानी नाश केलाच म्हणून समजा.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# || मना सज्जना ||



## बुधवार

**महासंकटी सोडिले देव जेणे । प्रतापे बळे आगळा सर्व गुणे ।**
**जयाते स्मरे शैलजा शूळ्पाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३१।।**

रावण हा जन्माने ब्राह्मण होता. पुलस्ती ऋषीचा पुत्र होता. पण कृतीने क्षत्रिय होता. त्याने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतलं होतं व आपल्याला माणूस सोडून इतर कोणाकडूनही मरण येऊ नये असा अमरत्वाचा वर त्याने त्यांच्याकडून मागून घेतला होता. क्षुद्र माणूस त्याच्या खिजगणतीतच नव्हता. याचाच फायदा घेऊन श्रीविष्णूनी माणसाच्या रूपात श्रीराम या नावाने अवतार घेतला. रावणाच्या उन्मत्तपणाला तीनही लोक अपुरे पडले. त्याने सरळ स्वर्गावर स्वारी केली व सर्व देवाना जिंकून त्यांना बंदीवासात टाकलं आणि त्याना नोकरांसारखी हलकीसलकी कामं करायला लावली. त्यामुळे सर्व देवांचं जीवन लाजिरवाणं व दुःखमय होऊन गेलं होतं. पण प्रभू श्रीरामचंद्रानी रावणाशी वानरांच्या मदतीने भीषण रणसंग्राम केला, घनघोर युद्ध केलं व सर्व राक्षसांचा संहार केला आणि रावणाचा नाश केला. मग बिभीषणाला लंकेचं राज्य दिलं आणि सर्व देवांची बंदिवासातून सुटका केली. त्यामुळे सर्व देवांना आनंदी आनंद झाला. ते स्वर्गात आपापल्या स्थानी परत गेले व सर्व भोग उपभोगू लागले. हे सर्व श्रीरामांच्या अलौकिक पराक्रमामुळे घडलं. असं त्यांचं सामर्थ्य आहे. ज्याच्या हातात त्रिशूल आहे असे भगवान शूलपाणी शंकर व जिचा जन्म पर्वतराज हिमालयापासून झाला आहे अशी गिरिजा म्हणजे पार्वती हे दोघेही कृतज्ञतेने भगवान् श्रीरामचंद्रांचं स्मरण करत असतात. कारण भगवान शंकरानी समुद्रमंथनातून निघालेल्या जहाल विषाचं प्राशन केल्यावर झालेला आपल्या गळ्याचा दाह रामनामानेच शांत केला होता. या श्रीरामांच्या अंगच्या अद्‌भुत गुणानी त्यांना भक्तांच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त झालं आहे. अतुल पराक्रमी, धर्मज्ञ, कृतज्ञ, सत्यवादी, दृढव्रती, चारित्र्यसंपन्न, संयमी, निर्मत्सरी, परमप्रेमी, प्रजावत्सल, इत्यादि सर्व सद्‌गुणानी युक्त असे श्रीराम आहेत. शिवाय ते कृपेचे महासागर आहेत. तेव्हा असे भक्तांचा अभिमान असलेले श्रीरामप्रभू आपल्या प्रिय भक्ताची उपेक्षा करतील तरी कशी? ते कधीही शक्य नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



गुरुवार

**अहिल्या शिळा राघवे मुक्त केली । पदी लागता दिव्य होऊन गेली ।**
**जया वर्णिता शीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३२।।**

महर्षी विश्वामित्र व इतर ऋषींबरोबर प्रवास करत करत श्रीराम व लक्ष्मण हे मिथिला नगरीत येऊन पोहोचले. तेथे त्याना एका उपवनात एक जुनाट ओसाड आश्रम दिसला. त्यात कोणीही वावरत नव्हतं. फक्त एक मोठी शिळा तिथे पडलेली दिसत होती. यासंबंधी श्रीरामानी विचारल्यावर महर्षी विश्वामित्र म्हणाले, 'हे श्रीरामा, फार पूर्वी या आश्रमात गौतम ऋषी तपाचरणासाठी आपली पत्नी अहल्या हिच्यासह रहात होते. त्यांच्या तपामुळे या आश्रमाला इतकं दिव्यत्व प्राप्त झालं होतं की इंद्रालासुद्धा त्याचा हेवा वाटू लागला. एक दिवस महर्षी गौतम आश्रमात नसताना इंद्र गौतमाचं रुप घेऊन आला व आपली कामवासनापूर्ती करण्याची त्याने अहल्येला आज्ञा केली. अहल्येनं गौतमाच्या रूपात आलेल्या इंद्राला ओळखलं पण त्याच्या स्वर्गातील इतमामाला बळी पडून तिने त्याची कामवासना पूर्ण केली व महर्षी गौतम यायच्या आत तिनं त्याला स्वर्गलोकी जाण्यास सांगितलं. तो झोपडीबाहेर पडतो न पडतो तोच गौतम मुनी हे नदीवरुन स्नान करुन घरी येत असलेले त्याला दिसले. त्यांच्याच वेषातल्या इंद्राला पाहून त्यानी अंतर्ज्ञानाने सर्व प्रकार ओळखला व रागाच्या भरात त्यांनी इंद्राला शाप दिला की त्याने अहल्येबरोबर जे काही पाप कर्म केलं त्याची शिक्षा म्हणून तो पुरुषत्वाला मुकेल आणि त्यानी अहल्येलाही शाप दिला की या आश्रमात ती उपवास करुन व वायुभक्षण करुन शिळेसारखी निश्चल पडून राहील. अशी कठोर शापवाणी उच्चारुन ते हिमालयाच्या शिखरावर तप करायला निघून गेले. ही शिळा म्हणजे ती अहिल्या. म्हणून हे श्रीरामा, तुम्ही या अभागी पण तपस्वी अहल्येचा उद्धार करा.' हजारो वर्षांच्या तपस्येनं अहल्येचं शरीर दिव्य झालं होतं. श्रीरामांनी आपल्या कृपापूर्ण दृष्टीने तिच्याकडे पाहिलं तोच ती सर्वांना दिसू लागली. श्रीराम-लक्ष्मणानी तिच्या चरणाना स्पर्श केला. तिनेही त्यांचा सत्कार केला. तेवढ्यात गौतम ऋषी तेथे आले. उभयतांनी श्रीरामांची पूजा केली. मग ते दोघे आनंदाने निघून गेले.

वास्तविक बलात्कारासारखा अपराध अहल्येच्या हातून घडला असतानासुद्धा प्रभू रामचंद्रानी तिचा उद्धारच केला. अशा रामाचं वर्णन करताना वेदसुद्धा थकून गेले व ते न इति न इति असं म्हणू लागले. तर अहल्येचासुद्धा उद्धार करणारे श्रीराम व आपल्या दासाचा अभिमान बाळगणारे श्रीराम आपली कधीतरी उपेक्षा करतील का?

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा । शशी सूर्य तारांगणे मेघमाळा ।**
**चिरंजीव केले जनी दास दोन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३३।।**

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा । शशी सूर्य तारांगणे मेघमाळा ।**

विश्वनिर्मात्या ईश्वराने आपल्या केवळ लीलेने ही सृष्टी निर्माण केली. आपण आकाशात पाहिलं की दिसतं की या सृष्टीत मेरुमांदारासारखे पर्वत आहेत. चंद्रसूर्य आणि तारांगणं आहेत. शिवाय सुंदर मेघमालाही आहेत. ही सृष्टिनिर्मितीची लीला किती अद्‌भुत आहे, ते पाहूया. आपल्या 'सस्य शामला' पृथ्वीचा परिघ ४०,००० किलोमीटर (कि.मी.) आहे तर आपल्या लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चांदोबाचं तिच्यापासून असलेलं अंतर सुमारे ४ लाख कि.मी. आहे. शिवाय आपल्यासाठी नियमाने सकाळी उगवून संध्याकाळी मावळणारा व दुपारच्या भुकेसाठी आपल्याला दिवसभर कामधंदा करायला लावणारा सूर्यनारायण तिच्यापासून १५ कोटी कि.मी. दूर आहे. यापुढील अंतरासाठी कि.मी. चं माप अपुरं पडतं, म्हणून प्रकाशवर्षाचं माप वापरावं लागतं. प्रकाशाचा वेग सुमारे सेकंदाला तीन लाख कि.मी. आहे. म्हणून प्रकाश एका वर्षात अंदाजे १० महापद्म म्हणजे $१०^{१३}$ कि.मी. अंतर कापतो. आपल्या सूर्यमालेत इतक्या लांबूनही आपल्या दैनंदिन जीवनात ढवळाढवळ करणारे पृथ्वीसह नऊ ग्रह आहेत. (हल्ली त्यांची संख्या बहुधा वाढली असावी. जामातो दशमग्रहः । हा आपला जावईशोध) आपलं अस्तित्वच ज्याच्यावर अवलंबून आहे, असा आपला सूर्य हा आपल्या आकाश गंगेतील एक मध्यम आकाराचा लहानसा तारा आहे. सूर्याच्या सगळ्यात जवळचा प्रॉक्झिमा सेन्टॉरस' या नावाचा तारा त्याच्यापासून ४.३ प्रकाशवर्ष अंतरावर आहे. असे सूर्यासारखे सुमारे १०० अब्ज तारे असलेली आपली आकाशगंगा मध्ये फुगलेल्या पुरीसारखी आहे. अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा सुमारे १०० अब्ज आकाशगंगा आपल्या विश्वात आहेत आणि नवीन नवीन आकाशगंगांचा, शोध लागतोच आहे. आपल्या सर्वोत्तम दुर्बिणीतून खगोलशास्त्रज्ञ कोठल्याही दिशेत सुमारे १० अब्ज प्रकाशवर्ष इतक्या अंतरापर्यंत विश्वाचं दर्शन घेऊ शकतात. आता आपणच विचार करावा की इतकं विशाल निर्जीव विश्व लीलेने निर्माण करणाऱ्या ईश्वराच्या समोर आपल्या साडेतीन हाताच्या शरीरात वास्तव्य करणाऱ्या बिंदुमात्र अशा आपल्या क्षुद्र आणि नगण्य असलेल्या अहंकाराला काही किंमत किंवा महत्त्व आहे काय?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा । शशी सूर्य तारांगणे मेघमाळा ।**
**चिरंजीव केले जनी दास दोन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३३।।**

**चिरंजीव केले जनी दास दोन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।**

प्रभू श्रीरामांचे हनुमान व बिभीषण हे दोन्ही सजीव परमभक्त. एकाचा जन्म वानरवंशात तर दुसऱ्याचा जन्म राक्षस व ब्राह्मणकुळात. दोघांचंही दैवत श्रीराम. दोघांनाही राघव अत्यंत प्रिय. पण दोघांची मनोरचना वेगवेगळी. हनुमान हा सुग्रीवाच्या मंत्रिमंडळातला तर बिभीषण हा श्रीरामांच्या शत्रूपक्षातला पण युद्धाच्या वेळी श्रीरामांच्या पक्षाला येऊन मिळालेला. प्रत्यक्ष युद्धात जेव्हा कठिण प्रसंग येत असे, तेव्हा बिभीषणाकडून मायावी रावणाच्या कुटिल डावपेचाची माहिती रामाला कळत असे व काही शक्तीचं व बुद्धीचं काम असल्यास मारुति ते तत्काळ करून टाकत असे. उदा. समुद्राचं उल्लंघन करून लंकेत जाऊन सीतामाईंचा शोध घेणं, लंका जाळून टाकणं, द्रोणागिरी पर्वत उचलून आणणं, रावणाच्या बलाढ्य राक्षसांचा संहार करणं ही दास्यभक्तीची कामं हनुमंताने केली. तर लक्ष्मण शक्ती लागून बेशुद्ध झाला असता सुषेण वैद्याला बोलावून घ्यावं असा बहुमोल सल्ला बिभीषणाने दिला व त्यावर हनुमंताने सुषेणाला लंकेतून त्याच्या घरासकट उचलून आणलं. अशा तऱ्हेने रावणाचा पराभव करण्यासाठी श्रीरामाना दोघांचीही बहुमोल मदत झाली म्हणून श्रीरामानी प्रसन्न होऊन दोघांनाही चिरंजीवपद बहाल केलं म्हणजे या दोघांच्याही मनोरचना चिरंजीव केल्या. पहिल्या मनोरचनेचा भक्त शक्तिमान् व बुद्धिमान असतो. त्यामुळे त्याचा दुष्टाना मोठा दरारा वाटतो. हा समूहप्रिय व मोठा चळवळ्या असतो. तर दुसऱ्या प्रकारचा शांत व सत्वगुणप्रधान असतो. त्याला एकांतात रहावसं वाटतं व तो जरुरीपुरताच व्यवहार करतो व मोकळ्या वेळात तो ईश्वराचं स्मरण करत रहातो. ईश्वराला मात्र दोन्ही प्रकारचे भक्त आवडतात. कारण भक्त म्हणून दोघांचीही योग्यता सारखीच असते. अवतारकार्यासाठी ईश्वराला पहिल्या प्रकारच्या भक्तांची गरज असते म्हणून तो हनुमंतासारख्या भक्ताला हाताशी धरतो. स्वतः श्रीसमर्थ या प्रकारचे भक्त होते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**उपेक्षा कदा रामरूपी असेना । जिवा मानवा निश्चयो तो वसेना**
**शिरी भार वाहेन बोले पुराणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३४।।**

भगवंतानी राम अवतारात असताना मी माझ्या भक्तांचा सर्व प्रकारचा भार माझ्या मस्तकी वाहेन असं आश्वासन सर्व भक्ताना दिलं आहे असा उल्लेख पुराणात आहे. तर 'योगक्षेमं वहाम्यहं' हे भगवंताचं गीतेतील वचन सर्वांनाच (विशेषतः जीवन-विमाधारकाना) माहित आहे. माझ्याशी अनन्य भावाने जोडलेल्या भक्तांचा मी योगक्षेम वहातो असा त्याचा अर्थ आहे 'अप्राप्तस्य प्राप्तः योगः' । आणि 'प्राप्तस्य परिपालनं क्षेमम् ।' न मिळालेली वस्तू मिळणं म्हणजे योग आणि मिळालेली वस्तू टिकून रहाणं म्हणजे क्षेम. तेव्हा अशा थोर व अनन्य भक्तीची उपेक्षा प्रभू रामचंद्राकडून कधीच होणार नाही.

या गीतेतील श्लोकाच्या विवरणात ज्ञानेश्वर माउलीनी असं म्हटलं आहे, 'अर्जुना, जे सर्व प्रकारच्या वृत्तीसहित मला विकले गेले, ज्याना माझ्याशिवाय दुसरं काही चांगलंच वाटत नाही, असे जे माझी उपासना करतात, त्यांची मीच न लाजता सेवा करतो. त्यांच्या काळजीचा सर्व भार माझ्यावरच पडतो. त्याना जर माझ्याशी एकरूप होण्याची आवड असेल तर मी ती पूर्ण करतो. पण त्याना जर माझ्या सेवेची आवड असेल तर त्यांच्या मनात मी माझ्याविषयी प्रेम घालतो व त्याना दिलेल्या गोष्टीचं रक्षणही मीच करतो. अशा रितीने त्यांच्या योगक्षेमाचा सर्व भार माझ्यावरच पडतो.'

पण असे भक्त नसलेल्या सामान्य माणसाला मात्र हा भरवसा वाटत नाही. त्याच्या बाबतीत दोन अडचणी उद्भवतात. पहिली अडचण अशी की ईश्वर आहे व तो आपल्या जवळ आहे याची त्याना शंभर टक्के खात्री नसते. मी आहे हे त्याना आतून जितकं सत्य वाटतं तितकं देव आहे हे सत्य त्याना आतून पटत नाही. दुसरी अडचण अशी की ईश्वर असलाच तर त्यांच्या प्रपंचामध्ये येणारे दुःखाचे प्रसंग दूर करण्याचं साधन या दृष्टीने ते त्याच्याकडे पहातात. म्हणजेच ईश्वराला त्यांच्या स्वार्थी व फालतु प्रपंचाचा नोकर बनवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणून ईश्वरावर माझा विश्वास आहे असं त्यानी कितीही तोंडाने म्हटलं तरी तो विश्वास त्यांच्या वर्तनात दिसत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।**

या श्लोकात समर्थ माणसाच्या मनाच्या मर्मावर बोट ठेवून त्याला भगवंताचं वर्म समजावून सांगत आहेत. माणसाने बाह्यतः कितीही भक्तीचं कर्म केलं, देवधर्म केला तरी त्याच्या अंतःकरणात जो भाव असतो त्या भावाप्रमाणेच देव त्याला पावतो. म्हणून भाव तसा देव अशी आपल्याकडे म्हण आहे. माणसाने आपली एखादी इच्छा पूर्ण करण्यासाठी जर देवाची भक्ती केली तर त्याच्या प्रारब्धात असल्यास देवाकडून त्याची ती इच्छा पुरी होईलही. पण त्याला या देवभक्तीचं फळ जे चित्तशुद्धी या रूपात असतं ते मात्र मिळणार नाही. पण हे कळल्यावर माणसाने जर निष्काम भक्ती करायला सुरवात केली तर मात्र त्याचा जसा भाव असेल तशी त्याला ईश्वराची प्राप्ती होईल. उदा. एखादा माणूस रामाचं ध्यान करत असेल तर देव त्याला रामाच्या रूपात दर्शन देईल. दुसरा एखादा माणूस जर देवाचं नामस्मरण करत असेल, तर शब्दांच्या रूपात देव त्याच्याशी बोलेल, त्याला उपदेश करील, त्याला सल्ला देऊन त्याचे प्रश्न सोडवील. आणखी एखादा माणूस जर विश्व हे रामाचंच रूप आहे या भावनेने दीनदुबळयाची सेवा करून त्यातूनच रामाची उपासना करीत असेल तर त्याचा प्रश्न श्रीराम कोणाही माणसाच्या मुखातून उपदेश करून सोडवील व त्याला योग्य ते मार्गदर्शन करील. जो भक्त त्याला अनन्यभावाने शरण जाईल त्याचं सर्व बाजूनी व सर्व प्रकारे रक्षण धनुर्धारी श्रीराम करील, कारण श्रीराम आपल्या दासाचा अभिमानी असल्यामुळे तो त्याची कधीही उपेक्षा करीत नाही. एका माणसाला, त्याच्या हातून घडलेल्या गुन्हयाबद्दल प्रायश्चित म्हणून पाच वर्ष गंगेच्या काठावर तपश्चर्या करण्यास सांगितली. त्या अडाणी माणसाने गंगेची माहिती नसल्यामुळे एका मोठ्याशा नदीवर पाच वर्ष तपश्चर्या केली. पण ही गंगा नाही हे कळल्यावर त्याने तिच्यापेक्षा मोठ्या नदीवर आणखी पाच वर्ष तप केलं, पण हीही गंगा नाही हे कळल्यावर त्याने तिच्यापेक्षाही मोठ्या नदीवर पाच वर्ष तप केलं. हीही गंगा नाही हे कळल्यावर तो खऱ्या गंगेपर्यंत पोहोचला पण तप सुरू करण्यापूर्वीच तो मरण पावला. पण चित्रगुप्ताने मात्र गंगेच्या काठावर पंधरा वर्षं तप केल्याचं पुण्य त्याला दिलं होतं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**सदा सर्वदा देव संन्नीध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।**

ईश्वराचं मूळ रूप सर्वव्यापक आहे. तरीसुद्धा ते भक्तांकरिता सगुण साकार होतं आणि त्यांच्या हृदयात ते आनंदाने वास करतं आणि एरवी ते सर्व विश्व व्यापून असतं. 'स्थिरचर व्यापुनि अवघा जो जगदात्मा दशांगुळे उरला' असं कवी म्हणतो. तर गीता सांगते की 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।' हे अर्जुना, ईश्वर सर्व भूतांच्या हृदयात वास करीत असतो. पण सामान्य माणसाचा या गोष्टीवर विश्वास बसत नाही. कारण त्याला असा प्रश्न पडतो की जर आपल्या हृदयातच ईश्वर आहे तर मग आपल्यावर संकटं येतातच का? आणि आली तरी ती ईश्वराच्या सहवासामुळे नष्ट का होत नाहीत? याला समर्थ या श्लोकात उत्तर देत आहेत. ते म्हणतात, 'ज्याला ईश्वर आपल्या जवळ आहे असं सदैव स्मरण असतं त्याला ईश्वर, ज्यात दुःखाचा लवलेशही नाही असा निरतिशय सुखाने भरलेला जो मोक्ष, केवळ आनंद हेच ज्याचं स्वरुप आहे असा मोक्ष देत असतो. पण हा दुर्मिळ व बहुमोल ठेवा सांभाळण्याची त्याची पात्रता आहे की नाही हे पाहण्यासाठी, त्याची परिक्षा पहाण्याकरता देव अगोदर त्याच्यावर संकटं आणतो. या संकटानी आपला भक्त खचून जातो का? या संकटातसुध्दा भक्त आपली भक्ती सोडून देत नाही ना हे देव पारखून पहातो आणि या परिक्षेत जर भक्त उतरला तरच त्याला तो मोक्षाचं दान करतो. उदा. विद्यार्थी वर्षभर कसून अभ्यास करतो तेव्हा तो वरच्या वर्गात जातो व शेवटी पदवी मिळवतो. पण अभ्यास न करणाऱ्या मुलाचं मात्र अभ्यास करताना डोकं दुखू लागतं. त्याला परिक्षा हे मोठं संकट वाटतं. म्हणून ईश्वर आपल्या भक्ताचं संकटात किती धैर्य टिकतं त्याची थोडीशी परिक्षा पाहिल्यावरच तो कृपा करतो व आपल्या अशा भक्ताला तो कैवल्याचं दान करतो. मग अशा दासाची तो दासांचा अभिमानी असलेला श्रीराम कधीही उपेक्षा करीत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटी स्वामि तैसा ।**
**हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३७।।**

चक्रवाक नावाचा एक पक्षी असतो. हा पाण्याच्या आश्रयाने रहातो. हा रात्रीच्या वेळी आपल्या पक्षिणीला मोठ्या उत्कंठेने साद घालीत असतो. तीही त्याला तसाच प्रतिसाद घालीत असते. दोघेही नदीच्या दोन तीरांवर असतात. हा तिला भेटण्यासाठी झेप घेऊन पैलतीरावर जातो तोपर्यंत ती आतुरतेने भेटण्यासाठी ऐलतीरावर आलेली असते. रात्रीच्या अंधारात त्याना नीट दिसत नसतं. बरं, थोडा वेळ दुसऱ्याची वाट पहावी एवढा धीर त्याना नसतो. त्यामुळे रात्रभर इकडून तिकडे हेलपाटे घालूनही त्याची एकदाही भेट होत नाही. त्यामुळे दरवेळी ते वाढत्या विरहदुःखाने आर्त आक्रंदन करीत रहातात. जेव्हा सूर्योदय होतो तेव्हा त्याच्या कोमल किरणांच्या प्रकाशांत त्यांचं मधुर मीलन होतं. विरहाचं दुःख वितळतं आणि मीलनाचा आनंद दिवसभर उसळतो. अशा तऱ्हेने चक्रवाक युगुलासाठी जसा सूर्य धावून येतो, तसा ईश्वर हा भक्ताचा स्वामी असल्यामुळे त्याच्यावर संकट आलं की तो अगदी उडी मारून धावत येतो. कारण भक्ताला जसा देव प्रिय असतो, तसंच देवालाही आपला भक्त अत्यंत प्रिय असतो. त्यामुळे भक्ताच्या रक्षणासाठी धावून येणं हे त्याचं ब्रीदच असतं. आपल्या पुराणात याची अनेक उदाहरणं आहेत. उदा. गजेंद्र मोक्ष, द्रौपदी वस्त्रदान, संत सखू, दामाजी, गोरा कुंभार, तुकाराम महाराज, वगैरे. ही सर्व उदाहरणं जीवनाच्या नगाऱ्यावरच्या निशाणप्रहाराप्रमाणे आपल्याला गर्जून सांगत असतात की या मानवजीवनाचं ईश्वरभक्ती हे एकमेव ध्येय आहे. आणि त्यासाठी ईश्वराचं सतत स्मरण हे त्याचं अंतिम लक्ष्य (निशाण) आहे. त्यासाठी ईश्वरस्मरणाची सुरुवात एका क्षणापासून करावी आणि मग ते स्मरण हळूहळू वाढवीत न्यावं. त्याचा परिणाम रात्रंदिवस देवाचं स्मरण प्रत्येक क्षणी करण्यात व्हावा. अशी स्थिती आली की राम आपल्या दासांचा अभिमानी असल्यामुळे आपल्या दासांची कधीच उपेक्षा करीत नाही. त्याच्या संकटकाली तो भक्ताच्या मदतीसाठी धावून जातो व त्याचं रक्षण करतो. तो भक्ताच्या मनाचा तोल कधीही ढळू देत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



गुरुवार

**मना प्रार्थना तूजला एक आहे । रघूराज थक्कीत होऊनि पाहे ।**
**अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।३८।।**

या श्लोकात समर्थ म्हणतात, 'हे मना, तुला एक अत्यंत आग्रहाची विनंती आहे. विनंती कसली, प्रार्थनाच आहे म्हणेनास. ती ही की प्रभू रामचंद्राविषयी व त्यांच्या चरित्राविषयी, सद्गुणांविषयी तुझ्या मनात नेहमीच मधुर आश्चर्याची भावना असू दे. एखादी अत्यंत प्रिय गोष्ट कल्पना नसतानाही प्राप्त झाली म्हणजे आश्चर्याचा जो भाव उत्कंठित अंतकरणात दाटून येतो, तसा भाव प्रभू रामचंद्राविषयी तुझ्या मनात सदैव उत्पन्न होऊ दे. आपल्या प्रिय दैवताविषयी माणसाला अशी ओढ असल्याशिवाय परमार्थसाधनात त्याची प्रगती होत नाही. अशी ओढ मनात निर्माण होणं हीच एक मोठी दुर्लभ अशी गोष्ट आहे. माणसाच्या मनाची सुख मिळवण्याकडे व ते सुख देणाऱ्या वस्तूंची प्राप्ती करून घेण्याकडे ओढ असते. तशी ओढ त्याला आपल्या दैवताविषयी, परमार्थमार्गाविषयी वाटत नाही.

समर्थ सांगतात 'हे मना, माझं हे सांगणं हे त्रिकालाबाधित सत्य असल्यामुळे त्याची अवज्ञा तू कधीही करू नकोस हो. अनादर, तिरस्कार, कंटाळा, आळस, तुच्छता ही सर्व अवज्ञेची लहान-मोठी रूपं आहेत. ही सर्व लक्षणं परमार्थाच्या बाबतीतच प्रकट होण्याची शक्यता असते. म्हणून तू त्याना कटाक्षाने दूर ठेव आणि मना, तुझा निवास हा सदैव राघवाच्या अंतःकरणातच असू दे. म्हणजेच तुझ्या ठिकाणी रामाचं स्मरण प्रत्येक क्षणी असू दे. हे मना, तू रामाची भक्ती इतक्या उत्कटतेने प्राणपणाने कर, तुझ्या ठिकाणी रामाची इतकी विलक्षण ओढ असू दे की रामानेच आश्चर्याने व कौतुकाने थक्क होऊन तुझ्याकडे पाहिलं पाहिजे. त्याला असं वाटलं पाहिजे की कसा हा माझ्याशी संपूर्ण जोडला गेलेला भक्त आहे ! किती श्रेष्ठ याची भक्ती आहे ! किती अचल याची निष्ठा आहे ! खरोखरच हा माझा अत्यंत लाडका भक्त आहे. असा भक्त मिळणं फारच दुर्मिळ आहे. अशा तऱ्हेचा तुझ्याबद्दल त्याच्या मनात विचार आला पाहिजे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे । जयाचेनि योगे समाधान बाणे ।**
**तयालागी हे सर्व चांचल्य दीजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।३९।।**

श्रीरामचंद्र हे ज्या ईश्वराचे अवतार आहेत तो ईश्वर सर्वनिर्माता, सर्वनियंता, सर्वज्ञानी, सर्वशक्तिमान सर्वव्यापक व आपल्या भक्तांसाठी परमप्रेममय असा आहे. तो अनादि, अनंत, अविनाशी, अजर, अमर, अचल असा आहे. तो सच्चिदानंद स्वरूप आहे. असं त्याचं वर्णन चार वेद, सहा शास्त्रं व अठरा पुराणानी केलं आहे. अशा ईश्वराची उपासना केल्याशिवाय, हे मना, तुला समाधान लाभणार नाही. पण समाधान म्हणजे काय? तर समाधान म्हणजे तृप्ती, संतुष्ट अवस्था. आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी आणखी काही मिळवावं अशी वखवख न वाटणं. आहे त्यापेक्षा जास्त वस्तूंची मालकी मिळावी असं न वाटणं. मनात कुठलीही वासना निर्माण न होणं. या स्थितीला समाधान म्हणतात. तुकाराम महाराज म्हणतात, 'अखंड राहे समाधान । हेचि ईश्वरदर्शन ।।' किंवा 'जैशी स्थिती आहे तैशापरी राहे । वा 'ठेविले अनंते । तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे । समाधान ।।' समाधान हा मनाचा मूळचा मोठा सद्गुण आहे. माणसाचं मन चंचल आहे हे निश्चितच आहे. पण तो त्याचा मूळचा स्वभाव नाही. मन हे मुळात सत्वगुणापासून निर्माण झालं आहे. त्यामुळे आनंद हा त्याचा मूळातील गुण आहे. पण मन रजोगुणाने व्यापलं की ते आपली मूळ स्थिती विसरतं व हा आनंद बाह्य वस्तूतून मिळवण्याचा प्रयत्न करू लागतं. एका वस्तूतला आनंद मिळायचा थांबला की ते दुसऱ्या वस्तूकडे वळतं. त्यामुळे त्याला चंचलपणा येतो. आता माणसाने ईश्वरभक्ती केली की ते मन सदैव सत्वगुणातच रहातं म्हणून त्याच्या मूळच्या आनंदाची त्याला प्राप्ती होते व त्यातच ते स्थिर राहिलं की मग ते रजोगुणाकडे वळतच नाही. म्हणून हे मना, तुझं वास्तव्य नेहमी हा राघव ज्याचा अवतार आहे, अशा ईश्वराच्या ठिकाणी असू दे रामायणात भक्तराज हनुमंताने रामापाशी हेच मागणं मागितलं आहे. तो म्हणतो, 'कधि न चळावे चंचल हे मन । श्रीरामा या चरणांपासून । जोवरि भूवर रामकथानक तोवरी जन्म असावा ।।१।। प्रभो मज एकच वर द्यावा । या चरणांच्या ठायी माझा निश्चल भाव असावा ।।धृ।।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**मना पाविजे सर्वही सूख जेथे । अती आदरे ठेविजे लक्ष तेथे ।**
**विवेके कुडी कल्पना पालटीजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।४०।।**

समर्थ या श्लोकात म्हणतात, हे सज्जन मना, ज्या ईश्वराच्या चरणांशी सर्व सुख लोळत असतं, त्या ठिकाणी तू अत्यंत आदराने एकाग्र हो आणि हे करण्यात ज्या वाईट वासना आड येत असतील त्यांचा विवेकबुद्धी वापरून चांगल्या वासनात रूपांतर कर. म्हणजे तुझा निवास कायम ईश्वरापाशी राहील. एका ठिकाणी समर्थ म्हणतात 'जयासि वाटे सुखचि असावे । तेणे रघुनाथ भजनी लागावे । तर तुकाराम म्हणतात, 'सर्व सुखाचे आगर । बाप रखुमादेवीवर ।" माणसाला नेहमीच सुख हवं असतं. पण त्याचा उगम ईश्वरापाशी आहे हे त्याला माहित नसतं. शिवाय ईश्वरभक्ती केली तरच ते सुख मिळणार असतं. म्हणून तो विश्वातील सुखदायक वस्तू मिळवण्यासाठी धडपड करीत असतो. पण ती धडपड मात्र सुखाची नसते तर ती त्रासदायक असते. आता ईश्वरभक्ती करताना कुठलीही धडपड किंवा कष्ट करावे लागत नाहीत. त्याऐवजी या विश्वातल्या सर्वच वस्तू ही ईश्वराने धारण केलेली रूपं आहेत असं जाणून त्यातल्या ईश्वरत्वावर प्रेमाने व अत्यंत आदरपूर्वक अवधान म्हणजे लक्ष ठेवावं लागतं. ज्ञानेश्वर माऊली म्हणते 'जरी अवधान एकले दीजे । तरी सर्व सुखासी पात्र होइजे ।' ईश्वराकडे अवधान दिलं की तुम्ही सर्व सुखाला पात्र व्हाल. पण असं एकाग्रतेने लक्ष ठेवणं माणसाला जमत नाही कारण माणसाच्या मनात अनेक वाईटसाईट दुष्ट कल्पना येत रहातात व त्यामुळे त्याची ईश्वरभक्तीला आवश्यक असणारी एकाग्रता ढळते. उदा. सर्व नीतीमत्ता गुंडाळून ठेवून भरपूर पैसा मिळवावा असं माणसाला वाटतं. मग त्याचं लक्ष ईश्वरावरून उडून पैशाकडे लागतं. पण अशा दुष्ट कल्पना विवेकबुद्धी वापरून पालटाव्या असं समर्थ सांगतात. विवेक म्हणजे एखाद्या प्रसंगावर अहंकाररहित बुद्धीने, सर्व बाजूनी व आपल्याला उपलब्ध असलेलं सर्व ज्ञान वापरून वेळकाळ वगैरेचं भान ठेवून केलेला उचित असा विचार. वरच्या उदाहरणात पैसा मिळवावा असं वाटलं तरी 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।' असं विवेकबुद्धी सांगते. म्हणून असा पैसा मिळवताना पैशातल्या ईश्वरी गुणधर्माकडे लक्ष ठेवावं. यासाठी हे मना, तुझा निवास सदैव राघवचरणी असावा असं समर्थ म्हणतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**बहु हिंडता सौख्य होणार नाही । सिणावे परी नातुडे हीत काही ।**
**विचारे बरे अंतरा बोधवीजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।४१।।**

माणसाच्या मनाला सुखाच्या बाबतीतसुद्धा तोच-तोचपणाचा कंटाळा येतो. त्याला सर्वच ठिकाणी नव्याचा हव्यास असतो. आता वेगवेगळ्या प्रकारच्या सुखाचे सर्व विषय हे एकाच ठिकाणी असत नाहीत. उदा. माणसाला सुख देणारे विषय मिळवण्यासाठी प्रथम पैसा कमवावा लागतो. तो काही घरबसल्या मिळत नाही. त्यासाठी ऑफिसमध्ये नोकरी-धंद्यासाठी जावं लागतं. इथून त्याचं सुखासाठी हिंडणं सुरू होतं. पैसा मिळाल्यावर खाद्यपदार्थापासून सुख हवं असेल ते आणण्यासाठी बाजारात किंवा मंडईत जावं लागतं व तिथून पदार्थ घरी आणल्यावर ते शिजवण्याचे कष्ट घ्यावे लागतात. फुलांचा सुगंध हवा असेल तर बागेत जावं लागतं. चांगलं गाणं ऐकायचं असेल तर रेडिओ, टेप-रेकॉर्डर, कॅसेट, टी.व्ही. वगैरे आणावे लागतात. चांगलं भव्य दृश्य पहायचं असेल तर नदी किंवा समुद्रकिनारी किंवा पर्वतशिखरावर जावं लागतं. मऊ गुळगुळीत स्पर्श हवा असल्यास कापडाच्या दुकानातून मखमली किंवा रेशमी कपडे आणावे लागतात. तेव्हा या सर्व हिंडण्यातून मिळतं काय तर सुखाची फक्त एक क्षणिक संवेदना पण त्याच्यासाठी माणसाची प्रचंड दमणूक होते व त्याला त्याचा शीण होतो व या क्षणिक सुखातून त्याचं खरं कल्याण होत नाही. पण एकदा मनाने राघवाच्या ठिकाणी कायमची वस्ती केली की मग खऱ्या चिरंतन सुखाचा ठेवा त्याच्या हाती लागतो. म्हणून या सर्व गोष्टीचा नीट सर्व बाजूनी विचार करून हा बोध म्हणजे ज्ञान अंतःकरणात उत्पन्न झालं पाहिजे व ते ठसलं पाहिजे. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'ठायीच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा ।' मिळाल्यावर कमी होत जाणाऱ्या सुखासाठी वणवण करीत हिंडण्यापेक्षा माणसाने एकाच ठिकाणी बसून एकाग्रचित्ताने अनंताला मोठ्या प्रेमाने व आवडीने आळवावं. त्याने आपल्याला काय काय दिलं आहे याचं सतत स्मरण करावं आणि राघवाच्या हृदयात ध्रुवाप्रमाणे कायमचं अढळ स्थान मिळवावं व तिथेच वसती करावी. उगाच सुखासाठी इकडे तिकडे हिंडत बसू नये. त्यात व्यर्थ श्रम होतात आणि ही धावपळ वाया जाते. त्यातून खरं हित कधीच पदरात पडत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

बहूतांपरी हेचि आता धरावे । रघूनायका आपुलेसे करावे ।
दिनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे । मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।४२।।

समर्थ मनाला म्हणतात, 'जसं अनेक रामभक्तानी रघुनायकाला अनन्यभावाने शरण जाऊन रामभक्ती करून आपल्या जीवनाचं सार्थक केलं तसं त्यांच्याप्रमाणे तूही या रघूनायकाला तुझ्या भक्तीने आपलासा करून घे. त्याला आपलासा करण्यासाठी तुला उत्कटतेने त्याची भक्ती करावी लागेल, चंचलपणाचा त्याग करावा लागेल. त्याच्या नामावर एकाग्रता करावी लागेल, वाईट गोष्टीच काय पण वाईट कल्पनासुद्धा सोडून द्याव्या लागतील. इतक्या सगळ्या गोष्टी तू केल्यास की तू राघवाला नक्की आपलासा करून घेशील. अनेक तऱ्हेने व अनेक प्रकारानी मी तुला हे सांगितलं आहे. श्रीराम हे दीनांचे नाथ आहेत व अशा दीनांचं पालनपोषण व रक्षण करणं हे त्याचं ब्रीदच आहे असं त्याच्या पायातला सुवर्णाचा तोडा (तोडर) गर्जून सांगतो आहे व हे त्याचं अलौकिक ब्रीद तिन्ही लोकात पावलोपावली गाजत आहे.

पण दीन कोण होऊ शकतं? दीन म्हणजे अशक्त, दुर्बल, अनाथ नव्हे तर दीन या शब्दाची व्याख्या नारदानीं भक्तिसूत्रात केली आहे. ते म्हणतात की ज्याचा अभिमान गळून पडला आहे, ज्याने अहंकाराला मूठ माती दिली आहे व ज्याने आपलं सर्वच जीवन ईश्वराला समर्पित केलं आहे त्याला दीन म्हणावं. असा दीनच आर्ततेने रामभक्ती करु शकतो. पण अभिमान सुटल्याशिवाय अशी आर्तता येत नाही. 'पक्वफलापरी सहजपणाने मीपण ज्यांचे गळले हो । जीवन त्याना कळले हो ।' ईश्वराला शरण जाणं म्हणजे विभक्तपणा सोडून देणं, त्याचा भक्त होणं व ईश्वराच्या विश्वरूपाशी एकरूप होणं. 'पै आपुलेनि भेदेविण । माझे जाणिजे जे एकपण । तयाचि नाम शरण । मज येणे गा ।। अशी ज्ञानेश्वर-माऊलीने शरणागतीची व्याख्या केली आहे व तेच त्याचं फलही आहे. आपण आणि विश्व या दोन वेगळया गोष्टी नसून दोन्ही ठिकाणी ईश्वराचाच एकपणा नांदत आहे अशी ज्ञानदृष्टी येणं म्हणजेच ईश्वराला शरण जाणं व त्यात विलीन होणं. म्हणून हे मना, तू राघवाच्या ठिकाणीच वस्ती कर असं समर्थ सांगत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**मना सज्जना येक जीवी धरावे । जनी आपुले हीत तूवा करावे ।**
**रघूनायेकावीण बोलो नको हो । सदा मानसी तो निज ध्यास राहो ।।४३।।**

समर्थ म्हणतात, हे सज्जना मना, तुला जर आपलं खरोखरच हित करायचं असेल, या माणसाच्या जन्माला आल्याचं काही सार्थक करायचं असेल तर तू आपल्या जीवाशी एक पक्की खूणगाठ बांधून ठेव. ती म्हणजे तुला त्या रघूनायकाचा निदिध्यास लागला पाहिजे (निदिध्यास म्हणजे निशिदिनी म्हणजेच रात्रंदिवस लागलेली ओढ). तुझा प्रत्येक क्षण श्रीरामाशी जोडलेला असला पाहिजे. त्याची प्राप्ती, त्याचं भजन, त्याच्या नामाचं स्मरण, त्याच्या सद्‌गुणांचं संकीर्तन, त्याचं चरित्रवाचन, त्याच्या भक्तांचा उद्धार त्याने कसा केला व त्यात त्याची कृपा कशी प्रकट झाली या संबंधीच्या कथांचं आनंदाने आणि प्रेमाने श्रवण यात तुझा प्रत्येक क्षण गेला पाहिजे. याशिवाय तुला इतर काही सुचताच कामा नये. तुला असा सतत ध्यास लागला की मग त्यात सहजता येईल व मग त्याचं निजध्यासात रुपांतर होईल. माणसांच्या श्वासोच्छवासाइतकाच हा निजध्यास सहज, नैसर्गिकरीत्या, श्रमाशिवाय तुझ्या जीवनात क्षणोक्षणी प्रकट होईल.

आपल्याला ईश्वराने जी वाणीची देणगी दिली आहे. त्यामुळे आपले विचार आपण दुसऱ्या माणसाला समजावून सांगू शकतो व त्याला ते पटलं तर त्याला आपण आपलासा करून घेऊ शकतो. अशा रीतीने आपल्या गोड बोलण्याने आपण माणसं जोडू शकतो. हा वाणीचा गुण लक्षात घेऊन समर्थ मनाला सांगतात की 'हे मना, तुला रघुनाथाला आपलंसं करायचं असेल तर सुवर्णमयी वाणीचा तुला बहुमोल उपयोग होऊ शकेल. जेव्हा तू एकटा असशील तेव्हा तुला त्याचं नाम घेता येईल. जेव्हा तू रामभक्तांच्या मेळाव्यात असशील तेव्हा तुला श्रीरामाच्या दिव्य चरित्रकथेचं वर्णन करून त्यांचा आनंद शतगुणित करता येईल आणि जेव्हा तुझं कर्तव्य कर्म करण्यासाठी तुला इतरांशी इतर विषयावर थोडंसं बोलावं लागेल त्यावेळी श्रीराघवानेच ही वाणी निर्माण केली आहे आणि त्याच्या पूर्वनियोजित संकल्पानुसारच तुझ्या मुखातून या क्षणी बोलणं होत आहे याचं स्मरण तुला प्रत्येक क्षणी करता येईल आणि मग तुला रघूनायकाला आपलंसं करता येईल.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



### बुधवार

**मना रे जनी मौन्य मुद्रा धरावी । कथा आदरे राघवाची करावी ।**
**नसे राम ते धाम सोडोनि द्यावे । सुखालागि आरण्य सेवीत जावे ।।४४।।**


समर्थ म्हणतात, 'हे मना, तू लोकांच्यात वागताना मौनाची मुद्रा धारण कर आणि बोलायचंच असेल तर अत्यंत आदरपूर्वक राघवाच्या चरित्राचं वर्णन कर की जेणेकरून तुझी वाणी पवित्र होईल. तुला आवडत असेल तर रामचरित्राचं गायन कर.' आपण नेहमी पहातो की सामान्य माणसं वायफळ गप्पा किंवा निरर्थक बडबड करण्यात आपला मौल्यवान वेळ खर्च करत असतात. यात फुकट गेलेला वेळ परत मिळणार नाही याची त्याना आठवण नसते. या बोलण्याचा विषय बहुतेक वेळा स्वतःच्या मोठेपणाचं प्रदर्शन, वर्तनाचं समर्थन आणि इतरांच्या चुका हाच असतो. याचा परिणाम मात्र इतरांची मनं गढूळ व कलुषित करण्याकडे होतो. माणसाने अगदी गरज असली तरच बोलावं नाहीतर शांत बसावं व प्रसन्न मुद्रेने म्हणजे चेहेऱ्यावर संतुष्टपणाचा भाव आणून इतरांच बोलणं एकाग्रतेने ऐकावं म्हणजे त्यातील वस्तुस्थिती व कल्पना वेगळी करता येते आणि कल्पना सोडून देऊन वस्तुस्थितीवर अचूक कृती करता येते. आपण जे काही थोडंफार बोलू ते अत्यंत गोड असावं. वाणीत मिठ्ठास पेरलेली असावी. लोकाना पुन्हा पुन्हा ऐकावसं वाटेल असंच आपलं संभाषण असावं.

समर्थांनी शेवटच्या दोन ओळीत मनाला सावधगिरीचा इशारा दिला आहे की जिथे राम नसेल ते घर सोडून द्यावं. तिथे पुन्हा म्हणून पायसुद्धा ठेवू नये. त्यापेक्षा निसर्गसौंदर्याने नटलेल्या व माणसांच्या अभावामुळे एकांत असलेल्या जंगलात वास करावा व तिथे ईश्वरभक्तीचं सुख उपभोगावं. हे शक्य नसेल तर घरातच एकांताची जागा करावी किंवा हेही न जमल्यास घराच्या जवळपासचं एखादं शांत ठिकाण पाहून तिथल्या एकांताचा उपयोग करून प्रभूंच्या प्रेमाला प्रतिसाद द्यावा व आत्मारामाच्या अखंड सुखाचा आस्वाद घ्यावा आणि त्याच्या अनंत चैतन्यमय अस्तित्वात आपलं अस्तित्व विरघळून टाकावं आणि जिथे एकाचाही अंत होतो तोच खरा एकांत हे गोंदवलेकर महाराजांचं म्हणणं सार्थ करावं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**जयाचेनि संगे समाधान भंगे । अहंता अकस्मात येऊनि लागे ।**
**तये संगतीची जनी कोण गोडी । जिये संगतीने मती राम सोडी ।।४५।।**

माणूस हा एक कळप करून रहाणारा प्राणी आहे त्यामुळे त्याला इतर माणसं हवीहवीशी वाटतात. म्हणून तो नेहमी इतर माणसांच्या सहवासात रमतो. आता ही भोवतालची माणसं तोंडपुजी किंवा स्तुती करणारी असली तर दुधात साखरच पडली म्हणायची. पण रामभक्ती करणाऱ्या साधकाना मात्र त्यांच्या बरोबर असणाऱ्या माणसांचा वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करावा लागतो. यासंबंधी मार्गदर्शन समर्थांनी या श्लोकात केलं आहे. कोणाची संगत टाळावी याबद्दल ते म्हणतात, 'ज्याच्या संगतीत आपल्या समाधानाचा भंग होतो अशांच्या संगतीत आपण विशेष रुची दाखवू नये. अशांची संगत सदैव टाळावी. कारण तृप्ती, संयम, त्याग, सदाचरण, कर्तव्यनिष्ठा या गोष्टींमुळे माणसाला खरं व कायमचं समाधान मिळत असतं. पण त्याच्याभोवती जर दुष्ट दुर्जन, कुटिल, लोभी, उद्धट व नास्तिक माणसं, यांचाच मेळावा असेल. तर त्याच्या आत्तापर्यंत भक्तीमार्गातून मिळवलेल्या समाधानाला तडा जाईल. मग भक्तिमार्गाने सुरू असलेला आपला प्रवास थांबून आपला प्रवास विरुद्ध दिशेने सुरू होईल. म्हणजे आपल्या मनात अकस्मात अहंकाराचा शिरकाव होईल. व अहंकार सुखावण्याच्या दिशेने प्रवास सुरु होईल. आपण इतरांपेक्षा मोठे आहोत असा विचार आपल्या मनात येऊन हा मोठेपणा सदैव टिकवण्यासाठी आपल्या मनात महत्वाकांक्षा उत्पन्न होईल. या महत्वाकांक्षेला खतपाणी घालून तिला पुष्ट करण्यासाठी आपल्याला हव्याहव्याशा वाटणाऱ्या वस्तू मिळवण्यासाठी आपले प्रयत्न सुरू होतील आणि त्यातूनच काम-क्रोधादि विकार निर्माण होतील. याचा परिणाम म्हणून जी बुद्धी परमार्थात स्थिर व्हायला पाहिजे त्या बुद्धीतून आता रामावरची निष्ठा व्यक्त न होता त्याऐवजी इतर तात्पुरत्या सुखदायक गोष्टींना महत्व दिलं जाईल व शेवटी ही बुद्धी रामभक्ती करणं सोडून देईल. तेव्हा ज्या दुष्ट माणसांच्या संगतीमुळे इतका मोठा अनर्थ घडणार आहे अशांच्या संगतीची गोडी कोणत्या रामभक्ताला लागेल. बरं? म्हणून अशा माणसांची संगत पहिल्यापासूनच चोखंदळपणे टाळावी हे अतिशय उत्तम.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**मना जे घडी राघवेवीण गेली । जनी आपुली ते तुवा हानी केली ।**
**रघुनायेकावीण तो सीण आहे । जनी दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ।।४६।।**

समर्थ म्हणतात हे मना, तुझ्या जीवनातील जो क्षण श्रीरामांच्या स्मरणाशिवाय जाईल तो क्षण वाया गेला म्हणून समज. जितका वेळ तुला राघवाचं विस्मरण होईल तितका वेळ तू स्वतःची हानी करण्यात व्यर्थ दवडलास असं निश्चित समज. त्या वेळात तू इतर जे जे करशील ते सर्व अहंकाराच्या माध्यमातून होणार असल्यामुळे त्यातून तुझ्या पदरात त्रास कष्ट आणि श्रम या व्यतिरिक्त काहीच पडणार नाही. फक्त शीणच तुझ्या वाट्याला येईल. म्हणून आपला वेळ कसा घालवावा यासंबंधी तू अत्यंत दक्ष, सावध राहून विचार कर आणि त्याप्रमाणे आपण आपला सर्व वेळ रामाच्या अनुसंधानात घालवतो की नाही याकडे पूर्ण लक्ष दे. जी घडी तू राघवाच्या स्मरणात घालवशील ती घडी तुझ्या जीवनाची घडी व्यवस्थितपणे बसवून देईल व तुला प्रगतीच्या मार्गावर पुढे घेऊन जाईल. याबद्दल कसलीच शंका तू मनात आणू नकोस.

सामान्य संसारी माणसाचा वेळ इतका पटकन निघून जातो की हा वेळ कसा गेला हे त्याचं त्यालाच समजत नाही. सकाळ झाली की त्यामागून थोड्या वेळाने दुपार, संध्याकाळ नंतर रात्र होते. असं करत करत दिवस, आठवडा, पंधरवडा, महिना, चातुर्मास, षण्मास, वर्ष कधी निघून जातात तेच कळत नाही. यातच बाल्य, तारुण्य, प्रौढत्व व वृद्धावस्थाही हातात हात घालून मृत्यूच्या दिशेने पुढे सरकत असतात पण अशा जीवनात फक्त "राम" नसल्यामुळे ते जीवन नेहमीच संघर्षमय होतं म्हणून दुसरीकडे समर्थ म्हणतात. 'घटका गेली पळे गेली तास वाजे ठणाणा। आयुष्याचा नाश होतो राम का रे म्हणाना ।। यासाठी आपल्या जीवनात असं व्हायला नको असेल तर अखंड ईश्वरसुखासाठी आपण प्रत्येक क्षणी दक्षतेने लक्ष लावून त्याचं स्मरण, मनन, चिंतन, निदिध्यासन केलं पाहिजे. ज्ञानेश्वर-माउली आपल्याला हेच सांगते 'जरी अवधान एकले दीजे । तरी सर्व सुखासी पात्र होइजे । हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आइका ।।'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे । जनी जाणता भक्त होऊनि राहे ।**
**गुणी प्रीती राखे क्रमू साधनाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४७।।**

यापुढील दहा श्लोकात समर्थांनी ज्ञानी रामभक्ताच्या गुणांचं वर्णन केलं आहे. असा भक्त त्याच्या मनात आणि डोळ्यानीही श्रीहरीलाच पहात असतो. इथे समर्थानी श्रीराम असं न म्हणता, श्रीराम हा ज्याचा अवतार आहे त्या मूलतत्वाचा म्हणजे श्रीहरी (श्रीविष्णू) चा उल्लेख केला आहे. ज्याचं स्मरण केलं असता संसारातील सर्व चिंतांचं हरण होतं व मूळ अज्ञानाचं जो हरण करतो त्या मूलतत्वाला श्रीहरी म्हणतात. अशा श्रीहरीला जो मनात साठवून ठेवतो व डोळ्यानी त्याचं प्रतीक असलेल्या श्रीरामाचं जो दर्शन घेतो, तसंच आपल्या जीवनातील किमान कर्तव्य करत असताना ज्याला सदैव श्रीरामाचं स्मरण असतं व त्याच्या पूर्व नियोजित संकल्पानुसार आपण हे कर्तव्यकर्म मोठ्या आवडीने करीत आहोत याची ज्याला जाणीव असते, अशा तऱ्हेने जो प्रत्येक क्षणी श्रीरामाशी जोडलेला असतो त्याला लोक जाणता भक्त म्हणजे आत्मज्ञानी भक्त म्हणून ओळखू लागतात. अशा भक्ताचं जीवन दोन भागात विभागलेलं असतं. एक त्याची एकांतातील साधना आणि दुसरा त्याचा लोकांतातील व्यवहार म्हणजे त्याचं लोकशिक्षणाचं कर्तव्यकर्म. अशा भक्ताचं राघवाच्या सद्गुणांवर विलक्षण प्रेम असतं व हे सद्गुण क्रमाने आपल्या अंगी बाणवण्याची साधना तो क्षणोक्षणी करीत असतो, आणि व्यवहारात आपलं कर्तव्य करीत असताना, आपण स्वत: समोरचा माणूस आणि त्यांच्या बाबतीतलं आपलं कर्तव्यकर्म ही तीनही त्या ईश्वराच्या शक्तीची तीन वेगवेगळी प्रकटीकरणं असली तरी त्या शक्तीचं अधिष्ठान किंवा आधार असलेला मूळ ईश्वर म्हणजे श्रीहरी एकच आहे असं आत्मज्ञान त्याला सतत होत रहातं.

म्हणून उत्तमातील उत्तम अशा सर्वोत्तमाची जो भक्ती करतो म्हणजे परमेश्वराचा जो दास म्हणून आपलं जीवन वेचतो तोच या जगात धन्यता प्राप्त करुन घेतो व त्याच्याच जीवनाचं सार्थक होतं. त्याच्याच सुवर्णमय जीवनाचा तोडर प्रभू आपल्या चरणात धारण करतात व अंती त्याला आपल्यात सामावून घेतात. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात, "साठविला हरी । जेणे हृदयमंदिरी ।। त्याची सरली येरझार । झाला सफल व्यापार।।'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा । सदा रामनामे वदे नित्य वाचा ।**
**स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४८।।**

ज्याची बुद्धी आणि शरीरातील प्रत्येक इंद्रिय हे देवाच्या कामासाठी सदैव वापरल्यामुळे चंदनाप्रमाणे झिजत असतं, ज्याची वाणी सदैव रामनाम घेतल्यामुळे पवित्र झालेली असते, जो कर्तव्यकर्माचं पालन करत असताना स्वधर्माचंच आचरण उत्तम प्रकाराने करत असतो असा त्या सर्वोत्तम ईश्वराचा दास या जगात खरोखर धन्य होय.

पण देवकाज म्हणजे ईश्वराचं काम कोणतं? तर साधूचं सरंक्षण व दुष्कृत्यांचा नाश आणि धर्माची संस्थापना हे ईश्वराच्या युगायुगातील अवताराचं प्रमुख कार्य असतं आणि सृष्टीचं पालन करणं हे त्याचं नेहमीचं काम असतं. म्हणून या कामात त्याला मदत करण्यासाठी इतर लोकाना सन्मार्ग दाखवून त्याना सुखी करणं व दुष्ट प्रवृत्ती, दुराचरण यापासून त्याची सुटका करणं या देवकार्यात रामभक्ताचा देह सदैव झिजत असतो. तसंच स्वतः रामभक्ती करताना त्यात आपल्या प्रत्येक इंद्रियाचा वापर तो करीत असतो. उदा. तो डोळयानी प्रभूंची प्रेमळ मूर्ती पहात असतो व ती जशीच्या तशी मनात उमटवत असतो. कानानी तो प्रभूचं गुणगान श्रवण करीत असतो व जिभेने तो प्रभूंचा प्रसाद सेवन करीत असतो. नाकाने तो प्रभूंना लावलेल्या चंदनाच्या सुवासाचा आस्वाद घेत असतो आणि आपलं मस्तक प्रभूंच्या चरणावर ठेवून तो त्यांचा मखमली अमृतस्पर्श अनुभवत असतो. इतकंच काय पण आपले काम क्रोध लोभ मोह आदि विकारसुद्धा त्याने प्रभूचरणी समर्पित केलेले असतात. काम असावा ईश्वरभजनी । क्रोध असावा इंद्रियदमनी। लोभ असावा प्रसादग्रहणी । मोह असावा गुणसंकीर्तनी । रामभक्ताचा सर्वच मोकळा वेळ हा प्रभूंच्या नाम-स्मरणात जात असल्यामुळे मोकळया वेळात काय करायचं असा त्याला कधीच प्रश्न पडत नाही. ईश्वराचं स्मरण हाच त्याचा स्वधर्म झालेला असतो आणि त्याचं तो उत्तम प्रकारे पालन करीत असतो. 'स्वरुपी राहणे हा स्वधर्म' असं समर्थ दुसऱ्या एका ठिकाणी म्हणतात. तर असा हा सर्वोत्तमाचा दासच जगात धन्यता पावतो. असा हा आदर्श रामभक्त म्हणून हनुमान जगात चिरंजीव झाला आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**सदा बोलण्यासारखे चालताहे । अनेकी सदा एक देवासी पाहे ।।**
**सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४९।।**

सामान्य माणूस आपला स्वार्थ साधण्यासाठी त्याने जणू काही आजच व आत्ताच संक्रांतीनिमित्त दुसऱ्याकडून तिळगूळ घेतला आहे अशा थाटात त्याच्याशी गोड गोड बोलत असतो. पण त्याच्या हातून कृती मात्र अगदी बोलण्याच्या विरुद्ध घडत असते. म्हणून 'मुखमे राम और बगलमे छुरी' अशी आपल्याकडे म्हणच आहे. पण रामभक्ताचं मात्र तसं नसतं. त्याच्या बोलण्यात आणि वर्तनात नेहमी एकवाक्यता आढळते. अशी माणसं फार दुर्मिळ असतात. म्हणून आपले तुकाराम म्हणतात, 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले।' तर एक कवी म्हणतो, 'बोलासम आचरण । त्याचे वंदावे चरण।' याचा अर्थ अडखळत चालणारा व तोतरं बोलणारा माणूस हाही वंदनीय असतो असा नाही. पण रामभक्ताच्या विचारात आणि आचारात नेहमीच सुसंवाद आढळतो.

ही सृष्टी निर्माण करण्याच्या वेळी ईश्वराखेरीज दुसरं काहीच अस्तित्वात नसल्यामुळे ईश्वरालाच या सृष्टीतील सर्व वस्तूंचे गुणधर्म धारण करावे लागले आहेत. म्हणून या सृष्टीमध्ये आकार, गुणधर्म हे अनेक प्रकारचे असले तरी त्यांच्या आत असलेलं ईश्वरी तत्व हे एकच असतं, म्हणून भक्त या ईश्वरालाच हृदयात घट्ट पकडून ठेवतो. म्हणून आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'धरिला पंढरिचा चोर । प्रेमे बांधुनिया दोर ।। हृदय बंदिखाना केला । आत विठ्ठल कोंडला ।। स्वतः समर्थ इतके राममय झाले होते की ते पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला गेले असता तिथे त्याना श्रीरामांचंच दर्शन झालं म्हणून ते म्हणाले की, 'येथे का रे उभा श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ।' भक्ताला कोणत्याही देवाच्या मूर्तीचं दर्शन घेताना तिथे त्याचा देव दिसतो. पण इतकी निष्ठा व श्रद्धा ठेवून त्याने आपल्या देवाची सगुण भक्ती केली तरी हीच भक्ती अंतिम आहे अशा भ्रमाचा त्याच्या ठिकाणी लेशमात्रही उदय होत नाही. उलट ईश्वराचं मूळ रूप निर्गुण, निराकार आहे व ही सृष्टी म्हणजे त्याचं सर्वगुण, सर्वाकार रूप आहे व याचं प्रतीक म्हणून आपण श्रीरामाची सगुण साकार भक्ती करतो याचं त्याला कधीच विस्मरण होत नाही. अर्थात सर्वोत्तम अशा ईश्वराचा हा दासच जगात धन्यता मिळवतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**नसे अंतरी काम-कारी विकारी । उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ।**
**निवाला मनी लेश नाही तमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५०।।**

काम या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक अर्थ म्हणजे इच्छा, वासना, कामना आणि दुसरा अर्थ म्हणजे स्त्री-पुरुषातील कामवासना. दोन्ही अर्थांनी या कामाची पूर्ती झाली किंवा नाही तर त्यातून इतर विकार जन्म घेतात. जर पूर्ती झाली तर त्यातून मद म्हणजे गर्व किंवा ताठा निर्माण होतो पण जर पूर्ती झाली नाही तर लोभ, मोह, मत्सर व क्रोध हे विकार उत्पन्न होतात. उदा. जी वस्तू आपल्याकडे नसते पण आपल्याला ती आवडते ती ज्याच्याकडे असते त्याच्याविषयी आपल्याला मत्सर वाटतो. प्रयत्न करूनही आपल्याला जर ती वस्तू मिळाली नाही तर त्याला जो कारण असतो त्याच्याविषयी आपल्याला राग येतो. पण भक्त असे विविध विकार निर्माण करणाऱ्या कामाला आपल्या अंतःकरणात थारा देत नाही.

उदासीन याचा व्यवहारातील अर्थ निराश असा आहे. पण या शब्दाचा खरा अर्थ निराश असा नसून उत्+आसीन म्हणजे वरती बसलेला असा आहे. ज्ञान, विचार व क्रिया या सर्वच बाबतीत याची बैठक सामान्य माणसांपेक्षा वरच्या पातळीवरची असते. समर्थ दुसरीकडे म्हणतात, 'दास डोंगरी रहातो । यात्रा देवाची पहातो ।" तसंच भक्त हा तापसी व ब्रह्मचारीही असतो. तापसी म्हणजे तपस्वी, तप करणारा, सहनशील असणारा, कष्टाला न कंटाळणारा. तर ब्रह्मचारी या शब्दाचा अर्थ वर्तमानपत्रात अनेक वेळा वधू पाहिजे अशी जाहिरात देऊनसुद्धा लग्न न झालेला असा नसून एक ब्रम्हच विश्वातील वस्तूंच्या रूपाने विलसत आहे, हे जाणून 'ब्रह्मणे चरति' म्हणजे त्या ब्रह्मात विहार करणारा व त्यामुळे सर्वांशी समत्वाच्या भावनेने वागणारा असा आहे. त्यामुळे भक्ताच्या हातून अशा वागण्यासाठी जे गुण आवश्यक आहेत ते मिळवण्याचं तप सदैव घडत असतं. म्हणून त्याचं चित्त 'निवलेलं' म्हणजे कमालीचं शांत असतं. कारण तमाचा म्हणजे मोहाचा, भ्रमाचा, अंधाराचा व अज्ञानाचा लेशही त्याच्या अंतःकरणात शिल्लक नसतो. रामभक्तीने त्याच्या चित्तातील सर्व विकारांची व अज्ञानाची आणि अहंकाराची जळमटं जळून गेलेली असतात. मग असा सर्वोत्तमाचा दास असलेला भक्त हा धन्यता मिळवील यात नवल ते काय?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**मदे मत्सरे सांडिली स्वार्थबुद्धि । प्रपंचीक नाही जयाते उपाधि ।**
**सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५१।।**

सामान्य प्रापंचिक माणसं ही नेहमीच स्वार्थबुद्धीने लिडबिडलेली असतात. त्यामुळे इतरांकडे ज्या गोष्टी नाहीत त्या गोष्टी आपल्याकडे असाव्यात असा त्यांचा अट्टाहास असतो. पण होतं काय की इतरांकडे ज्या गोष्टी आहेत त्या अनेक वेळेला यांच्याकडे नसतात. म्हणून या स्वार्थबुद्धीतून मग इतरांकडे नसलेल्या ज्या गोष्टी यांच्याकडे असतात त्याबद्दल त्यांना गर्व वाटू लागतो आणि यांच्याकडे नसलेल्या ज्या गोष्टी इतरांकडे असतात त्याबद्दल त्याना इतरांचा मत्सर वाटू लागतो. म्हणजेच एखाद्या वस्तूची मालकी त्यांच्या मनात गर्वाचं घर निर्माण करते तर त्या वस्तूचा अभाव त्याच्या मनात मत्सर जागृत करतो. पण रामभक्ताच्या बाबतीत मात्र अगदी अत्यावश्यक वस्तूंचाच संग्रह करण्याच्या त्याच्या स्वभावामुळे स्वार्थ, मद व मत्सर यानीच त्याला सोडलेलं असतं. त्याच्याशी काडीमोड घेतलेला असतो. या त्रिकुटाने त्याच्या घरी कायमचा राम म्हटलेलां असतो.

तसंच रामभक्ताला प्रंपचातील बऱ्यावाईट गोष्टींचा त्रास, कंटाळा किंवा उपाधी म्हणजे अडथळा वाटत नाही. कारण त्याला प्रपंचातील सर्वच गोष्टी राममय झालेल्या दिसतात. या संबंधात सावता माळी (दासगणू महाराजांच्या शब्दात) म्हणतात.

'विठ्ठल वापी विठ्ठल मोट विठ्ठल नांद्या बैल ग ।
विठ्ठू बेणे विठ्ठल उगवे विठ्ठल सारे शेत ग ।
तूही विठ्ठल मीही विठ्ठल विठ्ठल अवघे विश्व ग ।
घडिघडि विठ्ठल विठूस भेटे मग का व्हावे अधीर ग ।

अशा रितीने रामभक्ताला सर्वत्र व क्षणोक्षणी रामच दिसत असल्यामुळे साक्षात रामाशी हितगुज करावं इतक्या नम्रतेने व प्रेमाने तो नेहमी सर्वांशी गोड बोलून सर्वांना आपलंसं करुन घेत असतो. त्यामुळेच तो सर्वांना हवाहवासा वाटत असतो. त्याची वाणी ही नेहमीच 'सुवाचा' असते. त्याचं प्रत्येक वाक्य हे ईश्वराच्या प्रेषिताच्या मुखातून बाहेर पडणारं सुभाषितच' असतं. साक्षात् धन्यतेलाही धन्य वाटावं असं या सर्वोत्तमाच्या दासाचं आचरण असतं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादे । न लिपे कदा दंभवादे विवादे ।**
**करी सूखसंवाद जो उगमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५२।।**

समर्थ या श्लोकात रामभक्ताचा वेळ कसा व कशात जातो ते सांगत आहेत. सामान्य माणसांचा वेळ इतरांशी गप्पा मारण्यात किंवा टी.व्ही. वरच्या वेगवेगळ्या वाहिन्यानी सादर केलेले कार्यक्रम व क्रिकेटच्या मॅचेस आणि चित्रपट पहाण्यात किंवा ध्वनीफितींवरची गाणी ऐकण्यात जातो. त्याच्या जोडीला वर्तमानपत्रातील बातम्यांचं वाचन व त्यावर चर्वित चर्वण सकाळ-संध्याकाळ चालतंच. यातून त्यांच्या पदरात टाइम-पास म्हणजे वेळ फुकट घालवण्यापलीकडे काहीच पडत नाही. पण रामभक्ताचं मात्र तसं नसतं. तो आपला मोकळा वेळ मूलतत्वाच्या म्हणजेच ईश्वराच्या चिंतनाचा अनुवाद करण्यात घालवतो. म्हणजे ते चिंतन तो ईश्वराची आवड असलेल्या इतर भक्ताना त्यांच्या आनंदासाठी पुन्हापुन्हा सांगतो व त्यांचा आनंद शतगुणित करतो. त्यामुळे या रामभक्ताच्या चिंतनाचं रूपांतर निदिध्यासात होतं. हे करत असताना तो एक पथ्य कटाक्षाने पाळतो. तो आपलं अंतःकरण कधीही दंभाने व विवादाने लिप्त होऊ देत नाही. वादविवाद हा स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी स्वतःची प्रतिष्ठा, वाढविण्यासाठी केला जातो. दुसऱ्याचं म्हणणं खरं असलं तरी वादात ते अमान्य केलं जातं आणि मग दुसऱ्याचं कसं चुकीचं आहे यासाठी वितंडवाद घातला जातो. वादविवाद हा नेहमी जिंकण्यासाठीच केला जातो. मोठ्या लोकांमधील कित्येक वाद तर वर्तमानपत्रातून नेहमी गाजत असतात. तसंच जी गोष्ट आपल्याकडे नाही ती आपल्याकडे आहे असं दाखविण्याचा दांभिकपणा तो कधीही करत नाही. या उलट प्रत्येक प्रश्नाची नीट छाननी करून, त्याच्या अगदी मुळाशी जाऊन तो सर्व बाजूनी विचार करतो आणि ऐकणाऱ्याला सुख होईल अशा तऱ्हेने त्याच्याशी मनमोकळी चर्चा, सुसंवाद करतो. तसंच या सृष्टीचा उगम ज्या ईश्वरापासून झाला तो कसा आहे, त्याचा आणि जीवाचा संबंध कसा आहे, जीव ईश्वराचाच अंश कसा आहे यासंबंधी सुखसंवाद तो इतर भक्तांशी करत असतो. सामान्य माणसाप्रमाणे तो आपली स्तुती व हजर नसलेल्या माणसांची निंदा करण्यात आपला वेळ फुकट घालवीत नाही. तर अशा भक्ताच्या तृप्त व परिपूर्ण जीवनाला पाहून तो सर्वोत्तमही स्वतःला धन्य समजत असेल ना !

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## शुक्रवार

**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकी । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५३॥**

आर्जवी या शब्दाचा अर्थ सामान्यतः गोड बोलणारा, आर्जवं करणारा, नम्र असा केला जातो. मुळात आर्जव हा शब्द ऋजुता या शब्दावरुन आला आहे. ऋजुता म्हणजे सरळपणा, म्हणजे बोलण्यात व स्वभावात यत्किंचितही वाकडेपणा नसणं. लाचारी किंवा तोंडपुजेपणा म्हणजे आर्जव नव्हे. तसंच आर्जव म्हणजे फटकळपणा किंवा तुसडेपणाही नव्हे. भक्त त्याच्या स्वभावातील व बोलण्यातील नेहमीच्या सरळपणामुळे सर्व लोकांच्यात प्रिय म्हणजे आवडता असतो. 'जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला ।'

तसंच भक्त नेहमीच म्हणजे सदा सर्वदा सत्यवादी म्हणजेच व्यवहारात सत्याची कास धरणारा व विवेकी असतो. विवेक या शब्दाचा सामान्य अर्थ अहंकार सोडून केलेला एखाद्या गोष्टीबद्दल विचार. पण त्याचा पारमार्थिक अर्थ "नित्यानित्यवस्तुविवेक" म्हणजे जगात नित्य काय व अनित्य काय याचा योग्य तो विचार करून नित्य वस्तूला धरून ठेवणं व अनित्य वस्तू सोडून देणं. ही नित्य वस्तू म्हणजेच ईश्वर आणि अनित्य वस्तू म्हणजेच आकर्षक भासणारी ईश्वराची माया. तसंच सत्य म्हणजे खरं हा एक अर्थ तर सत् म्हणजे ज्यात कधीही बदल होत नाही व जे नेहमी एकाच स्थितीत कायमचं असतं त्याला सत्य म्हणतात म्हणून भक्त हा विवेकी म्हणून सत्यवादी म्हणजेच ईश्वरवादी असतो. या विविध गुणांमुळे भक्ताची बुद्धी नेहमी संतुलित व शांत रहाते. ती कधी भडकत नाही तर कधी भरकटत नाही. त्यामुळे ती कठिण प्रसंगी सर्वांच्याच उपयोगी पडते एका अर्थाने ती वैश्विक संपत्तीच असते. तसंच भक्त तोंडानं कधीही मिथ्या म्हणजे खोटं बोलत नाही. कारण खोटं बोलून स्वतःचा स्वार्थ साधावा, आपल्या पोळीवर तूप ओढून घ्यावं असं त्याच्या स्वप्नातही येत नाही. म्हणून पश्यंति, मध्यमा, व वैखरी या तीनही वाणीतून तो कधीही खोटं बोलत नाही. म्हणूनच तो सर्व लोकाना प्रिय असतो. भक्ताच्या ठिकाणी अज्ञान व अहंकाराचा अभाव असल्यामुळे त्याला यत्किंचितही खोटं बोलण्याची गरजच भासत नाही. असा ईश्वराचा भक्तच जगात धन्यता पावतो.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ॥ मना सज्जना ॥



## शनिवार

**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी । मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी ।**
**चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५४।।**

अगदी जन्मापासून मूल त्याच्या नातेवाईकातच वाढतं. त्यामुळे त्याच्या भोवती नेहमीच माणसांचा गराडा असतो व त्यानी केलेली गडबड नेहमीच त्याच्या बरोबर असते. घरातील सर्व सुखसोयी त्याच्या हाताशी असतात. त्यामुळे त्याला अरण्यातील एकांतवासाच्या सुखाची कल्पना नसते. हे सुख शरीरातील इंद्रियांच्या पातळीवर भोगण्याचं सुख नसतं. शिवाय समाजात रहाताना त्याच्या मनाविरुद्ध गोष्टी घडत रहातात. म्हणून बाहेरुन सुखी वाटणारं त्याचं जीवन आतून वैतागलेलं असं असतं. पण रामभक्ताला ईश्वरभक्ती करण्यासाठी मन एकाग्र करण्याची गरज असल्यामुळे अरण्यातला एकांत त्याला माणसांच्या वर्दळीपेक्षा जास्त मानवतो. ईश्वरभक्ती ही तरुणपणीच करण्याची गोष्ट असल्यामुळे, तारुण्यातच त्याला एकांतात रहायची सवय लागते. आता हल्लीच्या दिवसात अरण्य दुर्मिळ झाल्यामुळे गावातच मंदिरात किंवा स्वतःच्या घरात एकांतासाठी जागा निवडावी लागते. या एकांतात त्याला निर्वेधपणे ईश्वरभक्ती करता येते. ही करीत असताना तो कल्पनेच्या जाळ्यात कधीच सापडत नाही. कोठलीही घटना समजून घेताना त्यात वास्तव आणि काही कल्पना याचं बेमालूम मिश्रण झालेलं असतं. त्यात वस्तुस्थिती किती आहे व कल्पना किती आहे हे अगोदर नीट समजावून घ्यावं लागतं आणि वास्तवतेला योग्य प्रत्युत्तर देऊन कल्पनेचा भाग सोडून द्यावा लागतो. कारण मानसिक सुख-दुःख हे कल्पनेने निर्माण होतं. त्यामुळे कल्पना करणं थांबलं की मानसिक पातळीवरचं सुख-दुःख अदृश्य झालंच म्हणून समजा. पण यासाठी कल्पनेला बळी पडणार नाही असा त्याला अगोदर दृढ निश्चय करावा लागतो आणि मग कोठल्याही प्रसंगात तो आपल्या निश्चयापासून कधीच ढळत नाही. या बाबतीत त्याचं मन कधीच चंचल होत नाही. कोठल्याही संकटात हा त्याचा निश्चय ठाम असतो. याबाबतीत आपले तुकाराम महाराज म्हणतात 'फुटो हे मस्तक तुटो हे शरीर । परी तो विश्वंभर सोडू नये. तर समर्थ एका ठिकाणी म्हणतात, 'देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांच्या तुटी । सर्व अर्पावे शेवटी । प्राण तोही वेचावा. इतका दृढनिश्चय असल्यावर सर्वोत्तम ईश्वराचा दास असलेला भक्त या जगात धन्य होईल यात आश्चर्य ते काय?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## रविवार

**नसे मानसी नष्ट आशा दुराशा । वसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा ।**
**ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।**

मनुष्य हा नेहमी भविष्यकालीन सुखाच्या आशेवर जगत असतो. त्याचे सध्याचे दिवस कितीही चांगले असले तरी उद्या याच्याहीपेक्षा चांगले दिवस येतील असं त्याला वाटत असतं आणि दुर्जन तर दुष्ट आशांवरच दिवस काढत असतो. लोकांच्या घराना आग लागलेली असताना त्यावर आपली पोळी भाजून घ्यावी अशी नष्ट आणि दुष्ट आशा त्याच्या मनात घर करून असते. रेल्वे अपघातात सापडलेल्या दुर्दैवी माणसांची मनगटं किंवा नाक कान कापून त्यातील दागिने पळवावे अशी त्यांची मानसिक मोहमयता असते. सामान्य माणसाच्या मनातसुद्धा चढत्या श्रेणीने एकाहून एक वरचढ आशा निर्माण होत असतात. पण रामभक्ताचं मात्र तसं नसतं. त्याच्या मनात दुष्ट तर सोडाच पण साधी लहानशी आशासुद्धा निर्माण होत नाही. त्यामुळे त्याचं मन संपूर्ण मोकळं असतं. निसर्गाच्या नियमाप्रमाणे कोठेही पोकळी राहू शकत नाही. म्हणून त्या मोकळ्या मनात भगवंतासंबंधाचा भक्तिभाव भरभरुन पूर्णपणे वहात असतो. देवाच्या प्रेमाची तहान लागल्यामुळे त्याने साक्षात भगवंतालाच आपल्या निसीम प्रेमाच्या पाशात बद्ध केलेला असतो. देवालाही शेवटी अशा प्रेममय भक्तांची आत्यंतिक आवड असल्यामुळे शेवटी तोच याचा ऋणी होऊन बसतो. सुरवातीला देव सावकार असतो व भक्त ऋणको असतो. त्यामुळे देव सांगेल तसं भक्ताला वागावं लागतं पण जसजसा काळ जातो तसतसं भक्ताचा भगवंताविषयी भावप्रेमा वाढत जातो. ही परिस्थिती बदलत जाते. शेवटी भक्ताचं भगवंताविषयीचं प्रेम इतकं उत्कट होतं की भक्ताला रात्रंदिवस त्याचाच ध्यास लागतो. त्याला भगवंतावाचून क्षणभरही चैन पडत नाही. कारण 'जन्मभरीच्या श्वासाइतुंके त्याने हरिनाम मोजियलेले असते.' म्हणून त्याचा क्षणाचाही विरह भक्त सहन करू शकत नाही कारण या विरहात पाण्यातून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणे तो व्याकुळतेने तडफडत असतो. म्हणून शेवटी भक्ताचेच उपकार देवाच्या डोक्यावर चढतात आणि त्यातून उतराई होण्यासाठी देवच भक्तासाठी वाटेल ते करायला तयार होतो. मग तो अर्जुनाचे घोडे धुतो. धर्मराजाच्या यज्ञात उष्टी काढतो. एकनाथाच्या घरी पाणी भरतो. जनाईचं दळण दळतो. दामाजीचे पैसे भरतो वगैरे. असा हा सर्वोत्तमाचा दासच जगात धन्यता मिरवतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार


**दिनाचा दयाळू मनाचा मवाळु । स्नेहाळु कृपाळु जनी दास पाळु ।**
**तया अंतरी क्रोध संताप कैचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५६।।**

रामभक्ताच्या अंगी व्यवहारात कोणते गुण प्रकर्षाने जाणवतात ते समर्थ या श्लोकात सांगत आहेत. त्यातील पहिला गुण म्हणजे दीनांबद्दल दया त्याच्या अंतःकरणात वसत असते. रंजल्या गांजल्या लोकाविषयी त्याच्या मनात अपार करुणा असते. आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा । आपल्या दुर्बल बालकाविषयी आईच्या मनात जी करुणा असते तशीच करुणा भक्ताच्या मनात दीनांविषयी असते. 'भूतांची दया हे भांडवल संता। त्याचं मन अत्यंत मृदु, सौम्य व मुलायम असतं म्हणून पतिताविषयी त्याच्या मनात केव्हाही तिरस्काराची भावना येत नाही. उलट दुःखिताविषयी त्याच्या मनात कळवळाच असतो. दुर्जनांविषयी सुद्धा त्याला चीड न येता त्याऐवजी त्याची कीव करावीशी वाटते. साक्षात् ईश्वर जरी जशास तसं या न्यायाने माणसाशी वागत असला तरी त्याचा भक्त मात्र सर्वांशीच स्नेहभावाने, आपुलकीने, जिव्हाळ्याने, मित्रत्वाने वागतो. एखादा साधक त्याच्यापेक्षा खालच्या पायरीवर जरी असला तरी भक्त त्याच्यावर कृपा करून त्याला आवश्यक ती मदत करतो व त्याला त्वरित आपल्या पायरीवर आणतो. 'शब्द पाठी अवतरे । कृपा आधी' । ज्ञानेश्वर माउली. लोकांच्यात वावरत असताना आपण ईश्वराचे कोणीतरी फार श्रेष्ठ भक्त आहोत असा आव न आणता तो स्वतःला इतरांचा दास, किंकर समजतो व त्याप्रमाणे त्याचं आचरण असतं. हे सगळं त्याला सहज जमतं. कारण त्याच्या अंतःकरणात क्रोध व संताप याना थारा नसतो. संताप म्हणजे आपल्या मनाविरुद्ध घडल्यामुळे आपल्या मनाची आतल्या आत होणारी घुसमट आणि क्रोध महणजे मनाविरुद्ध घडलेल्या घटनेला जो जबाबदार असेल त्याच्यावर पाखडलेली आग. आता या विश्वातील सर्वच घटना रामाच्या पूर्व नियोजित संकल्पाने घडत असल्यामुळे तो इतर कोणालाही घडलेल्या घटनेबद्दल जबाबदार धरत नाही व त्याने आपलं मनच रामाच्या चरणांवर समर्पित केलं असल्यामुळे व त्यात आता कोठलीही अपेक्षा शिल्लक नसल्यामुळे रामाच्या संकल्पाने घडणारी कोणतीही घटना भक्ताला मनाविरुद्ध अशी वाटतच नाही व त्यामुळेच काहीही झालं तरी भक्ताच्या मनात संताप व क्रोध याना थाराच नसतो. म्हणून सर्वोत्तमाच्या दासाच्या या सद्‌गुणांमुळे भक्त देव आणि जग या सर्वांनाच धन्यता प्राप्त होते. या श्लोकाबरोबरच समर्थांचं हे 'धन्यता-दशक' समाप्त होत आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**जगी होईजे धन्य या रामनामे । क्रिया भक्ति उपासना नित्य नेमे ।**
**उदासीनता तत्वता सार आहे । सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।।५७।।**

मागील दहा श्लोकांमध्ये या जगात धन्य झालेल्या सर्वोत्तमाच्या दासाचं म्हणजे रामभक्ताच्या सद्गुणांचं वर्णन समर्थांनी केलेलं आहे. अशी धन्यता ज्या विवेकी माणसाला हवीहवीशी वाटेल त्याने ती कशी मिळवावी याचा उपाय ते या श्लोकात सांगत आहेत. ते म्हणतात, 'या जगात रामनामाच्या स्मरणाने माणसाला धन्यता प्राप्त होऊ शकते. या रामनामाने लुटारू, दरोडेखोर व खुनी वाल्या कोळीसुद्धा श्लोकबद्ध रचना करून आद्यकवी व प्रतिभावान महाकवी म्हणून भारतात धन्यता पावला. तसंच स्त्री लंपट असलेले गोस्वामी तुलसीदासजीसुद्धा या रामाच्या नामाने तरले व तेसुद्धा रामचरितमानस या अपूर्व रामचरित्राची रचना करुन धन्यता पावले. या रामनामाच्या जोडीला नित्य नियमाने निरपेक्ष व केवळ जगाच्या कल्याणासाठी केलेलं सत्कर्म तसंच रामरायाच्या जवळ म्हणजे अगदी मांडीला लावून बसण्यासाठी (उप+आसन) केलेली अनुष्ठानं पारायणं, भजनं, कीर्तनं, इत्यादि साधना, शिवाय ध्यान, चिंतन, मनन, स्मरण, निदिध्यासन वगैरेच्या मदतीने केलेली अखंड तीव्र तळमळीने केलेली, प्रेममय भगवंताची भावपूर्ण भक्ती यांचाही अंतर्भाव होतोच.

या सर्वांचा परिणाम असा होतो की या विश्वाच्या मुळाशी असलेलं सारभूत ईश्वरी तत्व भक्ताला गवसतं. मग तो संसारातील विषयांसंबंधी अनासक्त, उदासीन व अलिप्त होतो. उत् म्हणजे वरती आणि आसीन म्हणजे बसलेला. खालच्या माणसापेक्षा वरच्या माणसाला नेहमीच जास्त दिसतं म्हणून सामान्य माणसापेक्षा भक्ताचा दृष्टिकोन जास्त सखोल, व्यापक व विशाल असतो. तसंच त्याची वृत्तीही आकाशारखी मोकळी होते. कारण आता तिला कशाचंही बंधन नसतं. ती कोठल्याही दडपणाखाली दबावाखाली, प्रभावाखाली निर्माण होत नसते. ईश्वराशिवाय इतर कोणाचंही वर्चस्व ती झुगारून देते. अशी मोकळी वृत्ती फक्त ईश्वराला वाहिलेली असते. आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो रे । समर्थ म्हणतात. जसं आकाशात सर्वच ढगांना मजेने व आनंदाने विहार करता येतो कारण ते कोणालाही नाही असं म्हणत नाही तसं असं मोकळं व मुक्त मनच ईश्वराला मिठी मारू शकतं व त्याला आपल्या मिठीत सामावून घेऊ शकतं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



बुधवार

**नको वासना वीषई वृत्ति रूपे । पदार्थी जडे कामना पूर्वपापे ।**
**सदा राम निष्काम चिंतीत जावा । मना कल्पना लेश तो ही नसावा ।।५८।।**

विषय म्हणजे माणसाला सुख देणारी वस्तू. आता प्रत्येक माणसाची सुखाची कल्पना वेगळी असल्यामुळे प्रत्येकाच्या सुखाचे विषयही वेगवेगळे असतात. ' कुणाला वेड कनकाचे । कुणाला कामिनीचे ।' हे विषय कसे मिळवावे याबद्दल माणसाच्या मनात नेहमीच उलटसुलट विचारांच्या रूपाने वृत्ती उमटत असतात. गेल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे माणसाला आपलं मन सदा सर्वदा मोकळं ठेवायचं असेल तर त्याच्या मनात या विचाररूपी वृत्ती उठता कामा नयेत. म्हणजेच विषयसुखाची वासना त्याच्या मनात विचारांच्या वृत्तीच्या रूपानेसुद्धा येता कामा नये.

पण ही विषयाची कामना त्याच्या मनात मुळात निर्माणच का होते याचं उत्तर समर्थांनी दुसऱ्या ओळीत दिलं आहे. ते म्हणतात पूर्वी केलेल्या पापामुळेच माणसाला या सुखदायक वस्तू मिळवाव्या असं वाटतं. माणसाने पूर्वजन्मी पाप केलं असेल तर त्याचं रूपांतर या जन्मी दुःखात होईल. हे दुःख अर्थातच दारुण अपेक्षाभंगातून निर्माण झालेलं असेल. या अपेक्षाभंगासाठी प्रथम अपेक्षा असली पाहिजे आणि अपेक्षेच्या निर्मितीसाठी माणसाला प्रथम सुखदायक वस्तू आपल्या मालकीच्या असाव्यात अशी कामना किंवा जबरदस्त इच्छा असली पाहिजे. त्यासाठी सर्वप्रथम सुख देणाऱ्या पदार्थाचं आकर्षण त्याच्या मनात निर्माण झालं असलं पाहिजे. म्हणून पूर्वजन्मी केलेल्या पापामुळेच या जन्मी, सुखदायक वस्तूच्या मालकीची कामना माणसाच्या मनात निर्माण होते.

ही विषयवासना माणसाच्या मनात उमटू नये म्हणून समर्थ सांगतात की त्याने रामाचं सदैव चिंतन करावं, त्याची भक्ती करावी आणि हे चिंतनही निष्काम भावनेने करावं. भक्तीच्या जोडीला इच्छापूर्तीतून केलेल्या नवसाची सक्ती नसावी. तसंच विषयसुखाची आसक्तीही नसावी. शिवाय कणभरसुद्धा कल्पनाशक्ती नसावी. काही मिळवण्यासाठीच भक्ती, उपासना, साधना करावी या कल्पनेचा अणुरेणुसुद्धा माणसाच्या मनात येऊ नये. कारण अशी कल्पनाच जीवाला शिवापासून दूर नेते आणि रामभक्तीतून येणाऱ्या आरामाला व विरामाला या कल्पनेमुळेच माणूस वंचित होतो. म्हणून आपले तुकाराम महाराज म्हणतात 'ओळखा रे वस्तू। सांडा रे कल्पना.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**मना कल्पना कल्पिता कल्पकोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा राम भेटी ।**
**मनी कामना राम नाही जयाला । अती आदरे प्रीति नाही तयाला ।।५९।।**

एक कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजेच आपल्या पृथ्वीवरची चार अब्ज बत्तीस कोटी वर्षं आणि कोटी म्हणजे शंभर लक्ष वर्षं. म्हणून कोटी कल्प म्हणजे जवळजवळ अर्ध परार्ध वर्षं इतक्या प्रचंड कालावधीपर्यंत जरी, हे मना तू नुसत्याच अनंत कल्पना करत राहिलास आणि वास्तवाकडे पाठ फिरवून प्रत्यक्ष साधना केली नाहीस तर कोठल्याही प्रकारे तुला रामाची अजिबात भेट होणार नाही हे निश्चित. कल्पना म्हणजे भविष्यकाळासंबंधी मनाने केलेला विचार व त्यातून उभारलेलं एक चित्र किंवा आपल्यापासून दूर असल्यामुळे आपल्या ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांच्या कक्षेत न येणाऱ्या माणसाविषयी किंवा वस्तूंविषयी मनाने केलेला अंदाज. म्हणून रामाची प्रत्यक्ष भक्ती न करता, त्याच्या भेटीसाठी काही प्रत्यक्ष साधना न करता, मनाला प्रत्यक्ष परमार्थाची ओढ लागलेली नसताना आपण नुसत्याच कल्पना करीत राहिलो तर आपल्याला कधीही कोठल्याही प्रकाराने ईश्वरप्राप्ती होणार नाही ही गोष्ट निश्चित आहे हे समर्थांनी 'नव्हे' हा शब्द दोनदा वापरून सूचित केलं आहे. मी हे करीन, मी ते करीन अशी नुसती बढाई मारत राहणं किंवा उलटपक्षी याची गरज काय, त्याचा उपयोग काय अशा नुसत्या शंकाकुशंका काढत रहाणं हे दोन्हीही कल्पनेचेच खेळ आहेत. मणभर कल्पनेपेक्षा कणभर प्रत्यक्ष साधना जास्त श्रेष्ठ व श्रेयस्कर आहे. म्हणून ईश्वराचा साक्षात्कार व्हावा असं वाटत असेल तर सर्व शेखमहंमदी कल्पनाना बाजूला सारून सर्व कामनांचा त्याग करून प्रत्यक्ष साधना केली पाहिजे. आपल्या मनात काम आणि राम हे दोघे एकत्र राहू शकत नाहीत. जोपर्यंत माणूस आपल्या इच्छा पुऱ्या होण्यासाठी देवाची भक्ती करतो तोपर्यंत त्याने ईश्वराचं आपल्या कामनापूर्तीसाठी माध्यम बनवलेलं असतं. म्हणून अशी भक्ती म्हणजे त्याच्या अहंकाराचाच एक गोंडस व मोहक अविष्कार असतो. अशा माणसाला 'विठोबा' हा पोटोबासाठी हवा असतो. म्हणून त्याला ईश्वराचं निष्ठायुक्त, आदरपूर्वक प्रेम लाभत नाही. या संबंधात महात्मा कबीर म्हणतात, 'प्रेमगली अति साकरी (अरुंद) इसमे दो न समाये । जहा काम है वहा राम नही । और जहा राम वहा काम नही ।'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**मना राम कल्पतरू कामधेनु । निधी सार चिंतामणी काय वानू ।**
**जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता । तया साम्यता कायसी कोण आता ।।६०।।**

समर्थ मनाला या श्लोकात रामाची योग्यता वर्णन करून सांगत आहेत. त्याच्या सामर्थ्याविषयी ते बोलत आहेत. कल्पतरू म्हणजे आपल्या सावलीत बसलेल्या वाटसरूनी केलेल्या सर्व इच्छा पूर्ण करणारा, स्वर्गातल्या बागेतील एक वृक्ष. हा इतरांच्या इच्छा पुरवत नाही. तसंच कामधेनु म्हणजे आपल्या मालकाच्या सर्व कामना पुरवणारी गाय. वसिष्ठांकडे अशी गाय होती. ती वसिष्ठांच्या सर्व इच्छा पुरवत असे. त्यावर आश्रमाचा चरितार्थ चालत असे. वसिष्ठांच्या सांगण्यावरून तिने एकदा आपल्या अंगातून सैन्य निर्माण करून राजा विश्वामित्राचा पराभव केला होता. चिंतामणी म्हणजे माणसाच्या सर्व इच्छा पूर्ण करून त्याच्या चिंता हरण करणारा एक मणि किंवा रत्न. यातील कल्पतरू व कामधेनु सजीव आहेत तर चिंतामणि निर्जीव आहे. राम हा खरंच लोकांसाठी कल्पतरू, कामधेनु व चिंतामणी आहे कारण तो आपल्या भक्ताना निष्काम, निरपेक्ष व निश्चिंत करतो. तसंच निधि म्हणजे कुबेराचं सारं द्रव्यभांडार जरी एकत्रित केलं तरी त्या रामाच्या ऐश्वर्यापुढे ते कःपदार्थ आहे. तो भक्तांचं सारसर्वस्व आहे. ज्याच्या शक्तीमुळे या विश्वात सामर्थ्य निर्माण होतं, अशा रामचंद्राच्या बरोबरीला कोण कसा उभा राहू शकणार? अर्थात कोणीही उभा राहणार नाही हे त्रिवार सत्य आहे. हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. 'आहे बहु, होतिल बहु, झालेतचि बहु, परंतु यासम हा' असं कविवर्य मोरोपंत' म्हणतात. याच्यासारखा हाच. समर्थ म्हणतात, 'याचं वर्णन करताना वेद मौनावले. श्रुति-स्मृति थकल्या. उपनिषदं दमली. पुराणं पेंगुळली. एवढंच काय पण शेषाची हजार मुखंसुद्धा याचं वर्णन करताना सुकून गेली, अशा एकमेवाद्वितीय अशा रामाचं वर्णन मी एकटा काय करणार? आणि कसं करणार? याच्या वर्तनाला कोठलीच उपमा लागू पडत नाही. 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव।' या रामाच्या इच्छेने विश्वाची निर्मिती झाली आणि त्याच्याच संकल्पानुसार या विश्वाच्या उत्पत्तीपासून लयापर्यंत त्यात सर्व घटना घडत असतात. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात, 'वृक्षाचेही पान हाले । ही तुझी सत्ता ।।'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे । तया अंतरी सर्वदा तेचि आहे ।**
**जनी सज्जनी वाद हा वाढवावा । पुढे मागुता शोक जीवी धरावा ।।६१।।**

गेल्या श्लोकात समर्थांनी रामाला कल्पतरू, कामधेनू व चिंतामणी यांची उपमा दिली आहे. त्यापैकी कल्पवृक्षाचा विचार त्यानी या श्लोकात केला आहे. आपल्या सावलीत असलेल्या माणसाची इच्छा पुरी करणाऱ्या वृक्षाला कल्पवृक्ष असं म्हणतात. पण ती इच्छा माणसाला अंती सुखदायक आहे का दुःख देणारी आहे याचा विवेक कल्पवृक्षाकडे नसतो. म्हणून कल्पवृक्षाच्या तळाशी असलेल्या सावलीत उभं राहून एखाद्या माणसाने तात्पुरतं सुख देणाऱ्या पण अंती दुःखदायक ठरणाऱ्या वस्तूची इच्छा केली व ती कल्पवृक्षाने पुरी केली तर त्याला तात्पुरतं सुख मिळेल हे खरं आहे. पण पुढे त्याच्या मनाला नेहमीच दुःख होत राहील. अरण्यातून चालणारा एक वाटसरू दमल्यामुळे दुपारी एका झाडाखाली विसावला. तो वृक्ष कल्पतरू होता. वाटसरूला वाटलं की इथं छानसं सुग्रास अन्न खायला मिळेल का? ताबडतोब त्याच्यासमोर पंचपक्वान्नांनी भरलेलं ताट हवेतून हजर झालं. त्याने जेवणावर ताव मारला. मग सुस्ती आल्यामुळे त्याला वाटलं की जेवणानंतर झोपण्याची सोय झाली तर किती बरं होईल? तत्काळ गाद्यागिरद्यांसकट एक उत्कृष्ट पलंग तिथे अवतरला. प्रवासी त्यावर झोपला. पण हा प्रकार पाहून त्याला वाटलं की, अरे, ही भुताटकी तर नाही ना? आता त्याच्यासमोर एक अक्राळ विक्राळ भूत प्रकट झालं आणि त्याला नानाप्रकारे छळू लागलं. अगदी असंच सामान्य माणसाचं होतं. संतसज्जन हे कल्पतरूसारखे असतात. त्यांच्याकडून देवाची भक्ती कशी करावी, त्याचं अनुसंधान कसं टिकवावं हे शिकण्याऐवजी सामान्य लोक त्यांची योग्यता न ओळखता आपण करीत आहोत तेच कसं बरोबर आहे याबद्दल त्यांच्याशी वितंडवाद करतात व त्यांचंच कसं चुकतं हे त्याना पटवण्यात धन्यता मानतात. यासाठी ते आपला उगाचच घसा कोरडा करत राहतात. त्यामुळे साहजिकच त्यांच्या जीवनात शोक नेहमीच ठाण मांडून बसलेला असतो. अगोदरच दुःखी, असलेलं त्यांचं जीवन यांच्याशी वाद घातल्यामुळे पुढे आणखीनच दुःखमय बनतं. म्हणून ते पुढून मागून सर्व बाजूंनी शोकाच्या जाळ्यात गुरफटून जातात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**निजध्यास तो सर्व तूटोनि गेला । बळे अंतरी शोक संताप ठेला ।**
**सुखानंद आनंद भेदे बुडाला । मनी निश्चयो सर्व खेदे उडाला ।।६२।।**

समर्थ या श्लोकात वादविवाद करण्याचे तोटे मनाला समजावून सांगत आहेत. आपल्याकडे लहान मुलं सापशिडीचा खेळ खेळतात त्यात शिडीने सोंगटी वर चढते आणि सापाच्या तोंडातून ती खाली येते. तसं सामान्य माणसं थोडीफार भक्ती करुन आपल्या मनाला परमार्थात वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्याना देवाचा ध्यास लागू लागतो न लागतो तोच वितंडवाड करण्याच्या त्यांच्या खुमखुमीमुळे विवादाच्या सापाच्या तोंडातून ते पुन्हा खालच्या म्हणजे नेहमीच्या पातळीवर येतात. कारण त्याना लागलेला देवाचा ध्यास खंडित होतो. बरं, या सज्जनांशी केलेल्या वादविवादात त्याचा नेहमीच पराभव होत असल्यामुळे त्यांच्या मनात बळेच म्हणजे नको असताना हरल्याबद्दल शोक व सज्जनांबद्दल संताप ठिय्या मांडून बसतो. कारण अपेक्षापूर्ती झाली नाही की दुःख करणं आणि ज्याच्यामुळे हा अपेक्षाभंग झाला त्याचा संताप येणं हा सामान्य माणसांच्या मनाचा स्वभावच असतो. मग पुढे याचाच परिणाम म्हणून भेदबुद्धी वाढत जाते. संतांच्या आणि सामान्य माणसांच्यामध्ये दुरावा निर्माण होतो. त्याच्यांविषयी जो आपलेपणा वाटायला पाहिजे व पायरीपायरीने वाढायला पाहिजे तो हळूहळू नष्ट होऊ लागतो. यामुळे त्याच्याविषयीच्या द्वेषाला अधिकधिक धार चढू लागते. म्हणून मग सामान्य माणसं सत्संग किंवा अशा संतांची संगत टाळू लागतात. मग सहाजिकच संतसंगतीपासून मिळणाऱ्या सुखाचा आनंद व त्यातून स्वतःला होणारा आनंद दोन्हीही सत्संगतीच्या अभावाच्या डोहाच्या भोवऱ्यात बुडून जातात. यातून मग फक्त संसारदुःखच शिल्लक रहातं. कारण देवाची भक्ती करण्याचा माणसाने निश्चय अगोदर केलेला असतो. पण हाताला लावलेलं सुगंधी अत्तर जसं काही वेळाने उडून गेलेलं असतं, तसा हा निश्चयही सत्संगतीची साथ नसल्यामुळे कापरासारखा उडून जातो. म्हणून भक्ताने संतांशी कसलाही वितंडवाद न घालता त्याच्याकडून भक्तीची युक्ती समजावून घ्यावी. देवाशी संधान बांधण्यासाठी आपलं अनुसंधान कसं टिकवावं ते शिकून घ्यावं. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'शरण शरण बा हनुमंता । काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ।।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**घरी कामधेनु पुढे ताक मागे । हरीबोध सांडूनी वेवाद लागे ।**
**करी सार चिंतामणी काचखंडे । तया मागता देत आहे उदंडे ।।६३।।**

कामधेनू म्हणजे मालकाच्या सर्व इच्छा पुरवणारी गाय. कामधेनूचं एक सोडा पण साधी दुभती गाय जरी एखाद्या मालकाकडे असली तर त्याच्याकडे दूध, दही, लोणी, तूप व ताक इत्यादि गोष्टींची कमतरता नसते. उलट गरज लागल्यास इतरानांही देण्याइतका या दुधदुभत्याचा पुरवठा त्याच्याकडे सहज असतो. तर मग सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनू जर एखाद्या अडाणी मालकाच्या घरच्या अंगणात बांधलेली असेल व ही तिची पात्रता न ओळखता पाणचट ताकासाठी त्या अडाणी मालकाने जर शेजारच्या चार घरी भीक मागायला सुरवात केली तर त्यात त्याचा मूर्खपणाच जगजाहीर होईल. अगदी तस्साच मूर्खपणा संताच्यासारख्या श्रेष्ठ विभूतींबरोबर वादविवाद करणारी सामान्य माणसं करत असतात. वास्तविक संतांच्या अनुभवाचा फायदा घेऊन हरीबोध म्हणजे ईश्वराची अनुभूती किंवा आत्मज्ञान करून देणारी साधना कशी करावी यांचे धडे त्यांच्या चरणापाशी बसून घेण्याऐवजी जर आपण त्यांच्याशी क्षुल्लक गोष्टीत वितंडवाद करीत बसलो तर अकबराच्या सांगण्यावरुन बिरबलाने केलेल्या महामूर्खांच्या यादीत आपलंच नाव प्रथम क्रमांकावर झळकेल यात शंकाच नाही. तसंच चिंतामणी म्हणजे मालकाच्या सर्व इच्छा पुरवून त्याची चिंता दूर करणारं रत्न. आता सार सर्वस्व असलेलं हे रत्न आपल्याजवळ असताना आपण त्याच्याकडे महत्वाच्या व मौल्यवान् वस्तू किंवा रत्नं न मागता त्याच्याऐवजी जर काचेचे निरुपयोगी तुकडे मागायला सुरवात केली तर आपल्याला ते रत्न असे तुकडे हवे तेवढे भरपूर देऊ शकेल हे खरं. पण असे असंख्य काचेचे तुकडे जरी आपल्याकडे असले तरी आपल्याला हवं ते प्रतिबिंब पाहण्यासाठी त्यांचा उपयोग न होता उलट त्यांच्यामुळे शरीराला जखम होऊन रक्तस्त्राव होण्यापलीकडे आणखी त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. तसं ज्यांचा शेवट दुःखात होणार आहे अशा अनेक लहान-सहान सुखांच्या मागे लागून त्यासाठी हरीबोध म्हणजे ईश्वरप्राप्ती करून देणाऱ्या साधनेचा त्याग करणाऱ्या माणसाविषयी ज्ञानेश्वर माउली म्हणते की 'तैसा हृदयामध्ये मी रामू । असता सर्व सुखांचा आरामू । का भ्रांतासी कामू । विषयांवरी ।।९-६२।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना । अती काम त्या राम चित्ती वसेना ।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा । अती विषयी सर्वदा दैन्यवाणा ।।६४।।**

या श्लोकाच्या चारी ओळींच्या सुरवातीला समर्थांनी 'अती' हा शब्द वापरला आहे. 'अती तेथे माती' किंवा 'अति सर्वत्र वर्जयेत्' अशी आपल्याकडे म्हण व सुभाषित आहेच. "अति" या शब्दाचा अर्थ मर्यादेपलीकडे किंवा क्षमतेपलीकडे असा आहे. मूढ म्हणजे मूर्ख. ज्याला समजत नाही तो मूर्ख आणि आपल्याला समजत नाही हे ज्याला समजत नाही म्हणून काहीही समजावून घ्यावं असा निश्चय ज्याच्या बुद्धीत होत नाही तो अती मूर्ख म्हणजे अती मूढ. अज्ञानी आणि अतिमूढ यात हाच फरक आहे. अज्ञानात ज्ञानाचा अभाव असतो. पण हे अज्ञान दूर व्हावं असा जर त्याच्या बुद्धीचा दृढ निश्चय असेल तर तो श्रवणाने किंवा वाचनाने ज्ञानी होऊ शकतो. पण आपण पूर्ण ज्ञानी आहोत त्यामुळे आपण कोणाचंही ऐकण्याची गरज नाही असं ज्याला वाटतं त्याच्या बाबतीत 'सुधारू शकेना विधाता तयाला' हेच खरं.

काम म्हणजे तीव्र इच्छा किंवा वासना. आपलं शरीर व जीवन चालवण्यासाठी ज्या किमान इच्छा आपल्या मनात निर्माण होतात त्या नैसर्गिक असतात. त्यामुळे त्यात गैर किंवा चूक असं काहीच नाही. पण याच्यापलीकडे जाऊन चैन करण्यासाठी जेव्हा मनात तीव्र इच्छा निर्माण होते व चैनीच्या विषयांसबंधी जेव्हा मनात अति लोभ निर्माण होतो तेव्हा त्यातून विकारांची निर्मिती होऊन मन क्षुब्ध होतं व मग ते क्रोध, मोह, मद, मत्सर, चिंता यांच्या वावटळीत सापडून दाही दिशा भटकत रहातं व विषयातून मिळणाऱ्या सुखासाठी परावलंबी व लाचार बनतं. अशा माणसाचं जीवन नेहमीच दैन्यवाणं बनतं.

अशा विषयांनी व विकारांनी वसती केलेल्या मनात, 'राम' म्हणजे ईश्वराविषयीचं प्रेम, सदाचरणाची ओढ, सद्‌विचारांचं महत्व, वगैरे मौल्यवान गोष्टींचा शिरकाव होत नाही. अशा माणसांच्या जीवनात खऱ्या अर्थानं काही 'राम' उरत नाही. मन क्षुब्ध झाल्यामुळे त्याला आराम मिळत नाही. म्हणून करुणाष्टकांत समर्थ म्हणतात, की 'अचपळ मन माझे नावरे आवरीता । तुजविण शिण होतो धावरे धाव आता ।'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे । अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणे ।**
**धरी रे मना आदरे प्रीति रामी । नको वासना हेमधामी विरामी ॥६५॥**

समर्थ म्हणतात की हे मना, ज्यात भक्ती नाही, ज्यात देवाचं प्रेम नाही, असं दैन्यवाणं कोरडं रखरखीत जीवन तू जगू नकोस. असं जीवन जगणं अती मूर्खपणाचं आहे. जसं सत्तावीस नक्षत्रातून पावसाची नऊ नक्षत्रं उणे केली की सर्वत्र दुष्काळ पडतो व माणसाचं जीवन मरणाकडे वाटचाल करू लागतं, तसं भक्ती उणे केलेल्या या दैन्यवाण्या जिण्यात म्हणजे जीवनात सुखाच्या मागे धावण्याचा फक्त मूर्खपणाच वाढत जातो. पण या धावपळीत शाश्वत सुख तर हातात गवसत नाहीच. उलट दुःख मात्र दुप्पट होतं. तुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे अगोदरच जीवनात 'सुख पाहता जवा पाडे । दुःख पर्वता एवढे' असते. त्यात अती मूर्खपणामुळे ते नेहमीच आकाशाएवढं होऊन बसतं. उदा. गळ्यात मडकं अडकलेल्या गाईची अगोदर मान कापावी व नंतर मडकं फोडावं व त्यात मडकं व गाय दोन्ही गमवावीत तशी सामान्य संसारी माणसांची स्थिती होते. माणूस धन, संपत्ती, सत्ता व संतति याना सुखाची साधनं समजतो. पण यापैकी कोठल्याही गोष्टीच्या प्राप्तीने कायमचं सुख मिळत नाही. तृप्ती, संतोष व समाधान यांचा लाभ होत नाही. ही तृप्ती हा संतोष फक्त रामभक्ती केल्यानेच मिळतो. म्हणून तिसऱ्या ओळीत समर्थ म्हणतात की हे मना, तू फक्त रामावरच आदरयुक्त कृतज्ञतापूर्वक प्रेम कर. आदरयुक्त प्रेम म्हणजेच भक्ती. समर्थांनी इथे आदर हा शब्द मुद्दाम वापरला आहे. माणूस मर्यादित स्वरूपाचा, साडेतीन हात शरीराचा आणि इवल्याशा मुठीत मावेल इतक्या लहान मेंदूचा आणि श्रीराम तर अनंत, सर्वव्यापक आणि पूर्णज्ञानी. माणूस अणूहूनी लहान आणि श्रीराम तर अनंताहूनी महान. तेव्हा लहान माणूस जेव्हा महान श्रीरामाची भक्ती करतो तेव्हा ते आदरयुक्त सन्मानपूर्वक केलेलं प्रेम असतं व मायेच्या पलीकडे असलेले श्रीराम जेव्हा भक्तावर माया करतात तेव्हा ती वात्सल्ययुक्त व कौतुकाने केलेली कृपा असते. म्हणून जिथे रामाची आठवण येणार नाही असं स्थान म्हणजे साक्षात सुवर्णाचा सुप्रासाद जरी असला तरी हे मना, तू त्या ठिकाणी रहाण्याची वासना ठेवू नकोस बरं, असं समर्थ शेवटच्या ओळीत मनाला विनवून सांगतात.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ॥ मना सज्जना ॥



## गुरुवार

**नव्हे सार संसार हा घोर आहे । मना सज्जना सत्य शोधुनि पाहे ।**
**जनी वीष खाता पुढे सौख्य कैचे । करी रे मना ध्यान या राघवाचे ॥६६॥**

समर्थांनी आपला संसारासंबंधीचा दृष्टीकोन या श्लोकात सांगितला आहे. सामान्य संसारी माणसं संसार यशस्वी करण्यासाठी त्यात जास्तीत जास्त वस्तूंचा संग्रह करणं हेच त्यातील यशाचं गमक आहे असं मानतात.या वस्तूंच्या संग्रहासाठी जास्तीत जास्त पैसा भल्याबुऱ्या मार्गाने मिळवत राहतात व त्यासाठी ते अथक कष्ट करतात. पण या मिळवलेल्या-वस्तूतील सुख उपभोगण्यासाठी त्यांच्याकडे वेळच नसतो. एखाद्या गोल फिरणाऱ्या बैलाप्रमाणे ते या संसाराच्या घाण्याला जुंपले जातात. मग पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनं। या न्यायाने त्यांची यातून कधीच सुटका होत नाही. डोळयांना झापडं लावल्याप्रमाणे तीच चाकोरी ते पुनःपुन्हा आंधळेपणाने तुडवीत राहतात. वस्तूतील सुखाच्या आसक्तीमुळे हा संसार कितीही आकर्षक वाटला तरी त्याचा आकर्षकपणा हा जहाल विषाच्या मधुर चवीसारखाच भयानक ठरतो. या संसारात सार असं काहीच नसुन अज्ञानामुळे घोरत पडलेल्या जीवाला तो एक घोरच आहे. हा संसार सुवर्णासारखा चकाकणारा वाटला तरी त्याचं सत्य स्वरुप काय आहे याचा शोध घेतल्यावर त्याचं खरं पितळ उघडं पडतं. नागराजाच्या अंगावरील रंगीबेरंगी ठिपक्यांसारखा हा संसार मोहमय वाटला तरी त्या नागाच्या दंशाप्रमाणेच तो अंती प्राणघातक ठरतो. सुख मिळावं म्हणून संसाराचं वीष आसक्तीच्या रुपात प्राशन केलं तर शेवटी वाट्याला सुखाऐवजी यातना येतात. म्हणून समर्थ म्हणतात, हे सज्जना मना, तू स्वतःच्या जीवनात नुसतं डोकावून पाहिलंस तरी या सत्याचा शोध तुला लागेल की संसारात कायमचं असणारं शाश्वत सुख तुला फक्त रामाच्या ध्यानानेच मिळेल. या संसाराच्या रामरगाड्यातून तू रामाला विसरलास तर नुसताच रगडला जाशील. ऊसाच्या चिपाडाप्रमाणे तुझं जीवन शुष्क, नीरस व रखरखीत बनेल. या संदर्भात महात्मा कबीर म्हणतात की हे रामा, या अशाश्वत जगातील कोठली नश्वर गोष्ट मी तुझ्याकडे मागू ?

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



### शुक्रवार

**घनशाम हा राम लावण्यरूपी । महा धीर गंभीर पूर्ण प्रतापी ।**
**करी संकटी सेवकाचा कुढावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६७।।**

गेल्या श्लोकाच्या शेवटी करी रे मना ध्यान या राघवाचे या ओळीत हे मना, तू राघवाचं ध्यान कर असं समर्थांनी मनाला सांगितल्यावर या श्लोकापासून दहा श्लोकात रामाचं ध्यान कसं करावं ते मनाला समजावून सांगितलं आहे. प्रभातकाल हा जसा दिवसाचा आरंभ असतो तसं कोठल्याही कार्याचा प्रारंभ हा त्याचा प्रभातकाळ असतो. म्हणून प्रभातकाली रामाच्या रूपाचं, त्याच्या गुणांचं चिंतन करावं तर प्रत्येक कार्याच्या प्रारंभी त्याचं स्मरण करावं असं समर्थांना इथे म्हणायचं आहे.

घन म्हणजे मेघ आणि शाम म्हणजे सावळा. आपला हा श्रीराम मेघासारखा सावळा असला तरी त्याचं रूप हे लावण्याचं लेणं आहे. श्रीरामाचं शरीर हे पुरुषाचं असल्यामुळे ते अतिशय प्रमाणबध्द, सुघटित असं आहे. त्याच्या शरीरातच काय पण त्याच्या सावलीतसुध्दा सौष्ठत्व आहे (सावलीतही दिसते सौष्ठत्व) मेघ जसा जगावर सगळीकडे सारखाच वर्षाव करतो तसं श्रीरामाला सगळे सारखेच असतात. त्याच्या ठिकाणी आपपर भाव नसतो. असा हा श्रीराम आजानुबाहू आहे. त्याचा कंठ शंखाकृती आहे. त्याच्या मुद्रेवर हास्य व नयनामध्ये प्रेम, करुणा व आश्वासन आहे. त्याचा उजवा हात हा भक्तांना अभयदान देणारा आहे. तसंच आपला हा राघव अत्यंत धैर्यवान, दृढनिश्चयी, निश्चल बुध्दीचा, कोठल्याही प्रसंगाचं गांभिर्य पूर्णपणे समजावून घेऊन मग त्याप्रमाणे योग्य तो पराक्रम करणारा असा आहे. तो पूर्ण प्रतापवान असा आहे.

तो असा पूर्ण पराक्रमी असल्यामुळेच त्याचा भक्त संकटात सापडल्यास तो त्याच्या संकटाचा पूर्ण नाश करून त्याच्या भक्ताचं पूर्ण रक्षण करतो. त्यामुळे त्याच्या सेवकभक्ताला कसलीही चिंता उरत नाही. त्याने असंख्य राक्षसांचा संहार करुन विश्वामित्रांसकट सर्व ऋषीमुनीना चिंतेतून मुक्त केलं. तसंच त्राटिका नावाच्या बलाढ्य राक्षसीचा वध करून प्रजाजनाना तिच्या तावडीतून सोडवलं. रावणभगिनी शूर्पणखा हिचे नाक कान कापून तिला विरूप केलं. आपल्या पराक्रमाने सर्व देवांना बंदिवान करुन त्यांच्याकडून सेवकांप्रमाणे कामं करून घेणारा रावण. पण कपटी व मायावी अशा राक्षसराज रावणाचाही वध करून रामांनी सर्वांनाच निश्चिंत केलं. अशा रितीने श्रीरामाचं चिंतन आपण प्रतिदिनी प्रभातकाली करावं असं समर्थ सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# || मना सज्जना ||



## शनिवार

**बळे आगळा राम कोदंडधारी । महा काळ विक्राळ तोही थरारी ।**
**पुढे मानवा किंकरा कोण केवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६८।।**

या श्लोकात समर्थांनी श्रीरामाच्या गुणांचं वर्णन केलं आहे. आपला हा श्रीराम धनुर्धारी आहे. ज्या ईश्वराच्या नुसत्या संकल्पाने सृष्टीचा विनाश होऊ शकतो, त्याच ईश्वराने मानवरूपी रामाचा अवतार धारण केल्यानंतर मानवांच्या प्रवृत्तीनुसार त्याला हातात शस्त्र धारण करावं लागलं म्हणून त्याने डाव्या हातात कोदंड म्हणजे धनुष्य धारण केलेलं आहे. त्याने संपूर्ण धनुर्विद्या आत्मसात केल्यामुळे शस्त्रविद्येत व अस्त्रविद्येत तो परिपूर्ण व पारंगत आहे. म्हणून तो अतुल पराक्रमी आहे. या पराक्रमातही त्याचं वेगळेपण उठून दिसतं. त्याचा प्रताप, त्याचं बळ हे फक्त अन्यायाविरुध्दच, दीन लोकाना न्याय मिळवूनदेण्यासाठीच वापरलं जातं. भक्तांवर आलेल्या संकटाच्या निवारणासाठीच त्याच्या पराक्रमाचा उपयोग होतो. स्वतःच्या राज्याच्या सीमा विस्तृत करण्यासाठी त्याच्या पराक्रमाचा कधीही उपयोग केला गेला नाही. उदा. सुग्रीवावर झालेल्या अन्यायाचं परिमार्जन करण्यासाठी श्रीरामाने वालीचा वध केला. पण किष्किंधेचं राज्य मात्र निरपेक्षपणाने त्याचा मुलगा जो अंगद त्याला दिलं. तसंच ऋषीमुनींवर अन्याय करणाऱ्या राक्षसांचा राजा रावण त्याचा श्रीरामाने वध केला. सर्व राक्षसकुळाचा नाश केला पण लंकेचं राज्य मात्र त्याचा भाऊ बिभीषण यालाच दिलं. या बाबतीत त्याला त्या राज्याचा अजिबात मोह झाला नाही. अशा रितीने निरासक्तपणे व निरपेक्षपणे अन्याविरुध्द केलेला प्रचंड पराक्रम हेच या पराक्रमाचं आगळं वेगळं वैशिष्ट्य आहे. विश्वातील सर्वच लहानमोठ्या वस्तूना व प्राण्यांना आपल्या पोटात सामावून घेणारा महा काळ विक्राळ असा मृत्यु हा सुध्दा श्रीरामासमोर थरथर कापत असतो. मग त्याच्यासमोर आपल्यासारख्या सामान्य यःकश्चित माणसाला काय महत्व असणार बरं । त्याच्यासमोर आपला काय पाड लागणार? हे जाणूनच आपण त्याचे किंकर म्हणजे दास होणं हेच योग्य. म्हणून त्याच्या गुणांचं चिंतन आपण प्रतिदिनी प्रभातकाळी करावं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**सुखानंदकारी निवारी भयाते । जनी भक्तिभावे भजावे तयाते ।**
**विवेक तजावा अनाचार हेवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६१।।**

ज्यांची भक्ती करायची ते श्रीराम सुखदायक आणि आनंदकारी असे दोन्हीही आहेत. सुख म्हणजे हवेहवेसे वाटणाऱ्या वस्तूंच्या उपभोगातून निर्माण होणारी अनुकूल संवेदना आणि आनंद म्हणजे परिणामी हितकर असलेल्या गोष्टींच्या प्राप्तीमुळे होणारा लाभ. प्रभूचं मनःपटलावर केलेलं ध्यान हे सुख देतं तर रामभक्तीमुळे होणारी प्रगती ही मनाला आनंद देते. शिवाय श्रीराम हे भक्ताच्या भयाचंही निवारण करतात. माणसाला अगदी जन्मापासून स्वतःच्या मृत्यूचं भय वाटत असतं. तसंच नातेवाईकांचे मृत्यू, रोग,दारिद्र्य, अपकिर्ती, मिळवलेलं कोणीतरी हिरावून नेणं इ. गोष्टींचं भयही वाटत असतं. माणसाला नेहमी भविष्यकाळातील प्रतिकूल गोष्टी किंवा घटना यांचं भय वाटत असतं, कारण भविष्यकाळातील अनिश्चितता त्याला भेडसावित असते. पण रामभक्ताच्या बाबतीत मात्र 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' असं आश्वासन रामप्रभू देतात आणि त्याच्या भयाचा समूळ निरास करतात.

म्हणून रामभक्ताने लोकांमध्ये राहून ह्रदयातील रामाची भक्ती प्रकट करावी आणि लोकांसमोर एक आदर्श ठेवावा. कारण माणसं स्वभावतः भजनशील असतात आणि असे आदर्श रामभक्त समाजात असले की इतर माणसेही हळूहळू सन्मार्गाला लागतात. पण त्यासाठी माणसाला दोन पथ्यं पाळावी लागतात. बुध्दीतील विवेकशक्ती जागृत करुन मनातील मत्सर व वर्तनातील दुराचार टाळावा लागतो. या बाबतीत आपले तुकाराम महाराज म्हणतात,

**'कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'**

तसंच अहंकारातून निर्माण होणारा स्वतःच्या थोड्या फायद्यासाठी आपल्या जीवनात घडणारा दुराचार, दुर्वर्तन हेही कटाक्षाने निपटून काढावं लागतं पण हे परिवर्तन एकदम एका रात्रीत घडत नाही, म्हणून विवेकशक्तीच्या सहाय्याने पायरीपायरीने हळूहळू प्रयत्न करून दुराचार व मत्सर या गोष्टींचा पूर्णपणे निःपात करावा लागतो. यासाठी माणसाने प्रतिदिनी प्रभातकाळी प्रिय रामचंद्रांचं चिंतन करावं असं समर्थ सांगतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## सोमवार

**सदा रामनामे वदा पूर्णकामे । कदा बाधिजेनापदा नित्यनेमे ।**
**मदालस्य तो सर्व सोडोनी द्यावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥७०॥**

या श्लोकात समर्थांनी रामनामाचा महिमा सांगितला आहे. काम म्हणजे इच्छा, वासना. पूर्णकाम म्हणजे ज्याच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत असा. संसारात जेवढं मिळालं आहे, त्यात जो पूर्णपणे तृप्त आहे म्हणून अधिक मिळावं अशी ज्याला इच्छा होत नाही त्याला पूर्णकाम असं म्हणतात. म्हणून पवित्र असं रामनाम सदैव नित्यनेमाने निरपेक्ष व निष्काम भावनेने घेत रहावं म्हणजे संकटांची बाधा होत नाही. जीवनात सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे सदैव रामनाम घेणं अशी ज्याची श्रध्दा असेल त्यालाच नित्यनेमाने रामनाम घेणं शक्य होईल. अशाच रामनामधारकाला संकटं बाधत नाहीत. इथे समर्थांनी संकटं येत नाहीत असं म्हटलं नाही. कारण भक्ताच्या प्रारब्धानुसार त्याच्यावर कमीजास्त प्रमाणात संकटं ही येणारच. पण भक्ताची दृष्टीच बदललेली असल्यामुळे त्याला रामाच्या इच्छेनुसारच जगातील सर्व घटना घडतात असं निश्चितपणे वाटत असतं.म्हणून त्याला संकट हे संकट असं वाटतच नाही. म्हणून ते त्याला बाधत नाही. जसं मांजरीचे दात मांजरीच्या पिल्लाला लागत नाहीत, तसं हा रामभक्त कोठल्याही संकटातून रामकृपेने सहीसलामत निसटून जातो, म्हणजे त्याला संकटं बाधत नाहीत. पण ही स्थिती येण्यासाठी त्याला आणखी दोन पथ्यं पाळावी लागतात. 'जेणे रामनाम मात्रा घ्यावी । तेणे पथ्ये सांभाळावी' ॥ ती म्हणजे आळस आणि गर्व हा सर्वप्रकारे सोडून द्यावा लागतो. कारण आळस सोडून दिल्याशिवाय नित्यनेमाने रामनाम घेता येणार नाही. आणि साधनेमुळे आपल्याला जी उच्च स्थिती प्राप्त होते त्यामुळे आता आपण उच्च श्रेणीचे भक्त झालो आहोत तेव्हा इतर भक्तांनी आता माझ्या आज्ञा पाळल्या पाहिजेत, मला उठसूट सर्वांनी नमस्कार केला पाहिजे, माझी नित्य सेवा केली पाहिजे. अशा तऱ्हेचा गर्व आपण करू नये. तसंच संसारात आपल्याला जे काही मिळालं असेल ते सर्व रामाच्या कृपेमुळेच मिळालेलं आहे हे जाणून त्याबद्दल मनात ताठा बाळगू नये. अशा तऱ्हेचं चिंतन माणसाने प्रतिदिनी प्रभातकाळी करावं असं समर्थ म्हणतात.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**जयाचेनि नामे महादोष जाती । जयाचेनी नामे गती पाविजेती ।**
**जयाचेनि नामे घडे पुण्यठेवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७१।।**

या श्लोकात समर्थ आमच्या मनाला रामनामांचं महात्म्य पटवून देत आहेत. ते म्हणतात रामनामाने माणसाच्या मनातले मोठेमोठे दोष निघून जातात. त्याने केलेल्या पापांचे पर्वतसुध्दा भस्मसात होऊन जातात. रामनामाने काम, क्रोध, मोह, मद, लोभ, मत्सर, भय, चिंता इ. विकार नामशेष होऊन जातात. रामनामाने
चित्तशुध्दी होते. 'चित्त शुध्द तरी शत्रु मित्र होती.' असं तुकाराम महाराज म्हणतात. कारण भगवंताच्या विस्मरणानेच मी, माझेपणाच्या वाढीतून हे सर्व दोष आपल्या मनात ठाण मांडून बसलेले असतात.रामनामाचा  दुसरा फायदा हा की त्यामुळे माणसाला सातत्याने साधना करावीशी वाटते आणि त्यामुळे त्याच्या साधनेत प्रगती होऊ लागते व आपल्या उध्दाराचा मार्ग स्पष्ट दिसू लागतो. त्या मार्गाने वाटचाल करण्याची आवड निर्माण होते. त्यासाठी आवश्यक ती शक्तीही प्राप्त होते. आता मोक्षाच्या दिशेने भक्ताच्या साधनेला गती प्राप्त होते. म्हणून समर्थानी 'गती पाविजेती' असा शब्द वापरला आहे. नित्य नामस्मरणाचा तिसरा फायदा म्हणजे त्याने पुण्य मिळतं. ते वाढून त्याचा ठेवा होतो आणि तो प्रतिदिनी वाढत जातो. कारण एरवी दुसऱ्यावर उपकार केला तरच पुण्यप्राप्ती होणार व त्याचा फायदा जे सुख, ते भविष्यात केव्हा तरी मिळणार. पण नामस्मरणाने ते सुख बसल्या बसल्या तत्काळ मिळतं व दिसामासानी ते वाढत जातं. 'दिन दिन बढत सवाई' असं भक्त मीराबाई म्हणतात. याला उत्कृष्ट उदाहरण म्हणजे वाल्या कोळयाचं. प्रत्येक मनुष्याच्या वधासाठी एक खडा अशा हिशेबाने सात रांजण खड्यानी भरले असता पश्चात्तापदग्ध मनाने वाल्या कोळयाने रात्रंदिवस रामनाम घेतल्यामुळे त्याच्याभोवती वारूळ (वल्मीक) तयार झालं. म्हणून नंतर तो वाल्मिकी ऋषी म्हणून प्रसिध्द झाला. आणि हे वाल्मिकी नंतर आदिरामायणकार म्हणून पुढील पिढ्यात लोकप्रिय झाले. अशा तऱ्हेने नित्य रामनामस्मरणानेचं वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाला. अशा त्या रामाचं चिंतन प्रतिदिनी प्रभातकाली करावं असं समर्थ सांगतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**न वेचे कदा ग्रंथिचे अर्थ काही । मुखे नाम उच्चारता कष्ट नाही ।**
**महाघोर संसार शत्रु जिणावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥७२॥**

जगाच्या व्यवहारातला एक अलिखित नियम आहे की काहीतरी मिळवण्यासाठी त्याचं मूल्य माणसाला द्यावं लागतं. मग ते पैशाच्या रूपात असो नाहीतर कष्टाच्या रूपात असो किंवा वेळाच्या रूपात असो किंवा प्रेमाच्या रूपात असो. अगदी रोजचं उदाहरण घेऊ या. दहावीच्या विद्यार्थ्याला जर परिक्षेत उत्तम रितीने उत्तीर्ण व्हायचं असेल तर शाळेची माफक फी त्याच्या पालकाना भरावी लागेल. शिवाय रोज याव्यतिरिक्त ठराविक जादा वेळ त्याला अभ्यास करावा लागेल म्हणजे जवळजवळ दिवसाचा सर्वच वेळ त्याला अभ्यासात घालवावा लागेल. एवढ्याने जमलं नाही तर रात्रीची जागरणं करुनसुध्दा त्याला जादा अभ्यास करावा लागेल. यामुळे घरच्या लोकांचं टी.व्ही. बघणं बंद होईल व त्याच्या खाण्यापिण्याच्या सर्व वेळा त्याच्या आईला सांभाळाव्या लागतील. इतकं करून त्याच्या निकालाचा निर्णय संगणकाच्या हाती राहील. पण रामनाम ही एकच गोष्ट अशी आहे की ती घेण्यासाठी गाठीचा पैसा खर्च करावा लागत नाही. पूर्वी माणसं धोतराला गाठ मारून त्यात पैसा ठेवीत असंत म्हणून त्यातून गाठीचा पैसा हा वाक्प्रचार आला असावा. तसंच मुखाने फुकाचं रामनाम घेण्यात काहीच कष्ट पडत नाहीत.

हे मधुर रामनाम आपण फावल्या वेळात सतत घेत राहिलो तर या महाभयंकर अशा संसाररूपी शत्रूलाही आपल्याला सहज जिंकता येतं. कारण हाच संसार आपल्याला चांगल्या वाईट गोष्टी करायला लावून त्यातून पापपुण्याची निर्मिती करून ती भोगण्यासाठी जन्ममरणाचं चक्र आपल्यामागे लावतो पण रामनामाने चित्तशुध्दी होते. त्यामुळे आपण कर्म करतो हा आपला अहंकार दूर होतो. त्यामुळे पापपुण्य व सुखदुःखं याची निर्मितीच होत नाही, मग आपलं चित्त रामाने व रामनामाने पूर्ण भरुन जातं व त्यामुळे हा संसार रामरूपच होऊन जातो. याकरता रामाचं चिंतन प्रतिदिनी प्रभातकाळी आवडीने करावं असं समर्थ सांगतात.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**देहेदंडणेचे महादुःख आहे । महादुःख ते नाम घेता न राहे ।**
**सदाशीव चिंतितसे देवदेवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७३।।**

माणसाच्या शरीराचं एक वैशिष्ट्य असं आहे की त्याला आपल्या शरीराला कष्ट देणं पसंत पडत नाही. पण त्याचबरोबर खाल्लेल्या अन्नाचं पचन होण्यासाठी त्याला शरीराची हालचाल ही करावीच लागते.

यातूनच व्यायामपध्दतीचा जन्म झाला. त्यामुळे योग्य तेवढी हालचाल होऊ लागली. पण अनेक वेळा काही अपरिहार्य कारणामुळे माणसाला जीवापाड कष्ट करावे लागतात. शरीराकडून खूप श्रम करवून घ्यावे लागतात. देहाला खूप त्रास द्यावा लागतो. यातूनच मग शारिरीक वेदनांचं महादुःख माणसाच्या पुढे उभं रहातं. याशिवाय निरनिराळया रोगांमुळे शारिरीक वेदना प्रचंड प्रमाणात भोगाव्या लागतात त्या वेगळयाच. अनेक वेळा रोगांपेक्षा त्यावरच्या औषधांमुळेसुध्दा खूप वेदना सहन कराव्या लागतात. उदा. कॅन्सरच्या वेदना बऱ्या होण्यासाठी केमोथेरपीच्या औषधांच्या वेदना सहन कराव्या लागतात. त्यामुळे माणसाच्या स्वभावावर विपरीत परिणाम होतो. तो चिडचिडा बनतो. पण सतत नाम घेणाऱ्या भक्ताना मात्र या वेदनांचा अजिबात त्रास होत नाही.कारण योगशास्त्रातला एक असा नियम आहे की विषयाचं ज्ञान होण्यासाठी विषयावर चित्ताची पूर्ण एकाग्रता व्हावी लागते तरच त्याला विषयाचं ज्ञान पूर्णपणे होतं. एरवी नाही. आणि चित्त हे एका वेळी एकाच ठिकाणी एकाग्र होऊ शकतं. पण भक्ताच्या बाबतीत त्याचं चित्त नामावर इतकं एकाग्र झालेलं असतं की त्याला या वेदनांची जाणीवच होत नाही. शिवाय ही जाणीव नष्ट होण्यासाठी त्याला फक्त नाम व चित्ताची एकाग्रता याच दोन गोष्टींची गरज असते, ज्या त्याच्याकडे नेहमीच उपलब्ध असतात. उदा. समुद्रमंथनाच्या वेळी निर्माण झालेलं हलाहल विष पचविण्याची कोणाचीच प्राज्ञा नव्हती. म्हणून ते महाभयंकर विष भगवान शंकरानी जगताच्या कल्याणासाठी प्राशन केलं. त्याच्या प्रभावामुळे त्यांच्या शरीराचा दाह होऊ लागला व कंठ काळानिळा झाला. हा दाह कमी व्हावा म्हणून त्यानी हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावर वस्ती केली. मस्तकावर शीतळ चंद्र धारण केला. थंडगार असे नाग गळयाभोवती गुंडाळले, पण दाह काही कमी होईना. शेवटी रामनाम सुरू केल्यावर त्यांचा दाह शमला. मग त्यानी अखंड रामनामाचं चिंतन केलं. अशा रामाचं चिंतन प्रभातकाळी करावं असं समर्थ म्हणतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# || मना सज्जना ||



## शुक्रवार

**बहूतापरी संकटे साधनाची । व्रते दान उद्यापने ते धनाची ।**
**दिनाचा दयाळू मनी आठवावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७४।।**

आपल्याकडे ईश्वरप्राप्तीसाठी अनेक प्रकारच्या साधना आपल्या ग्रंथातून सांगितल्या आहेत. त्यामध्ये सामुदायिक रितीने करण्यासाठी अनेक प्रकारच्या देवतांच्या कष्टदायक उपासना आहेत. वाममार्गी शाक्तांच्या, कापालिकांच्या महाभयंकर दुराचारी उपासना आहेत व त्या करणारे अनेक संप्रदाय आहेत व या संप्रदायात अशा उपासनांचं आकर्षण असणारे साधकही आहेत. अशा उपासनांमध्ये तंत्राचा काटेकोरपणा फार, विधिनिषेधाचे नियम कडक, तसंच शरीराला कष्ट देणारे व मनावर ताण निर्माण करणारे प्रसंग फार आणि जराशी चूक होताच सर्वनाश होण्याचं भय निश्चित. काही क्षुद्र सिध्दींच्या लाभाना भुलल्यामुळे अशा उपासनांच्या मागे लागून स्वतःचं अपरिमित नुकसान करून घेणारे उपासक आपल्याला अनेक वेळा भेटतात.हातापायांना कापरं भरणं, शरीराला वेदना होणं, प्रसंगी वेड लागणं व परमार्थाऐवजी स्वैर दुर्वर्तनाने जीवन व्यापलं जाणं अशा प्रकारचे कितीतरी धोके या उपासना करणाऱ्यांना भोगावे लागतात व खरा फायदा बाजूलाच रहातो. तसंच नाना प्रकारची व्रतं, त्यांची उद्यापनं, दानधर्म ही हातात पैसे असल्याशिवाय शक्य होत नाहीत. कारण या व्रतात आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी जमवणं हे फार कष्टाचं काम आहे आणि ते फार महागातही पडतं. एकतर यात आवश्यक ब्राम्हणही पोटभरू आणि धंदेवाईकच असतात. त्यांचं लक्ष व्रत पार पडण्यापेक्षा मिळणाऱ्या दक्षिणेवरच असतं व यजमानालाही आपण धार्मिक आहोत एवढाच लौकिक हवा असतो. म्हणून समर्थ म्हणतात की इतकं सगळं करण्यापेक्षा सरळ दीनांचा कैवारी जो दयाळू श्रीराम त्याचंच स्मरण आपण सदैव करावं, इथे दीन या शब्दाचा अर्थ दुबळा असा नसूनज्यानं आपलं सर्वस्व श्रीरामाला अर्पण केलं आहे असा, रामाचा भक्त असा आहे तर अशा रामाचं चिंतन आपण प्रत्येक सुप्रभाती करावं असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**समस्तामधे सार साचार आहे । कळेना तरी सर्व शोधून पाहे ।**
**जिवा संशयो वाउगा तो तजावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७५।।**

सामान्य माणसाला नेहमीच असं वाटतं की या जगात सर्वात महत्वाची गोष्ट कोणती असेल तर तो स्वतः. तो या जगात नसेल तर या समस्त विश्वाला काहीच किंमत नाही, काहीच अर्थ नाही, तो आहे म्हणून त्याच्याकरता जग आहे नाहीतर 'अपने पीछे डुब गयी दुनिया'. पण थोडा विचार केला की ही
त्याची समजूत चुकीची आहे असं त्याच्या लक्षात येतं. कारण तो जन्माला येण्यापूर्वी हे जग होतंच आणि त्याच्या मृत्युनंतरही जणू काहीच घडलं नाही अशा थाटात हे जग पुढे चालूच रहातं. किती एक ते जन्मले आणि मेले. मग त्याच्यापुढे प्रश्न असा उभा रहातो की जर मी नसेन तर या विश्वात सार म्हणजे महत्वाचं असं काय आहे. या त्याच्या प्रश्नाला समर्थांनी या श्लोकात उत्तर दिलं आहे की त्यालाच काय पण या सर्व विश्वाला निर्माण करणारा जो परमेश्वर त्याचं स्मरण, मनन, चिंतन हेच सर्वात महत्वाचं आहे. तसंच ते साचार म्हणजे आचरणासहित असलं पाहिजे. म्हणजे हा परमेश्वर सर्वाभूती विराजमान झाला आहे हे लक्षात ठेवून त्याप्रमाणे आपलं सर्वांशी प्रेमाने आचरण असलं पाहिजे. विश्वातील परमेश्वर अव्यक्त असल्यामुळे आपल्याला कळला नाही तर तो सर्वात शोधून पाहिला पाहिजे. म्हणजे आपल्याला समजतं की सजीवांचा जिवंतपणा हेच ईश्वराचं अस्तित्व आहे. तसंच निर्जीवात इलेक्ट्रॉन्सचं अणूकेंद्राभोवती (न्युक्लिअस)
$१०^{-८}$ सेमी. इतक्या अरुंद जागेत $१०^{८}$ सेमी. प्रति सेकंद इतक्या प्रचंड वेगाने फिरणं हे ईश्वरी शक्तीमुळेच शक्य होतं. आता हे आपल्याला दिसत नाही म्हणून ते खरं कशावरुन असेल असा आपल्याला संशय आला तरी हे विज्ञानाने सिध्द केलेलं असल्यामुळेच आपला संशय खोटा आहे हे समजून जीवाने त्याचा त्याग करावा हेच योग्य आहे. व अशा अनंत ईश्वराचं मुखाने नामस्मरण, मनाने मनन व बुध्दीने चिंतन करावं आणि त्याप्रमाणे आपलं आचरण असावं व त्याकरता माणसाने प्रभातकाळी प्रतिदिनी रामाचं व त्याच्या गुणांचं चिंतन करावं असं समर्थ आपल्या मनाला विनवून सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**नव्हे कर्म ना धर्म ना योग काही । नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही ।**
**म्हणे दास विश्वास नामी धरावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७६।।**

'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' ही शेवटची ओळ असलेल्या मालिकेतील हा शेवटचा श्लोक आहे. अत्यंत मधुर आणि साधकाला विश्वास व दिलासा देणारी ही मालिका आहे. सामान्य माणूस जेव्हा काही ना काही कारणाने भक्तीमार्गाकडे वळतो तेव्हा 'उथळ पाण्याला खळखळाट फार' या न्यायाने त्याला काय करू आणि काय नको असं होतं. त्यामुळे सगळं अर्धवट होतं व त्याच्या हाताला काही लागत नाही अशी त्याची अवस्था होते. कारण पी हळद आणि हो गोरी अशी त्याची अपेक्षा असते. सकाळी पाच मिनिटं व संध्याकाळी पाच मिनिटं एवढी प्रचंड साधना केल्यावर जाता येता रामाने त्याला दर्शन देऊन हात जोडून काय आज्ञा आहे असं विचारावं आणि त्याच्या सर्व इच्छा तत्काळ पुरवाव्या असंही त्याला वाटतं. त्याचा हा भ्रमाचा भोपळा फुटण्यासाठी समर्थांनी हा श्लोक लिहीला आहे. तेव्हा ते म्हणतात हे मना, सकाम भावनेने पुराणात सांगितलेलं कर्मकांड आचरणात आणून ईश्वरप्राप्ती होणार नाही. कारण त्यात ईश्वराच्या प्राप्तीपक्षा आपली इच्छा पुरी होणं हे महत्वाचं असतं. तसंच आपल्या कुळातील कुळधर्म कुळाचार पाळूनही ती होणार नाही. तसंच योगाभ्यास म्हणजे यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार वगैरेचं पालन करुनही तो मिळणार नाही. कारण या अतिशय कष्टाच्या गोष्टी असल्यामुळे सामान्य माणसाच्या हातून त्या पुऱ्याच होऊ शकत नाहीत. शिवाय या संसाराचा भोग घेऊन किंवा त्याचा त्याग करूनही ईश्वर मिळणार नाही. कारण संसाराचा भोग घेतला तर त्यातून आसक्ती व त्यातून निरनिराळे विकार निर्माण होतात व ईश्वर लांबच जातो व त्याचा त्याग केला तर त्यातून तो मनापासून केलेला नसल्यामुळे त्यातून फक्त दुःखाचीच प्राप्ती होते व त्यातून पुन्हा विकारच निर्माण होतात. हे सर्व यथासांग पार पडले तर त्याचा उपयोग. म्हणून हे सर्व करण्यापेक्षा रामनामावर आपण दृढ व नितांत विश्वास ठेवावा हे सर्वात उत्तम. त्यानेच आपल्याला रामाची प्राप्ती होईल. आपण अखंड रामनाम मुखाने किंवा मनात घेतलं तर आपण एक दिवस त्याच्याशी एकरूप होऊन जाऊ. ज्ञानेश्वर महाराज हेच म्हणतात.

**'एक तत्व नाम दृढ धरी मना । हरिसी करुणा येईल तुझी ।'**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**करी काम निःकाम या राघवाचे । करी रूप स्वरूप सर्वा जिवांचे ।**
**करी छंद निर्द्वंद्व हे गुण गाता । हरिकीर्तनी वृत्तिविश्वास होता ।।७७।।**

माणसाच्या मनाचं एक वैशिष्ट्य आहे की ते कधीच मोकळं राहू शकत नाही.त्यात शब्द,विचार, इच्छा, वासना,विकार हे अगदी तिकीटाच्या रांगेत उभ्या असलेल्या माणसांप्रमाणे पाठीला पाठ लावून उभे असतात. त्यामुळे माणसाचं मन हे कधीच निर्विचार व निरिच्छ अवस्थेत राहू शकत नाही. पण ते तसं झाल्याशिवाय पुढची प्रगति साधत नाही. यासाठी या श्लोकात समर्थांनी चांगला उपाय सुचवला आहे. ते म्हणतात की राघवाच्या प्राप्तीची इच्छा सदैव मनात बाळगली तर ती इतर इच्छांना डच्चू देऊ शकते. म्हणून माणसाने आपण रामाची प्राप्ती कशी होईल याचाच सदैव ध्यास घ्यावा म्हणजे इतर सांसारिक इच्छा त्याच्या मनात फिरकणारच नाहीत. जसं एखाद्या बाईचं एकुलतं एक लहान मूल जत्रेत हरवलं की तिची स्थिती इतकी केविलवाणी होते की सांगता सोय नाही. त्या मुलाचा चेहरा तिच्या डोळ्यासमोरुन हलता हलत नाही. वास्तविक जत्रेतील सर्व आकर्षणं तिच्या समोर जशीच्या तशी उभी असतात. पण ती तिला मोह घालू शकत नाहीत. याक्षणी तिला हवा असतो फक्त तिला आराम देणारा तिचा लाडका श्रीराम. किंवा तिला आनंद देणारा तिचा नंदन. तसंच त्याच्या रुपाचा त्याला ध्यास लागला की कालांतराने त्याला ते राघवाचं रूपच सर्व जीवांच्या अंतःकरणात दिसू लागतं. याला विश्वरूपदर्शन म्हणतात. तसंच त्याला भगवंताच्या गुणगायनाचा एकदा छंद लागला की मग त्याचं मन हे कोठल्याही द्वंद्वात अडकत नाही. शीत-उष्ण, सुख-दुःख, मान-अपमान, निंदा-स्तुती यापैकी कोणतंही द्वंद्व त्याला बाधा करत नाही. कारण त्याला आपल्या देहाचा व परिस्थितीचा विसर पडतो व जीवनातील प्रत्येक क्षणी व विश्वातील प्रत्येक ठिकाणी त्याला प्रत्येक घटनेमध्ये भगवंताची लीला, त्याचा आनंद व त्याची परमशांती व चैतन्यशक्तीच जाणवू लागते. हरीच्या गुणसंकीर्तनाच्या शक्तीवर त्याचा विश्वास असला तरच हे सर्व शक्य होतं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



मंगळवार

**अहो ज्या नरा रामविश्वास नाही । तया पामरा बाधिजे सर्व काही ।**
**महाराज तो स्वामि केवल्यदाता । वृथा वाहणे देह संसार चिंता ।।७८।।**

रामभक्ताच्या दृष्टीने या जगात माणसांचे दोनच वर्ग होतात. एक ईश्वरावर ज्याचा विश्वास किंवा श्रद्धा आहे असे सश्रद्ध आस्तिक व दुसरे, ज्यांचा ईश्वरावर अजिबात विश्वास नाही, इतकंच काय पण या जगात देवाचं अस्तित्वच नाही, देव वगैरे सर्व झूट आहे, मग तो प्रसन्न होण्याची गोष्टच लांब राहिली अशी ज्याना खात्री आहे असे नास्तिक. नास्तिक हा शब्द 'न अस्ति' यावरुन आला आहे. न अस्ति म्हणजे नाही. म्हणून ईश्वराचं अस्तित्व न मानणाऱ्या माणसाला नास्तिक म्हणतात. समर्थांनी त्याच्यासाठी पामर असा शब्द वापरला आहे. पामर म्हणजे नगण्य, अतिक्षुद्र, ज्याची कीव करावी असा माणूस. हा माणूस ईश्वराचं अस्तित्व नाकारतो. पण स्वतःचं अस्तित्व त्याला नाकारता येत नाही. त्यामुळे त्याचा अहंकार जागृत होतो. मग स्वतःची बुद्धी वापरून तो ज्या काही वस्तूंवर आपली मालकी प्रस्थापित करतो, त्या वस्तूंविषयी त्याला ममत्व वाटू लागतं. या ममत्वामुळे त्याचा मूळचा अहंकार जास्तच वाढू लागतो व बळकट होऊ लागतो. त्यातून मग काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता, शोक या विकारांची त्याला बाधा होऊ लागते. यांच्याच जोडीला वित्तेषणा, कामेषणा, दारेषणा, लोकेषणा इ. वारानांचा धुमाकूळ त्याच्या मनात चालू होतो. या सर्वच गोष्टींची बाधा त्याला होऊ लागते. या सर्व बाधांमुळे तो पुनःपुन्हा जन्ममरणाच्या रहाटगाडग्यात खालीवर, वरखाली असा फिरत रहातो. त्यातून त्याची सुटका होऊ शकत नाही. पण जर त्याच्या हे लक्षात आलं की श्रीराम हा सर्व शक्तीमान असल्यामुळे आपल्याला तो मुक्ती देऊ शकतो, व आपली यातून सुटका करू शकतो, तसंच तो सर्वव्यापक असल्यामुळे सगळ्याच वस्तूंचे गुणधर्म त्यानेच धारण केलेले आहेत व ते त्याच्या संकल्पानेच प्रकट होत असतात, म्हणून आपण आपल्या शरीराची, संसार कसा चालेल याची चिंता करणं व्यर्थ आहे, हे जर त्याला समजलं की तो मुक्तीच्या मार्गाला लागतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।




## बुधवार

**मना पावना भावना राघवाची । धरी अंतरी सोडि चिंता भवाची ।**
**भवाची जिवा मानवा भूली ठेली । नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली ।।७९।।**

समर्थ मनाला सांगत आहेत हे मना, या जीवन पवित्र करणाऱ्या श्रीरामाची पावन भावना तू सदैव अंतरात बाळग. सदैव त्याचाच ध्यास तुला लागू दे. त्याचंच ध्यान तुझ्या अंतःकरणात नेहमी वसू दे. त्याचंच नाम तुझ्या ओठावर असू दे. त्याचं पावन चरित्र तुझ्या कानावर पडू दे. त्याच्या समचरणांवर तुझं मस्तक विसावू दे. त्याच्याच गुणकीर्तीचं संकीर्तन तुझ्या मुखातून स्त्रवू दे. त्याच्याच कृपेचा, दयेचा, करुणेचा सुगंध तुझ्या नासिकेत व आसमंतात दरवळू दे. आपल्या भक्ताना मुक्ती देण्याच्या त्याच्या कार्यात तुझा सक्रीय हातभार लागू दे. त्याच्याशी एकरूप होण्याची तुला तीव्रतम तळमळ लागू दे. एवढं केलंस की मग या संसाराची चिंता तुला करावी लागणार नाही.यातील वासनांच्या सर्पांचे फूत्कार तुला सहन करावे लागणार नाहीत. तसंच अपेक्षाभंगातून येणाऱ्या मानसिक दुःखांची झळ तुला लागणार नाही. तसंच त्यातून निर्माण होणाऱ्या क्रोधाच्या ज्वाला तुला भाजून करपवून टाकणार नाहीत. शिवाय मृत्यूमुळे होणाऱ्या दुःखरुपी नागाचं जहाल विष तुला पचवावं लागणार नाही. तसंच गर्व, लोभ, मत्सर इ. विंचू तुला दंश करणार नाहीत. एकूण काय संसारातील कोणत्याही लहान मोठ्या चिंतेचा तुला स्पर्शही होणार नाही. कोठलीही काळजी तुझ्या जवळपास सुध्दा फिरकणार नाही. तुझी संसाराची चिंता जशी जशी सुटत जाईल तसं तसं तू ईश्वरभावनेत जास्तीत जास्त रमून जाशील व जसजसा तुझा ध्यास तीव्र होईल तशा तुझ्या चिंता नाहिशा होतील. कारण हा संसार म्हणजे ईश्वराची माया आहे. या मायेला आपण जितकी माया लावू तितके आपण या भूलभुलैय्यात जास्त जास्त गुरफटत जाऊ. चवथ्या ओळीचे दोन अर्थ होऊ शकतात. 'नसे वस्तूची' म्हणजे नसलेल्या वस्तूची आपल्याला ओढ लागली तर ती व्यर्थच जाणार. मृगजळ आपली कधीही तहान भागवू शकणार नाही. हा एक अर्थ. तर दुसरा, वस्तू म्हणजे ईश्वर किंवा ब्रम्ह. या ईश्वरावर जर आपली धारणा किंवा एकाग्रता केली तर ती केव्हाही व कधीही व्यर्थ जात नाही. ती आपलं काम करतेच करते व जीवाला शिवाशी एकरूप करून टाकते. म्हणून हे मना, तू राघवाची पावन करणारी भावना अंतःकरणात धारण कर असं समर्थ मनाला कळवळून सांगत आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**धरा श्रीवरा त्या हरा-अंतराते । तरा दुस्तरा त्या परा सागराते ।**
**सरा वीसरा त्या भरा दुर्भराते । करा नीकरा त्या खरा मत्सराते ।।८०।।**

गेल्या श्लोकातील उपदेशाचाच या श्लोकात समर्थांनी थोडा विस्तार केला आहे. ते म्हणतात की हर म्हणजे भगवान शंकरांनी आपल्या अंतरात म्हणजे अंतःकरणात ज्या श्रीवराला म्हणजे लक्ष्मीपतीला म्हणजेच भगवंताला अक्षय स्थान दिलं आहे त्या ईश्वराला तुम्ही तुमच्या हृदयात धरून ठेवा. प्रेमाच्या बंधनाने त्याला बांधून ठेवा. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात,'धरिला पंढरीचा चोर । प्रेमे बांधुनिया दोर ।।' जसं यशोदेनं सर्वशक्तीमान, विश्वव्यापक ईश्वराला म्हणजे तिच्या खोडकर कान्ह्याला दोराने उखळाला घट्ट बांधून ठेवलं होतं तसं तुम्ही त्या श्रीरामाला आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात पकडून ठेवा. तुकाराम महाराज पुढे म्हणतात, 'हृदय बंदीखाना केला । आत विठ्ठल कोंडिला ।' यामुळेच अतिविशाल असा जो भवसागर जो एरवी तरून जाण्यासाठी अत्यंत कठीण, दुस्तर, फार क्लेशकारक असा असतो तो तुम्ही सहज तरून जाल. या संबंधात श्रीशंकराचार्य म्हणतात, सामान्य प्रापंचिक माणसाला अत्यंत खोल वाटणारा हा भवसागर माझ्या भक्तांसाठी फक्त कमरेइतका खोल आहे, असं सुचवण्यासाठीच जणू काही त्या विठ्ठलाने आपले हात कमरेवर ठेवले आहेत. तर या बाबत आपली माऊली म्हणते की एरवी कोणत्याही साधनानी तरून जाण्यास दुस्तर असलेली ही मायानदी माझ्या भक्तांसाठी ऐलथडीलाच आटून जाते. त्यामुळे तिच्यातून तरून जाणं हे आता कष्टाचं, धोक्याचं व जिकीरीचं असं उरतच नाही तर ते नदीच्या कोरड्या पात्रातून चालत जाण्याइतकं सोपं होतं.

ज्याची तृप्ती करणं दुर्घट आहे, पूर्तता करणं अशक्य आहे अशा पोटाची चिंता करु नका. याची पूर्ण तृप्ती करण्यात तुम्हाला कधीच यश येणार नाही. त्याला जरुरीपुरतंच अन्न द्या. इथे महात्मा कबीर म्हणतात की 'कबीर छूधा (क्षुधा) कुकडी (कुत्री) करत भजनमो भंग । उनको टुकडा डालिये भजन करो निस्संग ।।' भुकेच्या कुत्रीला एक हाडाचा तुकडा द्या आणि मग निवांतपणे भजन करा. वस्तुच्या मालकीच्या इच्छेच्या पूर्तीच्या अगोदर ज्याच्याकडे ती वस्तू आहे तिच्याविषयी तुम्हाला मत्सर वाटू लागतो, हा शुद्ध गाढवपणा आहे. म्हणून या मत्सरभावनेचा तुम्ही निकराने प्रयत्न करून निश्चयाने संपूर्ण नाश केला पाहिजे. मगच त्या भगवंताला हृदयात साठवता येईल. आपले तुकाराम महाराज म्हणतात,

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार


**मना मत्सरे नाम सांडू नको हो । अति आदरे हा निजध्यास राहो ।**
**समस्तांमध्ये नाम हे सार आहे । दुजी तूळणा तूळीताही न साहे ।।८१।।**

गेल्या श्लोकातील मत्सराचा धागा पकडूनच समर्थांनी मनाला या श्लोकात पुढे उपदेश केला आहे. ते म्हणतात हे मना, मत्सराचा परिणाम नामस्मरण सोडून देण्यात होऊ देऊ नकोस. उलट अत्यंत आदराने तुला नामाचा ध्यास लागू दे. एखादी मौल्यवान वस्तू दुसऱ्याकडे असली की ती आपल्याला हवीहवीशी वाटते व ती त्याच्याकडे आहे पण आपल्याकडे नाही याबद्दल त्याचा मत्सर वाटू लागतो. बरं, प्रयत्न करूनही ती वस्तू आपल्याला मिळाली नाही की आधीच असलेला मत्सर जास्तच वाढू लागतो. याचा परिणाम असा होतो की त्या वस्तूचेच विचार आपण नामस्मरण करू लागलो तरी येऊ लागतात व नाम घेणं बाजूलाच रहातं. याचं कारण असं की त्यावेळी आपल्याला नामापेक्षा त्या वस्तूच्या मालकीचं महत्व जास्त वाटत असतं व नाम घेणं पुढे ढकललं तरी चालेल असं वाटतं. पण जर आपल्याला नामस्मरणाचा प्रेमपूर्वक ध्यासच लागला असेल तर मात्र आपण मुळात मत्सरच निर्माण होऊ देणार नाही. कारण कोठल्याही वस्तूच्या मालकीपेक्षा आपल्याला परमेश्वर प्राप्ती ही सर्वात जास्त महत्वाची वाटेल. म्हणून काय वाटेल ते झालं तरी आपण नामस्मरण कधीही सोडणार नाही. सर्व साधनांमध्ये नाम हेच सारभूत आहे. याचं कारण असं आहे, इतर साधनांसाठी बाह्य सामग्रीची गरज लागते. उदा. देवपूजा करायची असेल तर देव्हारा, समई, तूप, वात, सहाण, चंदनाचं खोड, गंध, वस्त्र, फुलं, तुळशी, बेल, पाणी इ. अनेक गोष्टींची गरज लागते. यातली एखादी वस्तू जरी नसली तरी माणसाला पूजा केल्याचं समाधान मिळत नाही. ध्यान करायचं असलं तरी मूर्तीची गरज लागते किंवा भजन करायचं असलं तरी टाळ-चिपळ्यांची, एकतारीची गरज लागते.अगदी नुसता नमस्कार करायचा असला तरी संतांच्या, गुरूच्या किंवा मोठ्या माणसांच्या चरणांची गरज लागते. फक्त नामात 'मनाला' उलटं केलं जातं म्हणजे बाह्य विषयांची ओढ थांबवून त्याला अंतर्मुख करून नामावर एकाग्र केलं जातं. म्हणून या नामाची कशाशीही तुलना होऊ शकत नाही. झालीच तर स्वतःशीच होऊ शकते.
'राम रावणयोर्युध्दं रामरावणयोरिव' राम-रावण युध्द कसं झालं तर अगदी रामरावणाच्या युध्दासारखंच झालं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार


**बहु नाम या रामनामी तुळेना । अभाग्या नरा पामरा हे कळेना ।**
**विषा औषध घेतले पार्वतीशे । जिवा मानवा किंकरा कोण पूसे ।।८२।।**

अनंत अशा ईश्वराची अनेक नामं आहेत. त्यातलं श्रीराम, राम, श्रीकृष्ण, वासुदेव, शिव, शंकर, जगदंबा, कालीमाता, गणपति, गजानन, विठ्ठल, विठोबा, पांडुरंग इ. नामं सर्वांनाच माहीत असतात. पण देवतांचे उपासक आपापल्या देवतेचं नाम मोठ्या श्रद्धेने घेत असतात. प्रत्येक भक्ताला आपल्या देवतेचं नावच सर्वात श्रेष्ठ आहे असं प्रामाणिकपणे वाटत असतं आणि त्याची श्रद्धा वाढवण्याच्या दृष्टीने ते बरोबरच आहे. आता समर्थ हे रामभक्त. प्रभू रामचंद्र हे त्यांचं आराध्यदैवत. भगवान रामचंद्रांविषयी त्यांच्या हृदयात अनन्यनिष्ठा. त्यामुळे ते स्वतःला रामदास म्हणवत असंत व श्रीरामांना समर्थ म्हणत असंत. 'समर्थापुढे काय मागो कळेना ।' पण भक्ताचं व देवाचं ऐक्य होतं हे दाखवण्यासाठीच जणू काही लोक रामदासानाच समर्थ म्हणू लागले. या सर्व गोष्टींमुळे समर्थ म्हणतात की या जगात ईश्वराची अनेक नावे आहेत. परंतु राम या नावाशी त्यापैकी कोणाचीही तुलना होऊ शकत नाही. असं म्हणतात की ईश्वराचा विश्वनिर्मितीचा आदिसंकल्प ज्या नादरूपाने प्रकट झाला त्या अनाहत नादास ॐ असं म्हणतात. हा ओंकाररूपी अनाहत नाद सर्व जीवांच्या अंतर्यामी वास करत असतो. त्या ॐ मधूनच मग राम हे नाम निघालं. म्हणून मूळ अनाहत नादाची ॐ आणि राम ही सूक्ष्म व स्थूल अशी दोन रूपं आहेत. या बाबतीत समर्थांनी आधी केलं मग सांगितलं या वचनानुसार स्वतः तेरा कोटी रामनामाचा (श्रीराम जय राम जय जय राम या तारक मंत्राचा) जप केला तेव्हा श्रीरामानी त्यांना दर्शन दिलं व प्रसन्न होऊन वर माग असं सांगितलं. तेव्हा रामदास म्हणाले की या कलीयुगात कोणालाही १३ कोटी जप करण्याइतका वेळ मिळणार नाही तेव्हा आपणच कृपा करून जो ३।। कोटी जप करील त्याला दयाळूपणे आपण आपलं दर्शन द्यावं किंवा आपली काहीतरी अनुभूती द्यावी. यावर प्रभूनी प्रसन्न मनाने तथास्तु म्हटलं. पण जे अभागी क्षुद्र लोक आहेत त्याना हे कसं कळणार? देवानी जे समुद्रमंथन केलं त्यातून जे जहाल विष निघालं ते जगाच्या कल्याणासाठी भगवान शंकरानी प्राशन केलं पण त्यामुळे त्यांचा गळा पूर्णपणे भाजून निघाला. त्या वेदना थांबाव्यात म्हणून सर्व उपाय थकल्यावर रामनामाचं औषध घेतलं तेव्हा त्याना बरं वाटलं. ही जर त्यांची स्थिती आहे. तर मग तुमच्या आमच्या सारख्यांची काय स्थिती? काय कथा?

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**जेणे जाळिला काम तो राम ध्यातो । उमेसी अती आदरे गुण गातो ।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथे । परी अंतरी नामविश्वास तेथे ।।८३।।**

समर्थानी या श्लोकात भगवान शिवाचं वर्णन केलं आहे. समर्थाना शंकराचं खूप कौतुक आहे. कारण इतकी महान देवतासुध्दा विश्वासाने रामनाम घेते याचं ते कौतुक असावं. भक्ताचा अधिकार मोठा असला की देवाचं महत्व आपोआप वाढतं. शंकरांची योग्यता असामान्य कोटीतली आहे म्हणून त्याना महादेव म्हणतात. त्याना देवाधिदेव मानतात. त्याना तपाचरणाची अत्यंत आवड व तप एकांतातच होऊ शकतं म्हणून त्यानी यासाठी कैलासाची निवड केली. म्हणून त्याना कैलासराणा असंही म्हणतात.

एकदा कामदेव मदनाला गर्व झाला की आपण कोणाच्याही तपश्चर्येचा सहज भंग करु शकतो. विश्वामित्रासारखे ऋषी व ब्रम्हदेवासारखे देवही आपल्या तडाख्यातून सुटले नाहीत. मग शंकर तर काय? किस झाड की पत्ती. आपण चुटकीसरशी त्यांच्या तपाचा हां हां म्हणता चुराडा करुन टाकू, असं म्हणून त्याने शंकराच्या तप करण्याच्या जागेत प्रवेश केला व आपली किमया दाखवायला सुरवात केली. तत्क्षणी त्या जागेचा कायापालट होऊ लागला. सभोवती एक उपवन दिसू लागलं. त्यात सुगंधी फुलं उमलत होती व आसमंतात सुगंधाची बरसात करत होती. मंद वारा वहात होता. त्या उपवनात रती व तिच्या सख्या शंकराभोवती खेळू बागडू लागल्या. क्षणार्धात भगवान शंकराना या स्थितीला जबाबदार कोण ते समजलं व त्यांनी आपला तृतीय नेत्र उघडून मदनाला भस्म करुन टाकलं. असे हे भगवान शंकरसुध्दा रामभक्त आहेत व ते पार्वतीला रामाचं चरित्र सांगण्यात धन्यता मानतात. त्याचे गुण गाण्यात कृतार्थता मानतात व त्याच्या मुखात सदैव रामनाम असतं. वास्तविक त्याना विश्वज्ञान, विज्ञान, आत्मज्ञान सर्व काही भरभरून आहे. तसंच विश्वाचा संहार करण्याचं सामर्थ्यही त्याच्याकडे आहे. म्हणून तर त्यांच्याकडे विनाश, प्रलय, संहार वगैरेची कामगिरी सोपविलेली आहे. पण इतकं असून त्यांच्या अंगी कडकडीत वैराग्य बाणलेलं आहे. कारण त्याना कसलीही इच्छा नाही व कोणताही लोभ नाही. पण इतकं असूनसुध्दा त्यांच्या अंतःकरणात रामनामाविषयी अत्यंत विश्वास, आदर व प्रेम आहे. जणू रामनाम हे त्यांचं सर्वस्व आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## सोमवार

**विठोने शिरी वाहिला देवराणा । तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ।**
**निवाला स्वये तापसी चंद्रमौळी । जिवा सोडवी राम हा अंतकाळी ॥८४॥**
**भजा राम विश्राम योगेश्वरांचा । जपू नेमिला नेम गौरीहराचा ।**
**स्वये नीववी तापसी चंद्रमौळी । तुम्हा सोडवी राम हा अंतकाळी ॥८५॥**

श्लोक क्र. ८२ ते ८५ मध्ये समर्थ पुन्हापुन्हा त्याना आवडणाऱ्या भगवान शंकराचं उदाहरण देत आहेत. आपल्याला आवडणारे सुखभोग मिळणाऱ्या देवयोनीत असूनही केवळ सर्व विश्वाचं कल्याण व्हावं म्हणून कालकूट विषाचं प्राशन करून आपल्या काळानिळा झालेल्या कंठाचा दाह रामनामाने शांत करणारे भगवान महादेव शंकर हे बहुधा एकमेव उदाहरण त्यांच्यासमोर असावं म्हणून पुनरुक्ति हा येथे दोष समजू नये तर ते समर्थांच्या अंतःकरणाच्या उत्कटतेचे प्रतीक आहे.

पंढरपूरच्या पांडुरंगाच्या मरतकी शिवलिंग आहे हे लक्षात घेऊन समर्थ म्हणतात 'साक्षात विठ्ठलाने सुध्दा ज्याना शिरोधार्य मानले ते भगवान महादेवही श्रीरामाचं ध्यान करतात. त्याना जर सदैव श्रीरामाचाच ध्यास असतो तर तुम्ही त्या श्रीरामाला का जाणत नाही? त्याचं महत्व तुम्ही स्वतःच्या मनाला का पटवून देत नाही?' हिमालयातील बर्फ, नाग, चंद्र यासारखी बाह्यसाधनं जेव्हा विषाचा दाह शमविण्यासाठी असमर्थ आहेत असं भगवान शंकरांच्या लक्षात आलं तेव्हा त्या तपस्व्याने निःसंग होऊन फक्त रामनामाचा जप केला व त्यानेच त्यांचा दाह शांत झाला. म्हणून योगेश्वर शंकरांचंही विश्रामस्थान जे श्रीराम त्यांची सर्वानी उत्कटतेने भक्ती केली पाहिजे. त्याचा क्षणोक्षणी चढता वाढता ध्यास लागला पाहिजे. म्हणजे मग श्रीरामांच्या नामानेच तुम्ही सर्व जीव तुमच्या मृत्युच्या समयी जन्ममरणाच्या भोवऱ्यातून अगदी सहीसलामत सुटाल. 'अंते मतिः सा गतिः ।' अशी म्हणच आहे. पण जर श्रीरामांचं स्मरण केलं नाही, जन्मभरीच्या श्वासाइतुके जर हरिनाम घेतलं नाही तर शेवटचा श्वास रामनामात सुटणार कसा? राजा जडभरताला मृत्युच्या क्षणी त्याने पाळलेल्या हरिणाचं स्मरण झालं त्यामुळे त्याला पुढचा जन्म हरिणाचा घ्यावा लागला. पण रामभक्ताचं मात्र तसं होत नाही. कारण रामभक्तीशिवाय त्याच्या मनात इतर कसलीही वासनाच नाच करीत नाही. नामाचा सहवास त्याला अखंड मिळत असतो. तो सुटलेलाच असतो. म्हणूनच तो अंतकाळी आनंदाने मृत्यूला सामोरा जातो. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'आपुले मरण पाहिले म्या डोळा । जाहला सोहळा अनुपम' ।

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



## मंगळवार

**मुखी राम विश्राम तेथेचि आहे । सदानंद आनंद सेवूनि राहे ।**
**तयावीण तो सीण संदेहकारी । निजधाम हे नाम शोकापहारी ।।८६।।**

समर्थ या श्लोकात रामनामाची महती सांगत आहेत. जो प्रेमाने रामाचं नाम उच्चारीत असतो, जो मुखाने सतत रामनाम घेतो त्यालाच नेहमी आनंदाची प्राप्ती होते. इतकंच नाही तर तो स्वतःच आनंदाची मूर्ती होतो व तो हा आनंद दुसऱ्यांना वाटत रहातो. 'सेवितो हा रस वाटतो आणिका'। असं आपले तुकाराम महाराज म्हणतात. इतकंच नाही तर त्याला खरी विश्रांती मिळते. त्यालाच परमशांतीचा अनुभव येतो, लाभ होतो. शांतीचे अनेक प्रकार आहेत. दोन कर्मांमध्ये शांती असते. म्हणजे एक कर्म संपलं व दुसरं कर्म सुरू करायचं आहे याच्या मधल्या काळांत शांती असते. तसंच एक विचार करून संपला व दुसरा विचार अजून सुरू व्हायचा आहे तर मधल्या पोकळीत शांति विराजत असते. शिवाय ज्ञानाची एक वृत्ती निर्माण होऊन ती शमली आहे व दुसरी वृत्ती अजून उठली नाही, या दोन वृत्तींच्यामध्ये जी अज्ञातता किंवा ज्ञातता असते तेही शांतीचंच एक रुप आहे. याच्याही पलीकडे जाऊन जेव्हा आपल्या वैयक्तिक अस्तित्वाच्या जाणीवेची स्फूर्ती प्रकट होते तेव्हा अशा दोन स्फूर्तींच्यामध्ये परमशांतीचा वास असतो. पहिली स्फूर्ती उठून मावळली व दुसऱ्या स्फूर्तीचा अजून उदय झाला नाही अशा मधल्या फटीत परमशांती विलसत असते. पण याउलट जर का मुखात रामनाम नसेल तर मात्र मग अहंकाराचा उदय होऊन सर्वच गोष्टी कष्टदायक वाटू लागतात. 'पाऊल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे' अशी जीवाची स्थिती होते, आणि कितीही कष्ट उपसले तरी शेवटी पदरात काहीच पडत नाही. कारण मुलाना सुना घेऊन जातात व आपला संसार सुनासुना होतो मग 'सुन्यासुन्या मैफिलीत माझ्या'। कोणाचीही साथ रहात नाही. शिवाय लेकींना जावई घेऊन जातात. आजी नातवंडात मन रमवतात. त्यामुळे आजोबा अगदी एकाकी पडतात. आपण जन्मभर कष्ट करून शाश्वत असं काय मिळवलं याचा त्याना संदेह पडतो. पण नाम घेणाऱ्या भक्ताचं जीवन मात्र अगदी शोकरहित असतं. इतकंच नव्हे तर ते इतरानाही शोकरहित करतं. त्यामुळे त्या रामनामालाही रामभक्ताचं जीवन म्हणजे अगदी स्वतःचं घरच असल्यासारखं वाटत असावं. अगदी आपल्या घरासारखी सुरक्षितता त्याला भक्ताच्या जीवनात लाभत असावी.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**मुखी राम त्या काम बाधू शकेना । गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना ।**
**हरीभक्त तो शक्त कामास मारी । जगी धन्य तो मारुती ब्रम्हचारी ।।८७।।**

काम या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक काम म्हणजे स्त्री व पुरुष यांच्यामधिल आकर्षण. विरूध्द धृव एकमेकाना आकर्षित करतात. (Opposite poles attract each other) हा विज्ञानातील नियम इथेही लागू पडतो. आणि काम म्हणजे तीव्र इच्छा किंवा वासना हा दुसरा अर्थ. जीभेवर रामनाम असतं, त्याच्या मनात अहर्निश रामनामाचा जप चालू असतो. त्याला कोठलाही काम बाधू शकत नाही. म्हणजे ज्याची बाधा होईल असा काम त्याच्या मनात उत्पन्नच होत नाही. धर्माच्या विरुध्द नसणारा काम हे माझंच स्वरूप आहे, असं भगवान् श्रीकृष्णानी गीतेत सांगितलं आहे, तर धर्माला गुंडाळून ठेवणाऱ्या कामाला त्यानी नरकाचं द्वार असं म्हटलं आहे. उदा. गरजेतून निघणारी इच्छा ही कधीही बाधत नाही. पण चैन करण्याची इच्छा ही नेहमीच बाधते. रामनामाचं सामर्थ्य इतकं विलक्षण आहे की त्याच्या उच्चारामुळे साधकाला इष्ट ते धैर्य व इतर गुण चढत्या वाढत्या प्रमाणात लाभतात. या धैर्यामुळे त्याच्या मनात बाधक होतील अशा वासनाच निर्माण होऊ शकत नाहीत. आणि हेच धैर्य त्याला वेळोवेळी संकटांशी सामना करण्यास मदत करतं. जो हरिशी सतत जोडलेला असतो त्याला हरिभक्त असं म्हणतात. साधक एकदा हरिभक्त या श्रेणीत आला की मग त्याला कोणत्याही 'कामा'चा नाश करण्याचं बळ येतं. कारण दुराग्रह, आसक्ती व अनीती हे कामाचे सहाय्यक असतात. या सर्वांना हरिभक्त सहज नष्ट करू शकतो. मारुती हे हरिभक्तीचं उत्कृष्ट उदाहरण आहे. कारण तो शंकराचा अवतार होता. दोघानाही रामनामाचा पराक्रम माहीत होता. मारुतीला रामाच्या सेवेशिवाय दुसरी कोठलीही वैयक्तिक वासना नव्हती. दोन्ही प्रकारच्या कामाचा मारुतीने नाश केला होता. म्हणून त्याच्या ठिकाणी प्रचंड पराक्रम व जोडीला विलक्षण व विचक्षण बुध्दी वास करत होती. म्हणून त्याला 'बुध्दिमतां वरिष्ठम्' व जितेंद्रिय असं म्हटलं आहे. या गुणांमुळेच मारुती या जगात धन्यता पावला. [illegible]

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार

**बहू चांगले नाम या राघवाचे । अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे ।**
**करी मूळ निर्मूळ घेता भवाचे । जिवा मानवा हेचि कैवल्य साचे ।।८८।।**

समर्थांना रामनामाचं महत्व सांगताना कधीही कंटाळा येत नाही. त्यांच्या वाणीला कधीही थकवा येत नाही. ते म्हणतात, 'या जगात सर्वात चांगली गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे रामनाम घेणे होय. कारण ॐ कार व गायत्री यानी लाजेने मान खाली घालावी इतकी अपार शक्ती या रामनामात आहे. राम या शब्दाची व्याख्या रमते सः रामः म्हणजे जो कशातही रमतो, ज्याला काहीही त्याज्य नसतं तो राम व जो सर्वांना आराम देतो तो राम. तसंच जो सर्व जगाचं उत्पत्तिस्थान आहे तो आत्माराम म्हणजे जो जीवात्म्यालाही आराम देतो तो राम. पण आत्मारामाकडे तो सामान्य लोकाना अप्राप्य असल्यामुळे, त्याच्यापर्यंत कोणाचंही लक्ष जात नाही. आपले तुकाराम महाराज म्हणतात, **'राम, राम, राम अवघेची म्हणती । कोणी न जाणती आत्माराम ।।'.** दुसरे म्हणजे राम हा शब्द जोडाक्षरविरहित आणि मृदु आहे व तो अत्यंत सुंदर आहे. राम हा विश्वरूप आहे म्हणजे तो विश्वनिर्माता, विश्वनियंता, विश्वव्यापक, सर्वज्ञानी, सर्वशक्तीमान व भक्तांसाठी परमप्रेममय असा आहे. म्हणजे भक्ताने या अर्थावर आपल्या भावाचा साज चढवला की ते नाम साजिरं होतं. ते अत्यंत लहान म्हणजे फक्त दोन अक्षरांचं आहे व उच्चारायला अगदी सोपं व सुलभ आहे. या जगात काहीही फुकट मिळत नाही. कोणत्याही मालकीच्या गोष्टीसाठी त्याची योग्य किंवा अयोग्य किंमत चुकवावीच लागते. पण फक्त रामनाम याला सन्मान्य अपवाद आहे. कारण ते घेताना भक्ताला काहीही द्यावं लागत नाही. भव हा शब्द भू या धातूपासून झाला आहे. भू-भव म्हणजे काहीतरी होणं म्हणजे बदल होणं. तो बदल करण्याची इच्छा मनात निर्माण होणं याला भवरोग असंही म्हणतात. या इच्छा अनंत व पुन्हापुन्हा निर्माण होत असल्यामुळे याला भवसागर असंही नाव आहे. पण भक्ताचं सर्व जीवनच रामनाममय झालेलं असल्याने ते रामाला समर्पित केलेलं असतं. त्यामुळे रामाच्या इच्छेशिवाय त्याच्या मनात कसलीही वासना उत्पन्नच होत नाही, म्हणून अशा भक्ताला कैवल्य म्हणजे मोक्ष मिळतो. कैवल्य म्हणजे केवळ अस्तित्व,

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।




## शुक्रवार

**जनी भोजनी नाम वाचे वदावे । अती आदरे गद्य घोषे म्हणावे ।**
**हरीचिंतने अन्न सेवीत जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।।८९।।**

समर्थानी आत्तापर्यंतच्या श्लोकात प्रत्येकाने रामनाम घ्यावं असा उपदेश केला आहे. ते मनातल्या मनात एकाग्रतेने घ्यावं म्हणजे त्याला आनंद होतो असंही ते म्हणतात. आता या श्लोकात ते सामुदायिक नामस्मरणाची महती गात आहेत. ते म्हणतात की कुटुंबातील सर्व माणसानी भोजन करत असताना मोठ्या प्रेमाने वैखरी वाणीने जयघोष करून मोठ्या आनंदाने देवाचे नाव घ्यावे. जरी ते सुरात म्हणणं शक्य नसलं तरी ते गद्य स्वरूपात घ्यायला हरकत नाही.

माणसाला हवेच्या खालोखाल अन्नपाण्याची गरज असते. हे अन्न धान्य, डाळी, भाज्या, फळं या स्वरूपात त्याला हल्लीच्या अर्थव्यवस्थेप्रमाणे बाजारातून विकत घ्यावं लागतं. मग ते निवडून स्वच्छ करून ते गरजेनुसार अग्नीवर शिजवावं लागतं. आणि स्वयंपाक झाला की मग कुटुंबातली सर्व माणसं एकत्र बसून भोजन करतात. म्हणजे अन्नपदार्थांवर ताव मारतात. या सर्व प्रकारात अन्नात दोन प्रकारचे दोष शिरतात. एक मिश्रणदोष आणि दुसरा आश्रयदोष. उदा.डाळ, तांदूळ, गहू इ. प्रकारात खडे, माती इतर कचरा वगैरे मिसळलेला असतो. याला मिश्रणदोष म्हणतात. धान्य पाखडून व निवडून हा दोष दूर करता येतो. तसंच हे धान्य जितक्या माणसानी आतापर्यंत हाताळलं असेल तितक्या माणसांच्या मनातील दोष या अन्नात शिरलेले असतात. हे दोष दोन प्रकारच्या मंत्रानी काढता येतात. एक गायत्री मंत्राचा उपयोग करून व दुसरा प्रकार म्हणजे देवाचं नामस्मरण करून हे दोष दूर करता येतात. तसंच भोजन करताना म्हणजे अन्नाचं सेवन करताना प्रत्येक घासागणिक देवाचं चिंतन करावं म्हणजेच मी खाणारा, हे खाद्य अन्न व भोजन ही तिन्ही हरीची वेगवेगळी प्रकटीकरणं असली तरी तीनही प्रकारातील ईश्वरी शक्ती एकच आहे. असं सतत स्मरण करावं म्हणजे श्रीहरी भक्ताच्या भावानुसार त्याला पावेल कारण आपल्या भक्ताना पावावं हाच त्या श्रीहरीचा स्वभाव आहे. तसंच नामाने आसपासच्या वास्तूत पवित्र व मंगल स्पंदनं निर्माण होतात म्हणून नाम घ्यावं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# || मना सज्जना ||



## शनिवार

**न ये राम वाणी तया थोर हाणी । जनी वेर्थ प्राणी तया नाम काणी ।**
**हरी नाम हे वेदशास्त्री पुराणी । बहु आगळे बोलिली व्यासवाणी ।।१०।।**

या श्लोकात रामाचं नाम न घेणाऱ्या माणसाची काय गती होते ते समर्थ आपल्याला अत्यंत पोटतिडिकेने समजावून सांगत आहेत. ते म्हणतात की माणसाच्या मनात नामस्मरणाविषयी आवड उत्पन्न होत नाही, नामाविषयी प्रेम निपजत नाही, रामाविषयी ओढ लागत नाही, हे एकवेळ आपल्याला समजू शकेल. कारण या गोष्टी सवयीने उत्पन्न होऊ शकत नाहीत. पण नुसतं तोंडाने रामाचं नाम घ्यायचं ठरवलं तर ते मात्र अशक्य नाही. या संबंधात नामदेव महाराज म्हणतात की, 'चित्ती नसे तरी नसो । परी वाचे तरी असो ।'. थोर म्हणजे प्रचंड आणि हाणी म्हणजे हानी. ज्याच्या मुखातून रामनाम येत नाही त्याची इतकी प्रचंड हानी होते की ती मुखाने वर्णन करता येत नाही. आपल्या जीवनातील प्रगतीचे सर्व मार्ग त्याने आपल्या हट्टीपणाने बंद केलेले असतात, जो नामस्मरण करत नाही त्याचं सर्व जीवन व्यर्थ जातं. त्याचं आयुष्य फुकट जातं. तो केवळ श्वासोच्छ्वास करतो म्हणून त्याला जिवंत प्राणी म्हणावं तर लोहाराचा भाताही श्वासोच्छ्वास करतो. पण त्याचा उपयोग अग्नी प्रदीप्त करण्यासाठीतरी होतो. पण याचा येवढाही उपयोग होत नाही. म्हणून समर्थ अशा माणसाला प्राणीही म्हणायला तयार नाहीत, तर त्याला ते काणी म्हणजे क्षुद्र असं म्हणतात. काणी म्हणजे विशिष्ट रोगाने पछाडलेला व त्यामुळे आतुन पोखरलेला, काळा पडलेला अपायकारक असा जोंधळा. हा बाहेरुन चांगल्या जोंधळयासारखाच दिसतो पण खाण्यासाठी निरुपयोगी असतो. वास्तविक चार वेद, सहा शास्त्रं व अठरा पुराणांमध्ये वेगवेगळया पध्दतीतून व प्रकारे व्यासांच्या वाणीने हरीच्या नामाचीच थोरवी गायली आहे. त्याची श्रेष्ठता वर्णन करून सांगितली आहे. इतर साधनांहून हरीच्या नामाची आगळीवेगळी सुलभता समजावून सांगितली आहे. व्यासवाणीला काहीही अगम्य नाही म्हणून 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' असं त्याचं वर्णन केलं आहे. 'कलिसंतरण' नावाच्या उपनिषदात नामाचं कलियुगातील माहात्म्य सांगितलं आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**नको वीट मानू रघूनायेकाचा । अती आदरे बोलिजे राम वाचा ।**
**न वेचे मुखी सापडे रे फुकाचा । करी घोष त्या जानकी वल्लभाचा ।।९१।।**

रामनाम न घेणाऱ्या माणसाची काय गती होते हे समर्थांनी आपल्याला गेल्या श्लोकात सांगितलं. या श्लोकात त्यानी पुन्हा नामस्मरणाचं महत्व सांगायला सुरवात केली आहे. समर्थांना एखादी गोष्ट पुन्हापुन्हा सांगण्याचा, ती गोष्ट मनावर ठसण्याच्या दृष्टीने, बुध्दीला पटण्याच्या दृष्टीने फार उपयोग होतो असं वाटतं. म्हणून समर्थ म्हणतात हे मना, तू कोठल्याही परिस्थितीत रघुनाथाचा वीट मानू नकोस, त्याचा कंटाळा करू नकोस, त्याचा उबग येऊ देऊ नकोस. तर अत्यंत आदराने, आनंदाने, प्रेमाने त्याचं नाम वाचेने घेत जा. त्याचं स्मरण करून अत्यंत आवश्यक असं जे काही तू बोलशील त्याला नामस्मरणाइतकंच महत्व प्राप्त होईल. या जगात प्रत्येक गोष्टीला त्याचं योग्य ते मूल्य असतं आणि त्याची ही किंमत चुकवल्याशिवाय ती आपल्याला मिळू शकत नाही. पण रामनाम ही अशी विलक्षण गोष्ट आहे की ती आपल्याला मिळण्यासाठी आपल्या पदरचं काही वेचावं लागत नाही म्हणजे ती आपल्याला चकटफू मिळते. म्हणजे फुकट मिळते. कारण ती अमूल्य आहे. तिचं मूल्य ठरवणं ही आपल्या बुध्दीच्या पलीकडची गोष्ट आहे. म्हणून ती आपल्याला ईश्वराने प्रसन्न होऊन प्रदान केली आहे. हे लक्षात ठेवून, हे मना, तू त्या जानकीच्या वल्लभाचा म्हणजे सीतारामाचा सदैव जयघोष करीत जा. ईश्वराचा व त्याच्या शक्तीचा जयजयकार करत जा. ईश्वर जरी आपल्या जाणीवेच्या पातळीच्या पलीकडे असला तरी त्याच्या शक्तीचं हे विश्वनिर्मितीचं व पालनाचं कार्य आपल्याला ज्ञानेंद्रियांच्या मदतीने आणि बुध्दीच्या सहाय्याने समजू शकतं. म्हणून हे मना, तू जानकीच्या कार्याच्या आधाराने जानकीचाही आधार असलेल्या श्रीरामाच्या अनंतत्वाला जाणून घे व त्याच्या अस्तित्वाशी एकरूप हो. माणसाला बळजबरीने एखादी गोष्ट मग ती त्याला पटली नाही तरी, जर करायला लावली तर कालांतराने त्याला त्या गोष्टीचा वीट येऊ लागतो. पण जर त्याने तीच गोष्ट समजून उमजून, आदराने म्हणजे प्रेमाने व आनंदाने केली तर त्याचा कंटाळा येत नाही. जानकीला तिचं सर्वस्व असलेल्या वल्लभाचा कधीतरी कंटाळा येईल का?

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**अती आदरे सर्वही नामघोषे । गिरीकंदरे जाइजे दूरि दोषे ।**
**हरी तिष्ठतु तोषला नामघोषे । विशेषे हरा मानसी रामपीसे ।।९२।।**

माणसाने जर अत्यंत आदराने देवाचं नाव घेतलं, मोठ्या प्रेमाने त्याच्या नामाचा घोष केला, त्याचा जयजयकार केला तर त्याच्या अंतःकरणातील सर्व दोष, त्याच्या बुध्दीत ठाण मांडून बसलेले काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता इ. सर्व विकार त्याला सोडून जातात. जणू काही हे सर्व विकार, दोष वगैरे त्याच्यापासून अगदी लांब पळून जातात. पुन्हा त्याचं दर्शनसुध्दा होऊ नये म्हणून पर्वतांच्या दऱ्यात लपून बसतात, किंवा आपण त्याच्या दृष्टीससुध्दा पडू नये म्हणून दूर असलेल्या गिरीकंदरात जाऊन ते आपलं तोंड काळं करतात. जसं सिंहगर्जना ऐकली की सर्व लहानमोठे प्राणी भयाने आपापल्या गुहात व घरात छपून बसतात तसं प्रेमाने केलेल्या नामघोषामुळे विकारांची स्थिती होते.

भगवान रामकृष्णांचे एक साहित्यिक शिष्य होते. त्याना दारूचं जुनं व्यसन होतं व भगीरथ प्रयत्न करूनही ते सुटत नव्हतं. त्यानी रामकृष्णानाच यावरचा उपाय विचारला. तेव्हा परमहंस प्रेमाने म्हणाले, हे बघ, तुला अगदी राहवणार नाही तेव्हाच दारू पी पण त्यावेळी त्या दारूचा मला नैवेद्य दाखवून मगच तिचा घोट घे. याप्रमाणे भक्ताने एकदोनदा केलंही. पण मग त्याच्या मनात असा विचार आला की इतक्या शुध्द पवित्र आचरणाच्या महापुरुषाला मी दारूसारखी घाणेरडी वस्तू अर्पण करावी आणि तीसुध्दा माझ्या व्यसनासाठी. हे किती नीचपणाचं कर्म आहे. पश्चात्तापाने त्याचं मन इतकं भरून गेलं की त्याची दारू कायमची सुटली. यासाठीच समर्थ म्हणतात की मोठ्या प्रेमाने रामाचं नाम घेतलं की साहजिकच आपल्या दोषांचा तिरस्कार वाटू लागतो. नामघोषाने आपल्याला तर प्रसन्नता वाटतेच पण आपल्यापेक्षाही देव जास्त संतुष्ट होतो व आपल्याला दर्शन देण्यासाठी तो आपल्या दारात तिष्ठत उभा राहतो. याबद्दल माऊली म्हणते, **'परी तयापासी पांडवा । मी हारपला गिवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ।।'**. फक्त तो नामघोष 'बरवा' असला पाहिजे. भगवान शंकरासारख्या महादेवाधिदेवानासुध्दा जिथं रामनामाचं वेड लागू शकतं तिथे तुम्हाआम्हासारख्या सामान्य माणसाना रामनाम घ्यावंसं का वाटू नये असा सवाल समर्थ आपल्याला करीत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



मंगळवार

**जगी पाहता देव हा अन्नदाता । तया लागली तत्वता सार चिंता ।**
**तयाचे मुखी नाम घेता फुकाचे । मना सांग पा रे तुझे काय वेचे ।।९३।।**

या श्लोकात समर्थांनी अत्यंत महत्वाच्या मुद्याला हात घातला आहे. तो म्हणजे कृतज्ञता. कृतज्ञता म्हणजे परतफेडीची अपेक्षा न ठेवता आपल्यावर दुसऱ्याने सहज केलेल्या उपकारांची जाणीव व त्याचं स्मरण असणं. हा एक दुर्मिळ सद्‌गुण आहे, व परमार्थात त्याची फार आवश्यकता आहे. आपण थोडा मूळापासून विचार केला की आपल्या ध्यानात येतं की देवाने आपल्याला शंभर वर्षं टिकेल इतकं सुदृढ शरीर दिलं आहे. त्यात कार्यक्षम ज्ञानेंद्रियं व कर्मेंद्रियं दिली आहेत. सुविचारांची आवड असणारं मन दिलं आहे व सदाचाराचा ध्यास असणारी बुध्दी दिली आहे. तसंच योग्य काय व अयोग्य काय याची निवड करण्याची क्षमता असलेली विवेकप्रज्ञा प्रदान केली आहे. शिवाय कलागुणांचं कौतुक करणारं कोमल व रसिक व्यक्तिमत्व बहाल केलं आहे. तेव्हा इतक्या सगळ्या उत्तम गोष्टी देवाने आपल्याला फुकट दिल्यावर ज्योतीने तेजाची आरती या न्यायाने आपण त्याचं मुखाने स्मरण करायला काही हरकत आहे का? आपण त्याच्या उपकाराची जाणीव ठेवली तर आपल्या पदरचा एक तरी पैसा खर्च होणार आहे का? पण इतकं सगळं असूनसुध्दा देवाची आपल्याला कधीतरी आठवण होते का? फक्त आपण संकटात असलो व त्यावरचे सर्व उपाय थकलेले असले की आपल्याला त्याची आठवण होते की देवा, आता मला तुझ्याशिवाय कोणाचाही आधार नाही. तेव्हा तू धाव व या संकटात तू मला मदत कर. यासाठी मी तुझा धावा करीत आहे. या संकटातून तू मला सोडवलंस तर मी तुला दर बुधवारी पांढरं फूल वाहीन असा नवस करतो. एवढी लाच मी तुला दिल्यावर, तू गजेंद्राचा पाय जसा मगरीच्या तोंडातून सोडवलास तसंच मला या संकटातून अलगद सोडव.

काही लोक जेव्हा सर्व इंद्रियं दुर्बल होतात व शरीर संसार करायला निकामी होतं अशा म्हातारपणी देवाची भक्ती करून त्याला प्रसन्न करून घेऊ असं ठरवतात. पण म्हातारपणी काहीच करणं शक्य नसल्यामुळे त्यांचा भक्ती करण्याचा निश्चय पुढील जन्मातल्या म्हातारपणापर्यंत पुढे ढकलला जातो. म्हणून समर्थ या क्षणापासूनच देवाचं नाव घ्यावं असा कृतज्ञतेपोटी आग्रह धरतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

जगी पाहता देव हा अन्नदाता । तया लागली तत्वता सार चिंता ।
तयाचे मुखी नाम घेता फुकाचे । मना सांग पा रे तुझे काय वेचे ।।९३।।

**जगी पाहता देव हा अन्नदाता । तया लागली तत्वता सार चिंता ।।**

कोणत्याही सजीव प्राण्याला जगायचं असेल तर त्याला पहिली गरज हवेची असते. नंतर अन्नाची आवश्यकता असते. याबाबतीत तत्वतः म्हणजे मूळापासून विचार केला तर आपल्याला असं समजतं की आपलं सर्व जीवन ज्या निसर्गाच्या नियमानुसार चालतं तो निसर्गही देवाच्या नियंत्रणाखाली काम करत असतो. सर्व सजीव प्राण्यांना अन्न पुरवण्याची जबाबदारी त्याची असते, आणि ती तो व्यवस्थितपणे पार पाडतो. आपल्या शास्त्रज्ञानीसुध्दा हे सिध्द केलं आहे की या जगातील सर्व माणसाना पुरेल एवढं अन्नधान्य या पृथ्वीवर सहज निर्माण होतं. पण या धान्याचं वितरण चुकीच्या पध्दतीने केलं गेल्यामुळे एकीकडे अजीर्ण तर दुसरीकडे उपवास अशी परिस्थिती निर्माण होते. इथे समर्थांनी चिंता हा शब्द वापरला आहे, याचा अर्थ काळजी असा नसून चिंतन असा आहे. याच अर्थाने समर्थांनी त्यांच्या लहानपणी 'चिंता करतो विश्वाची' असं त्यांच्या आईला सांगितलं होतं. अन्नाच्या बाबतीत देवाचं चिंतन लक्षात आलं की मन थक्क होतं. प्रत्येक सजीव प्राण्यासाठी स्वतंत्रपणे अन्ननिर्मिति करायची असेल तर अतिप्रचंड प्रमाणात अन्न निर्माण करायला लागेल. आणि सजीव प्राणी मृत्यू पावल्यावर त्याच्या मृतदेहाचं काय करायचं हाही प्रश्न निर्माण झाला असता. पण देवाने 'जीवो जीवस्य जीवनम् ।' हा नियम तयार करून मोठ्या कौशल्याने दोन्ही प्रश्न एकाच वेळी सोडवले आहेत. दधिची ऋषींनी वृत्रासुराचा वध करण्यासाठी आपल्या शरीराचं समर्पण केलं म्हणून आपण त्याचं कौतुक करतो. पण इथे परमेश्वराच्या या नियमानुसार प्रत्येक लहानमोठा सजीव प्राणी महादधिची होऊन दुसऱ्याला जीवन देण्यासाठी आपल्या शरीराची आहुती त्याच्या मुखात घालत असतो. म्हणूनच माणसाचं शरीरसुध्दा मृत झाल्यावर गिधाडांचं अन्न बनतं. 'मरणात खरोखर जग जगते' याचा खरा अर्थ आपल्याला या ईश्वराच्या नियमातून चांगला समजतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार

**तिन्ही लोक जाळू शके कोप येता । निवाला हरू तो मुखे नाम घेता ।**
**जपे आदरे पार्वती विश्वमाता । म्हणोनि म्हणा तेचि हे नाम आता ।।९४।।**
**अजामेळ पापी वदे पुत्रकामे । तया मुक्ती नारायणाचेनी नामे ।**
**शुकाकारणे कुंटणी राम वाणी । मुखे बोलली ख्याति जाली पुराणी ।।९५।।**

पहिल्या श्लोकात समर्थानी, आपलं नेहमीचंच आवडतं उदाहरण घेतलं आहे. भगवान् शिवशंकर हे अत्यंत महाप्रतापी, बलशाली व प्रचंड पराक्रमी दैवत आहे. गरज पडल्यास तीनही लोक जाळून टाकण्याइतकं त्याचं सामर्थ्य आहे. एकदा मदनाला आपण शंकराच्या तपाचा भंग करू शकतो असा गर्व झाला होता. पण हे भगवान् शंकराच्या ध्यानात येताच त्यानी आपला तृतीय नेत्र उघडून मदनाला क्षणात भस्म करून टाकलं होतं. समुद्रमंथनाच्या वेळेस सागराच्या पोटातून जेव्हा हलाहल बाहेर आलं व त्याने आपला प्रभाव दाखवायला सुरवात केली तेव्हा सर्वांनी काढता पाय घेतला. विश्वाच्या कल्याणासाठी भगवान शंकरानी त्या हलाहल विषाचं प्राशन केलं व ते पचवून टाकलं. पण त्यामुळे त्यांचा कंठ निळा झाला व साऱ्या शरीराची आग होऊ लागली. सर्व उपाय थकल्यावर त्यानी रामनाम घेऊन शरीराचा दाह शांत केला. मग त्यानी विश्वमाता पार्वतीला आदराने रामनामाची दीक्षा दिली. म्हणून भगवान् शंकरांच्या पावलावर पाऊल टाकून आपणही रामनाम घ्यायला सुरवात करावी असं समर्थ सांगतात.

दुसऱ्या श्लोकात समर्थ श्रीमद्‌भागवतामधील अजामिळाच्या कथेचा संदर्भ देतात. कान्यकुब्ज देशात एक अत्यंत दुर्जन ब्राम्हण रहात होता. त्याच्या धाकट्या मुलाचं नाव नारायण होतं. तो त्याला मोठ्या प्रेमाने नारायणा, नारायणा अशी सारखी हाक मारीत असे. त्याच्या अंतकाळीही त्याने अरे नारायणा, धाव अशी हाक मारली. त्याचे प्राण हरण करण्यासाठी यमदूत व विष्णूदूत दोघेही आले. त्यामुळे त्यांचे एकमत होईना. म्हणून त्याचं मरण टळलं. हे पाहून त्याच्या मनावर अतीशय परिणाम झाला. तो नंतर नामस्मरणात विलक्षण रंगून गेला आणि त्याचा उध्दार झाला. तसंच पिंगळा नावाची एक वेश्या होती. तिने एक पोपट पाळला होता. त्याला बोलायला शिकवण्यासाठी ती पुन्हा पुन्हा राम राम असा उच्चार करीत असे आणि त्या रामनामाच्या जपाने ती उध्दरून गेली अशी कथा पुराणात आहे. यावरून आपल्या असं लक्षात येईल की सहजपणे घेतलेल्या नामाचा इतका उपयोग होतो तर जाणून बुजून घेतलेल्या नामाचा किती परिणाम होईल?

**'अजित नाम वदो भलत्या मिसे । सकल पातक भस्म करीतसे' ।।**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## शुक्रवार

**महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळी । जपे रामनामावळी नित्यकाळी ।**
**पिता पापरूपी तया देखवेना । जनी दैत्य तो नाम मूखे म्हणेना ॥१६॥**

समर्थानी या श्लोकात प्रल्हादाचं उदाहरण घेऊन त्याला महाभक्त या पदवीने गौरविलं आहे. याचा जन्म असुरकुळात झाला होता. तरी पूर्वजन्मसंस्कारानुसार हा लहानपणापासून मोठ्या प्रेमाने ईश्वराचं नाम सदैव उच्चारीत असे. तो भगवंताच्या भक्तीत पूर्णपणे रंगून गेला होता. पण याचे वडील हिरण्यकश्यपू हा म्हणजे सर्व पातकांचं मूर्तस्वरूपच होता. अत्यंत दुराचारी, कमालीचा सत्तालोलूप, उर्मट, अहंकारी असा हा हिरण्यकश्यपू स्वतः देवाचं नाव तर घेत नसेच पण इतर कोणीही देवाचं नाम घेतलं तरी त्याला स्वतःचा अपमान झाल्यासारखं वाटत असे. त्यात स्वतःचा मुलगाच देवभक्त आहे हे कळल्यावर त्याच्या तळपायाची आग मस्तकात जात असे. या संदर्भात रशियाच्या स्टॅलीनची गोष्ट प्रसिध्दच आहे. त्याने आपल्या नागरिकाना काहीही चांगली गोष्ट घडली की Thank Stalin असं म्हणायला शिकवलं. या बळजबरीला ते नागरिक इतके कंटाळले की तो मेल्यावर सगळ्यांनीच Thank God असं म्हटलं. अशीच थोडीफार स्थिती हिरण्यकश्यपूची होती. प्राप्त झालेल्या वराच्या सामर्थ्याने त्याचा उन्मत्तपणा अगदी टोकाला पोहोचला होता. त्याने प्रल्हादाला प्रथम समजावून सांगण्याचे खूप प्रयत्न केले. पण तो ऐकत नाही हे पहाताच त्याने स्वतःच्या मुलाला या ना त्या प्रकारे ठार मारण्याचाही प्रयत्न केला. त्याला कड्यावरून खाली लोटला. नंतर उकळत्या तेलाच्या कढईत फेकला. त्यानंतर अग्नीकुंडात ढकलला. शेवटी आईकडून विष देववलं पण कशाचाही उपयोग झाला नाही. तेव्हा त्याने प्रल्हादाला दरडावून विचारलं की तुझा देव आहे तरी कुठे? तेव्हां प्रल्हाद नम्रपणाने म्हणाला, अहो, तो सर्वत्रच आहे. त्यावर या खांबात तो आहे का? असं विचारून त्याने त्या खांबावर गदेचा प्रहार केल्यावर त्यातून अक्राळविक्राळ स्वरूपात नरसिंह प्रकट झाले व त्यानी वराने प्राप्त झालेल्या सर्व अटी पाळून त्याला ठार केलं व प्रल्हादाला वर मागण्यास सांगितलं. तो म्हणाला भक्ती करून मुक्ती मागण्याइतका मी व्यापारी वृत्तीचा नाही व माझे भाईबंद पृथ्वीवर असताना त्याना सोडून तुमच्या बरोबर येण्याइतका मी स्वार्थीही नाही. तेव्हा मला फक्त तुमची भक्ती करू द्या.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**मुखी नाम नाही तया मुक्ती कैची । अहंतागुणे यातना ते फुकाची ।**
**पुढे अंत येईल तो दैन्यवाणा । म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ।।१७।।**

ईश्वराच्या स्मरणाचं माणसाला विस्मरण झालं तर त्याची काय स्थिती होते याचं विदारक वर्णन समर्थ या श्लोकात करीत आहेत. माणसाच्या जीवनाचं अंतिम ध्येय मोक्ष म्हणजेच ईश्वरप्राप्ती हे आहे. ते ईश्वरस्मरण केल्यानेच साध्य होतं. त्यामुळे ज्याच्या मुखात रामनाम नाही त्याला मुक्ती मिळणं कदापिही शक्य नाही. म्हणजे त्याची या जन्ममरणाच्या रहाटगाडग्यातून सुटका होणं अशक्य आहे. याचं कारण भगवान पतंजलीनी आपल्या योगसूत्रात जे क्लेश (म्हणजे यातना) सांगितले आहेत, त्यात पहिला क्लेश अविद्या म्हणजे ईश्वराचं अज्ञान किंवा विस्मरण हा सांगितला आहे. त्यातूनच मग अस्मिता म्हणजे अहंकार या दुसऱ्या क्लेशाची निर्मिती होते. या अस्मितेतून मग राग म्हणजे आसक्ती आणि द्वेष म्हणजे तिटकारा हे क्लेश निर्माण होतात. यातून मग जगण्याची तीव्र अभिलाषा हा शेवटचा क्लेश तयार होतो. म्हणजे ईश्वराच्या अज्ञानातून पुढील चार क्लेश तयार होतात. ते सर्व जीवन यातनामय करतात, इतकंच नव्हे तर ते या जीवनाचा अंतही तितकाच दैन्यवाणा करतात. अहंकाराचं पहिलं लक्षण म्हणजे मी इतरांपेक्षा वेगळा आहे त्यामुळे सर्वांनी माझं ऐकलं पाहिजे, कारण माझं नेहमीच बरोबर असतं व चुकतं ते इतरांचंच. त्यांच्या चुकीमुळे मला दुःख भोगावं लागतं. त्यांची चूक ते माझ्यावर ढकलतात, आणि सर्व चुकांचं खापर माझ्या डोक्यावर फोडतात. सर्व सुख देणाऱ्या वस्तू या माझ्या मालकीच्या असाव्यात असं मला वाटतं व ही मालकी मिळवण्यासाठी मी मागेपुढे पहात नाही. गरज पडल्यास इतरांचा नाश करूनही मी मला हव्या असलेल्या सर्व वस्तू मिळवतो. पण या वस्तूतून उपभोग घेण्याची माझी शक्ती दिवसेंदिवस क्षीण होत जाते, व जीवनाच्या शेवटी या सर्व वस्तू मला इथेच सोडून जाव्या लागणार या विचाराने मृत्यू समयी माझं जीवन दैन्यवाणं होऊन जातं. या सर्व गोष्टीवर अक्सीर इलाज म्हणजे रामनामाचा सदैव जप करावा असं समर्थ आपल्याला सांगतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## रविवार

**हरिनाम नेमस्त पाषाण तारी । बहू तारिले मानवदेहधारी ।**
**तया रामनामी सदा जो विकल्पी । वदेना कदा जीव तो पापरूपी ॥१८॥**

या श्लोकात समर्थांनी सेतु बांधण्यासाठी वापरलेल्या दगडांचं उदाहरण घेतलं आहे. कोणत्याही प्रकारची सजीव चेतना नसलेले हे निर्जीव दगड, केवळ रामनामाच्या बळाने सागरावर तरले अशी रामायणात कथा आहे. नळ वानराच्या हातून दगड पाण्यावर तरंगतील असा त्याला वर होता. म्हणून समुद्रावर सेतू म्हणजे पूल बांधण्याचे काम नळ वानराकडे आलं. पण या आपल्या कर्तृत्वाचा नळाला गर्व झाला. म्हणून त्याने समुद्राच्या पाण्यावर ठेवलेला दगड तरंगेनासा झाला. तो बुडू लागला. तेव्हा सर्व परिस्थिती जाणून हनुमंताने त्यावर श्रीराम अशी अक्षरे लिहीली तेव्हा ते दगड व्यवस्थितपणे तरंगू लागले व सेतू पूर्ण झाला. या सेतूची लांबी १०० योजने होती. तेव्हा हे सर्व रामनामाचंच सामर्थ्य ठरलं. या संबंधात आणखी एक हृद्य लोककथा प्रसिध्द आहे. केवळ आपल्या नामाच्या सामर्थ्याने पाषाण तरंगत आहेत, या गोष्टीचं रामप्रभूना खूप कौतुक वाटलं. त्यावर त्यांच्या मनात असाही विचार आला की हे केवळ माझ्या नामाचं सामर्थ्य आहे, मग आपलं स्वतःचं संकल्पसामर्थ्य किती असेल? हे पाहण्यासाठी एका मध्यरात्री सर्वजण गाढ निद्रेत असताना रामप्रभू एकटे सागरतीरावर गेले व कोणी पहात नाही ना हे पाहून त्यानी एक दगड उचलला व त्यावर नेहमीच्या प्रथेप्रमाणे 'श्रीराम' असं न लिहीता हा दगड तरावा असा संकल्प करून हळूच तो पाण्यात सोडला. पण काय आश्चर्य? तो पाण्यावर न तरंगता एकदम पाण्याच्या तळाशी गेला. तेव्हा त्याना आपला अपमान झाला असं वाटलं. हा अपमान कोणी पाहिला नाही ना यासाठी त्यानी आसपास नजर टाकली तेव्हा त्याना आपल्या छायेसारखा आपल्या बरोबर असणारा हनुमान शेजारीच उभा असलेला दिसला. असं कसं झालं? असं त्याला विचारल्यावर तो हसून म्हणाला, प्रभो, बरोबरच आहे. आपण ज्याला हातातून सोडलात तो दगड असो की जीव असो तो बुडणारच. याप्रमाणे अनेक मानवदेहधारी भक्तांचा रामप्रभूनी उध्दार केला. पण अशा तारक रामनामाबद्दल ज्याच्या मनात संशय निर्माण होईल तो जीव तोंडाने रामनाम कधीही घेणार नाही. म्हणून असा जीव संपूर्ण पापाचं रूपच आहे असं समजावं, असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**जगी धन्य वाराणसी पुण्यरासी । तयेमाजी जाता गती पूर्वजांसी ।**
**मुखे रामनामावळी नित्य काळी । जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ।।९९।।**

उत्तर भारतातील गंगेच्या काठावर वसलेलं एक काशी या नावाचं तीर्थक्षेत्र आहे. हे फार प्रसिध्द पुण्यक्षेत्र आहे. कारण बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग काशी येथे आहे. शिवाय भारतीय विद्येचं माहेरघर म्हणून हे पहिल्यापासून प्रसिध्द आहे. सर्व देशातून संस्कृत भाषा शिकण्यासाठी काशी येथे विद्यार्थी येत असत आणि त्या भाषेचे पंडित होऊन मग स्वगृही परत जात. हे भगवान शंकर विश्वेश्वर यांचं स्थान म्हणूनही प्रसिध्द आहे. शिवाय भारतीयांची अशी श्रध्दा आहे की या काशीक्षेत्रात जर आपल्याला मृत्यू आला तर आपल्याला मोक्ष मिळतो. या कारणासाठी बरीच वृध्द मंडळी आपल्याला काशीक्षेत्री मृत्यू यावा म्हणून जीवनाची शेवटची काही वर्षे काशी क्षेत्रातच वास करतात. त्याना असंही सांगितलेलं असतं की साक्षात् भगवान् चंद्रमौळी शिवशंकरच मरत्या जीवाच्या अंतकाळी त्याला परमहितकर अशा रामनामाचा उच्चार त्याच्या कानामध्ये करतात व अंतकाळी श्रवणी पडलेल्या या रामनामाच्या अतुल सामर्थ्याने जीव उध्दरून जातो. त्यामुळे त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. म्हणजे शेवटी हे मोक्षाचे फळ रामनामाच्या महात्म्यानेच प्राप्त होतं. कारण भगवान शंकराच्या मुखात नेहमी रामनामच असतं.

पण जो सदा रामनाम स्मरणातच रंगलेला आहे त्याला मग मुक्तीकरता देह ठेवण्यासाठी काशीतच गेलं पाहिजे असं नाही. कारण प्रेमाने केलेल्या नामस्मरणाने देवच त्याचा ऋणी होतो व त्याला हवी असल्यास मुक्ती देतो. या संबंधात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, **'ते ऋणवेपण देखोनि अंगी । मी आपुलियाची उत्तीर्णत्वालागी । भक्ताचिया तनुत्यागी । परिचयी करी ।। म्हणोनी देहान्तीचे साकडे । माझिया भक्ता काहीचि न पडे । मी आपुलियाते आपुलीकडे ।सुखेचि आणी । (८/१३१,१३४).**

अर्थ - मी माझ्या भक्ताचा ऋणी असतो म्हणून त्या ऋणातून थोडंतरी उतराई व्हावं यासाठी मीच माझ्या भक्ताची सेवा करतो. त्यामुळे माझ्या भक्ताला त्याने देह सोडण्याचे वेळी त्याला हवं असेल तर मीच त्याला माझ्याकडे आणतो व माझ्यात सामावून घेतो. पण त्याला माझी भक्ती करायची असेल तर त्याला मी योग्य अशा घरात जन्म देतो जिथून तो माझी पुढील जन्मी सुखाने भक्ती करू शकेल. म्हणून आपण जसं व जितकं जमेल तितकं नामस्मरण सदैव करावं हेच आपल्याला श्रेयस्कर आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**यथासांग ते कर्म काही घडेना । घडे धर्म तो पुण्य गाठी पडेना ।**
**दया पाहता सर्व भूती असेना । फुकाचे मुखी नाम तेही वसेना ।।१००।।**

या श्लोकात समर्थांनी ज्याच्या हातून कोठलीच गोष्ट व्यवस्थित घडत नाही, अशा माणसाचं वर्णन केलं आहे. सर्वसामान्य माणसाची स्थिती साधारणपणे अशीच असते. त्याच्या हातून कोणतंही धार्मिक कर्म शास्त्रात सांगितल्याप्रमाणे म्हणजे यथासांग घडत नाही. कारण अशा कार्याला आपण समारंभाची जोड दिली आहे. उदा. मुंजीसारखं धार्मिक कार्य घ्या. बटु म्हणजे मुलगा गुरूगृही विद्या संपादन करण्यासाठी आपलं घर व नातेवाईक सोडून जातो तेव्हा हे धार्मिक कृत्य केलं जातं. यात त्याच्यावर सर्व त्यागाचे संस्कार करायचे असतात. पण प्रत्यक्षात मात्र त्याला भरजरी पोषाख दिला जातो. नातेवाईक तऱ्हेतऱ्हेचा अहेर त्याला करत असतात. मुंजीनिमित्त दुपारी जेवणावळी उठतात. मोठा अलीशान मंडप घातलेला असतो, किंवा हॉल भाड्याने घेतलेला असतो. हॉल विजेच्या रोषणाईने झगमगत असतो आणि बँडच्या आवाजाने दणाणून सोडलेला असतो. मुंजमुलाची घोड्यावरून किंवा मोटारीतून मिरवणूक काढली जाते. भिक्षावळसुध्दा थाटात साजरी होते. फक्त भटजींच्या दक्षिणेत काटकसर केली जाते आणि विशेष म्हणजे ज्या गायत्री मंत्राच्या प्रदान प्रक्रियेसाठी हा संस्कार निर्माण केला आहे त्याच्याकडे मात्र कोणाचं लक्ष नसतं. कारण वडिलानी कधी गायत्रीमंत्राचा जप केलेला नसतो व मुलानेही तो करावा अशी अपेक्षा नसते. अशा परिस्थितीत मुंजमुलावर त्यागाचे संस्कार कसे घडणार? अशी धार्मिक कृत्यं ही देवाणघेवाणीच्या समारंभावर आधारलेली असल्यामुळे त्यातून निरपेक्ष दानधर्मातून उद्‌भवणाऱ्या पुण्याचा वाटा दात्याच्या पदरात पडत नाही.. त्याऐवजी अपेक्षातून उद्‌भवलेले गैरसमजच बहुधा पदरात पडतात. काही माणसांच्या अंतःकरणात दया उत्पन्न होते पण ती सर्व भूतांच्या बाबतीत सारखी असत नाही. त्यामुळे तिचं स्वरूप 'दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।' असं रहात नाही. रंजल्या गांजलेल्या मनुष्याला कोणीच आपुलकीच्या भावातून मदत करत नाहीत. तर भिकाऱ्याच्या तोंडावर तुकडा फेकावा तशी तुच्छतेच्या भावनेतून बहुधा मदत केली जाते. या सर्व गोष्टीचा परिणाम म्हणून फुकट असलेलं रामनामसुध्दा सामान्य माणसाच्या मुखातून सहजपणे येत नाही. कारण यामुळे माझा जो वेळ व शक्ती खर्च होणार आहे त्यातून माझ्या पदरात काय पडणार आहे असा त्याचा प्रश्न असतो. म्हणून त्याला देवाचं नाव फुकट असलं तरी ते तोंडाने घ्यावं असं वाटत नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



बुधवार

**जया नावडे नाम त्या येम जाची । विकल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची ।**
**म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे । मुखे बोलता दोष जाती स्वभावे ।।१०१।।**

नामाचं महत्व वर्णन करणाऱ्या या श्लोकातून समर्थ सांगत आहेत की ज्याला काहीतरी संशय आल्यामुळे नामासंबंधी वेडीवाकडी तर्कटं रचायची सवय झाली आहे आणि त्यामुळे ज्याला नामस्मरणाची आवड नाही त्याना अंती नरकवास भोगावा लागतो व यमयातना सहन कराव्या लागतात, व जीवनात त्यांची छी थू होते. म्हणून अत्यंत प्रेमाने रामाचं नाव घ्यावं म्हणजे आपल्या स्वभावातले दोष हळूहळू निघून जातात. ज्याचं नाम घ्यायचं तो ईश्वर मुळात आहे की नाही, असल्यास आम्ही त्याचं नाम घेतल्यावर त्याच्या बदल्यात तो आम्हाला काय देणार आहे? अशी या लोकांची पहिली शंका असते. हिचंच निरसन न झाल्यामुळे तो मग देवाचं नाम घेत नाही. त्यांतून मग अहंकाराचा उदय होतो. या अहंकारातून मग ममत्व आणि त्याचं अवास्तव महत्व या गोष्टी निर्माण होतात. त्यातून मग मला आवडणाऱ्या गोष्टी माझ्या मालकीच्या असाव्यात ही भावना निर्माण होते. यातूनच मग पाप करूनसुध्दा या गोष्टी मिळवाव्यात असं वाटू लागतं. अशा तऱ्हेने अति हव्यासातून पापाचे डोंगर रचले जातात. त्याचा परिणाम म्हणून साहजिकच मृत्यूनंतर जीवाला नरक यातना भोगाव्या लागतात आणि यमधर्माचा जाच सहन करावा लागतो. म्हणून माणसानं अत्यंत प्रेमाने देवाचं नाम घ्यावं म्हणजे आपल्या स्वभावातील दोष हळूहळू अदृश्य होऊ लागतात. हे दोष कोणते? तर अपेक्षा, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता हे आपल्या स्वभावातील दोष आहेत. उदा. मला एखादी गोष्ट हवी असली तर ईश्वरीसंकल्पात असेल तरच ती मला मिळेल हे लक्षात आलं की माझ्या मनात तिच्या विषयी अपेक्षा व काम हे विकार निर्माणच होत नाहीत. मग साहजिकच ती वस्तू मिळाली नाही तरी मनात राग उत्पन्नच होत नाही. तसंच ती मिळाली तरी त्यापासून मद म्हणजे गर्व होत नाही. बरं, ती गोष्ट दुसऱ्याकडे असली तरी ईश्वरीसंकल्पातच ती त्याच्याकडे असावी असं आहे हे समजल्यावर मनात त्याच्याविषयी मत्सर येतच नाही. अशाच तऱ्हेने विचार केल्यावर मनातले दुष्ट विचार नाहीसे होतात व त्याजागी मनात सद्‌विचार प्रस्थापित होतात. म्हणूनच सतत रामनाम घेतलं की तुमच्यात देवमाणसांचे गुण अवतरतील व दोष नाहीसे होतील असं समर्थांनी सांगून नाममाहात्म्याच्या प्रकरणाचा उपसंहार केला आहे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## गुरूवार

**अति लीनता सर्व भावे स्वभावे । जना सज्जनालागी संतोषवावे ।**
**देहे कारणी सर्व लावीत जावे । सगुणी अती आदरेसी भजावे ।।१०२।।**

माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीचा मार्ग कसा असावा ते समर्थ या श्लोकात सांगत आहेत. माणसाने विनयी असावं, नम्र असावं. ही नम्रता माणसाच्या स्वभावातच असावी. म्हणजे ती सर्वच ठिकाणी असावी. लीनता हा एक दुर्मिळ गुण आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याला प्रसन्न करण्याचं एक साधन किंवा लोकप्रियतेचं साधन म्हणून माणसं लीनतेचा मुखवटा चेहेऱ्यावर धारण करतात. विशेषतः निवडणुका जवळ आल्या की या नम्रतेचं प्रदर्शन उमेदवारांच्या चेहेऱ्यावर नको तितकं उमटतं. पण तो सर्व तात्पुरता देखावा असतो. पण नम्रतेच्या संदर्भात तुकाराम महाराज म्हणतात, 'नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।।' माणसाचा अहंकार इतका प्रबळ असतो की आपल्याशिवाय इतर माणसाना मोठं मानायला कोणीही तयार नसतो. त्यामुळे अहंकार गेल्याशिवाय हा गुण माणसाला प्राप्त होत नाही. पण हा गुण अंगी बाणला की सर्व लोकाना विशेषतः सज्जनाना संतोष होईल अशीच भक्ताची वागणूक असते. तसंच आपलं शरीर सर्वांच्या सुखासाठी, इतरांच्या उपयोगी पडावं म्हणून झिजलं पाहिजे. या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।।' माणसांचं शरीर ही त्याला मिळालेली एक सर्वश्रेष्ठ देणगी आहे. ती त्याने समाजाच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे. निरपेक्ष भावनेने प्रामाणिकपणाने केलेली समाजाची सेवा ही सज्जनाना संतुष्ट करते. या बाबतीत जे आपणास शक्य असेल ते आळस सोडून दक्षतेने सेतुबंधनातील खारीच्या भावनेने करावं. आपल्या वाट्यास आलेलं काम लहानमोठं न मानता, पूर्णपणे जीव ओतून करावं. सगुण म्हणजे ईश्वराचे गुणधर्म म्हणजे सर्वभूती दया, नम्रता, करूणा, प्रेम, वात्सल्य, आदर, समभाव, ऐक्यभाव इत्यादि सद्‌गुणांचं नेहमी आदरपूर्वक भजन करावं. मनन, चिंतन करावं. हे गुण आपल्या अंगी बाणावेत यासाठी मनात तीव्र तळमळ असावी. शरीर, इंद्रिये, मन, बुध्दी व जीवभाव ही सर्व या ईश्वरी सद्‌गुणांच्या प्राप्तीसाठी झिजवावीत. या सद्‌गुणांची आपल्या जीवनात समृध्दी झाली की मग त्या ईश्वराशी एकरूपता होणं दूर नाही. ही एकरूपता हेच साधकाच्या जीवनाचं ध्येय असावं, असं समर्थानी या श्लोकात सांगितलं आहे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**हरीकीर्तने प्रीती रामी धरावी । देहेबुध्दि नीरूपणी वीसरावी ।**
**परद्रव्य आणीक कांता परावी । यदर्थी मना सांडि जीवी करावी ।।१०३।।**

या श्लोकात समर्थ कीर्तन भक्तीचं वर्णन करत आहेत. आपल्या शास्त्रात ईश्वरप्राप्ती होण्यासाठी नवविधा म्हणजे नऊ प्रकारची भक्ती सांगितली आहे. पहिली भक्ती ज्ञानेंद्रियातून घडते तर दुसरी भक्ती कर्मेंद्रियातून म्हणजे वाणीच्याद्वारे केली जाते. श्रवण भक्ती म्हणजे ऐकण्याची भक्ती. पण कोणीतरी बोलणारा असल्याशिवाय ही भक्ती घडेल कशी? म्हणून दुसरी कीर्तन भक्ती सांगितली आहे. या कीर्तनाचे दोन भाग असतात. पहिल्या भागाला पूर्वरंग म्हणतात. यात ईश्वराची भक्ती कशी करावी ते एखाद्या अभंगाच्या निरुपणाच्याद्वारा सांगितलेलं असतं. तर दुसऱ्या भागाला आख्यान असं म्हणतात. यात एखाद्या भक्ताचं किंवा संतसत्पुरुषाचं चरित्र, त्यातल्या ओव्या, साक्या, आर्या व पदं यांच्या माध्यमातून गद्यासह म्हणजे प्रवचनाच्या द्वारा वर्णन करून सांगतात. यातल्या निरूपणामध्ये ईश्वराच्या प्रेमाचं वर्णन केलेलं असावं, त्याच्या प्राप्तीचे उपाय सांगितलेले असावेत म्हणजे श्रोत्याना करमणुकीबरोबरच त्यांच्या कल्याणाचा मार्गही ऐकायला मिळतो. त्यावर मग त्याना फावल्या वेळात चिंतन करता येतं. तसंच या ईश्वरप्राप्तीच्या आड येणारी 'मी देहच आहे', ही बुध्दी कशी विसरता येईल किंवा ती कशी बाजूला ठेवता येईल याचंही शिक्षण या निरूपणातून उत्सुक श्रोत्याना, साधकाना मिळालं पाहिजे. जीव, जगत् आणि ईश्वर यांचे खरे संबंध काय व कसे आहेत याचं उद्‌बोधन या कीर्तनाद्वारा श्रोत्यांच्या मनाचं झालं पाहिजे. तसंच ईश्वरप्राप्तीच्या आड येणाऱ्या विकारांचं निर्मूलन कसं करावं याचंही प्रशिक्षण याच कीर्तनाच्याद्वारा साधकाना मिळालं पाहिजे. म्हणजे कामवासना आणि धनाचा लोभ या दोन विकारांचा विनाश होईल. कारण आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी माणसाला पैशाची गरज असते. आपल्याकडे पैसा नसल्यास दुसऱ्याच्या पैशाचं अनीतीने अपहरण करून आपल्या इच्छा पुऱ्या कराव्या असा माणसाला मोह होतो. पण यातून प्रचंड पापाची निर्मिती होऊन शेवटी दुःखच भोगावं लागतं. कामवासनेचंही तसंच आहे. म्हणून या दोन्ही गोष्टींचा त्याग करावा म्हणजे देहबुध्दी कमी होईल असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# || मना सज्जना ||



## शनिवार

**क्रियेवीण नानापरी बोलिजेते । परी चित्त दुश्चित्त ते लाजविते ।**
**मना कल्पना धीट सैराट धावे । तया मानवा देव कैसेनि पावे ।।१०४।।**

या श्लोकात समर्थांनी देव ज्या कोणाला पावत नाही अशा माणसाचं वर्णन केलं आहे. स्पष्टवक्तेपणाने केले आहे. सर्वसामान्यपणे प्रत्येक माणसाला देव भेटला तर हवाच असतो.पण तो कशासाठी? तर देवाने त्याच्यवर प्रसन्न होऊन त्याच्या सर्व इच्छा पुऱ्या कराव्या म्हणून. सामान्य माणसाला असं वाटतं की देव भेटून जर काही फायदा होणार नसेल तर तो भेटण्याची गरजच काय? पण ज्याला देव खरोखरच भेटायला हवा असेल तर त्याने कोणती पथ्यं पाळली पाहिजेत ते समर्थांनी या श्लोकात सांगितलं आहे.माणसाने फक्त देवासंबंधी बडबड केली की देव सर्वत्र आहे वगैरे, पण त्याचं चित्त जर विकारानी बरबटलेलं असेल तर त्याच्या हातून बोलण्याप्रमाणे आचरण होणार नाही. या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात की, 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।।' तर एक कवी म्हणतात, ' विचारासम आचरण । त्याचे स्पर्शावे चरण ।।' जोपर्यंत बुध्दीत अहंकार असतो तोपर्यंत चित्तात काम, क्रोध, अनीती इ. विकार माणसाला लाज वाटावी इतक्या प्रमाणात थैमान घालत असतात. त्याच्याच जोडीला त्याची कल्पनाशक्ती स्वैरपणे व धीटपणे धावत सुटली की मग बुध्दीला वस्तुस्थिती कोणती व कल्पना कोणती हाच बोध होईनासा होतो. निसर्गाचा नियम असा आहे की वस्तुस्थिती ही कधीच दुःख किंवा सुख निर्माण करत नाही. एकदा ती शांतपणे स्वीकारली की मनात सुख-दुःखाचं द्वंद्व सुरू होत नाही. पण ती कशी असावी यासंबंधी मनात कल्पना उद्‌भवली की ती मानसिक सुखदुःख निर्माण करू लागते. भूतकाळातील घटनांसंबंधी तसं घडलं नसतं तर बरं झालं असतं व भविष्यकाळात घडणाऱ्या गोष्टीसंबंधी असं असं झालं तर बरं होईल असं वाटणं या सुखदुःख निर्माण करणाऱ्या कल्पनाच आहेत. कारण भूतकालात घडून गेलेल्या घटना कधीही बदलत नाहीत व भविष्याकाळात घडणार असलेल्या घटना या त्या वर्तमानकाळात आल्याशिवाय आपल्याला समजत नाहीत. या घटना ईश्वरीसंकल्पात असेल तशाच घडतात. हे ज्याला कळत नाही त्याला देव कसा पावेल म्हणजे समजेल असं समर्थ विचारतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार


**विवेके क्रिया आपुली पालटावी । अती आदरे शुध्द क्रिया धरावी ।**
**जनी बोलण्यासारखे चाल बापा । मना कल्पना सोडि संसारतापा ।।१०५।।**

गेल्या श्लोकात केलेला उपदेशच समर्थांनी पुढे चालू ठेवला आहे. माणसाचं वर्तन बहुधा अहंकाराच्या वर्चस्वाखाली घडत असतं. त्यामुळे ते अनेक वेळा अशुध्द चित्तातून उगम पावतं. म्हणून ते कर्म अशुध्दीने लिडबिडलेलं असतं. ही अशुध्दी, विवेकशक्ती वापरून दूर करता येते. वास्तविक चांगलं कोणतं, वाईट कोणतं, योग्य काय, अयोग्य काय, काय करावं, काय करू नये याची जाणीव माणसाला शास्त्राने रूढीने, वडीलधाऱ्यांच्या उपदेशाने झालेली असते. पण तसं वर्तन करण्यासाठी आवश्यक असणारं सामर्थ मन मात्र माणसाकडे असत नाही. कारण मनाने ते सामर्थ्य आपल्या चंचलपणाने व्यर्थ घालवलेलं असतं. म्हणून आपली विवेकबुध्दी वापरूनच माणसाला आपली अशुध्द क्रिया शुध्द करून घ्यावी लागते. पण विवेकबुध्दी म्हणजे काय? तर अहंकाररहित बुध्दीने एखाद्या प्रश्नाचा त्या प्रश्नाच्या सर्व बाजू समजावून घेऊन व त्यासंबंधी असलेलं आपलं सर्व ज्ञान वापरून केलेला विचार व त्यातून घेतलेला निर्णय. या संदर्भात आपल्याकडे दोन प्रकारचे विवेक प्रसिध्द आहेत. एक नीरक्षीरविवेक (जो फक्त दूधवाल्या भैय्यालाच माहित असतो) आणि दुसरा नित्यानित्यवस्तुविवेक म्हणजे या जगात चिरकाल टिकणारं नित्य काय आणि थोड्यावेळाने नाश पावणारं अनित्य काय याची जाण असणं आणि अनित्य गोष्टींचं आकर्षण नसणं. तसंच हे अशुध्द कर्म एका क्षणात शुध्द होत नाही. तर ते हळूहळू, पायरीपायरीने शुध्द होत जातं तोपर्यंत अत्यंत आदराने म्हणजे प्रेमाने विवेकबुध्दीचा वापर करावा लागतो आणि मग माणूस जसा बोलतो तसाच वागू लागतो. किंबहुना विवेकशक्तीचा वापर केल्यानंतर माणसाचं कमीतकमी बोलणं व चालणं यात एकवाक्यता असावी अशी समर्थांची अपेक्षा आहे म्हणून ते बाबापुता करून आपल्याला समजावून सांगत आहेत, आणि या संसाराच्या कटकटीतून कायमची सुटका करून घ्यायची असेल तर अनावश्यक कल्पनांचाही त्याग करावा लागेल. त्यातली पहिली कल्पना अशी की आपण पुढचा क्षण जिवंत रहाणार आहोत. दुसरी कल्पना अशी की तो क्षण आपण निरोगी स्थितीत जगणार आहोत आणि तिसरी कल्पना अशी की तो क्षण आपण सुखात जगणार आहोत. पहिली कल्पना मृत्यूचं, दुसरी रोगाचं व तिसरी कल्पना दुःखाचं भय निर्माण करते आणि यातून सर्व संसारताप सुरू होतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा । विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा ।**
**दया सर्व भूती जया मानवाला । सदा प्रेमळ भक्तिभावे निमाला ।।१०६।।**

या श्लोकात माणसाने विवेकाच्या सहाय्याने आपलं जीवन कसं विकसित करून घ्यावं ते समर्थ सांगत आहेत. शरीराच्या स्वच्छतेसाठी स्नान व मनाच्या शुध्दतेसाठी त्रिकाल संध्या असा क्रम समर्थांनी सांगितला आहे. एक शरीरशुध्दीसाठी तर दुसरी मनाच्या शुध्दीसाठी आहे. पहिल्या क्रियेत पाणी (गरम किंवा गार) व तेल आणि साबण (हल्ली शँपू) या गोष्टी वापरतात. पण नदीत स्नान असल्यास नदीकाठची किंवा तळातली मातीसुध्दा पुरते. त्यामुळे साबण डोळयात जाण्याची भीती नसते. काठाची धूळ ही दुसऱ्याच्या डोळयात फेकण्यासाठी असल्यामुळे ती आपल्या डोळयात जात नाही. पूर्वी स्वयंपाक करण्याच्या अगोदर स्नान करण्याचा रिवाज होता. पण हल्ली मात्र जसा भैरवीचा रियाज केव्हाही केला तरी चालतो, तसं आंघोळ केव्हाही केली तरी चालते. कारण आंघोळ हा शब्दच अंग ओलं या शब्दापासून झाला आहे. त्यामुळे स्नानाला लावलेली समयाची आवश्यकता काढून टाकली की आंघोळ होते. स्नान समयी 'हर हरगंगे, भागीरथी' असा घोष करूनमग डोक्यावर पाण्याचा तांब्या ओतण्याची प्रथा असे. हल्ली आंघोळ कोणाच्याही नावाने केली तरी चालते. संध्या या उपासनेमध्ये देवाची २४ नावं, दिग्बंधन, प्राणायाम आणि गायत्री मंत्राचा जप या गोष्टींचा समावेश आहे. या गायत्री मंत्रामध्ये सूर्य आमच्या बुध्दीला चांगल्या प्रेरणा देवो, अशी त्याची प्रार्थना केली आहे. या चांगल्या प्रचोदनांमुळे आपल्या बुध्दीत विवेकप्रज्ञा जागृत होते. फक्त हा जप व हे नामस्मरण पूर्ण एकनिष्ठेने म्हणजे पूर्ण श्रध्देने करावं लागतं म्हणजेच ती बरी म्हणजे उत्तम प्रकारे होते. या विवेकशक्तीच्या सहाय्याने आपलं स्थानभ्रष्ट म्हणजे झालेलं मन आवरून ते ईश्वराच्या ठिकाणी लावता येतं. यातूनच मग भक्ताचं मन हळुहळू शांत होऊन ते विषयातून बाहेर पडतं. मग सर्व भूतांच्या ठायी प्रेम व दया ही अशा मनात देवभक्तीमुळे उत्पन्न होते. यासंबंधात तुकाराम महाराज म्हणतात, 'भूतांची दया हे भांडवल संता', तर कबीर म्हणतात, 'दया धरमका मूल है' [redacted]'. असा भक्त स्वतः प्रेमरसाने ओथंबलेला तर असतोच. शिवाय तो जिकडे पाहील त्या दिशेत प्रेमाचा वर्षाव होतो. म्हणून गोंदवलेकर महाराज म्हणतात, 'प्रेमात राम रमतो प्रेमाला मोल ना जगामाजी'. म्हणून परमशांत अशा निवालेल्या मनातूनच भक्तीभाव व सर्वाभूती प्रेम आणि दुःखितांबद्दल दया निर्माण होऊ शकते, असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## मंगळवार

**मना कोप आरोपणा ते नसावी । मना बुध्दि हे साधुसंगी वसावी ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी । मना होई रे मोक्षभागी विभागी ।।१०७।।**

मागील श्लोकात मनाला आलेली शांती कशी स्थिर करावी याचे उपाय समर्थांनी या श्लोकात सांगितले आहेत. कुठल्याही परिस्थितीत मनाला क्रोध, संताप किंवा राग येऊ देऊ नये, हा पहिला उपाय. या संसारात आपल्याला राग येण्याचे प्रसंग वारंवार येतात. त्यामुळे मनाची शांती बिघडते. त्याची कारणं अनेक असतात. कधी जे आवडतं म्हणून हवं असतं ते मिळत नाही तर कधी जे नको असतं ते डोक्यावर बसतं. नातेवाईक बोलू नये ते बोलतात, वागू नये तसं वागतात. आपलीच माणसं फसवतात. याच परिस्थितीत आपण शांत रहाण्याचा अभ्यास केला पाहिजे. यासाठी उत्तम उपाय समर्थांनी दुसऱ्या ओळीत सांगितला आहे. तो म्हणजे आपल्याला जितकं जमेल तितकं जास्तीत जास्त वेळ संतसज्जनांच्या संगतीत रहाणं. समर्थांनी इथे बुध्दी हा शब्द वापरला आहे. नुसतं शरीर राहून चालत नाही. नाहीतर एखादा संत हॉस्पिटलमध्ये राहिल्यावर तिथल्या आया, नर्सेस, डॉक्टर व वॉर्डबॉईज यांचा आपोआपच उध्दार झाला असता. कारण यांचं शरीर जरी संतांच्या सहवासात असलं तरी त्यांची बुध्दी तो हॉस्पिटल सोडताना आपल्याला किती प्राप्ती होईल याच विचारात गर्क असते. संतांचा उपदेश, विचार व आचरण यांचा आपल्या अशांत मनावर चांगला परिणाम होतो. टाळण्यासारखी आणखी एकच गोष्ट म्हणजे विषयांचा संग किंवा आसक्ती. ही अत्यंत घातक आहे. म्हणून समर्थांनी या संगाला नष्ट आणि चांडाळ अशी विशेषणं लावली आहेत आणि या संगाचा तत्काळ त्याग केला पाहिजे असं सांगितलं आहे. समर्थांचा गरजेनुसार विषय भोगण्याला विरोध नाही.पण त्यांची आसक्ती, त्यांचा संग हा बाधक आहे म्हणून त्याचा त्याग करावा असं समर्थ सांगतात.असं केलं तरच मोक्षाचा अधिकारी (मोक्षभागी) असलेल्या जीवाला मोक्षाची प्राप्ती होते. मोक्ष ही काही बाहेरून मिळवण्याची गोष्ट नाही. 'न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले । मोक्षो हि चेतो विमलं सम्यक् ज्ञाननिबोधितं ।।' मोक्ष हा आकाशातून पावसासारखा पडत नाही, पाताळातून आडासारखा वर येत नाही तर शुध्द व निर्मल चित्तामध्ये ईश्वरासंबंधीचं सत्य ज्ञान होऊन त्याच्याशी एकरूप होणं हाच मोक्ष आहे आणि हे कसं करावं हे सांगण्यासाठीच समर्थांनी या श्लोकाच्या द्वारा आपल्याला तळमळीने उपदेश केला आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**सदा सर्वदा सज्जनाचेनि योगे । क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१०८।।**

या श्लोकात समर्थ सज्जनसंगतीचं महत्व सांगत आहेत. पण सज्जन कोणाला म्हणावं तर ज्याला सत् म्हणजे वैश्विक अस्तित्वाची ज्यात कधीही बदल किंवा रुपांतर होत नाही अशा 'सत्'ची जाण असते, भान असतं व अनुभव असतो अशालाच सज्जन असं म्हणावं. आणि अशा सज्जनसंगतीनेच माणसाच्या अशुध्द कृतीमध्ये बदल होऊन त्याची क्रिया भक्तिभावपूर्ण होऊ लागते. पण अशी सज्जनाची संगति माणसाला सदा आणि सर्वदा म्हणजे नेहमीच लाभली पाहिजे. ईश्वराला सत्-चित् आनंद असं म्हणतात. त्यातलं सत् म्हणजे कधीही न बदलणारं वैश्विक अस्तित्व, चित् म्हणजे वैश्विक चैतन्यशक्ति, जिच्या प्रकटीकरणात नेहमीच म्हणजे क्षणोक्षणी बदल होत असतो. ही चैतन्यशक्ती सजीव प्राण्याना आणि वस्तूना जन्म देते म्हणजे त्यांची रूपं धारण करते. आणि त्यांच्या परस्परसंबंधातून तिची जी लीला प्रकट होते, तिला वैश्विक स्तरावर आनंद असं नाव आहे. या सर्व वस्तूना व प्राण्याना ओळखण्यासाठी आपण जी नावं दिली आहेत तिला नाम असं म्हणतात. यांच्या गुणधर्माना आपण रूप असं सामान्य नाव दिलं आहे. त्यामुळे या विश्वाला म्हणजे विश्वातील वस्तूना सच्चिदानंदनामरूपात्मक असं म्हणतात. हे सारं ज्ञान ज्याला असतं त्याला संतसज्जन किंवा सत्पुरुष असं म्हणतात. अशा माणसाच्या उपदेशाचं श्रवण केलं असता 'श्रवण केलियाचे फळ । क्रिया पालटे तत्काळ ।।' असं समर्थ दासबोधात म्हणतात.

दोन माणसं जेव्हा एकमेकाना भेटतात तेव्हा त्यांच्यामध्ये काहीना काही संभाषण होतं. त्यातला एक जर देवभक्त असेल तर त्याने आपल्याला जितका अनुभव आहे, आपल्याला ज्या कृतीची माहिती आहे त्या कृतीविषयीच फक्त बोलावं. जी गोष्ट आपल्याला माहित नसेल तिच्याविषयी आपण बोलू नये. दुसऱ्याने विचारलं तरी आपल्याला माहित नाही असं सांगावं. शिवाय दुसऱ्याच्या ज्या मताशी आपण सहमत नसू त्यासंबंधी उगाच वाद घालू नये. विवाद, वितंडवाद हा नेहमी टाळावा. त्यातून डोकेदुखीशिवाय काहीही निष्पन्न होत नाही त्याऐवजी उभयपक्षी हितकारी असा सुसंवाद करावा आणि असा सुसंवाद फक्त सज्जनांच्या सत्संगतीतच होऊ शकतो. म्हणून समर्थानी, 'तुटे वाद संवाद तो हीतकारी' ही ओळ शेवटी असलेले पुढचे चार श्लोक लिहीलेले आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार

**जगी वादवेवाद सोडूनि द्यावा । जनी सूखसंवाद सूखे करावा ।**
**जगी तोचि तो शोकसंतापहारी । तुटे वादसंवाद तो हीतकारी ।।१०९।।**


समर्थ या श्लोकात आपल्याला चारचौघात वादविवाद करू नये त्याऐवजी सुसंवाद किंवा सुखसंवाद करावा असं कळकळीने सांगत आहेत. माणसाच्या अहंकाराचं एक प्रमुख लक्षण म्हणजे तो जे करतो, जो विचार करतो तो नेहेमीच बरोबर आहे असं त्याला वाटतं. त्याच्या दृष्टीने चुकतं ते नेहमी इतरांचंच. कोठल्याही विषयावर त्याचं जे मत झालेलं असतं ते बरोबरच असतं. असा माणूस जेव्हा दुसऱ्याशी किंवा चारचौघात आपल्या मताबद्दल बोलतो तेव्हा ज्यांचं मत याच्यासारखंच असतं त्यानाच फक्त ते पटू शकतं. पण ज्यांचं मत याच्यापेक्षा वेगळं असतं त्याना मात्र आपलं स्वतःचंच मत बरोबर आहे व याचं मत चूक आहे असं वाटतं. मग त्यानी तसं त्याच्याकडे बोलून दाखवलं की वाद सुरु होतो. नंतर प्रत्येक जण आपला मुद्दा हिरीरीने मांडतो. अनेक वेळा तर इतरांवर ते खोटं बोलत असल्याचा आरोप केला जातो मग त्यातून चिडचिड, यात महिला सहभागी असल्यास रडारड, पुरुष असल्यात आरडाओरड आणि शेवटी मुद्यावरून गुद्यावर हे भांडण घसरतं व मग एकमेकाचं तोंड पहाणार नाही असा निश्चय करुन सर्वांची फाटाफूट होते. म्हणून 'वादो न अवलंब्यः' असं देवर्षी नारदानी आपल्या भक्तीसूत्रात म्हटलं आहे. तर 'वादे वादे जायते शीर्षनाशः' असं एका कवीने खवचटपणे म्हटले आहे.

पण शंकानिरसनासाठी एखाद्या जिज्ञासूने प्रश्न उपस्थित केला आणि जाणकार व अधिकारी व्यक्तीने त्याचं यथायोग्य उत्तर दिलं तर तो मात्र सुखसंवाद होतो. असे प्रश्न कसे विचारावे याचं उत्तर गीतेत दिलं आहे. 'तद् विध्दी प्रणिपातेन परीप्रश्नेन सेवया ।' म्हणजे प्रश्नकर्त्याने प्रथम नमन करून, मग सेवा करून मगच प्रश्न विचारावा. मग ज्ञानी पुरुष त्याचं योग्य ते उत्तर देतात. असं उत्तर हे नेहमीच प्रश्नकर्त्या साधकाचा शोक व संताप म्हणजे राग शांत करणारं व दुःख हरण करणारं असं असतं. म्हणून साधकाने कधीही वितंडवाद घालू नये. स्वतःच्या मताचा कधीही आग्रह धरू नये. माणसाने थोडं बोलावं पण ते अगदी गोड बोलावं, असं एक संतपुरुष नेहमी सांगत असत ते आपण लक्षात ठेवलं पाहिजे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**तुटे वाद संवाद त्याते म्हणावे । विवेके अहंभाव याते जिणावे ।**
**अहंतागुणे वाद नाना विकारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११०।।**

या श्लोकात समर्थांनी वाद करण्याच्या प्रवृत्तीचं मूळ अहंकारात असतं हे सांगितलं आहे. त्या अहंकाराला जिंकण्याचा उपाय विवेकशक्ती हा आहे हेही अगदी आवर्जून सांगितलं आहे. वादाचा अभाव असलेलं संभाषण म्हणजे संवाद अशी त्यानी संवाद या शब्दाची व्याख्या केली आहे. वाद या शब्दाची निर्मिती 'वद' या धातूपासून झाली आहे. वद म्हणजे बोलणं. त्यातून वदन म्हणजे बोलणारं मुख असा शब्द तयार झाला. म्हणून वाद म्हणजे बोलण्याची क्रिया. ही निरर्थक किंवा अर्थपूर्ण अशी दोन्ही प्रकारे होऊ शकते. म्हणून ज्यातून काहीही निष्पन्न होत नाही अशा निरर्थक बोलण्याला वाद म्हणावं. असं बोलणं हे बहुधा सत्यापेक्षा कल्पनेवर आधारलेलं असतं. कारण एकाला आलेला अनुभव हा दुसऱ्याला कल्पनेवर आधारलेला आहे असं वाटतं, तर तिसऱ्याला तो योगायोग वाटतो आणि चवथ्याला तर हा अनुभव धादांत (पूर्ण) खोटाआहे असं वाटू लागतं. समर्थ म्हणतात की या सर्व प्रतिक्रिया अहंकारावर आधारलेल्या असतात. अहंकारावर आधारलेल्या वादातून अनेक विकार निघू शकतात. उदा. एखाद्याने दूरदर्शनचा संच विकत घेतला असेल त्याच्यापेक्षा तो कमी किंमत आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याना सांगतो. मग त्याना इतक्या कमी किंमतीला मिळाला
मग आपल्यालाही असा संच मिळावा अशी इच्छा निर्माण होते (काम). याला इतक्या कमी किमतीला मिळाला म्हणून त्याचा मत्सर इतराना वाटू लागतो. आपण इतक्या कमी किमतीला हा संच मिळवला याचा खोटा गर्व (मद) मालकाला वाटू लागतो. अशा तऱ्हेने वादातून अनेक विकार निर्माण होतात. हा अहंकार विवेकबुध्दीतून नेस्तनाबूत करता येतो. वरील उदाहरणात आपल्याला सर्वांनी हुशार म्हणावं, व्यवहारचतुर म्हणावं या अहंकारापोटी मुद्दाम कमी किंमत सांगण्याऐवजी मालकाने जरी त्याची खरी किंमत सांगितली असती तर पुढील विकारांची निर्मितीच झाली नसती. म्हणून माणसाने आपली विवेकबुध्दी वापरून अहंकारातून येणाऱ्या विचारांचा त्याग करावा व विवेकातून येणाऱ्या विचारांचा स्वीकार करावा व तसं आचरण करावं म्हणजे संभाषणातून वादविवाद निर्माण न होता त्यातून सर्वांना हितकारी असा सुसंवादच फक्त होईल असं समर्थांना इथे सुचवायचं आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## शनिवार

**हिताकारणे बोलणे सत्य आहे । हिताकारणे सर्व शोधूनि पाहे ।**
**हिताकारणे बंड पाषांड वारी । तुटे वाद संवाद तो हितकारी ॥१११॥**

माणसाचं खरं हित कशात आहे? माणसाच्या जीवनाचं खरं ध्येय काय असावं? या संबंधात सर्वांची एकवाक्यता झालेली दिसत नाही. कोणी म्हणतील माणसाने भरपूर पैसा कमवावा, श्रीमंत व्हावं, सात पिढ्याना पुरेल इतकं धन मिळवावं यातच जीवनाचं सार्थक आहे. तर आणखी कोणी म्हणतील की अरे पैशात काय ठेवलं आहे? पैसा क्या कोईभी कमाता है । पैशाने विकत घेता येतील अशा सुखदायक वस्तू फक्त माणसाना पैशामुळे मिळतील. उदा. माणसाला अगदी छपरी पलंग व मऊ मऊ गादी पैशाने विकत घेता येईल. पण सुखदायक झोप विकत घेता येईल का? त्याऐवजी चारचौघांनी आपली स्तुती करावी, समाजात मानमान्यता असावी, लोकानी नेता म्हणून आपली निवड करावी यातच जीवनसाफल्य आहे, तर आणखी कोणी म्हणतील की अरे, मारो गोली ये सब चीजोंको, इसमे क्या रखा है? त्यापेक्षा सुंदर स्त्रियानी आपल्या जीवनावर भाळावं, त्यानी आपल्यावर प्रेम करावं, आपल्यासाठी जान कुर्बान करावी आणि भ्रमराप्रमाणे सर्वांच्या सौंदर्याचा आस्वाद घ्यावा यातच जीवनाचा मझा आहे. तर शिवाय आणखीन कोणी म्हणतील या सर्व गोष्टी अशाश्वत आहेत. त्यापेक्षा आपण महाराज व्हावं, लोकाना उपदेश करावा, आपले चांगदेवासारखे हजारो शिष्य असावेत. त्यांची जीवनं आपल्या तालावर चालावित, हे जीवनाचं अंतिम ध्येय असावं. अशा या मतामतांच्या गलबल्यातून माणसाला जीवनाचं खरं हित कोणतं ते कळत नाही. पण त्याला जर ते शोधण्याची तळमळ असेल तर तो अनेक ग्रंथ वाचून, अनेक सत्पुरुषांच्या भेटी घेऊन किंवा त्यांची चरित्र वाचून तो अंतिम सत्य शोधून काढतो. ते हे की ईश्वराचं सत्यज्ञान करून घेणं व त्याची भक्ती करून त्याच्याशी एकरूप होणं हेच त्याच्या जीवनाचं अंतिम ध्येय असतं. पण काही पाखंडी लोक स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी यांच्या विरुध्द मोठ्या हिरीरिने प्रचार करीत असतात. या अंतिम सत्याविरुध्द बंड उभारतात. कमकुवत मन असलेल्या लोकांवर त्याचा परिणामही होतो. पण ज्याला खरंच आपलं हित साधायचं आहे त्याने आपल्याकडून या बंडाचा बीमोड करायलाच पाहिजे. म्हणजे त्याला समजलेलं सत्य हे इतरांच्या हितासाठी त्याने सर्वांना सांगायला पाहिजे. म्हणजेच वादविवाद सोडून देऊन सर्वांशी सुसंवाद साधला पाहिजे असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**जनी सांगता ऐकता जन्म गेला । परी वादवेवाद तैसाचि ठेला ।**
**उठे संशयो वाद हा दंभधारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११२।।**

जेव्हा मूल जन्माला येतं तेव्हा जगाचं लक्ष वेधण्यासाठी त्याला फक्त रडण्याचीच कला अवगत असते. पण जसा काल जाईल तसं ते हळूहळू आवाज करू लागतं. त्यातून ते अक्षर व शब्द उच्चारुन (आई-बाबा वगैरे) विशिष्ट व्यक्तींचं लक्ष आपल्याकडे खेचून घेऊ शकतं. तसंच ते हाताने वस्तू पकडून ठेवतं व त्यातूनच मालकीच्या भावनेचा म्हणजे ममत्वाचा उगम होतो. ते थोडंस मोठं झाल्यावर त्याला इतरांचं बोलणं समजतं व त्याला शब्दात किंवा वाक्यात ते उत्तर देऊ शकतं. यातूनच मग आपलं बोलणं दुसऱ्याला पटवावं म्हणून वादविवाद या प्रवृत्तीचा जन्म होतो. मग पुढे जन्मभर जरी हा इतरांचं ऐकत राहिला व इतराना आपलं म्हणणं सांगत राहिला तरी ही त्याची प्रवृत्ति काही शांत होत नाही. उलट दिवसेंदिवस वाढतच जाते. एका माणसाला मित्र भेटल्यावर तो त्याच्याशी स्वतःबद्दलच तासभर बोलत राहिला. मग तो मित्राला म्हणाला, अरे, मी एवढा वेळ तुझ्याशी माझ्याबद्दलच बोलत राहिलो. आता आपण थोडावेळ तुझ्याबद्दल बोलू. आता तू मला सांग, तुला माझ्याबद्दल काय वाटते ते. एखाद्या बोलभांड माणसाला दुसरा माणूस सांगतो की तुझ्या संगतीत अगदी हां हां म्हणता वेळ गेला. कारण तू सतत बोलत राहिलास त्यामुळे हां हां म्हणण्यापलीकडे मला दुसरं काही करावंच लागलं नाही. बोलण्यावर ज्याचं पोट अवलंबून आहे असे प्राध्यापक, शिक्षक, व्याख्याते, कीर्तनकार, पुराणिक हे जन्मभर बोलत असतात पण त्यांचं लक्ष मिळणाऱ्या पैशावर असल्यामुळे श्रोत्याना त्यांच्या उपदेशाचा काहीच लाभ होत नाही. त्यांच्या 'दांभिक' उपदेशावर श्रोत्यांच्या मनांत नेहमीच संशय निर्माण होत रहातो व त्यांचं मन जास्तच गोंधळात पडतं. मग पुन्हा पुन्हा त्याच त्याच शंका येत रहातात. यात नेहमी येणाऱ्या शंका म्हणजे ईश्वर खरोखरच आहे का? असल्यास त्याचा स्वतंत्रपणे अनुभव का येत नाही? सज्जन माणसाला नेहमी जास्त दुःख का भोगावं लागतं? आणि नामात मन एकाग्र का होत नाही? अगदी व्यास-वाल्मिकींपासून रामदास आणि गोंदवलेकर महाराजांपर्यंत सर्वांनी या प्रश्नाची योग्य उत्तरं दिली असली तरीही या शंकांची 'उत्तरक्रिया' होत नाही. त्यांचा पूर्ण नाश होत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## सोमवार

**जनी हीत पंडीत सांडीत गेले । अहंतागुणे ब्रम्हराक्षेस जाले ।**
**तयाहूनि वित्पन्न तो कोण आहे । मना सर्व जाणीव सांडूनि राहे ॥११३॥**

या जगात माणसांचे दोन प्रकार होतात. एक ज्ञानी व दुसरा अज्ञानी. ज्ञानी माणसानी सर्व शास्त्रांचं अध्ययन केलेलं असतं, त्याच्या आधारे ते प्रवचनं करतात. वादविवाद करतात. दुसऱ्याच्या मताचं खंडन करीत व आपल्या मताचं मंडन करीत ते गावोगावी फिरत असतात. पण स्वतःच्या वर्तनात मात्र त्या मिळवलेल्या ज्ञानाचा अजिबात उपयोग करत नाहीत. जे त्यांच्या अंतिम हिताचं आहे ते, ते नेमकं टाकून देतात. त्यांना समर्थांनी पंडीत असं म्हटलेलं आहे. या लोकांचा अहंकार त्यांच्या ज्ञानातून निर्माण होत रहातो. जितकं ज्ञान जास्त तितका त्यांचा अहंकार जास्त, आणि तितकं त्यांचं आचरणं मलीन. या बाबतीत आपली ज्ञानेश्वर माऊली म्हणते 'नवल अहंकाराचे गोठी । लोंबे सज्ञानाचे कंठी ॥' त्याना प्रामाणिकपणे असंच वाटत असतं की या जगात त्यांच्याइतका दुसरा शहाणा, व्युत्पन्न माणूस नाही. म्हणून त्याना जे वाटतं तेच योग्य. त्यांच्याविरुध्द जो जाईल तो मूर्ख. हा त्याचा मूर्खपणा आणि माझा शहाणपणा त्याला पटवून दिलाच पाहिजे. म्हणून ते वादविवाद करत गावोगाव फिरत असतात. इतर व्युत्पन्न विद्वानांकडून मानपत्र मिळवतात. असे पंडित मेले की त्यांच्या अहंकारामुळे ते ब्रम्हराक्षस होतात. भूतपिशाच्यांपैकी ब्रम्हराक्षस हा खास अशा ब्राम्हणांसाठी निवडलेला वर्ग आहे. या योनीतून लवकर सुटका होत नाही. याबाबतीत वामनपंडीतांची गोष्ट प्रसिध्द आहे. वादविवादामध्ये सर्व पंडिताना हरवून अजिंक्यपत्रं मिळवल्यामुळे त्याना भर दिवसा मशाली लावून हिंडण्याचा मान मिळाला होता, असं म्हणतात. त्याना एकदा पिंपळाच्या पारावर रात्र काढण्याचा प्रसंग आला. तिथे त्याना दोन भुतांचं संभाषण ऐकू आलं. एक भूत दुसऱ्याला पिंपळाच्या फांदीवर रहाण्याची परवानगी मागत होतं. पण त्यावर पहिलं भूत म्हणालं की या फांदीवर वामन पंडित हा व्युत्पन्न ब्राम्हण मेल्यानंतर ब्रम्हराक्षस म्हणून राहायला येणार आहे. त्याच्यासाठी ती फांदी आरक्षित केली आहे. हे ऐकल्यावर वामन पंडिताना आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला. मग त्यानी समर्थांकडून अनुग्रह घेतला. मग ते पुढे मोठे भगवद्भक्त म्हणून प्रसिध्द झाले. यासाठी समर्थ मनाला सांगतात की हे मना, तू आपल्याला ज्ञान आहे अशी जाणीवसुध्दा जवळ बाळगू नकोस. ती सर्वथा सोडून दे.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**फुकाचे मुखी बोलता काय वेचे । दिसेदीस अभ्यंतरी गर्व साचे ।**
**क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारे तुझा तूचि शोधूनि पाहे ।।११४।।**


गेल्या काही श्लोकातून प्रत्यक्ष आचरण हे वायफळ बडबडीपेक्षा कितीतरी महत्वाचं आहे हे समर्थ आपल्याला पुन्हा पुन्हा समजावून सांगत आहेत. याही श्लोकात त्यानी तीच गोष्ट पुन्हा सांगितली आहे. आपल्या तोंडाने फुकटची बडबड करण्यात आपल्या पदरची एक पैही खर्च होत नाही, असं आपल्याला वाटतं. पण त्यामुळे आपला काय तोटा होतो ते आपल्या लक्षात येत नाही. शब्दांचा खेळ करणं सोपं आहे. त्या बळावर लोकांचं लक्ष वेधून घेणही सोपं आहे. शिवाय आजकाल ग्रंथसंपदा विपुल असल्यामुळे सूचिकोश, संदर्भग्रंथ, निरनिराळया विषयांवरची एकत्रित केलेली सुभाषितं, संतांच्या उपदेशांचे संग्रह हे कोणालाही सहज उपलब्ध आहेत आणि त्यांच्या मदतीने थोडीशी बुध्दी वापरून वक्तृत्वाचा फंड जिंकणं सहजसुलभ आहे. पण हे सर्व बोलणं फुकट जातं. त्याचा काहीही उपयोग तर होत नाहीच पण उलट आपण फार विद्वान आहोत, आपली सर्व व्याख्यानं विलक्षण रंगतात, आपल्या व्याख्यानाच्या वेळी श्रोत्यांची इतकी गर्दी होते की मुंगीलाही आत यायला जागा नसते. व्याख्यान सुरू झालं की श्रोते मंत्रमुग्ध होतात, त्यांचं भान हरपून जातं. शेवटी मला नमस्कार करण्यासाठी श्रोत्यांची लांबच लांब रांग लागते. माझ्या प्रवचनांचं नेहेमीच Advance booking झालेलं असतं. वर्तमानपत्रात बातमी छापून येते. मग अभिनंदनाची व कौतुकाची असंख्य पत्रं वगैरे येत रहातात व त्यामुळे आपल्या मनात हिमालयावर बर्फ साचावा तसा फक्त गर्वच साचत जातो. पण प्रत्यक्ष आचरण करायची वेळ आली की आपलं सर्व ज्ञान, हुशारी, कौशल्य लटकं पडतं. आणि आपण एका सामान्य, प्रवाहपतित, विकारी माणसासारखंच वागतो.

समर्थ म्हणतात. हे मना, हे सर्व कसं घडतं, का घडतं, आपला सर्व विवेक आपल्या अहंकारापुढे कसा लटका पडतो, कसा दुबळा होतो हे सर्व तू नीट विचार करून शोधून पहा. जे काय घडतं त्याच्याकडे
नीट अवधान देऊन लक्षपूर्वक पहा व त्यावर मूळापासून विचार कर. मग तुझा अहंकार व ममता या सर्वांच्या मुळाशी आहे हे तुझ्या ध्यानात येईल व तो दूर करण्यासाठी तू नेटाने प्रयत्न करशील.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**जनी हीत पंडीत सांडीत गेले । अहंतागुणे ब्रम्हराक्षेस जाले ।**
**तयाहूनि वित्पन्न तो कोण आहे । मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।।११३।।**

या जगात माणसांचे दोन प्रकार होतात. एक ज्ञानी व दुसरा अज्ञानी. ज्ञानी माणसानी सर्व शास्त्रांचं अध्ययन केलेलं असतं, त्याच्या आधारे ते प्रवचनं करतात. वादविवाद करतात. दुसऱ्याच्या मताचं खंडन करीत व आपल्या मताचं मंडन करीत ते गावोगावी फिरत असतात. पण स्वतःच्या वर्तनात मात्र त्या मिळवलेल्या ज्ञानाचा अजिबात उपयोग करत नाहीत. जे त्यांच्या अंतिम हिताचं आहे ते, ते नेमकं टाकून देतात. त्यांना समर्थानी पंडीत असं म्हटलेलं आहे. या लोकांचा अहंकार त्यांच्या ज्ञानातून निर्माण होत रहातो. जितकं ज्ञान जास्त तितका त्यांचा अहंकार जास्त, आणि तितकं त्यांचं आचरणं मलीन. या बाबतीत आपली ज्ञानेश्वर माऊली म्हणते 'नवल अहंकाराचे गोठी । लोंबे सज्ञानाचे कंठी ।।' त्याना प्रामाणिकपणे असंच वाटत असतं की या जगात त्यांच्याइतका दुसरा शहाणा, व्युत्पन्न माणूस नाही. म्हणून त्याना जे वाटतं तेच योग्य. त्यांच्याविरुध्द जो जाईल तो मूर्ख. हा त्याचा मूर्खपणा आणि माझा शहाणपणा त्याला पटवून दिलाच पाहिजे. म्हणून ते वादविवाद करत गावोगाव फिरत असतात. इतर व्युत्पन्न विद्वानांकडून मानपत्र मिळवतात. असे पंडित मेले की त्यांच्या अहंकारामुळे ते ब्रम्हराक्षस होतात. भूतपिशाच्यांपैकी ब्रम्हराक्षस हा खास अशा ब्राम्हणांसाठी निवडलेला वर्ग आहे. या योनीतून लवकर सुटका होत नाही. याबाबतीत वामनपंडीतांची गोष्ट प्रसिध्द आहे. वादविवादामध्ये सर्व पंडिताना हरवून अजिंक्यपत्रं मिळवल्यामुळे त्याना भर दिवसा मशाली लावून हिंडण्याचा मान मिळाला होता, असं म्हणतात. त्याना एकदा पिंपळाच्या पारावर रात्र काढण्याचा प्रसंग आला. तिथे त्याना दोन भुतांचं संभाषण ऐकू आलं. एक भूत दुसऱ्याला पिंपळाच्या फांदीवर रहाण्याची परवानगी मागत होतं. पण त्यावर पहिलं भूत म्हणालं की या फांदीवर वामन पंडित हा व्युत्पन्न ब्राम्हण मेल्यानंतर ब्रम्हराक्षस म्हणून राहायला येणार आहे. त्याच्यासाठी ती फांदी आरक्षित केली आहे. हे ऐकल्यावर वामन पंडिताना आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला. मग त्यानी समर्थांकडून अनुग्रह घेतला. मग ते पुढे मोठे भगवद्भक्त म्हणून प्रसिध्द झाले. यासाठी समर्थ मनाला सांगतात की हे मना, तू आपल्याला ज्ञान आहे अशी जाणीवसुध्दा जवळ बाळगू नकोस. ती सर्वथा सोडून दे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



मंगळवार

फुकाचे मुखी बोलता काय वेचे । दिसेदीस अभ्यंतरी गर्व साचे ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारे तुझा तूचि शोधूनि पाहे ॥११४॥

गेल्या काही श्लोकातून प्रत्यक्ष आचरण हे वायफळ बडबडीपेक्षा कितीतरी महत्वाचं आहे हे समर्थ आपल्याला पुन्हा पुन्हा समजावून सांगत आहेत. याही श्लोकात त्यानी तीच गोष्ट पुन्हा सांगितली आहे. आपल्या तोंडाने फुकटची बडबड करण्यात आपल्या पदरची एक पैही खर्च होत नाही, असं आपल्याला वाटतं. पण त्यामुळे आपला काय तोटा होतो ते आपल्या लक्षात येत नाही. शब्दांचा खेळ करणं सोपं आहे. त्या बळावर लोकांचं लक्ष वेधून घेणही सोपं आहे. शिवाय आजकाल ग्रंथसंपदा विपुल असल्यामुळे सूचिकोश, संदर्भग्रंथ, निरनिराळया विषयांवरची एकत्रित केलेली सुभाषितं, संतांच्या उपदेशांचे संग्रह हे कोणालाही सहज उपलब्ध आहेत आणि त्यांच्या मदतीने थोडीशी बुध्दी वापरून वक्तृत्वाचा फंड जिंकणं सहजसुलभ आहे. पण हे सर्व बोलणं फुकट जातं. त्याचा काहीही उपयोग तर होत नाहीच पण उलट आपण फार विद्वान आहोत, आपली सर्व व्याख्यानं विलक्षण रंगतात, आपल्या व्याख्यानाच्या वेळी श्रोत्यांची इतकी गर्दी होते की मुंगीलाही आत यायला जागा नसते. व्याख्यान सुरू झालं की श्रोते मंत्रमुग्ध होतात, त्यांचं भान हरपून जातं. शेवटी मला नमस्कार करण्यासाठी श्रोत्यांची लांबच लांब रांग लागते. माझ्या प्रवचनांचं नेहेमीच Advance booking झालेलं असतं. वर्तमानपत्रात बातमी छापून येते. मग अभिनंदनाची व कौतुकाची असंख्य पत्रं वगैरे येत रहातात व त्यामुळे आपल्या मनात हिमालयावर बर्फ साचावा तसा फक्त गर्वच साचत जातो. पण प्रत्यक्ष आचरण करायची वेळ आली की आपलं सर्व ज्ञान, हुशारी, कौशल्य लटकं पडतं. आणि आपण एका सामान्य, प्रवाहपतित, विकारी माणसासारखंच वागतो.

समर्थ म्हणतात. हे मना, हे सर्व कसं घडतं, का घडतं, आपला सर्व विवेक आपल्या अहंकारापुढे कसा लटका पडतो, कसा दुबळा होतो हे सर्व तू नीट विचार करून शोधून पहा. जे काय घडतं त्याच्याकडे
नीट अवधान देऊन लक्षपूर्वक पहा व त्यावर मूळापासून विचार कर. मग तुझा अहंकार व ममता या सर्वांच्या मुळाशी आहे हे तुझ्या ध्यानात येईल व तो दूर करण्यासाठी तू नेटाने प्रयत्न करशील.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**तुटे वाद संवाद तेथे करावा । विवेके अहंभाव हा पालटावा ।**
**जनी बोलण्यासारखे आचरावे । क्रिया पालटे भक्ति पंथे चि जावे ।।११५।।**

वादविवादासंबंधीच्या समर्थांच्या उपदेशाचा उपसंहार या श्लोकाने होत आहे. त्यामुळे आत्तापर्यंत केलेल्या उपदेशाचं सारच या श्लोकात आलं आहे ते असं की १) वाद करू नये. २) त्याऐवजी सुसंवाद करावा. ३) वादाचं मूळ अहंकारात असल्यामुळे विवेकबुध्दीने अहंकाराचा नाश करावा. अहंकाराचं मूळ ईश्वरासंबंधीच्या अज्ञानात असल्यामुळे ईश्वराचं योग्य ज्ञान मिळवावं. ५) त्याच्या आधारावर आपल्या बोलण्यात व वागण्यात एकवाक्यता असावी आणि ६) आपल्या जीवनाची वाटचाल भक्तीच्या मार्गानेच करावी.

कोठेही मतभेदाचा प्रश्न उद्भवला की आपण प्रथम गप्प बसावं. एरवीसुध्दा आपण अगदी थोडं बोलावं. जिथे मानेच्या हालचालीनी काम होईल तिथे शब्द वापरू नये. जिथे एका शब्दाने अर्थ समजेल तिथे वाक्य वापरू नये. आणि जिथे एकच वाक्य पुरे आहे तिथे पाल्हाळिक परिच्छेदाचा उपयोग करू नये. बोलण्यात फार शक्ती वापरली जाते, हे लक्षात ठेवावं. विशेष म्हणजे जे बोलू ते गोडव्यात भिजवलेलं असावं. पुढा स्नेह पाझरे । माघा चालती अक्षरे । शब्द पाठी अवतरे । कृपा आधी ।। आपल्या वर्तनाचं विश्लेषण करून त्यातून जर अहंकार डोकावत असेल तर तो काढून टाकावा. ईश्वरच सर्वांच्या रूपानी वावरत असल्यामुळे सर्वांशी नम्रतेने वागावं. 'नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।।' असं तुकाराम महाराज म्हणतात. आपल्याला जितकी शक्य असेल तितकी दुसऱ्याला मदत करावी. हे विश्व हे ईश्वराचं रूप असून आपण त्या ईश्वराचे अंश आहोत हे क्षणोक्षणी लक्षात ठेवावं. तसंच या विश्वातील प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक क्षणी घडणाऱ्या घटना या पूर्वनियोजित ईश्वरीसंकल्पानुसारच घडत असतात, याचं क्षणोक्षणी स्मरण ठेवावं. याची आपला अहंकार घालवायला मदत होते व आपलं मन प्रत्येक क्षणी शांत रहातं, समाधानी रहातं. हे समाधान कधीच भंगत नाही. 'अखंड राहे समाधान । हेच ईश्वर दर्शन ।।' असं तुकाराम महाराज म्हणतात. मग आपण लोकांच्यात जे आपण करून दाखवू शकतो तितकंच बोलावं. अशा तऱ्हेने आपला पूर्ण क्रियापालट झाला की आपलं प्रत्येक पाउल हे भक्तीमार्गावर प्रगतीच्या दिशेनेच पडेल. शेवटी आपण ईश्वराशी एकरूप होऊन जाऊ. मग 'पाहायाचे पाहिले । मिळवायाचे मिळविले । आता काही अवशेष न राहिले ।' अशी आपली स्थिती होईल.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार

**बहू श्रापिता कष्टला अंबऋषी । तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी ।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११६।।**

राजा अंबरीष हा नाभाग याचा पुत्र होता. हा आपल्या वडिलांप्रमाणे मोठा पराक्रमी तसाच धार्मिक होता.. याने सहस्त्रावधी राजांबरोबर एकट्याने लढून त्यांच्यावर विजय मिळवला होता. हा महान भगवद्भक्त होता. राजा अंबरीष हा एकादशीचं व्रत मोठ्या निष्ठेने करीत असे. द्वादशीला सूर्योदय होताच व्रताची सांगता करी. एकदा महासंतापी दुर्वास ऋषी त्याच्याकडे अतिथि म्हणून आले. द्वादशीचे दिवशी ते सकाळी स्नान संध्येसाठी नदीवर म्हणून गेले. तिथे त्यांची संध्या खूप वेळ चालली. सूर्योदय होऊन गेला तरी ऋषी परत आले नाहीत. आता अतिथिच्या आधी भोजन करता येत नाही, आणि एकादशीच्या व्रतानुसार सूर्योदयाच्या वेळी त्याची सांगता केली पाहिजे अशा धर्मसंकटात राजा सापडला. शेवटी त्याने फक्त श्रीविष्णूच्या अभिषेकाचे तीर्थ घेऊन व्रताची सांगता केली. पण दुर्वास ऋषी संतापले व त्यानी राजा अंबरीषाला काही जन्म पशुयोनीत आणि काही जन्म मनुष्ययोनीत असे दहा तरी जन्म घ्यावे लागतील असा त्याला शाप दिला. पण भगवंतानी तो शाप स्वतःवर घेतला आणि त्याचं संरक्षण केलं. मग दुर्वासानी आणखी संतापून त्याच्यावर कृत्या सोडली. पण विष्णूनी सुदर्शन चक्र सोडून तिचा नाश केला. मग ते सुदर्शन चक्र दुर्वास ऋषींच्याच मागे लागलं. दुर्वास अनेक ठिकाणी आश्रयाला गेले पण त्या चक्राने त्यांचा पिच्छा सोडला नाही. शेवटी देवर्षि नारदांच्या सांगण्यावरून ते राजा अंबरिषालाच शरण गेले. मग त्याने त्या सुदर्शन चक्राला नमस्कार करून ते परतवलं. दुसरी कथा उपमन्यूची. हा वरिष्ठ कुलोत्पन्न ऋषी होता. लहानपणी घरी अठरा विश्वे दारिद्र्य असे. हा आपल्या मामाबरोबर एका यज्ञाला गेला असताना तिथे त्याला गायीचं दूध प्यायला मिळालं. मग घरी परत आल्यावर त्याने तशाच दूधासाठी हट्ट केला. तेव्हा त्याची आई म्हणाली, 'बाळा, आपण गरीब आहोत. तुला दूध पाहिजे असेल तर तू देवाकडे माग.' हे ऐकून उपमन्यु धृवाच्या निश्चयाने आईला नमस्कार करून बाहेर पडला व त्याने भगवान् शंकराना आपल्या उग्र तपश्चर्येने आणि उत्कट भक्तीने प्रसन्न करून घेतलं. मग शंकरानी प्रसन्न होऊन त्याला क्षीरसागरच देऊ केला. याप्रमाणे देव आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करीत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## शुक्रवार

**धुरू लेकरु बापुडे दैन्यवाणे । कृपा भाकिता दीधली भेटि जेणे ।**
**चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११७।।**

गेल्या श्लोकापासून देव आपल्या भक्तांचा अभिमानी असल्यामुळे तो आपल्या भक्तांची ते संकटात असताना कधी उपेक्षा करीत नाही, हे सांगण्यासाठी समर्थानी अशा अनेक भक्तांची उदाहरणे दिली आहेत. या श्लोकात त्यानी बालभक्त ध्रुवाचं उदाहरण दिले आहे. सूर्यवंशामध्ये उत्तानपाद नावाचा राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. मोठी बायको सुनीती ही त्याची नावडती बायको होती. तिला ध्रुव नावाचा मुलगा झाला. धाकटी बायको सुरुचि ही त्याची आवडती राणी होती. तिलाही एक मुलगा होता. एकदा ध्रुव हा मोठ्या लडिवाळपणे आपल्या वडिलांच्या मांडीवर बसून खेळत असता त्याच्या सावत्र आईने म्हणजे राजाच्या लाडक्या राणीने सुरुचीने, त्याला मत्सरामुळे उत्तानपादराजाच्या मांडीवरून खाली ओढलं आणि लाथ मारून त्याला हाकलून दिलं. यावर आपल्या लाडक्या बायकोच्या मुठीत गेलेला राजा तिला बोलू शकला नाही. ही आपली आगतिकता ध्रुवाला फार बोचली. तो रडत रडत आईकडे गेला असता त्याची आई सुनीती त्याला म्हणाली, बाळ, तू असा शोक करू नकोस. भगवंत हा अनाथांचा नाथ आहे म्हणून तू त्याला आपलासा कर. हे एकून पाच वर्षांचा ध्रुव निश्चयी मनाने आईला नमस्कार करून घराच्या बाहेर पडला. वाटेत त्याला महर्षि नारद भेटले. त्यांच्या उपदेशावरून ध्रुवाने 'ॐ नमो श्रीभगवते वासुदेवाय', या त्रयोदशाक्षरी मंत्राचा अखंड जप तहानभूक विसरून केला. त्याच्या निष्ठेने भगवान् श्रीविष्णू प्रसन्न झाले. आणि आपल्या शामसुंदर अशा चतुर्भुज रूपात प्रकट झाले. डोळे मिटलेले असतानाही भगवंताचं अस्तित्व ध्रुवाला जाणवलं. त्याने आपले नेत्र उघडले तो साक्षात् भगवान् श्रीविष्णू त्याच्यावर अमृतवर्षाव करीत होते. ते दिव्य रूप पाहून ध्रुवाची वाचा बसली. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. मग श्रीविष्णूनी आपल्या हातातील शंखाचा ध्रुवाच्या उजव्या गालाला स्पर्श केला. मग ध्रुवाने भगवंताची स्तुती केली व वर माग म्हटलं तरी त्याने काहीही मागितलं नाही. तेव्हा भगवंतानी त्याला समुद्रवलयांकित पृथ्वीचं साम्राज्य देऊ केलं व नंतर सर्व ताऱ्यानी त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालावी अशा अढळपदाचं दान दिलं. अशा तऱ्हेने भक्त वयाने लहान असो की मोठा असो भक्ताभिमानी देव त्याची कधीच उपेक्षा करीत नाही, त्याच्या सहाय्याला देव नेहमीच धावून जातो असं समर्थ सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**गजेंद्र महा संकटी वास पाहे । तयाकारणे श्रीहरी धावताहे ।**
**उडी घातली जाहला जीवदानी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११८।।**

इंद्रद्युम्न या नावाचा एक राजा होता. तो पांड्य देशावर राज्य करीत असे. तो फार धार्मिक प्रवृत्तीचा होता. तो एकदा ध्यान करत असताना अगस्ति ऋषी तिथे आले. पण ते आल्याचे राजाला कळलेच नाही कारण तो ध्यानस्थ होता. म्हणून ऋषी रागावले व त्यानी राजाला तू उन्मत्त झाला आहेस म्हणून [redacted] पुढच्या जन्मी तू मदोन्मत्त हत्ती होशील असा शाप दिला. पण राजाने प्रार्थना करून त्यांची क्षमा मागितली. तेव्हा त्यानी असा उःशाप दिला की त्या जन्मात तू काही संकटात सापडून भगवंताचा धावा करशील तेव्हा भगवंत प्रत्यक्ष येऊन तुझा उध्दार करतील. त्याप्रमाणे तो पुढील जन्मात हत्तीच्या जन्माला आला. त्याचं नाव गजेंद्र होतं. तो हत्तीच्या एका कळपाचा नेता होता.

तो एकदा चित्रकूट पर्वतावर संचार करीत असता जलक्रीडेसाठी एका सरोवरावर आला. पण पाण्यात उतरताच एका मगराने त्याचा पाय आपल्या तोंडात धरून ठेवला व तो त्याला पाण्यात खेचू लागला. हा मगरही देवल ऋषींच्या शापाने मगर म्हणून जन्माला आला होता. तो पूर्वजन्मीचा हूहू नावाचा गंधर्व होता. गजेंद्राने आपला पाय सोडवून घेण्यासाठी जंग जंग पछाडले पण त्याच्या भगीरथ प्रयत्नानासुध्दा यश आले नाही. कळपातील इतर हत्ती वा हत्तीणीनीही खूप प्रयत्न केला पण त्यांचेही प्रयत्न कामास आले नाहीत. मग त्या संकटात गजेंद्रास एकटं सोडून तो कळप परत फिरला. ज्यांच्या रक्षणासाठी गजेंद्राने अनेक शर्थीच्या झुंजी दिल्या होत्या ते सर्व हत्ती त्याला एकट्याला संकटात तसेच सोडून निघून गेले. म्हणतात ना, 'कठिण समय येता कोण कामास येतो'. गजेंद्राच्या मदतीस धावून येईल असं तिथे कोणीच उरलं नव्हतं. गजेंद्र थकला, हताश झाला व त्याने कळवळून भगवंताचा धावा केला. त्याने एक कमळ सोंडेने उपटलं आणि भगवंताला अर्पण करण्यासाठी ते आकाशात फेकलं. त्यासरशी भगवान् विष्णू तिथे धावून आले व त्यानी गजेंद्राची सुटका केली व वैकुंठाला घेऊन जाण्यासाठी ते निघाले असतानाच पाण्यातून मगराचा आवाज आला. 'प्रभो, आपल्या भक्ताचे चरण धरणाऱ्याचासुध्दा तुम्ही उध्दार करता असा आपला अलौकिक लौकीक आहे. मग असं असताना मी आपल्या भक्ताचा चरण कितीतरी वेळ तोंडात धरून बसलो होतो. तेव्हा कृपा करून मलाही आपण बरोबर न्याना.' हे ऐकून प्रभु हसले व त्यानी मगरालाही वैकुंठाला नेलं अशी पद्मपुराणात कथा आहे. म्हणून भक्ताभिमानी देव आपल्या भक्तांची कधीच उपेक्षा करीत नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**अजामेळ पापी तया अंत झाला । कृपाळूपणे तो जनी मुक्त केला ।**
**अनाथासी आधार हा चक्रपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११९।।**
**विधीकारणे जाहला मच्छ वेगी । धरी कूर्मरूपे धरा पृष्ठीभागी ।**
**जना रक्षणाकारणे नीच योनी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२०।।**

अजामिळाची कथा व त्यावर झालेली भगवंताची कृपा याचं सविस्तर वर्णन आपण पंचाण्णवाव्या श्लोकात बघितलंच आहे. 'अपि चेत् सुदुराचारो भजते मां अनन्यभाक् । साधुरेव स मंतव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।' (गीता ९-३०)

कोणत्याही भक्ताचा उध्दार करण्याची भगवंताची प्रतिज्ञाच असल्यामुळे दुर्जन, पातकी माणसालाही त्याच्या उध्दाराचा मार्ग मोकळा आहे. या संबंधात माऊली म्हणते, 'यालागी दुष्कृती जरी जाहला । तरी अनुतापतीर्थी न्हाला । न्हाऊनी मजआतु आला । सर्वभावे ।।' (९-४२०) जो पश्चात्तापाने अत्यंत तप्त होऊन भगवंताची करुणा भाकेल आणि भक्तिमार्गाला लागेल तो जरी दुर्जन असला तरी तो निश्चितपणे उध्दरून जाईल, जसं अजामिळाचं झालं. त्याने चुकून मुलाचं नारायण नाव घेतलं त्या क्षणी तो उध्दरला. त्याला आपलं मरण टळल्याच्या अद्भूत योगायोगाने आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला मग त्याने प्राणपणाने भवितसाधना केली व शेवटी त्याचा उध्दार झाला. यामुळे मी आता देवाचं नाव घेतो, देवाची भक्ती करतो. आता मला कोठलीही व कितीही पापं करण्यास हरकत नाही. कारण माझा उध्दार करणं हे त्याचं ब्रीदच आहे, असा गैरसमज कोणीही कृपया करू नये.

पुढील श्लोकात समर्थांनी मत्स्य, कूर्म व वराह अशा तीन अवतारांचा उल्लेख केला आहे. पंचविसाव्या कल्पाच्या शेवटी ब्रम्हदेवाची रात्र व सृष्टीचा प्रलय चालू झाला होता. अशा वेळी हयग्रीव नावाच्या एका महापराक्रमी दैत्याने वेदच पळवून नेले आणि तो त्या प्रलयसागरात कोठेतरी लपून बसला. आपले महत्वाचे वेद पळवले गेले आहेत ही बातमी ब्रम्हदेवाच्या कानावर गेल्यावर तो किंकर्तव्यमूढ झाला. त्याने भगवान् विष्णूची प्रार्थना केली व वेद सोडवून आणण्याची विनंती केली. त्याप्रमाणे भगवंतानी मत्स्यावतार धारण करून हयग्रीवाचा नाश केला व वेद सोडवून आणले. नंतर ब्रम्हदेवाने निर्माण केलेली ही सृष्टी आपल्याच वजनामुळे समुद्रात बुडु लागली तेव्हा भगवंताने कासवाचं रूप धारण केलं व तिला आपल्या पाठीच्या आधारावर तोलून धरली. तिसरा अवतार वराहाचा. कश्यपाच्या दिली नावाच्या पत्नीच्या पोटी जन्मलेल्या हिरण्याक्ष नावाच्या दैत्याने पृथ्वीचंच हरण केलं व तिला पाताळात नेली. तेव्हा विष्णूने वराहाच्या रूपाने प्रकट होऊन हिरण्याक्षाचा वध केला व पृथ्वीला आपल्या सुळयावर तोलून बाहेर काढली. पृथ्वीचं रक्षण करण्यासाठी भगवंतानी खालच्या योनीतील पशूचं रूप धारण करतानाही संकोच बाळगला नाही. तेव्हा असा भगवंत आपल्या भक्ताची उपेक्षा काय म्हणून करील?

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**महाभक्त प्रल्हाद हा कष्टविला । म्हणोनी तया कारणे सिंह्य झाला ।**
**न ये ज्वाळ वीषाळ सन्नीध कोणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२१।।**
**कृपा भाकिता जाहला वज्रपाणी । तया कारणे वामन चक्रपाणी ।**
**द्विजाकारणे भार्गव चापपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२२।।**

भक्ताभिमानी भगवंताने आपला भक्त प्रल्हाद याला नरसिंहाच्या रूपाने दर्शन दिलं व त्याबरोबरच त्याचा पिता हिरण्यकश्यपु याचा, त्याला मिळालेल्या वरातल्या सर्व अटी पाळून वध केला ही कथा शहाण्णवाव्या श्लोकात आलीच आहे. पण या श्लोकात समर्थानी त्याला महाभक्त म्हणून गौरविलं आहे. त्याचं खास कारण असं आहे. प्रल्हादाला त्याचा पिता हिरण्यकश्यपु याने कल्पनेबाहेर त्रास दिल्यामुळे भगवंताने त्याचा नाश करण्यासाठी नरसिंहाचं रूप धारण केलं आणि त्याचं पोट फाडून वध केला. त्यावेळी त्याच्या सर्वांगातून विषारी ज्वाळा बाहेर पडत होत्या म्हणून कोणीही त्याच्या जवळ जायला धजत नव्हतं. अशा वेळी भक्त प्रल्हादाने आपल्या जीवीताचा धोका पत्करून त्याच्या जवळ जाऊन त्याची स्तुति केली व त्याला शांत केलं. मग भगवंतानी प्रसन्न होऊन काहीही वर माग असं सांगितल्यावर चिमुरडा प्रल्हाद म्हणाला, 'प्रभो, तुमची भक्ती करून त्या बदल्यात मोक्ष मागण्याइतका मी स्वार्थी व व्यापारी वृत्तीचा नाही. माझे बांधव बध्द असताना मला एकट्याला मुक्ती मिळावी अशी माझी इच्छाही नाही. तेव्हा मला फक्त तुमची भक्ती करण्याची इच्छा द्या'. या अपार करुणेमुळेच प्रल्हाद हा समर्थांच्या मते महाभक्त ठरतो.

**कृपा भाकिता जाहला वज्रपाणी । तया कारणे वामन चक्रपाणी ।**

या प्रल्हादाचा नातू बलीराजा. हा महापराक्रमी होता. त्याने एकदा इंद्रपदाची अभिलाषा धरून मोठं यज्ञसत्र मांडलं. तेव्हा घाबरलेल्या इंद्राने भगवान् विष्णूची प्रार्थना केली की या बलीपासून माझं संरक्षण करा. त्याप्रमाणे विष्णूनी कश्यप व अदितीच्या पोटी वामन रूपाने अवतार घेतला व ते बटूच्या रूपात मंडपात अवतीर्ण झाले. बलीने त्यांचा सन्मान करून त्याना दान मागण्यास सांगितलं. तेव्हा त्यानी फक्त तीनच पावलं भूमी दान मागितली. बलीला ही मागणी हास्यास्पद वाटली. तरी बटूच्या आग्रहामुळे त्याने त्रिपाद भूमीचं उदक सोडलं. शुक्राचार्य यातील धोका ओळखून पाण्याच्या झारीत जाऊन बसले. पण वामनाने झारीच्या छिद्रात दर्भ घालून त्यांचा डोळा फोडला. नंतर वामनाने तत्काळ विराट रूप धारण केलं व एका पावलात पृथ्वी व्यापून दुसऱ्या पावलात स्वर्गलोक व्यापला व बलीच्या इच्छेप्रमाणे तिसरं पाऊल त्याच्या डोक्यावर ठेवून त्याला पाताळात ढकललं. त्याचबरोबर पुढील मन्वंतरात तू इंद्र होशील असा त्याला वर दिला व त्याच्या इच्छेनुसार ते त्याचे द्वारपाल होऊन राहिले. कोणत्याही पातळीवरच्या भक्ताची उपेक्षा होत नाही ती अशी.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**कृपा भाकिता जाहला वज्रपाणी । तया कारणे वामन चक्रपाणी ।**
**द्विजाकारणे भार्गव चापपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२२।।**
**अहिल्ये सतीलागी आरण्यपंथे । कुढावा पुढे देव बंदी तयाते ।**
**बळे सोडिता घाव घाली निशाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२३।।**

**द्विजाकारणे भार्गव चापपाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।**

या श्लोकातील तिसऱ्या ओळीत समर्थांनी परशुराम अवताराचं उदाहरण घेतलं आहे. परशुरामाने शीघ्रकोपी जमदग्नी ऋषी व रेणुका माता यांच्या पोटी जन्म घेतला. परशुरामाच्या लहानपणी रेणुका मातेच्या हातून बारीकशी चूक झाली असता जमदग्नी ऋषींनी तिचा वध करण्याची बाल परशुरामाला आज्ञा केली. पितृभक्त व आज्ञाधारक परशुरामाने तत्काळ तिचं मस्तक शरीरापासून वेगळं केलं. तेव्हा जमदग्नी ऋषी परशुरामावर प्रसन्न झाले व वर माग असं म्हणाले. तेव्हा परशुरामाने रेणुका मातेला जिवंत करावं अशी त्यांची प्रार्थना केली. तेव्हा ताबडतोब रेणुकामाता जिवंत झाली व सर्वांना आनंद झाला.

एकदा कार्तवीर्य राजाने परशुराम आश्रमात नसताना आश्रमातील गाय पळवून नेली. परशुराम परत आल्यावर त्याने कार्तवीर्याशी युध्द केलं व त्यात त्याला ठार मारलं. त्याचा सूड घेण्यासाठी कार्तवीर्याच्या मुलानी परशुराम नसताना जमदग्नीस एकटं गाठून त्याचा वध केला. हा प्रकार पाहून परशुरामाने अशी घोर प्रतिज्ञा केली की हे क्षत्रिय आता उन्मत्त झाले असून शांत व तपस्वी ब्राम्हणांवर अत्याचार करीत आहेत. तेव्हा मी या पृथ्वीवर क्षत्रियांचा मागमूसदेखील उरू देणार नाही. असं म्हणून त्याने हा भारत २१ वेळा निक्षत्रिय केला व आपली प्रतिज्ञा सिध्दीस नेली. पुढे दाशरथी रामाची भेट झाली असता त्याने आपलं सर्व तेज रामात विलीन केलं.

दुसऱ्या श्लोकात इंद्राच्या संसर्गामुळे भ्रष्ट झालेल्या गौतमपत्नी अहील्येच्या उध्दारासाठी प्रभू रामचंद्र अरण्यातील तिच्या निर्मनुष्य असलेल्या आश्रमात आवर्जून आले व तिचा उध्दार केला अशी रामायणात कथा आहे. बत्तीसाव्या श्लोकात या कथेचा उल्लेख समर्थांनी केला आहे.

रावण हा जन्माने ब्राम्हण असून पुलस्ती ऋषींचा पुत्र होता. त्याने तप करून ब्रम्हदेवाला प्रसन्न करून घेतलं. मग त्याने आपल्या पराक्रमाने स्वर्गावर स्वारी करून सर्व देवाना बंदीखान्यात टाकलं व त्यांच्याकडून नोकरांची कामं करून घेतली. त्यामुळे सर्व देव संत्रस्त झाले होते. तेव्हा प्रभूरामचंद्रानी माकडांच्या मदतीने रावणाचा वध करून सर्व देवांची सुटका केली. याप्रमाणे भक्ताभिमानी असा देवाचा डंका त्रैलोक्यात गाजत आहे, असं समर्थ म्हणतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार


**तये द्रुपदीकारणे लागवेगे । त्वरे धावतु सर्व सांडुनि मागे ।**
**कळीलागी जाला असे बोध्य मौनी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२४।।**
**अनाथा दिनाकारणे जन्मताहे । कलंकी पुढे देव होणार आहे ।**
**जया वर्णिता शीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा देव भक्तभिमानी ।।१२५।।**

समर्थ पहिल्या श्लोकात कृष्णावतारातील कथेचं वर्णन करीत आहेत. या प्रसंगाचं वर्णन कवी देशपांडे करीत आहेत, 'प्रतिकाराविण सरे पराक्रम, कपट खळाळुन हासे । पुरुषार्थाला जिंकून गेले द्यूताचे फासे । नियत का चुकते कोणाला । आणिले सभेत पांचालिला ।।' द्यूताचं आमंत्रण नाकारता येत नाही, म्हणून कौरवांच्या सभेत द्यूत खेळायला युधिष्ठीर बसला खरा. पण युध्दातसुध्दा स्थिर रहाणारी त्याची बुध्दी द्यूतात मात्र अस्थिर झाली, आपली विवेकशक्ती गमावून बसली. तो या कपट द्यूतात डावामागून डाव हरु लागला. संपत्ती, लक्ष्मी, राज्यवैभव सगळं त्याच्या हातून कौरवांकडे गेलं व त्यांच्या मालकीचं झालं. नंतर त्याने स्वतः व इतर पांडव याना पणाला लावलं. हाही डाव हरल्यामुळे आता पाचही पांडव कौरवांचे दास झाले. आता द्यूताची नशा युधिष्ठीराच्या मस्तकात गेली होती. महाकपटी शकुनीने खिजवल्यामुळे त्याने आता साध्वी द्रौपदीलाही पणाला लावलं आणि दुर्दैवाचा कळस म्हणजे हा सुध्दा डाव तो हरला. दुर्योधन, दुःशासन, कर्ण वगैरै लांडगे टपून बसलेच होते. रजस्वला, एकवस्त्रा व असहाय्य द्रौपदीला फरफटत ओढून सभेत आणलं गेलं. द्रौपदीने खूप बुध्दीवाद केला पण त्या तेजस्विनीचं चातुर्य निष्फळ ठरलं. नराधम दुःशासनाने तिच्या वस्त्राला हात घातला तेव्हा खाटकाच्या सुऱ्याखाली गाय हंबरावी तशी द्रौपदी अगतिक झाली व पदर दातात पकडून तिने मनात कृष्णाचा धावा केला. इकडे भगवान् कृष्ण द्वारकेत अस्वस्थ झाले, रुक्मिणीने विचारताच भगवंतानी सर्व हकीकत सांगितली, पण मग आपण तिला मदत का करत नाही अशी रुक्मिणीने पृच्छा करताच ते म्हणाले, अग, तिने दातात पदर धरून ठेवला आहे तोपर्यंत मी काहीच करू शकत नाही. पण दौपदीने 'कृष्णा' म्हणून टाहो फोडताच 'कृ' म्हणताच तिच्या दातातील पदर सुटला व 'ष्णा' म्हणायच्या आत भगवंतानी तिला वस्त्रं पुरवली. असा हा भगवंत या कलीयुगात मात्र भक्तांशिवाय इतर कोणाशी बोलत नाही. म्हणून तो मौन धारण करून बसला आहे असं वाटतं. असे या भगवंताने दीन, अनाथ लोकांसाठी वारंवार अवतार घेतले आहेत. या कलियुगाच्या शेवटी त्यांचा कलंकी अवतार होणार आहे असं म्हणतात. हा अवतार बहुतेक कलंकित लोकांच्या उध्दारासाठी असेल, असं वाटतं. अशा तऱ्हेने ज्याच्या लीलांचं वर्णन करताना साक्षात् वेदही थकून गेले तो देव आपल्या भक्तांची उपेक्षा कधीही करणार नाही, असं समर्थ आपल्याला आवर्जून सांगत आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## गुरुवार

**जनाकारणे देव लीलावतारी । बहुतापरी आदरे वेषधारी ।**
**तया नेणती ते जन पापरूपी । दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ॥१२६॥**

याप्रमाणे लीला करण्याची आवड असणाऱ्या ईश्वराने आपल्या भक्तांच्या कैवारासाठी तसंच जनांच्या कल्याणासाठी त्याना संकटातून सोडवण्यासाठी व दुर्जनांचा संहार करण्यासाठी वेळोवेळी अनेक अवतार धारण केले आहेत, व ते त्याने अनेक रूपानी धारण केले आहेत. कधी त्याने माशाचं रूप धारण केलं आहे तर कधी कासवाचं रूप घेतलं आहे, तर कधी पशूचं कातडं पांघरलं आहे. तसंच तो कधी अर्धा माणूस व अर्धा पशू असा झाला आहे. तर कधी लहान मुलगा झाला आहे. कधी ब्राम्हण झाला आहे तर त्याने कधी क्षत्रियात जन्म घेतला आहे, त्याचा जन्म कधी राजवाड्यात तर कधी तुरूंगात तर कधी गरीब ब्राम्हणाच्या घरीसुध्दा झाला आहे. असे अनेक अवतार त्याने मोठ्या प्रेमाने लोकांच्या कल्याणासाठी घेतले आहेत. या अवतारांवरून माणसाच्या प्रगतीची कल्पना येऊ शकते. पहिला अवतार मत्स्याचा. मासा हा संपूर्णपणे पाण्यात म्हणजे जीवनात आपलं जीवन घालवतो. तर दुसरा अवतार कासवाचा. हा प्राणी पाण्यात व जमिनीवर अशा दोन्ही ठिकाणी जगू शकतो. तिसरा वराह. हा प्राणी बलवान् असून पूर्णपणे जमिनीवर जीवन जगतो. चौथा नरसिंह. म्हणजे अर्धा पशु व अर्धा मानव. नर आणि सिंह यांचं मिलन. पाचवा अवतार बटु वामनाचा. म्हणजे ज्याची बुध्दी पूर्ण विकसित झाली नाही अशा लहान ब्राम्हण मुलाचा. सहावा अवतार परशुरामाचा. म्हणजे पूर्ण विकसित झालेल्या बुध्दिमान व शक्तीमान ब्राम्हणाचा. सातवा अवतार प्रभू रामचंद्राचा, म्हणजे न्यायी व विवेकी क्षत्रिय राजाचा. म्हणजेच मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांचा अवतार झाला. त्यांचे भावाभावातील प्रेम, आज्ञापालन, वचनाला जागण्याचा सच्चेपणा हे प्रजेचे आदर्श झाले. पुढील अवतार श्रीकृष्णाचा. भाऊबंदकीच्या काळात याचा अवतार झाला. याने सांगितलेली भगवद्गीता आज अक्षरशः अमृतमय व अमर झाली आहे. यावरून मानवाच्या प्रगतीचा आलेख तयार करता येईल. याशिवाय आपल्या भक्तांसाठी त्याने अनेक तात्पुरते अवतार घेतले ते निराळेच. पण हे सर्व ज्याना समजत नाही अशांची समर्थानी दुरात्मे, महानष्ट, चांडाळ, पापी इ. शब्दांनी संभावना केली आहे. कारण असे लोक अनावर झाले म्हणजे त्यांच्या नाशासाठीच शेवटचा उपाय म्हणून भगवंताला अवतार धारण करावे लागतात.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ॥ मना सज्जना ॥



## शुक्रवार

**जगी धन्य तो रामसूखे निवाला । कथा ऐकता सर्व तल्लीन झाला ।**
**देहेभावना रामबोधे उडाली । मनोवासना रामरूपी बुडाली ।।१२७।।**


गेल्या श्लोकामध्ये दुर्जनांची व्याख्या केल्यावर या श्लोकात समर्थ या जगात कोण धन्य होतो त्याचं वर्णन करीत आहेत. ते म्हणतात की ज्याचं सुख रामामध्येच साठवलं आहे, रामाच्या नामस्मरणाने ज्याचं मन शांत होतं, रामाचं चरित्र ऐकताना जो तल्लीन होतो, श्रीरामाच्या शक्तीच्या ज्ञानाने ज्याची देहभावना (देहाबद्दलची ममता) क्षीण होते व ज्याच्या सर्व कामना या रामाच्या रूपात, सद्गुणात आणि अलौकिक चरित्रात विलीन होऊन जातात, तो या जगात धन्य होतो. धन्यतेची सामान्य माणसाची व्याख्या आणि समर्थांसारख्या संतसत्पुरुषांची धन्यतेची व्याख्या यात जमीन अस्मानाचा फरक आहे. जो राजवाड्यातकिंवा भव्य प्रासादात रहातो, ज्याच्याजवळ पुढील सात पिढ्यानी काहीही उद्योग न करता नुसतं बसून खाल्लं तरी पुरेल इतकी विपुल धनधान्य संपत्ती आहे, जो अनेक बहुराष्ट्रीय संस्थांचा मालक आहे, ज्याने ज्ञानशाखात 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतची आद्याक्षरे असलेल्या सर्व पदव्या मिळवलेल्या असाव्यात, ज्याच्या कृपाकटाक्षासाठी शेकडो लोक त्याची हांजी हांजी करत आहेत, ज्याची पत्नी सुस्वरूप असून मुले ज्याच्या आज्ञेत आहेत, ज्याच्या मालकीची विमानं आहेत असा माणूस सामान्य जनांच्या दृष्टीने धन्यता पावलेला असतो तर शंकराचार्यांच्या दृष्टीने वेदांत वाक्येषु सदा रमंतः । देहादिभावं परिवर्जयंतः। आत्मानमात्मन्यवलोकयंतः । कौपिनवंतः खलु भाग्यवंतः । म्हणजे जे सदा वेदांतात रमतात, ज्यांचा देहभाव नाहिसा झाला आहे, जे आत्मदृष्टीनेच सर्वत्र आत्म्याला पहातात, असे लज्जारक्षणापुरती कौपिन(लंगोटी) धारण केलेले जन खरोखर धन्य होत.यासंबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात,'भाग्यवंत म्हणो तया ।जे शरण गेले पंढरिराया ।

एकदा एक पुराणिक रामचरित्र सांगत होते. आणि श्रोत्यांमधील एक भाविक ठाकूर मोठ्या तन्मयतेने ते ऐकत असे. पुराणिकबुवा रावणाने केलेल्या सीताहरणाचा प्रसंग वर्णन करून सांगत होते, तेव्हा तो ठाकूर जोरात ओरडला की माझ्यासारखा रामभक्त इथे हयात असताना रावण सीतामाईला पळवून नेतो म्हणजे काय असं म्हणून तो आपल्या घोड्यावर बसला व टाच मारून दौडत निघाला. तो एका कड्याच्या टोकावरून कोसळण्याच्या बेतात असतानाच तिथे प्रभू रामचंद्र प्रकट झाले व त्याचा घोडा अडवून त्याला म्हणाले, 'अरे, मी स्वतःच रावणाचा वध करून सीतेला सोडवून आणलं आहे, तू आता कष्ट करू नकोस' इतकी तल्लीनता रामचरित्र ऐकताना ज्या भाविक रामभक्ताची होते तो या जगात धन्यता प्राप्त करून घेईल यात नवल ते काय? असं समर्थांचं सांगणं आहे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**मना वासना वासुदेवी वसो दे । मना कामना कामसंगी नसो दे ।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे । मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे ।।१२८।।**

समर्थांनी या श्लोकात वासनांची वासलात कशी लावावी ते प्रत्यक्षपणे सांगितलं आहे. कारण अनेक वेळा अप्रत्यक्षपणे सुचवलेलं सगळ्यांच्या लक्षात रहातंच असं नाही व ते वेळीच उपयोगी पडेल असंही नाही म्हणून या श्लोकात त्यानी स्पष्टपणे आज्ञा केली आहे. ते म्हणतात हे मना, तुझ्या सर्व इच्छा, आकांक्षा, आशा, कामना, वासना या वासुदेवाच्या ठिकाणी राहू देत. सध्या त्या सर्व कामाच्या संगतीत आहेत. तेव्हा त्या तेथून काढ व त्या सर्व वासुदेवाला अर्पण कर. समर्थ स्वतः रामोपासक असले तरी उपासनेच्या बाबतीत ते राम व कृष्ण असा भेद करत नाहीत. सामान्य माणसं ही जास्त रजोगुणी असल्यामुळे त्याना मर्यादापुरुषोत्तम श्रीरामापेक्षा श्रीकृष्णाचं चरित्र जास्त आकर्षक वाटतं. कारण श्रीरामाचा जन्म राजधराण्यात झाला तर श्रीकृष्णाचा जन्म बंदीशाळेत झाला आणि तो गोकुळातल्या गवळयांच्या गोप-गोपीमध्ये लहानाचा मोठा झाला त्यामुळे सामान्य माणसाला रामापेक्षा कृष्ण जास्त जिव्हाळयाचा आणि म्हणून जास्त जवळचा वाटतो.

माणसांच्या इच्छांचे दोन प्रकार होतात. एक प्रकार अत्यावश्यक या सदरात मोडतो. दुसरा प्रकार जगण्यासाठी अनावश्यक पण सुखासाठी हवाहवासा वाटणारा असतो. उदा.- अन्न, पाणी, हवा, कपडे, निवारा, शिक्षण मिळावं या इच्छा जीवनाला आवश्यक आहेत. पण याव्यतिरिक्त जीवन सुखी करणाऱ्या इतर इच्छा या अनावश्यक आहेत हे समजून त्यांची पूर्ती ही ईश्वराच्या संकल्पावर सोडावी.'काम असावा ईश्वरभजनी। लोभ असावा प्रसादग्रहणी । क्रोध असावा इंद्रियदमनी । मोह असावा देवदर्शनी ।।' असं कवी म्हणतो. म्हणून यासंबंधात उगाच शेखमहमदी वायफळ कल्पना करत बसू नये. कारण कल्पनातूनच भ्रामक सुखदुःख व त्याची आसक्ती व तिटकारा या गोष्टी निर्माण होतात. पण ईश्वरचरणी वासना अर्पण करण्यासाठी देवाला शोधायचं कोठे? यासंबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात, 'तीर्थी धोंडापाणी । देव रोडका सज्जनी ।।' किंवा,'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोची साधू वोळखावा । देव तेथेची जाणावा ।।' याकरता समर्थ म्हणतात, हे सज्जना मना, तुझी वसती सज्जनांच्या सत्संगातच नित्य असू दे. म्हणजे तुझ्यावर सुसंस्कार होतील व तुझी प्रगती होऊन तू वासुदेवाशी एकरूप होशील.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।




रविवार

**गतीकारणे संगती सज्जनाची । मती पालटे सूमती दुर्जनाची ।**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे । म्हणोनी मनातीत होऊनि राहे ।।१२९।।**

जर माणसाची प्रगती व्हायला हवी असेल तर त्याने सज्जनांच्या संगतीत रहायला हवं असं गेल्या श्लोकात सांगितल्यावर समर्थांनी याही श्लोकात तोच विषय पुढे चालू ठेवला आहे. ते म्हणतात. सज्जनसंगतीचा खरा लाभ परमार्थाच्या दृष्टीने कोणता? तर तो म्हणजे दुर्जनाच्यासुध्दा बुध्दीत पालट होणं. कारण माणसाची बुध्दी जसा विचार करते तसा त्याचा आचार असतो आणि त्याप्रमाणे त्याला त्याच्या कृतीचं चांगलं वाईट फळ मिळतं. जसं वाल्या कोळ्याला माणसांचा पैसाअडका हिरावून घेऊन त्याना ठार मारण्यात आनंद होत असे. कुटुंब चालवण्यासाठी हे आवश्यकच आहे असं त्याचं समर्थन तो करीत असे. एका मनुष्यवधासाठी एक खडा या मापाने त्याचे सात रांजण अशा खड्यानी भरले होते. पण देवर्षी नारदांसारख्यांची संगत लाभल्यावर त्याची बुध्दीच पालटून गेली. कारण नारदानी त्याला विचारलं की बाबा रे, तू मला खुशाल मार. पण या ब्राम्हणवधाने जे पातक तुझ्या हातून घडेल त्याचा वाटा ज्या तुझ्या बायकापोरांसाठी तू ही माझ्यासारख्या निष्पाप ब्राम्हणाची हत्या नाहक करीत आहेस, ती बायकापोरं तुझ्या पापात वाटेकरी व्हायला तयार आहेत का? ते तू त्यांना विचारून ये. तोवर मी इथेच थांबतो. त्याप्रमाणे घरी जाऊन वाल्याने सर्वांना विचारलं, पण आश्चर्य म्हणजे कोणीही त्याच्या पापात वाटेकरी व्हायला कबूल होईनात. ते पाहून वाल्याचे डोळे खरोखरच उघडले. तो नारदानाच शरण गेला. मग रामनामाचा मंत्र देऊन नारदानी त्याच्या उध्दाराची सोय केली. त्याची दुर्बुध्दी पालटून तिची सुमती झाली व पुढे आद्यरामायणकार म्हणून त्यांची सर्वत्र प्रसिध्दी झाली. पण एवढं मनुष्यवधाचं प्रचंड पाप वाल्या का करीत होता तर रतीनायिकेचा पती जो कामदेव किंवा मदन त्याचा वास वाल्याच्या हृदयात होता व स्वस्त्रीच्या आकर्षणाला बळी पडल्यामुळे त्याच्या हातून पापांचे पर्वत तयार झाले. ही कामवासना भल्याभल्यांचे बळी घेते. सुखालाच ती हितकारक आहे असं भासवते. एकदा कामवासनेने बुध्दीचा ताबा घेतला की मग स्वैराचाराचंसुध्दा समर्थन करणारं तत्वज्ञान निर्माण होतं. म्हणून याच्यातून जर सुटायचं असेल तर जीवाने ज्या मनात या वासना निर्माण होतात त्याच्याही पलीकडे आपलं वसतिस्थान ठेवलं पाहिजे व तिथे राहून ईश्वरभक्ती केली पाहिजे. म्हणजे साधकाची प्रगती होते.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**मना अल्प संकल्प तो ही नसावा । मना सत्य संकल्प चित्ती वसावा ।**
**जनी जल्प वीकल्प तो ही तजावा । रमाकांत एकांत काळी भजावा ।।१३०।।**

समर्थ या श्लोकात साधकाच्या मनात कोठले विचार यावेत व कोणत्या विचारांचा त्याने त्याग करावा यासंबंधी उपदेश करत आहेत. आपल्या शास्त्रात मनाची व्याख्याच संकल्पविकल्पात्मकं मनम् । अशी केली आहे. सम्यक् (योग्य) कल्पना म्हणजे संकल्प आणि विकृत (अयोग्य) कल्पना म्हणजे विकल्प. कल्पना म्हणजे एखादी गोष्ट भविष्यकाळात कशी असावी किंवा कशी नसावी याबद्दल केलेला विचार. आज भविष्यकाळासंबंधी केलेला संकल्प त्याचा वर्तमानकाळ झाला की तोपर्यंत केलेल्या प्रयत्नामुळे वास्तव होऊ शकतो. उदा. साधकाने आपण देवाची भक्ती करून त्याच्याशी भविष्यकाळात एकरूप होऊ असा सत्यसंकल्प करून त्याप्रमाणे प्राणपणाने देवाची भक्ती करावी व एक ना एक दिवस आपल्याला त्याची प्रचीती येईल असा संकल्प चित्तात सदैव बाळगावा. देवाने एका भक्ताला नारदांकरवी निरोप दिला की समोरच्या चिंचेच्या झाडाला जितकी पाने आहेत तितक्या जन्मानंतर माझं तुला दर्शन होईल. हे ऐकून वाईट वाटण्याऐवजी तो आनंदाने नाचू लागला, की, हे प्रभो, तू किती दयाळू आहेस? तू मला लवकरच भेटणार आहेस. मधले जन्म काय हां हां म्हणता निघून जातील. पण हा सत्यसंकल्प आपल्या चित्तात सदैव वसण्यासाठी इतर संकल्प अल्प प्रमाणातसुध्दा उद्‌भवता कामा नयेत. कारण वस्तुस्थिती कधीच सुखदुःख निर्माण करत नाही तर ती कशी असावी यासंबंधीची कल्पनाच आपल्या मनात सुखदुःख निर्माण करत असते. म्हणून समर्थ म्हणतात की देवाच्याऐवजी केलेल्या इतर संकल्पाचं अल्पस्वल्प बीजसुध्दा आपल्या मनात क्षणभरही रेंगाळू देऊ नये. न जाणो या बीजाचा उद्या विशाल वटवृक्ष व्हायचा आणि आपल्या सत्यसंकल्पाच्या आड यायचा.

माणसाला एक सवय असते की चारचौघांमध्ये संभाषण सुरु झाले असता प्रत्येकजण स्वतःच्या मोठेपणाचंच कौतुक सांगत बसतो. म्हणून साधकाने चारचौघात स्वतःचं कौतुक सांगत बसू नये. त्याऐवजी 'सुखालागी आरण्य सेवीत जावे'. एकांतात जाऊन देवाचं म्हणजे त्या लक्ष्मीपती विष्णूचं भजन निवांतपणे करावं. कारण विष्णू हा जगाचा पालनकर्ता असल्यामुळे त्याच्याच कृपेमुळे आपण जिवंत आहोत. समर्थ दासबोधात म्हणतात, 'महंते एकांती बैसावे'. तर आपले तुकाराम महाराज म्हणतात,

**'ठायीच बैसोनी करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।।'**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**भजाया जनी पाहता राम येकू । करी बाण येकू मुखी शब्द येकू ।**
**क्रिया पाहता उधरे सर्व लोकू । धरा जानकीनायकाचा विवेकू ।।१३१।।**

समर्थ या श्लोकात रामचरित्राची महती गात आहेत. कारण रामर्थांचं उपास्य दैवत व सद्गुरू दोन्ही रामच असल्यामुळे आपल्या आराध्यदैवताचं माहात्म्य अनेक प्रकारे वर्णन करावं असं त्याना वाटणं साहजिकच आहे. प्रभू रामचंद्रांचं वैशिष्ट्य म्हणजे ते एकवचनी, एकबाणी व एकपत्नी असे होते. त्यानी लक्ष्याचा वेध करण्यासाठी एकदा धनुष्यावर बाण लावला की तो आपला नेम साधून पुन्हा भात्यात येऊन बसत असे. आफ्रिकन लोकांकडे बूमरँग नावाचं एक हत्यार असतं. त्याला मागे दोरी बांधलेली असते. ते बूमरँग अशा शिताफीने सावजावर टाकीत की सावजाचा वध करून दोरी खेचल्यावर ते परत मारणाऱ्याकडे येत असे. पण प्रभू रामचंद्रांच्या बाणाच्या ठिकाणी अशी काही अद्‌भूत शक्ती होती की तो सावजाचा वध करून परत येऊन त्यांच्या भात्यात विसावत असे. तसंच श्रीराम सत्यवचनी म्हणून एकवचनी होते. म्हणून त्याना आपले शब्द कधीही बदलावे लागले नाहीत. तसंच मी असं कधी बोललोच नव्हतो किंवा माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता किंवा त्या परिस्थितीत मी तसा बोललो वगैरे स्पष्टीकरणं देण्याचे प्रसंग त्यांच्या जीवनात कधीही आले नाहीत. हा गुण नेत्याच्या अंगी असेल तरच त्याच्या अनुयायाना कधी पश्चात्ताप करण्याची किंवा तोंडघशी पडण्याची पाळी येत नाही. तसंच राजा असूनही त्यानी जन्मभर एकपत्नीव्रताचं पालन केलं. बहुधा साडेतीनशे राण्या आणि तीन पट्टराण्या यांच्या तावडीत सापडल्यामुळे महाराज दशरथांचे जे हाल झाले त्याच्यावरून श्रीरामानी या व्रताचं आजन्म पालन केलं असावं. 'जानकीविना ना नारी मनी राघवाच्या ।'अशी गदिमानी ग्वाही दिली आहे. सीतारामचंद्राचं सारं आयुष्यच अभ्यासनीय असं आहे. समर्थानी या संदर्भात विवेक हा शब्द वापरला आहे. कारण अशा अवतारी व्यक्तींचं मोठेपण सामान्य मापाने किंवा निकषाने मोजून चालत नाही. श्रीरामचंद्राच्या जीवनातील काही प्रसंग असे आहेत की विवेकबुध्दी वापरल्याशिवाय त्या प्रसंगाचं महत्व आपल्याला समजत नाही. उदा. वालीवध, सीतात्याग वगैरे. म्हणून अशा श्रीरामांची आपण सदैव भक्ती करावी.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**विचारूनी बोले विवंचूनी चाले । तयाचेनि संतप्त तेही निमाले ।**
**बरे शोधल्यावीण बोलो नको हो । जनी चालणे शुध नेमस्त राहो ।।१३२।।**

समर्थानी या श्लोकात साधकाने व्यवहारात कसं वागावं यासंबंधी उपदेश केला आहे व त्याचं सार या श्लोकाच्या चवथ्या ओळीत सांगितलं आहे. ते म्हणतात की साधकाचं व्यवहारातील वर्तन शुध्द, नियमबध्द व सौम्य असं असावं. खरोखर अध्यात्माच्या विश्‍वविद्यालयाचे प्रमुख अशी पदवी समर्थांना प्रदान केली पाहिजे. कारण प्रमुखाकडे जसं अध्यापनाच्या जोडीला व्यवस्थापनविषयक कामसुध्दा असतं, तसं समर्थ भक्तीमार्गाच्या जोडीला साधकाच्या व्यावहारिक वर्तनाचीसुध्दा बारिकसारिक बाबतीत काळजी घेत असतात. या शुध्द वर्तनासाठी माणसाचं बोलणं आणि चालणं शुध्द असावं लागतं. 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले ।।' असं तुकाराम महाराज म्हणतात. तर 'भाषणासम आचरण । त्याचे वंदावे चरण ।' असं एक कवी म्हणतो. समर्थ पहिल्या ओळीत म्हणतात, जो माणूस पूर्ण विचार करून बोलतो आणि प्रश्‍नाच्या सर्व बाजूंचं परीक्षण करून (विवंचून) जो आपली प्रतिक्रिया निश्‍चित करतो आणि त्याप्रमाणे जो वागतो तो कोणत्याही परिस्थितीत स्वतः एकनाथमहाराजांसारखा शांत तर रहातोच पण त्याच्या अंगी इतरानाही शांत करण्याचं सामर्थ्य येतं. जो कोठल्याही गोष्टीचा अगदी मुळापासून विचार करतो व तोही प्रश्‍नाला असलेल्या सर्व बाजूंचा आपला अहंकार बाजूला ठेवून विचार करतो त्याची प्रतिक्रिया अगदी योग्य असते व ती इतरानीसुध्दा अनुकरण करण्यासारखी असते. म्हणून 'महाजनो येन गतः स पंथः ।' अशी आपल्याकडे म्हण आहे.

माणसाला आपल्या मनाविरुध्द काही घडलं किंवा लहानानी, इतरानी आपलं ऐकलं नाही किंवा दुसऱ्याच्या चुकीमुळे आपलं नुकसान झालं की संताप येतो व या संतापातून आपल्या मनात दुसऱ्याच्या विरुध्द सूडाची भावना उफाळून येते. पण आपण दुसऱ्याच्या बाजूने विचार केला किंवा त्याने असं का केलं असेल याचा विचार केला तर त्याची बाजू आपलं मन शांत असेल तर आपल्याला पटू शकते व त्यानंतर आपला संताप शांत होऊ लागतो. पण जर आपण पहिल्यापासूनच दुसऱ्याचा विचार करून वागलो तर आपल्या मनात संतापाची भावना उत्पन्नच होणार नाही. अशा माणसाच्या सहवासात मग हळुहळू इतरांचाही राग शांत होऊ लागतो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## गुरुवार

**हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी । जेणे मानसी स्थापिले निश्चयेसी ।**
**तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे । तया भाषणे नष्ट संदेह मोडे ॥१३३॥**

या श्लोकात समर्थ हरीभक्ताची लक्षणं आणि त्यांच्या जीवनाचा सामान्य लोकांवर काय परिणाम होतो ते सांगत आहेत. त्याचं पहिलं लक्षण म्हणजे तो अत्यंत विरक्त असतो. त्याचं जीवन वैराग्ययुक्त असतं. त्याच्या आयुष्याच्या वस्त्राला आतून अनासक्तीचं अस्तर असतं. केवळ जीव जगविण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचीच फक्त त्याला इच्छा होते. या व्यतिरिक्त इतर वस्तू मिळाव्यात अशी त्याच्या मनात इच्छाच निर्माण होत नाही. त्याचबरोबर त्याच्या प्रारब्धाने ज्या वस्तू त्याला मिळतात त्याचा तो त्यागही करत नाही. त्याला सर्वसामान्य माणसांप्रमाणेच सुखदुःखाच्या संवेदना जाणवतात पण सुखाची संवेदना पुन्हा पुन्हा उमटावी व त्यासाठी सुख देणाऱ्या वस्तूची मालकी आपल्याला मिळावी अशी सुखाची आसक्ती त्याच्या मनात ठाण मांडून बसत नाही. कारण जे त्याला मिळतं त्यात तो पूर्ण समाधानी व संतुष्ट असतो. त्याचं दुसरं लक्षण तो विज्ञानाची रास असतो. अंकगणितात रास म्हणजे मुद्दल + व्याज किंवा भांडवल+फायदा. हरीभक्ताने जीवनाच्या विज्ञा नाची रास ही भक्तीचं भांडवल घालून त्यातून मिळणाऱ्या आनंदाचा फायदा पुन्हा त्यातच मिसळून तयार केलेली असते. म्हणून त्याला अहंकारातून निर्माण होणाऱ्या जीवनाचं, त्यातल्या संघर्षांचं व समस्यांचं तसंच ईश्वरीय दृष्टीकोनातून जगल्या जाणाऱ्या सहज जीवनाचं पूर्ण ज्ञान असतं. या विज्ञानात त्याला झालेल्या आत्मज्ञानाचाही समावेश असतो. त्याच्या मनात ईश्वरासंबंधी, त्याच्या अस्तित्वासंबंधी, त्याच्या कार्यासंबंधी पूर्ण श्रध्दा असते. भक्ताने आपल्या मनात देवासंबंधी दृढनिश्चयाची स्थापना केलेली असते. हा त्याचा निश्चय कधी डळमळत नाही तर तो नांगर टाकलेल्या नौकेप्रमाणे सदैव स्थिरच असतो. याबाबतीत त्याच्या मनाने आपला सगळा चंचलपणा सोडून दिलेला असतो. अर्थातच अशा माणसाचं जीवन ही समाजासाठी एक स्थिर अशी सामाजिक संपत्तीच असते. अशा माणसाचं नुसतं दर्शन जरी झालं तरी पहाणाऱ्याला पूर्ण प्रसन्नता प्राप्त होते. त्याच्या वरदहस्ताचा स्पर्श आशीर्वादासाठी दुसऱ्याच्या मस्तकाला होताच नमस्कार करणाऱ्याचं मन शांत होतं. त्यातील विचाराच्या वावटळी शमतात. त्याला पुण्याचा लाभांश मिळतो. त्याच्या भाषणाने अगदी जुन्या जटिल समस्यांना उत्तरं मिळतात. सर्व शंकांचं समाधान होतं. सर्व नष्ट व नतद्रष्ट संदेहांचं निरसन होतं. म्हणून 'संगत साधूकी करीये' असं रामभक्त कबीर म्हणतात.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**नसे गर्व अंगी सदा वीतरागी । क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । यही लक्षणी जाणिजे योगीराणा ।।१३४।।**

समर्थ या श्लोकात योग्याची, सत्पुरुषाची, पूर्ण पुरुषाची लक्षणं सांगत आहेत, बहुतेक सामान्य माणसाना आपल्याला कोणीतरी सत्पुरुष भेटावा व त्याने आपल्या डोक्यावर हात ठेवून आपल्या सर्व इच्छा पुरवाव्यात असं वाटतं. मग मनातलं ओळखणं, भूत-भविष्य सांगणं, रोग बरे करणं, हातातून भस्म, कुंकू, उदी, प्रसाद, मौल्यवान वस्तू वगैरे काढणं ह्या गोष्टी जो करतो त्याला तो साधू समजतो व अशांच्या नादी लागून स्वतःचं पारमार्थिक नुकसान करून घेतो. अशी सामान्य माणसाची फसगत होऊ नये म्हणून समर्थ, योगी कोणाला म्हणावं ते इथे सांगत आहेत. आपल्या अंगातील सद्‌गुणांची, योग्यतेची त्याला यत्किंचितही जाणीव नसते. मग त्याचा गर्व वाढणं लांबच राहिलं. म्हणून आपल्या मोठेपणाची तो जाहिरात करत नाही. भोवती स्तुतिपाठकांचा मेळा जमवीत नाही. सत्काराची त्याला अपेक्षा नसते. कारण त्याला अहंकाराची बाधा होत नाही. तसंच त्याने कायमची आसक्ती जिंकलेली असते. याचा अर्थ त्याला सुखसंवेदना होत नाहीत असा नाही. पण या सुखदायक विषयांची मालकी आपल्याला मिळावी म्हणजे आपल्याला हवा तितका सुखोपभोग घेता येईल असं त्याला वाटत नाही. तसंच तो क्षमाशील असतो. कारण तो एकनाथमहाराजंसारखा शांतिब्रम्ह असतो. कितीही निंदा, अवहेलना, अपमान, तिरस्कार, उपेक्षा त्याच्या वाट्याला आली, त्याच्यावर कितीही संकटं कोसळली तरी त्याचं मन निवांत जागी तेवणाऱ्या नंदादीपासारखं शांत, स्थिर व प्रसन्न असतं. आपल्या तुकाराममहाराजांची त्यांच्या तोंडाला काळं फासून, गळयात चपलांची माळ घालून, त्याना गाढवावर उलटं बसवून त्यांच्या निंदकांनी त्यांची मिरवणूक काढली होती. पण त्यांच्या चेहेऱ्यावरची प्रसन्नता व शांती लवमात्र ढळली नाही. ते म्हणत, 'निंदकाचे घर असावे शेजारी.' या शांतीचा परिणाम म्हणून तो दुर्जनावर देखील दया करून त्याला सन्मार्ग दाखवू शकतो. उदा. नारदांनी त्यांच्या जिवावर बेतलं असतानासुध्दा वाल्या कोळयाचा उध्दार करून त्याला महर्षींची पदवी प्राप्त करून दिली. शिवाय त्याच्या मनात कोणत्याही गोष्टीचा लोभ नसल्यामुळे त्याच्या मनात कधीही क्षोभ होत नाही. ते निःस्तरंग असलेल्या सरोवरासारखं शांतच असतं. तो मनातून पूर्ण तृप्त असल्यामुळे तो कधीच दैन्यवाणा होत नाही. त्याच्या ठिकाणी अगतिकता, लाचारी कधीच निर्माण होत नाही. समर्थ म्हणतात, इतकी लक्षणं असणाऱ्या माणसालाच योगी म्हणतात.

**'वैष्णव जन तो तेने कहिये । जो पीड परायी जाने रे ।।' इति, नरसी मेहता.**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



शनिवार

**धरी रे मना संगती सज्जनाची । जेणे वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।**
**बळे भाव सद्‌बुध्दि सन्मार्ग लागे । महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे ।।१३५।।**

या श्लोकात समर्थ सज्जनांच्या संगतीचं महत्व सांगत आहेत. सामान्य संसारी माणसाना तर सज्जनांच्या संगतीचा फायदा होईल यात काही नवल नाही. पण यांच्या संगतीने दुर्जनाचीसुध्दा दुष्प्रवृत्ति पालटून जाते, हे या संगतीचं वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य त्यानी १२९ व्या श्लोकातसुध्दा सांगितलं आहे. सज्जनसंगतीच्या सामर्थ्याने म्हणजे बळाने दुर्जनाच्या मनात भक्तिभाव निर्माण होतो. त्याला मग सद्‌बुध्दी प्राप्त होते. आणि त्याला सन्मार्ग मिळतो. इतकंच नव्हे तर त्याला अत्यंत क्रूर अशा विक्राळ काळाचीसुध्दा भीति वाटत नाही. हा काळही जणू काही त्याच्यासमोर मोडून पडतो, भंग पावतो. जसा कस्तुरीच्या किंवा फुलाच्या संगतीने मातीलाही सुवास प्राप्त होतो, तसं सज्जनसंगतीने सामान्य माणसाचं होतं. येथे सज्जन याचा अर्थ सत् म्हणजे ईश्वरीय अस्तित्वाच्या संगतीत सतत असलेला पुरुष म्हणजेच सत्पुरुष असा असतो.

उदा. चैतन्य महाप्रभू किंवा गौरांग प्रभू याना मारायला आलेले दोन दरोडेखोर जगाई व मधाई या नावाचे, त्यांच्या प्रभावामुळे त्यांना मारु तर शकले नाहीतच उलट घरी गेल्या गेल्या त्या दोघानीही त्यांच्या घरी जाऊन त्यांची क्षमा मागितली. चैतन्य महाप्रभूनी त्याना पोटाशी धरलं व भक्तीमार्गाची दीक्षा देऊन त्या दोघांचही जीवन कृतार्थ केलं. सद्‌गुरूनाथ गुळवणीमहाराज यानी स्थापन केलेल्या वासुदेव निवास या आश्रमातून सतत चपला चोरीला जात होत्या. पण चपला कोण चोरतो ते काही कळेना. मग आश्रमातील स्वयंसेवकानी पाळत ठेवली तेव्हा एक गरीब मुलगा त्या चपला चोरतो आणि चांभाराला विकतो असं समजलं. शेवटी त्या मुलाला चपला चोरताना रंगे हाथ पकडलं व महाराजांसमोर उभं केलं. आता त्याला पोलिसांच्या हवाली करतील अशी सर्वांची कल्पना होती. पण महाराजांनी त्याची पूर्ण चौकशी केली व हा पहिलाच गुन्हा असल्यामुळे त्याला क्षमा केली. इतकंच नाही तर त्याला एक नोकरी देववून शिवाय त्याला रात्रीच्या शाळेत घालून त्याच्या शिक्षणाची सोयही केली. या अनपेक्षित मदतीमुळे मुलगा हळुहळू आश्रमात येऊ जाऊ लागला व त्याचं बस्तान बसल्यावर महाराजानी त्याला काही काळानी अनुग्रहही दिला. असा असतो सत्संगतीचा महिमा.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



रविवार

**भये व्यापिले सर्व ब्रम्हांड आहे । भयातीत ते संत आनंत पाहे ।**
**जया पाहता द्वैत काही दिसेना । भय मानसी सर्वथाही असेना ।।१३६।।**

या श्लोकात समर्थ भयाचं स्वरूप, व्याप्ती आणि निर्भय होण्याचा उपाय सांगतात. ते म्हणतात की ज्याला कशाहीपासून भय नाही असा एकही प्राणी या विश्वात नाही. प्रत्येकाला कशाना कशाचं तरी भय आहेच. सर्व ब्रम्हांडच जणू काही भयाने व्याप्त झाले आहे. उदा. माणसाला रोगजंतूंचं भय आहे, असाध्य व्याधीचं भय आहे. (कॅन्सर, हृद्रोग, मेंदूतील गाठी वगैरे). अकस्मात होणाऱ्या अपघाताचं भय आहे. अचानक, अनाहूतपणे येणाऱ्या मृत्युचं भय आहे. असह्य यातनांचं भय आहे, त्याने केलेल्या धनसंग्रहाला चोरीचं भय आहे, तर शेतातील लहानसहान कीटकाना उंदीर-घुशींचं भय आहे. उंदरांना साप-नागाचं भय. सापाला मुंगुसाचं भय असतं. अरण्यात लहान प्राण्याला मोठ्या प्राण्यांचं भय असतं. उंदराला मांजराचं, मांजराला कुत्र्याचं, कुत्र्याला लांडगे-कोल्ह्यांचं, तर यांना वाघसिंहाचं भय असतं. आपल्या भित्र्या सशाला तर झाडावरून पडलेल्या वाळलेल्या पानाचंसुध्दा भय वाटतं. असं असल्यामुळे सामान्य माणसाला कधीही निर्भयपणे जगता येत नाही. कारण तो आसक्तीतून सृष्टीशी जोडलेला असतो. पण संत सत्पुरुष मात्र भयाच्या पलीकडे म्हणजे निर्भय असतात. कारण त्यांची दृष्टी ही भय निर्माण करणाऱ्या वस्तूकडे नसून तिला निर्माण करणाऱ्या व तिचे गुणधर्म धारण करणाऱ्या अनंत अशा ईश्वराकडे असते. त्या ईश्वराशी ते एकरूप झालेले असल्यामुळे ती भयकारक वस्तू आपल्याहून वेगळी आहे असं वाटतच नाही. 'द्वितीयात् वै भयं भवति ।' कारण 'एकाकी न रमते बुधः ।' असं श्रुतिवचन आहे. शहाण्या व ज्ञानी माणसालाही एकटं रहायला कंटाळा येतो म्हणून त्याने दुसऱ्याशी सहवास केला की त्याच्या वागणूकीची व विचारांची निश्चितपणे कल्पना नसल्यामुळे त्याच्याविषयी भीती वाटू लागते. पण संत मात्र ईश्वराशी एकरूप झालेले असल्यामुळे व विश्व हे ईश्वराचंच रूप आहे आणि त्यातील सर्व गुणधर्म त्यानेच धारण केलेले आहेत याचं त्याना ज्ञान असल्यामुळे त्याना या विश्वात ईश्वराशिवाय काही वेगळे दिसतच नाही व अशा तऱ्हेने मूळातच द्वैतभाव लोपून गेल्यामुळे त्याच्या मनात केव्हाही व कोठल्याही तऱ्हेच्या भयाला स्थानच नसतं. म्हणून साक्षात भयालाच अशा संतांच्या बुध्दीत वसती करण्याचं भय वाटतं.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## सोमवार

**जिवा श्रेष्ठ ते पष्ट सांगोनि गेले । परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।**
**देहेबुध्दीचे कर्म खोटे टळेना । जुने ठेवणे मीपणे आकळेना ।।१३७।।**

या श्लोकापासून १४१ व्या श्लोकापर्यंत पाच श्लोकात 'जुने ठेवणे मीपणे आकळेना' हे पालुपद समर्थानी वापरलेलं आहे. माणसाला केवळ त्याच्या अहंकारामुळे अत्यंत सनातन व अनादि, अनंत असं ईश्वरतत्व समजत नाही व समजलं तरी अनुभवता येत नाही असा पालुपदाचा अर्थ आहे.

वास्तविक अनेक श्रेष्ठ संत, सत्पुरुषानी स्वतःच्या अनुभवावर आधारलेला ईश्वराशी एकरूप होण्यासाठी स्पष्टपणे ईश्वरभक्तीचा मार्ग सांगून ठेवला आहे. उदा. देवर्षी नारदांची व शांडिल्यांची भक्तिसूत्रं प्रसिध्दच आहेत. तसंच बादरायण व्यासानी ब्रम्हसूत्रं लिहीली. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी, समर्थ रामदासानी दासबोध तर एकनाथमहाराजानी एकनाथी भागवत हे ग्रंथ सामान्य लोकांच्या प्रगतीसाठी व मार्गदर्शनासाठी लिहीले होते. तर तुकाराममहाराजांची अभंगगाथा सर्वांना परिचितच आहे. परंतु या सर्व ग्रथांचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही. कारण मानवाचं मूळ अज्ञान तसंच शिल्लक राहिलं. संतानी सांगितलेलं आत्मज्ञान त्या मूळ अज्ञानाचा नाश करू शकलं नाही. मूळ अज्ञान म्हणजेच ईश्वरासंबंधीचं अज्ञान. हे अज्ञान म्हणजे अपुरं ज्ञान किंवा भ्रामक ज्ञान किंवा चुकीचं ज्ञान किंवा ज्ञानाचा अभाव. ईश्वराच्या मायेचा प्रभाव इतका विलक्षण आहे की कितीही वेळा ज्ञान झालं, त्याचं वाचन, घोकंपट्टी, मनन, चिंतन झालं तरी प्रसंग आला की विषयांच्या आकर्षणाच्या जाळयात माणूस अडकतोच व त्यातून पुढील विकारांची निर्मिती होतेच. उदा. काम, क्रोध वगैरे. आपल्या शास्त्रात जे अनेक न्याय सांगितले आहेत. त्यापैकी शुकनलिका न्याय नावाचा एक न्याय आहे. पोपटाला कितीही पढवलं की नळीला धरलेले पाय सोडलेस की तू नळीपासून मोकळा होऊन आकाशात पुन्हा भरारी मारू शकशील. तरीसुध्दा तो जर दोरीभोवती असलेल्या नळीवर बसला व नळी फिरून तो वर पाय खाली डोकं अशा स्थितीत उलटा लोंबकळू लागला तर आपण पडू या भीतीने अजिबात नळी सोडत नाही व आयताच पारध्याच्या हातात सापडतो. तसंच आपण देहच आहोत या बुध्दीतून केलेलं कर्म हे खोटं आहे हे माणसाला जरी कळलं तरी ते त्याला टाळता येत नाही म्हणून ते तो पुन्हा पुन्हा करत असतो. तसं आपलं सनातन, अनंत असं आत्मस्वरूप केवळ अहंकारामुळे जीवाला समजत नाही, त्याचं आकलन होत नाही व त्याचा अनुभव येत नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**भ्रमे नाडळे वीत ते गुप्त झाले । जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आले ।**
**देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना । जुने ठेवणे मीपणे आकळेना ।।१३८।।**

फार पूर्वीची गोष्ट आहे. एक आटपाट नगर होतं. त्या शहरात एक सावकार रहात होता. त्याला एकच मुलगा होता. लोकाना व्याजाने पैसे देऊन त्याने खूप धन कमावलं होतं. खूप संपत्ति गोळा केली होती. या संपत्तीचं रक्षण कसं करावं याची त्याला सारखी चिंता वाटत असे. कारण त्याकाळी लॉकर्स नव्हते, बँका नव्हत्या. शिवाय दरोडेखोरानी दरोडा घालून संपत्तीची लूटमार करण्याची भीतीही होतीच. बरं, मुलगा लहान असल्यामुळे त्याला कोणीतरी फसवण्याची शक्यता होती. किंवा वाईट संगत लागून तो सर्व संपत्ती उधळून टाकण्याचीही भीती होतीच म्हणून एक दिवस मुलगा गावी गेला असता आपल्या मित्राच्या सल्ल्याने त्याच्या नकळत त्याने नोकरांकरवी एक खड्डा खणून घेतला व एक मोहरांचा हंडा त्यात पुरून ठेवला व वर माती लोटून जमीन नेहमीसारखी करून घेतली. त्यामुळे मुलाला ही गोष्ट समजली नाही. काही काळाने सावकार काळाच्या आधीन झाला. मग मुलाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याच्या नातेवाईकानी त्याला पार लुबाडलं व शेवटी त्याच्यावर भीक मागण्याची पाळी आली व ज्या खोलीत मोहरा पुरल्या त्याच खोलीत तो धाय मोकलून रडू लागला. मित्राला ही हकीकत कळताच त्याने खरी परिस्थिती सांगून मुलाचं जन्म-दारिद्र्य दूर केलं. समर्थ म्हणतात, आपली सामान्य माणसाची अशीच त्या मुलाप्रमाणे स्थिती होते. आपण भ्रमाने दाराशी आलेल्या कामधेनूला भाकड गाय समजतो तर पदरी पडलेल्या चिंतामणीला गारगोटी समजतो व कल्पवृक्षाच्या सावलीत बसूनसुध्दा आपण उपाशी रहातो. कारण मी देहच आहे अशा बुध्दीमुळे देहाला नटवणं व सजवणं, त्याला उंची वस्त्रं नेसवणं, त्याच्यावर मौल्यवान दागिने घालणं हीच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे असं आपण मानतो. इंद्रियसुखातून मिळणारी भोगलालसा शमवणं हेच आपण जीवनाचं ध्येय आहे असं समजतो. पण या गोष्टीमुळे आपली काही प्रगति होत नसून फक्त आपला अहंकारच फोफावतो हे काही केल्या आपल्या लक्षात येत नाही व या अहंकारामुळेच आपलं मूळचं आत्मस्वरूप जे अनंत व सनातन आहे, सुखदुःखाच्या पलीकडे, पापपुण्याच्या पलीकडे आहे, जे नित्य व परमशांत आहे, जे सर्व विश्वाला व्यापून आहे व त्याच्यापलीकडेही आहे हे आपल्या ध्यानात येत नाही व अनुभवालाही येत नाही. याचं कारण आपण फक्त देहच नाही असा आपला निश्चय टिकत नाही असं समर्थ या श्लोकात म्हणतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार


**पुढे पाहता सर्वही कोंदलेसे । अभाग्यास हे दृश्य पाषाण भासे ।**
**अभावे कदा पुण्य गाठी पडेना । जुने ठेवणे मीपणे आकळेना ।।१३९।।**

सर्व विश्व हे खरं पाहता चेतन व जड म्हणजे सजीव व निर्जीव यानी ठासून, कोंदून भरले आहे. विश्वात याशिवाय तिसरी वस्तूच नाही.या चेतन व जड वस्तूही ज्या तत्वापासून निर्माण होतात त्याला
ब्रम्ह किंवा ईश्वर असं म्हणतात. शिवाय चेतनालासुध्दा निर्जिवातून प्रकट व्हावं लागतं. उदाः- आपल्या शरीरातील चेतनशक्ती (जिवंतपणा) आपल्याला सोडून गेली की आपलं शरीर निर्जिव म्हणजे जड होतं. हे जडत्व घन, द्रव, वायु, तेज (उर्जा) व आकाश या रूपातून व त्यांच्या गुणधर्मातून प्रकट होतं. पण आपल्या शरीरातील ज्ञानेंद्रियांना मात्र जडाचे गुणधर्मच समजतात. पण या समजलेल्या गुणधर्मावरून ती वस्तू जड आहे की चेतन आहे हे अनुमानाने व तर्काने समजून घ्यावं लागतं. ज्ञानी माणसाला चैतन्य समजू शकतं. पण अज्ञानी व अभागी माणूस मात्र जडाच्या गुणधर्मांच्या आकर्षणात अडकतो. या जडतेसाठी समर्थानी पाषाण म्हणजे दगड असा शब्द वापरला आहे. म्हणून भक्ताला पाषाणाच्या मूर्तीत साक्षात् चैतन्याचा म्हणजेच ईश्वरीशक्तीचा अनुभव आला तरी अज्ञानी व म्हणून अभागी असलेल्या माणसाला मात्र त्यातील पाषाण म्हणजे दगडच जाणवतो. तसंच त्याच्या स्वतःच्या जड शरीरात विलास करीत असलेलं आत्मस्वरूप किंवा ब्रम्हभाव न जाणवल्यामुळे त्याला फक्त जड शरीराचे गुणधर्मच जाणवतात. त्यातूनच त्याचा व्यक्तिगत अहंकार निर्माण होतो. मग त्याचं सर्व लक्ष स्वतःचे गुणधर्म सुशोभित करण्याकडेच लागतं. पण या ईश्वराच्या ज्ञानाच्या अभावी आपल्यासारखीच इतर माणसं व प्राणी आहेत, त्याच्यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे, त्याचं दुःख कमी करण्याचं पुण्यकर्म आपल्या हातून घडलं पाहिजे, 'या गोष्टीवर त्याचं लक्ष केंद्रित होत नाही. त्यामुळे तसा पुण्याप्राप्तीचा प्रयत्नही त्याच्या हातून घडत नाही. याला एकच कारण असतं. ते म्हणजे त्याच्या अहंकाराने त्याचं सर्व जीवन व्यापलेलं असतं. याची त्याला कल्पना नसते. आपण सर्वच प्राणी त्या सनातन व अनंत ईश्वराचे अंश असतो. इतकंच नव्हे तर ती अनंत असलेली ईश्वरी शक्ती आपल्या मर्यादित शरीराच्या माध्यमातून प्रकट होत असते, पूर्वनियोजित ईश्वरीसंकल्पानुसार ठरलेली लीला करीत असते याचं त्याला ज्ञान नसतं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार


**जयाचे तया चूकले प्राप्त नाही । गुणे गोविले जाहले दुख देही ।**
**गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना । जुने ठेवणे मीपणे आकळेना ।।१४०।।**

या श्लोकात समर्थ त्रिगुणांचे परिणाम सांगत आहेत. वास्तविक ईश्वर, ब्रम्ह किंवा आत्मस्वरूप अनंत आहे. त्याच्या अनंत शक्तीने स्वतःचा संकोच करून मानवी शरीर, मन, बुध्दी व जीव यांचे गुणधर्म धारण केले. पण त्या धारण करण्याच्या प्रयत्नात आपण अनंत आहोत हे ती विसरली व स्वतःला आपण शरीर, मन, बुध्दी व जीवाइतकेच आहोत असं मानू लागली. त्यामुळे देहाची सुखदुःखं आपलीच आहेत असं तिला वाटू लागलं. म्हणून माणसाला वास्तविक आत्मस्वरूप हे अनंत असतानासुध्दा त्याची जाणीव तर होत नाहीच. पण शिवाय आपल्या ठिकाणी वास्तव्य करून असलेल्या जीवात्म्याचीसुध्दा त्याला दादफिर्याद नसते. त्यामुळे प्रकृतीने निर्माण केलेल्या त्रिगुणातच तो सुखदुःख भोगत असतो व प्रकृतीने केलेल्या कर्मांनाच तो आपण केलेली कर्मं आहेत असं मानतो व त्यांच्या यशस्वितेबद्दल चिंता करत बसतो. त्याच्या अपेक्षेप्रमाणे ती झाली नाहीत की त्याचं दुःख भोगत रहातो. हे सर्व प्रकृतिच्या त्रिगुणांमुळे घडतं. हे त्रिगुण कोणते? तर सत्व, रज, तम असं या त्रिगुणाचं नाव आहे. या त्रिगुणानी निर्माण केलेल्या बंधनात जीव अडकून बसतो. सत्वगुण हा सुखमय म्हणजे सुखाची निर्मिती करणारा अत्यंत निर्मल व ज्ञानाचा प्रकाशक म्हणजे ज्ञानदायक असा असतो. तर रजोगुणामळे माणसाच्या ठिकाणी तृष्णा म्हणजे वासना निर्माण होते. ती पूर्ण करण्यासाठी कर्म करावं लागतं आणि त्यातील सुखदायक कर्मांची आसक्ती उत्पन्न होऊ लागते. आता तमोगुणामुळे जीवाला अज्ञानाचा विळखा पडतो. त्यामुळे खरं ज्ञान झाकलं जातं. भ्रामक ज्ञानाचा मोह निर्माण होतो. तसंच तमोगुणामुळे अंगात आळस येतो. अवेळी झोप येते आणि जागेपणी हातून चुका होतात. म्हणून सत्वगुण हा ज्ञान आणि सुख या रज्जुने तर रजोगुण हा आसक्तीच्या दोरीने व तमोगुण हा अज्ञानाच्या धाग्याने जीवाला बंधन निर्माण करतो. आणि जीव अहंकाराच्या तावडीत असला तर ही बंधनं आणखीनच बळकट व अतूट होतात व दुःखाला कारणीभूत होतात. शिवाय जीवनात या चित्तात उठणारी कोणतीही वृत्ती या गुणातूनच निर्माण होते. या गुणांवेगळी अशी वृत्ती चित्तात उठूच शकत नाही. याला अपवाद फक्त संत सत्पुरुष असतात कारण त्यांच्या चित्तात फक्त ईश्वरासंबंधीच वृत्ती उठतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



शुक्रवार

**म्हणे दास सायास त्याचे करावे । जनी जाणता पाय त्याचे धरावे ।**
**गुरू अंजनेवीण ते आकळेना । जुने ठेवणे मीपणे ते कळेना ।।१४१।।**

समर्थांनी या श्लोकात स्वतःला दास म्हणवून घेतले आहे. ते रामाला समर्थ म्हणत असत व स्वतःला रामाचे दास म्हणून रामदास म्हणवून घेत असत. पण कालांतराने लोक रामदासानाच समर्थ म्हणू लागले. ते या श्लोकात सद्गुरूंची आवश्यकता सांगत आहेत. ते म्हणतात अध्यात्मक्षेत्रात सद्गुरू हे जाणते म्हणजे आत्मज्ञानी असतात. शंकराचार्यांनी म्हटलं आहे की सद्गुरू हा ब्रम्हनिष्ठ म्हणजे ब्रम्हज्ञानी आणि श्रोत्रिय म्हणजे त्याच्याकडे शिष्याला मार्गदर्शन करून ब्रम्हानुभव देण्याची क्षमता असावी लागते. त्याच्याच जोडीला शिष्याकडून त्याची कसलीही अपेक्षा नसते. अशा माणसालाच समर्थ जाणता म्हणतात. परमार्थाच्या प्रांतात ज्या साधकाला आपली प्रगती करून घेण्याची इच्छा असेल त्याला सद्गुरूकडून मार्गदर्शन करून घ्यावंच लागतं. म्हणून मोठ्या प्रयत्नाने अशा सद्गुरूला शोधून काढावे लागते असं पहिल्या ओळीत सांगतात. 'गुरूबिना ग्यान नही मिलता' अशी हिंदी भाषेत म्हणच आहे. म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात, 'सद्गुरूवाचोनी सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ।' समर्थही श्लोकाच्या दुसऱ्या ओळीत तेच सांगतात की अशा जाणत्या सद्गुरूचे पाय धरावे म्हणजे आपलं मस्तक त्याच्या चरणावर ठेवावं म्हणजेच दुसऱ्या अर्थाने आपल्या शरीरातील सर्वात उच्च बिंदू म्हणजे आपलं मस्तक. त्या मस्तकात असलेला आपला अहंकार आपण सद्गुरूच्या शरीरातील सर्वात खालचा भाग म्हणजे सद्गुरूचरण, त्या चरणांवर समर्पित करावा. 'अडला हरी आणि गाढवाचे पाय धरी' अशा भावनेने सद्गुरूना नमस्कार करू नये. त्याचा काही उपयोग होत नाही. सद्गुरूंच्या सेवेत व नमस्कारात शंभर टक्के समर्पणाची भावना हवी. मग सद्गुरू जी साधना करायला सांगतील ती प्राणपणाने केली पाहिजे. त्याशिवाय ईश्वरदर्शन किंवा ईश्वरप्राप्ती किंवा ईश्वराशी एकरूपता होत नाही. गुरूकृपेचं अंजन डोळ्यात घातल्याशिवाय आपल्या साधनेत अपेक्षित प्रगती होत नाही. गुरूकृपा झाल्याशिवाय शिष्याचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन संपूर्णपणे पालटत नाही. गुरूच्या उपदेशाने शिष्याच्या अहंकाराचा नाश होतो. मग अनंत व सनातन अशा आत्मस्वरूपाशी साधकाचं मीलन होतं. या स्थितीचं वर्णन करताना आपले तुकाराम महाराज म्हणतात की, 'देव पहाया गेलो । तेथे देवचि होऊनि ठेलो ।' किंवा 'तुका झालासे पांडुरंग ।' या श्लोकाबरोबर 'जुने ठेवणे मीपणे आकळेना' या पालुपदाचे श्लोक पूर्ण होत आहेत.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**कळेना कळेना कळेना, ढळेना । ढळे नाढळे, संशयोही ढळेना ।**
**गळेना गळेना अहंता गळेना । बळे आकळेना मिळेना मिळेना ।।१४२।।**
**अविद्यागुणे मानवा उमजेना । भ्रमे चूकले हीत ते आकळेना ।**
**परिक्षेविणे बांधले दृढ नाणे । परी सत्य मिथ्या असे कोण जाणे ।।१४३।।**

पहिल्या श्लोकात एखाद्या कसलेल्या शास्त्रीय संगीत गायकाप्रमाणे समर्थानी शब्दांच्या तिहायांचा वाचकांवर वर्षाव केलेला दिसतो. एखादा विचार वाचकांच्या मनावर पूर्णपणे बिंबवायचा असेल तर तो पुन्हापुन्हा सांगावा लागतो. त्याच तंत्राचा इथे समर्थानी अवलंब केलेला दिसत आहे. ते म्हणतात, माणूस जन्मभर निरनिराळ्या ज्ञानाचा संग्रह आपल्या चिमुकल्या बुध्दीत करत असतो. उदा. संगणक कसा वापरावा, सायकल, स्कूटर, मोटार कशी चालवावी, विजेची उपकरणं शॉक (धक्का) न बसता कशी हाताळावी, स्वयंपाकाचा गॅस कसा वापरावा वगैरे. पण ईश्वरासंबंधी जे ज्ञान असायला हवं, ते मात्र त्याला होत नाही. या बाबतीत त्याला जे कळायला हवं ते कळत नाही. कारण त्याच्या मनातील संशय नाहीसा होत नाही. याचं महत्वाचं कारण म्हणजे त्याचा अहंकार निःशेष गळून जात नाही. त्यामुळे मिळवलेल्या ज्ञानावर अहंकाराच्या आधारावर त्याचा व्यवहार व्यवस्थित चालू असतो. म्हणून ईश्वरी ज्ञानाची त्याला गरज वाटत नाही. त्यामुळे कितीही प्रयत्न केला तरी त्याला मुक्ती व मनःशक्ती मिळत नाही.

पुढच्या श्लोकात समर्थ याचं कारण सांगत आहेत. ते म्हणतात, अविद्येमुळे म्हणजे अज्ञानामुळे माणसाला स्वतःचं खरं हित कशात आहे तेच कळत नाही. वास्तविक इंद्रिये, मन, बुध्दी ही ज्ञानग्रहणाची सर्व साधनं उपलब्ध असताना केवळ अविद्येच्या आवरणामुळे माणसाला भ्रमाने जे सत्य आहे त्याचे आकलन होत नाही. भगवान् पतंजलींच्या म्हणण्याप्रमाणे अविद्येतून अहंकाराची निर्मिती होते. हे विश्व एक वस्तू असताना आपल्याला त्यात भासणारा वेगवेगळेपणा खरा वाटणं म्हणजे मी वेगळा व विश्व वेगळे असं वाटणं हे अविद्येचं पहिलं रूप. तर मी विश्वापेक्षा मोठा आहे म्हणून महत्वाचा आहे असं वाटणं हे तिच्यातून निघालेल्या अहंकाराचं स्वरूप. परीक्षा न करता जर आपण खोटं नाणं पदरात बांधून घेतलं म्हणजे अहंकाराचा व अज्ञानाचा स्वीकार केला तर जीवनात शाश्वत काय आहे आणि अशाश्वत काय आहे हे आपल्याला कोण सांगणार? अर्थात् ते आपल्याला कधीही कळणं शक्य नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

**जगी पाहता साच ते काय आहे । अती आदरे सत्य शोधूनि पाहे ।**
**पुढे पाहता पाहता देव जोडे । भ्रमे भ्रांति अज्ञान हे सर्व मोडे ।।१४४।।**
**सदा वीषयो चिंतिता जीव झाला । अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।**
**विवेके सदा स्वस्वरूपी भरावे । जिवा ऊगमी जन्म नाही स्वभावे ।।१४५।।**

माणसाला आपलं जीवन नेहमी सुखात जावं असं वाटतं व तो हे सुख जगातील त्याला आवडणाऱ्या वस्तूत शोधत असतो. पण या वस्तूंची मालकी त्याला नेहमीच मिळते असं नाही. मग सुखाच्या शोधात असतानाच त्याच्या पदरी मात्र दुःख येतं. यातून मग सुख काय किंवा दुःख काय हे तात्पुरतं क्षणिक असतं, असं त्याच्या लक्षात येतं. मग या जगात शाश्वत सत्य काय आहे याचा त्याला गांभिर्याने व तळमळीने शोध घ्यावासा वाटतो. त्यातून त्याच्या असं लक्षात येतं की या जगातील सर्वच वस्तू बदलणाऱ्या, रूपांतरीत होणाऱ्या व कालाच्या ओघात नष्ट होणाऱ्या आहेत. इतकंच काय पण आपलं शरीरही व त्याबरोबरच आपली बुध्दीही एकना एक दिवस या मातीत निर्जीव होऊन पडणार आहे.त्याक्षणी आपण मिळवलेल्या सर्व वस्तू इथेच सोडून आपल्याला परलोकी जावं लागणार आहे. असंच सर्वांनाही जावं लागणार आहे. या जगात फक्त ईश्वर व त्याची शक्ती या दोनच गोष्टी शाश्वत व अंतिम सत्य आहेत. हे कळल्यावर व अनुभवल्यावर त्याचा या जगाविषयीचा सर्व भ्रम, भ्रांति व अज्ञान हे मोडून पडतं म्हणजे नाश पावतं.

दुसऱ्या श्लोकात समर्थ विवेकबुध्दीचं महत्व सांगत आहेत. ते म्हणतात, जन्माला आलेला जीव आपलं जीवन सुखात जावं म्हणून धडपडत असतो. त्यासाठी त्याला सदैव सुख देणाऱ्या विषयांचंच चिंतन करावं लागतं. या करावा लागणाऱ्या चिंतनातूनच मग ईश्वराविषयीचं अज्ञान व त्यातून जन्माला येणारा अहंकार व त्यातून स्वतःच्या मालकीच्या गोष्टीसंबंधी ममत्व व म्हणून त्यांच्याबद्दल वाटणारं अवास्तव व अयोग्य महत्व ही सगळी साखळी निर्माण होते. यामुळेच जीव जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकून पडतो. पण विवेकशक्तीची मदत घेऊन जीवाने आपलं खरं, वास्तव स्वरूप काय आहे हे ओळखलं व रामभक्ती करून तो जर त्या स्वरूपस्थितीपर्यंत पोहोचला तर त्याला असं समजेल की हा त्याचा शेवटचा जन्म असून तो मुक्त व रामाशी एकरूप झाला आहे. जसं गंगा ही उगमापाशी अत्यंत शुध्द व पवित्र असते पण वाटेत तिला येऊन मिळणाऱ्या ओढे नाल्यामुळे तिचं जल मलीन होत जातं व आपली सर्व मलीनता ती सागराला अर्पण करून स्वतः पुन्हा शुध्द होते व ढगांच्या रूपाने ती पुन्हा स्वतःच्याच उगमापाशी येते. जीवाचं तसंच होतं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥




## सोमवार

**दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी । अकस्मात आकारले काळ मोडी ।**
**पुढे सर्व जाईल काही न राहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४६॥**
**फुटेना तुटेना चळेना ढळेना । सदा संचले मीपणे ते कळेना ।**
**तया एकरूपासी दूजा न साहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४७॥**


समर्थानी पहिल्या श्लोकात जगातील सर्व वस्तू रूपांतरीत होणाऱ्या व नाश पावणाऱ्या असतात, हे सनातन सत्य आपल्या मनाला समजावून सांगताना, डोळ्याना दिसणारा जगाचा जो थोडासा भाग दिसतो तो जसा आहे तसाच कायम टिकत नाही. त्यात क्षणोक्षणी बदल होत जातो. मग त्याचं दुसऱ्या कशात तरी कालांतराने रूपांतर होतं. त्याचा मूळ आकार काळ मोडून टाकतो. आणि शेवटी प्रळयाच्यावेळी सर्वच जगाचा नाश होऊन पुढे त्यातील काहीच शिल्लक रहात नाही कारण त्याचा मूळ शक्तीत लय होतो. आणि तिचा विलय अनंत अशा ईश्वरात होतो. आश्चर्य म्हणजे या ईश्वरात कधीही व कसलाच बदल होत नाही. म्हणूनच याला सत् , चित् व आनंद म्हणतात व या अनंत आणि अव्यक्त अशा ईश्वराच्या आधारावरच या विश्वातील शक्तीची लीला चालू असते व या लीलेत अडकून गेल्यामुळे जीवाला अविकारी व अनंत अशा ईश्वराचा तो अव्यक्त असल्यामुळे सहजासहजी पत्ता लागत नाही. म्हणून तो सापडण्यासाठी त्याला विवेकबुध्दीने व सूक्ष्म दृष्टीने शोधावे असं समर्थ आपल्या मनाला समजावून सांगत आहेत.

दुसऱ्या श्लोकात समर्थ म्हणतात, की अशा तऱ्हेने एका बाजुने विचार करता विश्वातील सर्व वस्तू जरी नश्वर व क्षणभंगुर व केव्हातरी नाहीशा होणाऱ्या आहेत असं दिसलं तरी त्यांचा आधार असलेलं जे शुध्द व मूलतत्व, जे ईश्वर, ब्रम्ह, अंतिम सत्य किंवा वस्तू या नावानी ओळखलं जातं ते मात्र कधीही फुटत नाही, तुटत नाही, चळत नाही व ढळतही नाही. तर ते आपल्या निर्गुण, निराकार, सर्वव्यापक, अनंत अखंड व अव्यक्त अशा स्वरूपात पूर्णपणे व्यापून राहिलेलं असतं. पण माणसाला स्वतःच्या ठिकाणी असलेल्या अहंकारामुळे या अनंत अशा तत्वाची जाणीव होऊ शकत नाही. कारण अहंकार हा मी वेगळा आणि उरलेलं जग वेगळं अशी जगाची विभागणी करतो, तर ईश्वर हा अखंड असल्यामुळे त्याला आपल्याहून दुसरं कोणी वेगळं अस्तित्वात आहे ही जाणीवही सहन होत नाही. म्हणून अशा ईश्वराला आपण त्याच्या अनंत स्वरूपाशी एकरूप होऊनच शोधून काढला पाहिजे असं समर्थ आपल्याला सांगत आहेत.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**निराकार आधार ब्रम्हादिकाचा । जया सांगता सीणली वेदवाचा ।**
**विवेके तदाकार होऊनि राहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४८।।**
**जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे । जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे ।**
**जगी पाहता पाहणे जात आहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४९।।**

समर्थ पहिल्या श्लोकात ब्रम्हाची लक्षणे सांगत आहेत. ते म्हणतात, या विश्वाला ब्रम्हाचा आधार आहे. व्यवहारात आपण पहातोच की प्रत्येक गोष्टीला दुसऱ्या वस्तूचा आधार घ्यावा लागतो. उदा. पुस्तकाला टेबलाचा आधार, तर टेबलाला जमिनीचा आधार, इमारतीतील जमिनीला पृथ्वीचा आधार, पृथ्वीला आकाशाचा आधार तर आकाशाला ब्रम्हाचा आधार. पण ह्या ब्रम्हाच्या आधाराला मात्र कोठलाही आकार नसतो. ते निराकार असतं. इतकंच नव्हे तर मनाला त्याचं आकलन होत नाही. बुध्दीला त्यासंबंधी विचार करता येत नाही. वाणीने त्याचं वर्णन करता येत नाही. वेद ही ईश्वराची अपौरुषेय अशी दिव्य वाणी आहे, असं आपण मानतो. पण तिलाही या ब्रम्हाचं समाधानकारकरितीने वर्णन करता आलं नाही. तिला त्याविषयी न इति, न इति एवढंच म्हणता आलं. कारण वर्णन करण्यासाठी मर्यादितपणा आणि द्वैत या दोन गोष्टी असाव्या लागतात. पण ब्रम्ह तर अनंत व सर्वव्यापक आहे. म्हणून विवेकबुध्दीने त्या ब्रम्हाचा अनुभव घेऊन त्याच्याशी तदाकार, तद्रूपच होऊन रहावं लागतं. कारण ब्रम्हाच्या ठिकाणी ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान अशी त्रिपुटी नसते. याचसाठी ते शोधावं लागतं.

समर्थ दुसऱ्या श्लोकात आपल्याला सांगतात, या जगात ब्रम्हाचा शोध घेताना चामड्याच्या डोळ्यांची आपल्याला मदत होत नाही कारण ते ब्रम्हाला जाणू शकत नाहीत. डोळेच काय पण कान, नाक, जीभ व त्वचा यापैकी कोणतंही इंद्रिय एकेकट्याने किंवा सर्व इंद्रियं मिळूनसुध्दा ब्रम्हाला अनुभवू शकत नाहीत. तसंच या ज्ञानेंद्रियांपेक्षा मन व बुध्दी ही अधिक तीक्ष्ण व सूक्ष्म आहेत. पण हे ज्ञानचक्षूही ब्रम्हापुढे पांगळे होतात. यानी ब्रम्हाविषयी थोडंसं समजल्यासारखं वाटतं पण त्या ज्ञानाचं रक्षण होऊ शकत नाही. याचं कारण असं आहे की कोठल्याही वस्तूचं ज्ञान होताना त्याचे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान असे तीन भाग होतात. पण ब्रम्हाच्या बाबतीत मात्र हे तीनही ब्रम्हाचेच अंश असल्यामुळे ते ब्रम्हरूपच होऊन जातात. मग पाहण्यासाठी पाहणारा, जे पहायचं ते व पाहणं या तीन गोष्टी वेगळ्या रहात नाहीत. अशा ब्रम्हाचा शोध घेताना पाहणंच संपून जातं. येथपर्यंत पोहोचण्यासाठी अनंत अशा ब्रम्हाचा शोध घेतला पाहिजे. ज्याप्रमाणे मिठाची बाहुली समुद्राची खोली मोजायला गेली आणि स्वतः समुद्रच झाली तशी ब्रम्हाचा शोध घेणाराची स्थिती होते. आपले तुकाराम महाराज म्हणतात, **'देव पहाया गेलो । तेथे देवचि होऊनी ठेलो ।।'**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**नसे पीत ना श्वेत ना शाम काही । नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाही ।**
**म्हणे दास विश्वासता मुक्ति लाहे । मना संत आनंत शोधूनि पाहे।।१५०।।**
**खरे शोधिता शोधिता शोधताहे । मना बोधिता बोधिता बोधताहे ।**
**परी सर्वही सज्जनाचेनि योगे । बरा निश्चयो पाविजे सानुरागे ।।१५१।।**

समर्थ पहिल्या श्लोकात ब्रम्हाचं वर्णन आणि त्याच्या प्राप्तीचा उपाय सांगत आहेत. त्यांच्या मते ब्रम्ह हे अनिर्वचनीय आहे हे सांगण्यासाठी त्यानी रूपाचा व त्याच्या गुणधर्माचा उपयोग केला आहे. कारण माणूस सर्व इंद्रियामध्ये जास्तीत जास्त उपयोग डोळ्याचाच करतो. म्हणून समर्थ म्हणतात, ब्रम्ह हे पिवळं नाही, पांढरं नाही, काळं नाही व निळंही नाही. इतकंच काय तर ते कोणत्याच रंगाचं नाही. दोन रंगांच्या मिश्रणानेही त्याचा रंग सांगता येत नाही. एकूण काय ब्रम्हाच्या रंगांचंच काय पण कोणत्याही गुणधर्माचं वर्णन करता येणार नाही. इतकंच नव्हे तर ते व्यक्त आहे की अव्यक्त आहे तेही सांगता येत नाही. ते विश्वाचा आधार असल्यामुळे त्याला ते संपूर्ण अव्यक्त आहे असंही म्हणता येणार नाही. पण ते ज्ञानेंद्रिये, मन व बुध्दीला न जाणता येण्यासारखं असल्यामुळे त्याला ते संपूर्ण व्यक्त आहे असेही म्हणता येणार नाही. जी गोष्ट आहे असं आपल्याला माहीत आहे, पण जिचं वर्णन करता येत नाही अशा गोष्टीला अनिर्वचनीय असं म्हणतात. म्हणून समर्थ म्हणतात अशा गोष्टीच्या अस्तित्वावर आपण पूर्ण श्रध्दा ठेवली तरच आपल्याला जन्ममरणापासून पूर्णपणे मुक्ती लाभेल.

पुढच्या श्लोकात समर्थ म्हणतात की अशा या अज्ञेय, अनिर्वचनीय ब्रम्हाचा तुम्ही शोध घेतला पाहिजे. कारण ब्रम्ह हे अंतिम सत्य आहे व ते घरबसल्या मिळत नाही म्हणून तुम्ही त्याचा शोध घ्यायला सुरवात केली पाहिजे. म्हणजे शोधता शोधता एक दिवस एका क्षणी ते तुम्हाला सापडेल. शिवाय हे सत्य शोधत असताना तुम्हाला जो बोध होत जाईल त्याची सतत पुनरावृत्ती, चिंतन करून तो बोध आचरणात आणायचं तपही तुम्हाला करावं लागेल. आता हे सर्व जाणत्या, ज्ञानी व अनुभवी सज्जनाच्या मार्गदर्शनाखाली व्हायला पाहिजे. त्यासाठी सत्संगती मिळायला पाहिजे व मोठ्या प्रेमाने, निश्चयाने या सत्संगतीचा लाभ आपण घेतला पाहिजे, जसं एखाद्या सज्जनाला काही रोगामुळे हॉस्पिटलमध्ये रहावं लागलं तर त्याची संगत डॉक्टर, नर्सेस, आया व इतर कर्मचारी याना मिळत असतेच. पण त्याना या सत्संगतीचा काहीच लाभ उठवता येत नाही. कारण त्या सर्वांची नजर त्याच्याकडून मिळणाऱ्या पैशावर असते. तसं आपण सत्संगतीच्या बाबतीत करू नये.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**बहूता परी कूसरी तत्वझाडा । परी पाहिजे अंतरी तो निवाडा ।**
**मना सार साचार ते वेगळे रे । समस्तामध्ये येक ते आगळे रे ।।१५२।।**
**नव्हे पिंडज्ञाने नव्हे तत्वज्ञाने । समाधान काही नव्हे तानमाने ।**
**नव्हे योगयागे नव्हे भोगत्यागे । समाधान ते सज्जनाचेनि योगे ।।१५३।।**

आपल्याकडे ईश्वराचा शोध घेण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्यानुसार अनेक तत्वज्ञानं निर्माण झाली आहेत. त्याला आपण दर्शन म्हणतो. आपल्याकडे अशी सहा दर्शने उपलब्ध आहेत. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा, अशी त्यांची नावं आहेत. शिवाय ज्ञानयोग, राजयोग, कर्मयोग व भक्तियोग हे चार मार्गही आहेत. हे मार्ग ज्ञान, विचार, क्रिया व भावना यावर आधारलेले आहेत. या सर्वांचा सूक्ष्म अभ्यास करण्याचं कौशल्य जरी माणसाच्या बुध्दीत असलं तरी यातील त्याच्यासाठी योग्य मार्ग कोणता आहे, यासंबंधी त्याच्या अंतःकरणाची साक्ष पटून तो आचरणात येईपर्यंत या नुसत्या शब्द -पांडित्याचा काही उपयोग होत नाही. या शब्दज्ञानाचा उपयोग फक्त प्रवचन करण्याकडे होतो. पण ईश्वरी तत्वाचं सार या शब्दांच्या पसाऱ्याच्या पलीकडे असतं. त्याचं खरं स्वरूप वर्णनातीत आहे. दिसणाऱ्या, भासणाऱ्या व असणाऱ्या सगळ्या विविधतेच्या पलीकडे ते आगळेपणाने, स्वतंत्रतेने, एकत्वात रममाण झालेलं असतं. या अनेकत्वाचा त्याला स्पर्शसुध्दा होत नाही. ते फक्त साचार असतं. म्हणजे स्वानुभवानेच त्याच्याशी एकरूपता साधता येते. त्या तत्वापासून वेगळं राहून त्याला अनुभवता येत नाही.

दुसऱ्या श्लोकात समर्थ खरं समाधान कशाने मिळेल ते स्पष्ट करून सांगत आहेत. ते म्हणतात की खरं समाधान हे शरीराच्या ज्ञानाने मिळत नाही. आपल्या शरीरामध्ये अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोश असे पाच कोश आहेत. ते एकाच्या आत एक असे अधिकाधिक सूक्ष्म व तरल होत जाणारे असे असतात. पण या शरीराचं ज्ञान होऊनसुध्दा जर आपण कुपथ्य केलं तर समाधान बिघडणारच. तसंच संपूर्ण तत्वज्ञानाचा अभ्यास करणारा विद्वानसुध्दा जर मोहग्रस्त झाला तर तोही असमाधानी होणारच. तसंच संगीत, नृत्य, काव्य, कथा, नाटक वगैरे कलांच्या अभ्यासाने थोडं मनोरंजन होतं व आनंद मिळतो हे खरं आहे. पण तो तात्पुरता असतो. तसंच काही लोक सिध्दी मिळवण्यासाठी पातंजल योगाचा अभ्यास करतात. पण याच सिध्दी समाधीच्या साधनमार्गात अडथळा आणतात, असं स्वतः भगवान् पातंजली म्हणतात. नाना विषयांचं सुख भोगून किंवा त्यांचा कंटाळा आल्यावर त्यांचा त्याग करूनही माणसाला खरं समाधान मिळत नाही. समर्थ म्हणतात, चिरकाल टिकणारं खरं व शाश्वत समाधान माणसाला फक्त सज्जनाच्या संगतीपासूनच मिळू शकतं, कारण तो देवाशी एकरूप झाल्यामुळे तोच इतराना खरं समाधान देऊ शकतो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# || मना सज्जना ||



## शुक्रवार

**महावाक्य तत्वादिके पंचिकर्णे । खुणे पाविजे संतसंगे विवर्णे ।**
**द्वितीयेसी संकेत जो दाविजेतो । तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ।।१५४।।**

आपल्या शास्त्रात ब्रम्हज्ञान करून देणारी जी वाक्यं आहेत त्याला महावाक्य असं म्हणतात. त्यातलं पहिलं महावाक्य म्हणजे 'तत्वमसि' म्हणजे 'ते तू आहेस', हे सद्गुरू आपल्या मुखाने शिष्याला सांगतात. त्वं म्हणजे तू याचा वाच्यार्थ तू जीव आणि ब्रम्हाचा अंश हा त्याचा लक्ष्यार्थ. तसंच तत् म्हणजे ते. आता ईश्वर हा त्याचा वाच्यार्थ आणि ब्रम्ह हा त्याचा लक्ष्यार्थ. मग शिष्य हे ऐकून आपल्या अधिकारानुरुप श्रवण, मनन, निदिध्यासन, सगुण उपासना, निर्गुण साधना वगैरे करून 'अहं ब्रम्हास्मि' म्हणजे 'मी ब्रम्ह आहे' या महावाक्याचा अनुभव घेतो. या साधनेच्या शेवटी त्याला 'अयमात्मा ब्रम्ह' म्हणजे 'हा आत्माच ब्रम्ह आहे' अशा महावाक्याचा म्हणजे ब्रम्हात्मैक्याचा अनुभव येतो. या अनुभवानंतर जेव्हा ब्रम्हज्ञानी डोळे उघडून जगाकडे पाहू लागतो तेव्हा, 'सर्वं खलु इदं ब्रम्ह' म्हणजे हे सर्व विश्व खरोखर ब्रम्हच आहे या महावाक्याची अनुभूती येते. या महावाक्यांचा जप करू नये तर त्यांचं सतत चिंतन करावं, असं समर्थ दासबोधात सांगतात. पंचीकरण ही अशीच एक सृष्टीनिर्मितीची व्यवस्था आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही क्रमाक्रमाने अधिक सूक्ष्म असलेली पंचमहाभूतं. यातून एका भूताचा अर्धा भाग आणि इतर चार भूतांचा प्रत्येकी १/८ भाग असं मिश्रण केलं की वेगवेगळ्या वस्तू तयार होतात. १/२ + १/८ + १/८ + १/८ + १/८ = १ अशा तऱ्हेने सृष्टीतील सर्वच वस्तू तयार होतात. पण हे सर्व एखादा संतच विवरण करून सांगू शकतो. पण या सर्वांहून ब्रम्ह अगदी वेगळं आहे. ते सांगण्यासाठी समर्थ शाखाचंद्रन्यायाचा उपयोग करतात. द्वितीयेची बारीक चंद्रकोर दाखवण्यासाठी पाहाणाऱ्याला त्याच दिशेत असलेली फांदी प्रथम दाखवून मग त्या फांदीच्या दिशेत आकाशात पहायला सांगतात. मग पाहणाऱ्याला चंद्र दिसतो. तसंच ब्रम्हाची खूण पटण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जातो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## शनिवार

**दिसेना जनी तेचि शोधून पाहे । बरे पाहता गूज तेथेचि आहे ।**
**करी घेउ जाता कदा आढळेना । जनी सर्व कोंदाटले ते कळेना ॥१५५॥**
**म्हणे जाणता तो जनी मूर्ख आहे । अतर्कासि तर्की असा कोण आहे ।**
**जनी मीपणे पाहता पाहवेना । तया लक्षिता वेगळे राहवेना ॥१५६॥**

सृष्टीच्या मुळाशी जे ईश्वरतत्व आहे ते अव्यक्त म्हणजे इंद्रियाना न सापडणारं असं असल्यामुळे या सृष्टीत ते सूक्ष्म बुध्दीच्या मदतीने शोधून पाहिलं पाहिजे, कारण ते रहस्य आपल्याला या सृष्टीतच सापडेल. त्यातसुध्दा ते रहस्य स्वतःच्याच ठिकाणी म्हणजे आपल्या जीवनाच्या अगदी मुळाशी जाऊन शोधलं तर ते सापडण्याची शक्यता जास्त आहे. ईश्वर हा अनंत, असीम असल्यामुळे तो आपल्याला इतर लहानसहान वस्तूंसारखा 'करतलामलकवत्' म्हणजे तळहातावरील आवळ्यासारखा हातात घेऊन त्याचं सर्व बाजूनी निरीक्षण करीत पाहता येणार नाही, पण तो सृष्टीतील सर्व वस्तूंमध्ये अखंडपणे, ओतप्रोत, कोंदून भरलेला असतो. म्हणजे शोध घेणाऱ्यातही तो असतो व ज्या सृष्टीत त्याला शोधायचा त्यातही तो असतोच असतो.

दुसऱ्या श्लोकात समर्थ सांगतात की तर्काच्या पलीकडे असणाऱ्या ईश्वराला मी तर्काने जाणले आहे असं म्हणणारा माणूस हा मूर्ख आहे असं समजावं. जसं झोप लागलेल्या माणसाला मला गाढ झोप लागली आहे हे स्वतःच्या तोंडाने सांगता येत नाही तसं कल्पना करणारं मन, विचार करणारी बुध्दी, शोध घेणारी प्रज्ञा, वर्णन करणारी वाणी, ज्ञानेंद्रिये यांचे व्यापार जिथे संपतात ते तत्व मी केवळ तर्काने अनुभवलं असं कसं म्हणता येईल? कारण मला ब्रम्ह जाणायचं आहे म्हणजे मी ब्रम्हापासून वेगळा आहे ही जाणीव जोपर्यंत वेगळेपणाने शिल्लक रहाते तोपर्यंत ती एखाद्या दाट धुक्यासारखी ब्रम्हानुभूतीच्या मार्गातील अडथळा ठरते. जसं एखादी मीठाची बाहुली समुद्राची खोली मोजायला गेली आणि त्यात स्वतःच विरघळून गेली व सागररूप झाली. तसं वेगळेपणाने ब्रम्हाचा शोध घेणाऱ्या जीवाचं होतं. कारण तो त्या मिठाच्या बाहुलीप्रमाणे स्वतःच ब्रम्हरूप होतो.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ॥ मना सज्जना ॥



## रविवार

**बहू शास्त्र धुंडाळता वाड आहे । जया निश्चयो येक तोही न साहे ।**
**मती भांडती शास्त्रबोधे विरोधे । गती खुंटती ज्ञानबोधे प्रबोधे ।।१५७।।**
**श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रे । स्मृती वेद वेदांतवाक्ये विचित्रे ।**
**स्वये शेष मौनावला स्थीर पाहे । मना सर्व जाणीव सांडून राहे ।।१५८।।**

ईश्वराच्या ज्ञानासाठी सामान्य माणूस जेव्हा शास्त्रांचा अभ्यास करू लागतो तेव्हा त्याच्या लक्षात येतं की या सर्व शास्त्रांचा अभ्यास पूर्णपणे व सांगोपांग करायचा म्हटल्यास त्याला चालू जन्म पुरणार नाही. शिवाय या सर्व शास्त्रांचं आपसात मतैक्य नसतं. तर प्रत्येक ग्रंथ आपलं वेगळं मत प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करत असतो. हे मतभेद एवढ्यावरच थांबले असते तरी हरकत नव्हती. परंतु प्रत्येक ग्रंथकार आपलंच मत खरं मानून त्याचा खरेपणा सिध्दं करण्यासाठी इतरांच्या मताचं खंडन करीत बसतो. अशा तऱ्हेने मतामतांचं खंडनमंडन करीत बसणं म्हणजे बुध्दीच्या पातळीवर निरर्थक भांडत बसणं होय. त्यामुळे एकाच मार्गाविषयी साधकाचा निश्चय होत नाही. पण बुध्दीने ईश्वराचं खंडनमंडन करीत बसण्यापेक्षा ती बुध्दीच बाजूला ठेवून खरा जिज्ञासू जेव्हा ईश्वराचं निदिध्यासन करतो तेव्हाच त्याला ईश्वराशी एकरूप होता येतं.

समर्थ दुसऱ्या श्लोकात अशा ग्रंथांची लांबलचक यादीच सांगत आहेत. चार वेद (ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद), न्यायदर्शन, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, तर्कशास्त्र, प्रमाणशास्त्र, अनेक स्मृती, नाना प्रकारचे वेदांतावरील ग्रंथ, वेगवेगळी उपनिषदं, इत्यादिनी आपलं ईश्वराविषयीचं ज्ञान प्रकट केलं तरी ते पूर्ण होत नाही इतकंच काय पण हजार तोंडाचा शेष आपल्या दोन हजार जिभानी जरी ईश्वराचं वर्णन करू लागला तरी त्याला देखील शेवटी मौन पाळून शांत बसून रहावं लागेल. मग सामान्य साधकाची काय कथा? म्हणून अशा साधकाला सन्मार्गावर आणण्यासाठी समर्थ त्याच्या मनाला तळमळीने समजावून सांगतात की मना, हे सर्व ज्ञान सोडून दे. इतकंच नव्हे तर ज्या तुझ्या वैयक्तिक जाणीवेला हे सर्व ज्ञान झालं ती वैयक्तिक जाणीवच तू सोडून दे म्हणजे त्या ईश्वराशी तू एकरूप होऊ शकशील.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



सोमवार

**जेणे मक्षिका भक्षिली जाणीवेची । तया भोजनाची रुची प्राप्त कैची ।**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना । तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना ॥१५९॥**
**नको रे मना वाद हा खेदकारी । नको रे मना भेद नाना विकारी ।**
**नको रे मना सीकवू पूढीलासी । अहंभाव जो राहिला तूजपासी ॥१६०॥**

पहिल्या श्लोकात समर्थ एक योग्य अशी पण सामान्य माणसाला किळसवाणी वाटणारी उपमा जाणीवेच्या ज्ञानाला देत आहेत. ते म्हणतात की एखादा वर्षातून एकदा येणारा सण असावा. त्यात घरच्या माऊलीने अपूर्वाईने पंचपक्वान्नांचं सुग्रास भोजन तयार करावं. त्याचा सुवास घरभर दरवळत असावा. घरच्या जेवणाऱ्यानाही केव्हा एकदा आपण जेवणावर तुटून पडतो असं झालं असावं. पण प्रत्यक्षात मात्र हातातोंडाची लढाई सुरू झाल्यावर आमटीत चुकून पडलेली माशी एखाद्याच्या पोटात गेली तर जेवणाचा आनंद मिळण्याच्या ऐवजी त्याला मळमळू लागेल. त्याच्या पोटात ढवळू लागेल, उलट्या सुरु होतील आणि कुठून जेवायला बसलो असं त्याला होऊन जाईल. तसंच ज्याच्या ठिकाणी अहंकार शिल्लक आहे त्याला ईश्वराचं ज्ञान हे पचवता येत नाही.

समर्थ दुसऱ्या श्लोकात अहंकाराची काही ठळक लक्षणं सांगत आहेत. ते म्हणतात की हे मना, ज्याने तुझ्या ठिकाणी खेद निर्माण होईल असा वाद तू दुसऱ्याबरोबर घालू नकोस. उलटपक्षी तू दुसऱ्याबरोबर नेहेमी सुसंवाद करत रहा. कारण आपलं नेहमी बरोबरच आहे असं वाटणं हे अहंकाराचं एक लक्षण आहे. मग आपलं बरोबर असलेलं म्हणणं दुसऱ्याला पटवून देण्यासाठी माणसाला वाद घालावासा वाटतो. तसंच हे मना, तू निरनिराळे विकार निर्माण करणारे जे भेद त्याना तू जास्त महत्व देऊ नकोस. कारण सृष्टीत भेद हे असणारच. प्रत्येक वस्तू ही इतरांपेक्षा थोडी वेगळी असणारच. तसंच प्रत्येकालाच तुझ्यासारखं आपणच बरोबर आहोत असं वाटणारच. तेव्हा दुसऱ्याला शिकवायला जाऊन त्याला सुधारण्याच्या फंदात तू पडू नकोस. त्यापेक्षा स्वतःत सुधारणा कशी होईल त्याचा विचार कर. त्यानेच तुझा जास्त फायदा होईल. कारण ही सर्व तुझ्या अहंकाराची लक्षणं आहेत.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**अहंतागुणे सर्वही दुःख होते । मुखे बोलिले ज्ञान ते वेर्थ जाते ।**
**सुखी राहता सर्वही सूख आहे । अहंता तुझी तूचि शोधून पाहे ।।१६१।।**
**अहंतागुणे नीति सांडी विवेकी । अनीतिबळे श्लाघ्यता सर्व लोकी ।**
**परी अंतरी सर्वही साक्ष येते । प्रमाणांतरे बुध्दी सांडूनि जाते ।।१६२।।**

समर्थ पहिल्या श्लोकात सांगत आहेत की या जगातील सर्व मानसिक दुःखं ही माणसाच्या अहंकारातून निर्माण होतात. समाजातील कोणत्याही माणसाला अहंकारी, गर्विष्ठ व उध्दट माणूस आवडत नाही. तो कोणालाही नको असतो. यामुळे असा माणूस नेहमी उगीचच दुःखी होतो. बरं, अशा माणसाला दुसरा एखादा संतपुरुष चांगलं-वाईट काय ते समजावून सांगू लागला तर त्याचा काहीच उपयोग होत नाही. कारण आपलं नेहेमीच बरोबर असतं, असं अहंकाराचं पहिलं लक्षण असल्यामुळे हे मुखाने सांगितलेलं ज्ञान व्यर्थ होतं व दुसऱ्याने कितीही सांगितलं तरी माणसाचा अहंकार जाता जात नाही. पण एखाद्या माणसाचा जर ईश्वराच्या कृपेने अहंकार पूर्णपणे निघून गेला तर मात्र त्याच्यासारखा सुखी या जगात दुसरा कोणीही नसतो. असा अहंकाररहित माणूस स्वतः तर सुखी होतोच पण तो इतरानाही सुखी करतो. त्याच्या नुसत्या असण्याने या जगात सर्वत्र सुखाची महादिवाळी झगमगत असते. म्हणून समर्थ म्हणतात. आपला अहंकार शिल्लक आहे की नाही हे ज्याचं त्यालाच नीटपणे शोधून काढल्यावर समजतं.

समर्थ दुसऱ्या श्लोकात सांगतात की अहंकारामुळे विवेक असलेला माणूससुध्दा आपली नीतीमत्ता सोडून देतो आणि अनीतीने वागायला लागतो. पण अनीतीने वागूनसुध्दा त्याला समाजामध्ये मानमान्यता हवी असते. म्हणून मग तो आपल्या अनीतीला आधार देणारं एक तत्वज्ञान बनवतो. समर्थ त्याला अनीतीबळ असं म्हणतात. या तत्वज्ञानाच्या बळावर तो आपल्या अनीतीच्या वागण्याचं समर्थन करतो. उदा. एखाद्या माणसाला मादक पदार्थाचं व्यसन असलं तर तो त्याचं समर्थन असं करतो की एखादं तरी व्यसन असल्याशिवाय पुरुषाला मर्द कसं म्हणता येईल? आणि कोणतही व्यसन नसेल तर त्याच्या दीर्घायुष्याचा तरी उपयोग काय? त्याला आपलं उरलेलं आयुष्य असंच बावळटपणे, रटाळपणाने जगावं लागणार. तेव्हा असं सपक जीवन जगून त्याला काय मिळणार? पण अशा तऱ्हेचं अनीतीला अर्थ देणारं तत्वज्ञान तयार करताना बुध्दिला सर्व तऱ्हेची प्रमाणं म्हणजे शास्त्राची, संस्कृतीची, सभ्यतेची, संतपुरुषांची वचनं ही सर्वच प्रमाणं सोडून द्यावी लागतात. तरीसुध्दा शेवटी स्वतःच्या अंतःकरणाची साक्षच सत्य मानावी लागते, जी कोठल्याही व्यसनाला आपल्या बुध्दीच्या जवळपाससुध्दा फिरकू देत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ॥ मना सज्जना ॥



## बुधवार

**देहेबुध्दीचा निश्चयो दृढ झाला । देह्यातीत तो हीत सांडित गेला ।**
**देहेबुध्दी ते आत्मबुध्दी करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६३।।**
**मने कल्पिला वीषयो सोडवावा । मने देव निर्गुण तो ओळखावा ।**
**मने कल्पिता कल्पना ते सरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६४।।**

समर्थांनी येथून पुढील पाच श्लोकात सज्जनाची संगत का धरावी ते समजावून सांगितलं आहे. ते म्हणतात की सदैव देहाच्या माध्यमातून व्यवहार करत असल्यामुळे माणसाची मी देहच आहे, आणखी कोणी नाही अशी जी बुध्दी तिचा निश्चय दृढ होतो. त्यामुळे दोन गोष्टी होतात. एक तर मी देहच आहे या बुध्दीमुळे देहाला नटवण्यात, सजवण्यातच सुखाची परिसीमा आहे असं माणसाला वाटू लागतं. आणि दुसरं म्हणजे या देहबुध्दीच्या पलीकडे जे हितकर सुख आहे ते माणसाला सोडून द्यावं लागतं. ते म्हणजे मनाच्या, बुध्दीच्या किंवा आत्म्याच्या पातळीवरचं सुख. याकरता समर्थ तिसऱ्या ओळीत सांगतात की मी देहच आहे ही बुध्दी सोडून देऊन मी आत्मस्वरूप आहे, मी अनंत आहे अशी दृढबुध्दी धारण करावी. त्यासाठी प्रथम मी देह नसून मन आहे, मग मी बुध्दी आहे, नंतर मी जीव आहे आणि शेवटी मी आत्मा, आत्मस्वरूप आणि अनंत आहे अशी क्रमाक्रमाने धारणा करावी लागते आणि ही प्रेरणा आपल्याला संतांच्या किंवा सज्जनांच्या संगतीतूनच मिळत जाते व ती दृढ होत जाते असं समर्थ या श्लोकात म्हणतात.

दुसऱ्या श्लोकात समर्थ सांगतात की आपल्या जीवनात सत्यापेक्षा कल्पनेचा भाग फार मोठा असतो

आणि तो आपल्याला फार महत्वाचा वाटतो. विशेषतः आपल्याविषयी वाटणारा अहंकार ही एक भ्रामक परंतु सत्य भासणारी कल्पनाच आहे. यामुळेच आपल्याला काही विषय सुखदायक तर काही दुःखदायक वाटतात. त्यातलं मानसिक सुख किंवा दुःख ही कल्पनाच असल्यामुळे ती टाकून दिली की तो विषय सुखदुःखाच्या कल्पनेपासून मुक्त होतो. मग ज्या ईश्वरी शक्तीने हे विषयाचं रूप व गुणधर्म धारण केले ती शक्ती स्वतः निर्गुण म्हणजे अव्यक्त रूपात असली तरी या विषयाच्या रूपाने ती स्वतः सगुण स्वरूपात उतरली आहे असं आपल्याला समजू लागतं. अशा रितीने या विश्वातील प्रत्येक वस्तूच्या बाबतीत आपण असंच चिंतन करू लागलो की आपल्या मनातील कल्पना व तिचं महत्व हे दोन्हीही पार सरून जातं व मग फक्त वस्तुस्थितीचं आपल्याला ज्ञान होतं. पण या बदलासाठी आपल्याला नेहेमी संतसज्जनांची संगती असावी लागते तरच त्यांच्या उदाहरणावरून आपली कल्पना सुटून जावू शकते, एरवी नाही असं समर्थ सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## गुरूवार

**देह्यादीक प्रपंच हा चिंतियेला । परी अंतरी लोभ निश्चीत ठेला ।**
**हरीचिंतने मुक्तिकांता वरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६५॥**
**अहंकार विस्तारला या देह्याचा । स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा ।**
**बळे भ्रांति हे जन्मचिंता हरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६६॥**

समर्थ पहिल्या श्लोकात सांगतात की माणूस सज्ञान झाल्यापासून त्याला आपला देह कसा टिकवावा व आपल्यावर अवलंबून असलेल्यांचं जीवन कसं सुरळीत चालेल याची चिंता करावी लागते. त्यासाठी अन्नवस्त्राची जरुर असल्यामुळे त्याला एखादी नोकरी किंवा धंदा करून आवश्यक तितका पैसा मिळवावा लागतो. पण हे करत असताना सवयीमुळे त्याच्या मनात सुखाची आसक्ती किंवा लोभ निश्चितपणे निर्माण होतो. मग जीवनात सदैव सुखच मिळवलं पाहिजे अशी त्याची धारणा होऊन बसते. मग अधिक कष्ट, अधिक पैसा, अधिक सुख व त्यासाठी अधिक कष्ट असं दुष्टचक्र माणसाच्या मागे कायम लागतं. म्हणून संसाराचं चिंतन कमीतकमी म्हणजे अगदी अत्यावश्यकच असेल तितका वेळ करून उरलेल्या वेळात जर माणसाने ईश्वराचं चिंतन तीव्र तळमळीने केलं तर त्याची जन्ममरणाची चिंता कायमची दूर होईल. म्हणजे त्याचा हाच जन्म शेवटचा ठरून त्याच्या गळयात मुक्ती नामक पत्नी मोठ्या खुशीने माळ घालील. पण हे सर्व केव्हा जमेल? तर त्याला अशा मुक्त झालेल्या संतपुरुषाची संगत मिळेल तेव्हा. म्हणून समर्थ पुढील श्लोकात या प्रपंचाचं जरा विस्ताराने वर्णन करीत आहेत.ते म्हणतात की माझेपणाच्या भावनेतून या 'देही' असलेल्या मीपणाचा विस्तार वाढत जातो. 'मी-माझे, तुझे-माझे । हे सारे भ्रमाचे ओझे ।' हे त्याला शेवटपर्यंत कळत नाही. आणि कळतं तेव्हा फार उशीर झालेला असतो. हा अनुभव फणीसारखा असतो. पण तो बहुधा माणसाला टक्कल पडल्यावरच मिळतो. त्यावेळी त्याचा काही उपयोग नसतो. म्हणून हा अहंकार माझी बायको, माझे आईवडील, माझी मुले, माझी नातवंड, माझे मित्र, माझे नातेवाईक, माझा देश या फांद्यांच्या रूपाने विस्तारत जातो व तो माझं सारं जीवन व्यापून टाकतो. अशा तऱ्हेने जे मी नाही तेच मी आहे असं वाटणं यालाच भ्रांति असं म्हणतात. या भ्रांतिमुळेच आपल्याला जीवनात अनेक दुःख भोगावी लागतात. शिवाय पुन्हा पुन्हा जन्म घेऊन जन्ममरणाच्या चक्रात अडकून पडावं लागतं. पण मोठ्या बळाने म्हणजे निश्चयाने हरीचिंतन करून या चक्रातून सुटता येते. पण यासाठी मुळात सज्जनाची संगती माणसाला मिळावी लागते असं समर्थ या श्लोकात सांगत आहेत.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**बरा निश्चयो शाश्वताचा करावा । म्हणे दास संदेह तो वीसरावा ।**
**घडीने घडी सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६७।।**
**करी वृत्ति जो संत तो संत जाणा । दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा ।**
**उपाधी देहेबुध्दिते वाढवीते । परि सज्जना केवि बाधू शके ते ।।१६८।।**

माणसाने आपल्या जीवनात क्षणिक सुख देणारी गोष्ट कोणती आणि कायम सुख देणारी वस्तू कोणती याचा निश्चय केलाच पाहिजे. आपल्या शास्त्रात याला नित्यानित्यवस्तुविवेक म्हणतात. जी गोष्ट नित्य असते तिच्या प्राप्तीचाच माणसाने निश्चय केला पाहिजे. आता या जगात सर्वच गोष्टी निर्माण होतात आणि काही काळ या जगात राहून त्या शेवटी नाश पावतात. त्यामुळे जगातील सर्वच गोष्टी अनित्य असतात. फक्त एक ईश्वरच काय तो सत्य म्हणजे नित्य असतो म्हणून त्या शाश्वत ईश्वराची प्राप्ती मी करून घेईनच असा निश्चय माणसाने करावा व त्याबाबत कोठलीही शंका मनात निर्माण झाल्यास तिला मनात थारा देऊ नये. यासाठी समर्थ सांगतात की प्रत्येक क्षणी ईश्वराचं कोणत्या ना कोणत्या स्वरूपात माणसाने स्मरण केलं की त्याचा क्षण न् क्षण सार्थकी लागला असं समजावं. हे स्मरण, नाम, ध्यान, चिंतन किंवा ईश्वरी संकल्पातून निघालेली घटना यापैकी कोणत्याही स्वरूपात होऊ शकतं पण यासाठी प्रथम आपल्याला संगती सज्जनाची असावी लागते. मग इष्ट असा हा पालट हळू हळू होत जातो.

समर्थ दुसऱ्या श्लोकात सांगतात की संतसंगतीसाठी आवश्यक असणारा संतसज्जन हा कसा ओळखावा? तर कोठल्याही परिस्थितीत ज्याची चित्तवृत्ती शांत, स्थिर व प्रसन्न असते तो खरा संत जाणावा. दुसरी गोष्ट म्हणजे त्याच्या चित्तात वाईट विषयासंबंधी आसक्ती कधी नसते. म्हणून तो विषयासक्ती नसल्याने कधीही लोकांच्यात दैन्यवाणा दिसत नाही. प्रपंचात कितीही आपत्ती आल्या तरी खरा संत कधी विचलित होत नाही, गडबडून जात नाही की त्याचा तोलही कधी ढळत नाही, त्याची विवेकशक्ती कधीही त्याला सोडून जात नाही. सामान्य माणसाच्या बाबतीत असं होतं की त्याच्याजवळ जितक्या जास्त उपाधि तितकी त्याची देहबुध्दी वाढलेली असते. उदा. पैसा-अडका, धन-धान्य, गुरं-ढोरं, बंगला-शेतीवाडी जितकी जास्त तितकी त्याला उपाधि म्हणजे त्रास जास्त. पण संत मात्र ही सर्व ईश्वरी शक्तीचीच रूपं व गुणधर्म या दृष्टीने त्यांच्याकडे पहात असल्यामुळे सज्जनाना या उपाधीची कधीही बाधा होत नाही. या वस्तू असल्या काय किंवा नसल्या काय त्यांचं चित्त कधीही विचलित होत नाही. ते नेहमी समतोलच रहातं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**नसे अंत आनंत संता पुसावा । अहंकार विस्तार हा नीरसावा ।**
**गुणेवीण निर्गुण तो आठवावा । देहेबुध्दीचा आठउ नाठवावा ।।१६९।।**
**देहेबुध्दि हे ज्ञानबोधे त्यजावी । विवेके तये वस्तुची भेटि घ्यावी ।**
**तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे । म्हणोनी सदा ते चि शोधीत जावे ।।१७०।।**

ज्याला अंत नाही असा अनंत जो ईश्वर त्याची ओळख सामान्य माणसाने संतांकडूनच करून घ्यावी. कारण त्यांच्या संगतीत या ईश्वराचं म्हणजे मूलतत्वाचं किंवा ब्रम्हाचं ज्ञान सामान्य माणसाला होत असतं कारण त्याना या ब्रम्हाचा अनुभव आलेला असतो. संत जणू प्रत्यक्ष ब्रम्हात वसती करून रहात असतात. कारण त्यांचा देहभाव शून्य झालेला असतो. पण सामान्य माणसाचा अहंकार हा वटवृक्षाच्या पारंब्यांप्रमाणे मी व माझे या कल्पनेतून विस्तारत असतो, फोफावत असतो. त्याच्या फांद्या म्हणजे जे ममत्व किंवा माझेपणा तो छाटून टाकावा लागतो. पण हे कसं करायचं? तर गुणाशिवाय असलेलं ईश्वराचं निर्गुण रूप आठवून. पण ईश्वराचे गुण कुठले? तर ईश्वर सर्वज्ञ, सर्वव्यापक आणि सर्वशक्तिमान असतो पण सामान्य माणूस मात्र अल्पज्ञ, मर्यादित आकाराचा आणि अल्पशक्ति असलेला असा असतो म्हणून आपल्या वेदांतात असा मार्ग सुचवला आहे की या सर्व गुणांच्या जोड्या बाजूला ठेवून (अल्पज्ञत्व, सर्वज्ञत्व वगैरे) मग जे काही उरतं त्याचं मुळात ऐक्य असतं. पण आपल्याला देहबुध्दीचा विसर पडल्याशिवाय ही गोष्ट घडत नाही.

म्हणून समर्थ पुढील श्लोकात देहबुध्दीचा निरास कसा करावा ते सांगत आहेत. ते म्हणतात की आपली विवेकशक्ती वापरून त्या ईश्वराचं ज्ञान आणि बोध करून घ्यावा. म्हणजे त्या ईश्वराच्या बोधामुळे मी देहच आहे ही आपली बुरसटलेली बुध्दी दूर होईल आणि त्याऐवजी मी अनंत व परमशांत असं आत्मस्वरूप आहे ही जाणीव स्थिर होईल. विवेकबुध्दी म्हणजे अहंकाराचा अजिबात अभाव असलेली, सर्व बाजूंचा विचार करणारी व आपल्याला असलेलं सर्व ज्ञान वापरणारी प्रज्ञा. ही बुध्दी आपल्याला त्या ब्रम्हवस्तूची भेट करून देते. पण एरवी व्यवहाराशी तदाकार होणारी ही बुध्दी कायमची ब्रम्हवस्तूशी एकरूप होऊन राहू शकत नाही. याकरता जीवाला साधना करावी लागते. ही साधना धीराने, उत्कटतेने, जिव्हाळ्याने आणि सातत्याने करावी लागते. या साधनेच्या आड थकवा, कंटाळा, आळस, उपेक्षा व अश्रध्दा या गोष्टी येत असतात. त्यामुळे या गोष्टी साधनेमध्ये कधीही उत्पन्न होणार नाहीत याची साधकाला काळजी घ्यावी लागते. म्हणून साधकाची वृत्ती शोधक असावी लागते.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



रविवार

**असे सार साचार ते चोरलेसे । येही लोचनी पाहता दृश्य भासे ।**
**निराभास निर्गूण ते आकळेना । अहंतागुणे कल्पिताही कळेना ।।१७१।।**
**स्फुरे वीषयी कल्पना ते अविद्या । स्फूरे ब्रम्ह-रे जाण माया सुविद्या ।**
**मुळी कल्पना दो रुपे तेचि जाली । विवेके तरी सस्वरुपी मिळाली ।।१७२।।**

ईश्वर हा सामान्य माणसापासून गुप्त रहातो, त्याच्यापासून तो चोरलेला असा रहातो म्हणजे त्याला तो अव्यक्त असतो. तो त्याच स्वरूपातून आपलं कार्य करीत रहातो आणि हे त्या ईश्वराचा गुणधर्मच आहे. जणू स्वभावच आहे. तो जेव्हा दृश्य जगाच्या स्वरूपात प्रकट होतो तेव्हा तो आपल्या डोळयांना वस्तू या स्वरूपात दिसू लागतो. पण या मूलतत्वाच्या दर्शनाची इच्छा अज्ञानामुळे त्याच्यापासून दुरावलेल्या माणसाच्या ठिकाणी असते. पण ज्ञानासाठी माणसाला जी इंद्रियं, मन, बुध्दी वगैरे साधनं लाभली आहेत ती स्वभावतःच बहिर्मुख असतात. त्यामुळे त्याना होणारे ज्ञानही विषयाच्या बाह्य कवचाचं असतं. पण ही इंद्रिये वस्तूच्या अंतरंगाचा वेध घेऊ शकत नाहीत. पण मूळ तत्व आहे निर्गूण व निराभास. त्यामुळे इंद्रियाना, मनाला वा बुध्दीला त्या तत्वाचे आकलन होऊ शकत नाही. बरं समजा, दीर्घ प्रयत्नाने ही इंद्रियांची विषयासक्ती सुटली, मन अंतर्मुख व बुध्दी एकाग्र झाली तर या तत्वाचं आकलन होऊ शकेल पण माणसाचा अहंकार तेही घडू देत नाही. कारण अहंकाराधिष्ठित बुध्दीमुळे नको नको त्या कल्पनांचे फाटे फुटत रहातात व ईश्वरासंबंधीच्या नाना संकल्पविकल्पानी मनाला चंचलता येते.

समर्थ दुसऱ्या श्लोकात ही ईश्वराची माया (भ्रम) अविद्या व सुविद्या या दोन रूपात कशी काम करते ते आपल्याला समजावून सांगत आहेत. ते म्हणतात की 'ब्रम्ह निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ।।' ईश्वर हा शांत, स्थिर असतो तर त्याची माया ही गतिमान, चंचल असते. या गतीमुळे ती जेव्हा जीवाला ईश्वरापासून दूर घेऊन जाते तेव्हा तिला अविद्या माया किंवा विसंवादी भ्रम असं नाव आहे. या अविद्येमुळे, कल्पनेमुळे माणूस सुख देणाऱ्या विषयांकडे आकर्षित होतो. पण या विषयांचा कंटाळा आल्यावर तो ईश्वर या कल्पनेकडे आकर्षित होतो. मग तो साधना करू लागतो. त्यातून त्याला जे अनुभव येतात ते सुविद्या मायेच्या प्रभावाने येतात. यालाच आपल्या शास्त्रात सुसंवादी भ्रम असं म्हणतात. पण इथे सुविद्या माया आपल्या गतीचा उपयोग जीवाला ईश्वराच्या जवळ नेण्यासाठी करते. मग विवेकशक्तीच्या सहाय्याने जीवाला असा अनुभव येतो की ज्या ईश्वराला आपण इतरत्र शोधत आहोत त्या ईश्वराचं आणि आपलं मूळ रूप आपल्या चित्तातच आहे. तेव्हा तो जीव जन्ममरणाच्या फेऱ्यामधून कायमचा मुक्त होतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**स्वरूपी उदेला अहंकार राहो । तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो ।**
**दिशा पाहता ते निशा वाढताहे । विवेके विचारे विवंचूनि पाहे ।।१७३।।**
**जया चक्षुने लक्षिता लक्षवेना । भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना ।**
**क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो । दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो ।।१७४।।**


समर्थानी पहिल्या श्लोकात सूर्यग्रहणाचं रूपक वापरलं आहे. ते म्हणतात की मूळ अनंत अशा ईश्वरस्वरूपी अहंकाररूपी 'राहू' या दैत्याचा उदय झाला. याने सूर्याला ग्रासून टाकलं आहे. त्यामुळे 'राहू' या ईश्वरस्वरूपावर अज्ञानाचे पांघरुण घालतो. त्यामुळे ज्ञानाचा प्रकाश लोपून जातो आणि जिकडे तिकडे अज्ञानाचा अंधार पसरलेला अनुभवास येतो. याचा अर्थ मूळ ईश्वरस्वरूप ज्ञानमय आहे. ते चैतन्यमयही आहे. पण ते झाकणारा अहंकारही अज्ञानाच्या रूपाने आहे यात शंका नाही. फरक इतकाच की ज्ञान शाश्वत आहे आणि अज्ञान अशाश्वत आहे. माणसाने पूर्ण विचाराने हे समजून घ्यावं. मानवी जीवनात आत्मज्ञान आणि आत्म्याचं अज्ञान ही दोन्हीही आहेत. पण आत्म्याचं अज्ञान हे व्यवहारातील भेदबुध्दीला कारणीभूत होतं. त्यामुळे वस्तू वेगवेगळ्या व भिन्न गुणधर्मांच्या जाणवू लागतात. मग त्यातील काही गुणधर्मांबद्दल आपल्या मनात आकर्षण निर्माण होतं. ते गुणधर्म असलेल्या गोष्टी आपल्याला सुखदायक वाटतात म्हणून त्या पुन्हापुन्हा हव्याशा वाटतात. यातून त्यांच्याबद्दल आसक्ती म्हणजे राग निर्माण होतो. हे सगळं विवेकाने समजतं.

समर्थ दुसऱ्या श्लोकात परब्रम्हाचं किंवा ईश्वराचं वर्णन करताना सांगतात की डोळे त्याला पाहू शकत नाहीत. म्हणजे ईश्वराचं ज्ञान इंद्रियानी होण्यासारखं नाही. पण ज्ञानचक्षूने त्याला पाहू गेलं तरी त्याचं संपूर्ण ज्ञान होणं शक्य नाही. वास्तविक आत्मज्ञान हे संसाराचा भ्रम नाहीसं करणारं म्हणजे संसाराला खाऊन टाकणारं ज्ञान आहे. पण अशा ज्ञानाचं स्मृतीच्या सहाय्याने रक्षण करता येत नाही. कारण जसं लाकूड जळाल्यावर अग्नीही स्वतः शांत होतो, तसं संसार संपताच हे ज्ञानही नाहीसं होतं. त्यामुळे प्रथम अज्ञान आणि त्यापाठोपाठ ज्ञान ही दोन्हीही नाहीशी होऊन जातात. हा ईश्वर क्षयाच्या पलीकडचा म्हणजे अक्षय असा असल्यामुळे तो जीवाना अक्षय असा मोक्ष देऊ शकतो. ईश्वर दयाळू पण दक्ष असल्यामुळे जेव्हा जीव त्या स्थितीपर्यंत येईल तेव्हाच त्याला तो मोक्ष देतो. पण इतर जीवांची पायरीपायरीने प्रगती करून त्याना तो त्या स्थितीजवळ आणतो. म्हणून त्याची भक्ती करणाऱ्या भक्ताना आज ना उद्या मोक्ष हा नक्कीच मिळणार यात शंकाच नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**

**विधी निर्मिता लीहितो सर्व भाळी । परी लीहिता कोण त्याचे कपाळी ।**
**हरू जाळितो लोक संहार काळी । परी शेवटी शंकरा कोण जाळी ।।१७५।।**
**जनी द्वादशादित्य हे रुद्र अक्रा । असंख्यात संख्या करी कोण शक्रा ।**
**जगी देव धुंडाळता आढळेना । जनी मुख्य तो कोण कैसा कळेना ।।१७६।।**

सामान्य माणूस जेव्हा ईश्वरासंबंधी विचार करू लागतो तेव्हा त्याच्या मनात असे विचार येतात की हे विश्व ब्रम्हदेव निर्माण करतो व विष्णू त्याचे पालन करतो व श्रीशंकर त्याचा संहार करतो अशी आपल्या पुराणात कल्पना आढळते. विश्वाच्या व्यवहाराला तीन अंगं दिसतात. एक अव्यक्तातून व्यक्तात अवतरणे, तर व्यक्त झालेलं नीट जपणे हे दुसरं अंग आणि व्यक्त पुन्हा अव्यक्तात विलीन होणं हे तिसरं अंग होय. म्हणून यांच्या मागे तीन शक्तीमान देवता आहेत अशी कल्पना माणूस करतो. पण आत्मानात्मविचार करू लागल्यावर या कल्पनांचा सदोषपणा उघडकीस येतो. मग माणसाच्या मनात असा प्रश्न येतो की ब्रम्हदेव सर्वांच्या कपाळी त्याच्या प्रारब्धात काय आहे ते लिहीतो हे जर खरे असेल तर ब्रम्हदेवाच्या कपाळी त्याने काय करावं हे कोण लिहीतो? तसंच शंकर जर सर्वांचा संहार करतो तर त्या शंकराचा संहार शेवटी कोण करतो? हे प्रश्न पुढे येतात. यांचाही निर्माणकर्ता कोणीतरी मोठा देव असलाच पाहिजे.

समर्थ दुसऱ्या श्लोकात सांगतात की या विश्वामधे बारा आदित्य आणि अकरा रुद्र असा अधिदैविक अधिकारी वर्ग आहे. आतापर्यंत स्वर्गाचा राजा म्हणून राज्य करणाऱ्या इंद्रांची संख्या तर खूपच होऊन गेली आहे. पण या सगळयाना उत्पन्न करणारा देव या विश्वामध्ये सापडता सापडत नाही. त्यामुळे या सर्वांचा मुख्य देव कोण, कसा आहे ते कळत नाही. एखाद्या स्वार्थी माणसाने आपले लबाडीचे व्यवहार साधण्यासाठी शासनातील खालच्या लोकाना लाच देऊन स्वतःची कामं करून घ्यावीत त्याच वृत्तीने माणसं या देवतांची पूजाअर्चा वगैरे करतात. पण ही सर्व देवतांची मूळ शक्ती त्या मोठ्या देवाकडून आलेली असते हे मात्र ते विसरुन जातात. आणि जर कोणी हे लक्षात आणून दिलं तर सामान्य माणसाला ते पटतही नाही. पण ही केलेली आराधना, त्याचं शुध्द स्वरूप न कळल्यामुळे, ही माणसाच्या हिताला कारणीभूत होत नाही. या संबंधात आपले तुकाराम महाराज म्हणतात की, '**तुका म्हणे सारे आंधळे हे जन । गेले विसरुन खऱ्या देवा ।।**'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**तुटेना, फुटेना कदा देवराणा । चळेना, ढळेना कदा दैन्यवाणा ।**
**कळेना, कळेना कदा लोचनासी । वसेना, दिसेना जगी मीपणासी ।।१७७।।**
**जया मानिला देव तो पूजिताहे । परी देव शोधून कोणी न पाहे ।**
**जगी पाहता देव कोट्यानुकोटी । जया मानली भक्ती जे तेचि मोठी ।।१७८।।**

समर्थ या श्लोकात मुख्य मोठ्या देवाविषयी बोलत आहेत. ते म्हणतात की मुख्य देव कधी फुटत नाही, तुटत नाही. हा कधी चळत नाही, हा कधी आपल्या स्थानापासून ढळत नाही. हा कधी दीन, दैन्यवाणा होत नाही. हा आपल्या डोळयाना कधी दिसत नाही. तसंच जोपर्यंत माणसांच्या ठिकाणी मीपणा असतो तोपर्यंत हा मुख्य देव माणसाच्या काही प्रत्ययास येत नाही. कारण हा मुख्य देव म्हणजे केवळ ज्ञानमय अस्तित्व होय. सामान्य माणसाला दृश्य इतकं खरं वाटतं की मानवी जीवनातील सर्व वस्तूना, व्यक्तीना, अनुभवाना आणि मूल्याना तो दृश्याच्या म्हणजे इंद्रियाच्या कक्षेत आणायला बघतो. पण देव हा चर्मचक्षूने म्हणजे माणसाच्या डोळयानी कधीच पाहता येत नाही. जगात जोपर्यंत मीपणाची म्हणजे अहंकाराची सत्ता आहे तोपर्यंत माणसाला देवाचं अस्तित्व भासणार नाही आणि देवाचं अस्तित्व समजलं की मीपणा किंवा अहंकार ज़िवंत रहाणं शक्यच नाही. रामकृष्ण परमहंस नेहमी म्हणत की व्यवहारापुरता जो काही मीपणा शिल्लक रहातो तो राहू दे, देवाचा दास म्हणून.

समर्थ दुसऱ्या श्लोकात सांगतात की प्रत्येक माणूस त्याला पूर्वसंस्कारानुसार जो देव आवडतो त्याची तो भक्ती करतो. पण सगळयात मोठा व त्याच्यावरचा मुख्य देव कोण आहे त्याला कोणीही शोधून पहात नाही. यामुळे माणसांप्रमाणे जगात देवही कोट्यावधी झालेले आहेत आणि गम्मत म्हणजे प्रत्येकाला आपला देवच मुख्य व सर्वश्रेष्ठ वाटतो. कारण त्यामुळे त्या देवाची भक्ती करत असतो ना? या विश्वात सात्विक, राजस आणि तामस अशी तीन गुणापासून झालेली माणसं असतात. ज्याला जो देव पूर्वसंस्कारानुसार आवडत असतो त्याची तो पूजाअर्चा करत असतो. त्याला जे आवडत असतं ते माणसं त्याला अर्पण करतात. आपल्याकडे म्हणच आहे ना की 'चांभाराच्या देवाला खेटराची पूजा' आवडते म्हणून. आपल्याकडे तेहेतीस कोटी देव आहेत. त्यातून ज्याला हवा असेल तो देव ज्याने त्याने निवडावा व त्याची पूजाअर्चा करावी. पण मीपणा गेल्याशिवाय त्याचा अनुभव मात्र येत नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरुवार

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले । तया देवरायासि कोण्ही न बोले ।**
**जगी थोरला देव तो चोरलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ।।१७९।।**
**गुरू पाहता पाहता लक्ष कोटी । बहूसाळ मंत्रावळी शक्ती मोठी ।**
**मनी कामना चेटके धातमाता । जनी व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ।।१८०।।**

समर्थ पहिल्या श्लोकात सांगतात की आपलं शास्त्र असं म्हणतं की स्वर्ग, पाताळ व पृथ्वी हे तीनही लोक ईश्वराने निर्माण केले. यापैकी स्वर्गात देवाची वसती व मनुष्यांमध्ये जे पुण्य मिळवलेले जीवात्मे असतात, त्यांची वसती असते तर नरकामध्ये पापात्म्यांची व राक्षसांची वगैरे वसती असते. यापैकी आपली म्हणजे मानवांची वसती पृथ्वीवर असते व आपण पृथ्वीवर असताना जसं पुण्य किंवा पाप करू त्याप्रमाणे आपण पृथ्वीवर मरण पावल्यावर आपल्या जीवात्म्याची रवानगी स्वर्गात किंवा नरकात होते. मग तिथे काही काळ राहिल्यावर आपलं पुण्य किंवा पाप क्षीण झाल्यावर मग 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' पुण्य (किंवा पाप) क्षीण झाल्यावर हा जीवात्मा पुन्हा मृत्युलोकात प्रवेश करतो तो पुन्हा पुण्य किंवा पाप मिळवण्यासाठी. असा नित्यक्रम बरेच जन्म चालतो. मग त्याला कंटाळा येतो व यातून सुटण्यासाठी तो ईश्वराची भक्ती करू लागतो. मग त्याला गुरू भेटतो. तो त्याला भक्ती कशी करायची ते समजावून सांगतो. वास्तविक या जगात गुरूची वाण नाही. गुरू कोट्यावधी आहेत. शिवाय प्रत्येक गुरूचा स्वतंत्र मंत्र असतो. त्याची शक्तीही वेगवेगळी असते. पण शिष्याच्या अंतर्मनात इतक्या वासना भरलेल्या असतात की त्या वासना जाता जात नाहीत. इतकंच नव्हे तर गुरू कसा असावा याविषयीही एक इच्छा शिष्याच्या मनात तयार होऊन बसते. त्याला असं वाटतं की गुरूजवळ एखादं चेटूक किंवा एखादी युक्तीप्रयुक्ती असावी की ज्याच्यामुळे जन्ममरणाच्या चक्रातून आपली सुटका होऊ शकेल. पण असे गुरू शिष्याला मुक्ती देऊ शकत नाहीत. कारण ही मुक्ती म्हणजे सर्वच वासनातून मुक्ती असते. जन्ममरणाच्या चक्रातून मुक्ती असते. हवेनकोपणातून मुक्ती असते. मुक्ती इतकी सोपी का आहे की कुणीही यावं आणि शिष्याला मुक्त करावं?

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



शुक्रवार

**नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदू । नव्हे निंदकू मछरु भक्तिमंदू ।**
**नव्हे उन्मतु वेसनी संगबाधु । जनी ज्ञानिया तोचि साधु अगाधू ।।१८१।।**
**नव्हे वाउगी चाहुटी काम पोटी । क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।**
**मुखे बोलिल्यासारखे चालताहे । मना सद्‌गुरू तोचि शोधूनि पाहे ।।१८२।।**

समर्थ पहिल्या श्लोकात सद्‌गुरूविषयी आणखी वर्णन करून सांगत आहेत. अध्यात्मात गुरू म्हणून मिरविणाऱ्यांचे जे प्रकार आहेत त्यापैकी काही इथे वर्णन करून सांगत आहेत. थोडक्यात सद्‌गुरू कसे नसावेत ते त्यानी इथे सांगितलं आहे. सद्‌गुरू हा कधीही चेटकी म्हणजे जारण-मारण उच्चाटन करणारा नसतो. ही एक नीच विद्या आहे. क्षुद्र देवता, भूत-पिशाच्च याना काही मंत्राच्या व काही कुत्सित साधनेच्या बळावर वश करून त्या बळाने एखाद्याला नाना प्रकारानी त्रास देणं, काही वस्तू काढून दाखवणं, भूतभविष्य सांगणं अशासारख्या गोष्टी केल्या जातात. चाळकू म्हणजे फसवणारा, वंचना करणारा, स्वतःची महती नानाप्रकारे प्रकट करून भोळ्या भाविकाना स्वतःच्या नादी लावत असतात. सद्‌गुरू द्रव्य मिळवण्यासाठी कधीही भोंदूपणा करत नाही. शिष्यांना व्रते-उद्यापने सांगत नाही. तो कोणाचीही निंदा करत नाही, मत्सर करत नाही. त्याची ईश्वरावर प्रखर भक्ती असते तो कधीही आपल्या गुरूपदाचा उन्मत्तपणे ताठा मिरवीत नाही. त्याला कसलंही व्यसन असत नाही. त्याला कोणाच्याही संगतीची बाधा होत नाही. अशा दुर्मिळ साधूचा महिमा अगाध असतो.

समर्थ दुसऱ्या श्लोकात असं सांगतात की 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले ।।' हे सद्‌गुरूंचं लक्षण असतं. पोटामध्ये सुख मिळावे अशी इच्छा मनात धरून बाहेरून ईश्वराविषयी लोकांना प्रभावित करतील अशी कितीही प्रवचने दिली तरी त्यामुळे कोणीही वक्ता सद्‌गुरू ठरत नाही. असे प्रवचनकार, कीर्तनकार कितीही चांगलं बोलत असले तरी ते सद्‌गुरू होऊ शकत नाहीत. सद्‌गुरू निरिच्छ म्हणजे पोटात कोठलीही इच्छा नसलेला असा असावा. सद्‌गुरू हा मुख्य म्हणजे आत्मसाक्षात्कारी असला पाहिजे. तो तत्वानुभवी असला पाहिजे. ज्याला सामान्य माणूस सद्‌गुरू म्हणतो त्याच्या ठिकाणी निस्पृहता, संयम, तितिक्षा, भक्ती, विवेक हे गुण असलेच पाहिजेत. ते त्याच्या आचाराचा भाग व्हायला पाहिजेत, तरच ते आहेत असं म्हणता येईल. असे गुण काही प्रवचनाचा विषय होऊ शकत नाहीत. म्हणून समर्थ बोलल्यासारखं वागणाऱ्या माणसाला फार किंमत देतात. म्हणून ज्या भक्तीज्ञानवैराग्याचे तो प्रवचन करतो तसेच ज्याचे आचरण असावे लागते, त्यालाच माणसाने 'सद्‌गुरू' असं म्हणावं असं समर्थ सांगतात.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शनिवार

**जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी । कृपाळू, मनस्वी, क्षमावंत योगी ।**
**प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे । तयाचेनि योगे समाधान बाणे ।।१८३।।**
**नव्हे तेचि जाले नसे तेचि आले । कळो लागले सज्जनाचेनि बोले ।**
**अनुर्वाच्य ते वाच्य वाचे वदावे । मना संत आनंत शोधीत जावे ।।१८४।।**

या श्लोकात समर्थ रामभक्ताची लोकातली लक्षणं सांगत आहेत. ते म्हणतात की लोकांमध्ये रामभक्त हा ज्ञानी माणसाप्रमाणे वागून लोकांचं अज्ञान दूर करत असतो. कारण त्याला आत्मानात्मविवेक, नित्यानित्यवस्तूविवेक समजलेला असतो. त्यामुळे अनित्य वस्तूविषयी त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न झालेलं असतं. शिवाय तो अत्यंत कृपाळू असतो. कारण मानवी स्वभाव स्खलनशील असतो हे त्याला चांगलं माहित असतं. म्हणून तो इतरांच्या बाबतीत क्षमावंत असतो. कृपाळू असतो. तो रामभक्त असतो व याबाबतीत तो मनस्वी असतो. तो इतरांच्या व स्वतःच्याही बाबतीत अत्यंत दक्ष व सावधान असतो. शिवाय तो योगी म्हणजे ईश्वराशी जोडलेला असून त्याचा भक्त असतो. शिवाय तो व्युत्पन्न म्हणजे विद्वान म्हणजे बहुश्रुत, निरनिराळ्या ग्रंथांचं सखोल अध्ययन केलेला असा असतो. तो चतुर असतो म्हणून तोच कोणाचंही समाधान करू शकतो. त्याचं बोलणं नुसतं ऐकल्यामुळे कोणाच्याही ठिकाणी समाधान बाणून जातं. हे गुण त्याचे अंगी असतात.

समर्थ दुसऱ्या श्लोकात असं सांगतात की सामान्य माणसाने नेहमी सज्जनाच्या संगतीत रहावं. त्याच्या संगतीत राहिल्यानेच सामान्य माणसाला हे समजते की इंद्रियांच्या द्वारे प्रत्ययास येणाऱ्या या सृष्टीच्या मुळाशी जे मूलतत्व आहे ज्याला ईश्वर असं म्हणतात. ते तत्व वास्तविक मन, बुध्दी यांच्या सामर्थ्यापलीकडे असल्याने अवर्णनीय आहे. असं असतानाही सगुण सृष्टीच्या स्वरूपात ते ब्रम्ह व्यक्त होतं. निर्गुण असताना ते ब्रम्ह सगुणात येतं, निराकार असताना साकारल्यासारखं दिसतं. कोठलीही वस्तू हा त्या ब्रम्हाचाच अविष्कार असतो. पण आपल्याला आलेला अनुभव दुसऱ्याला सांगायचा असेल तर तो आपल्या बोलण्याने व्यक्त करावाच लागतो. पण हा अनुभव येण्यासाठी आपल्याकडे तशी तीव्र तळमळ असावी लागते. नंतर मग भक्त ईश्वराचा शोध करू लागतो. मग त्याला तो आपल्या हृदयातच सापडतो. मग या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात,

'साठविला हरी । जेणे हृदयमंदिरी । त्याची सरली येरझार । झाला सफल व्यापार ।।'

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



रविवार

**लपावे अती आदरे रामरूपी । भयातीत निश्चीत ये सस्वरूपी ।**
**कदा तो जना पाहताही दिसेना । सदा ऐक्य तो भिन्न भावे वसेना ।।१८५।।**
**सदा सर्वदा राम सन्नीध आहे । मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ।**
**अखंडीत भेटी रघूराजयोगू । मना सांडि रे मीपणाचा वियोगू ।।१८६।।**

समर्थ या श्लोकात असं सांगत आहेत, ज्या साधकाला रामाशी आपलं ऐक्य व्हावं असं वाटत असेल त्याने रामाच्या रूपात अत्यंत प्रेमाने लपून जावं म्हणजे या विश्वात ऐक्यरूपाने मिसळून जावं. म्हणजे ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचं म्हणजे मिठाच्या बाहुलीने समुद्राची खोली मोजण्यासाठी समुद्रात उतरावं तसं हे लपणं हवं, शोधणं हवं. म्हणजे मी मी म्हणून वेगळेपणाने सतत जाणवणारं स्वतःचं भिन्न अस्तित्व पार विसरून जाणं म्हणजेच हे लपणं आहे. यासाठी साधकाच्या मनात अतीव आदर, प्रेम असावं लागतं. ईश्वराविषयी पराकाष्ठेची भक्ती असावी लागते. ईश्वराचं हे विश्वरूप भयाच्या पलीकडचं आहे कारण हा कोणाच्याही नेत्रांचा विषय होऊ शकत नाही. का? तर तो आपल्याहून भिन्न नसतो म्हणून. आपण स्वतःला त्याच्यापेक्षा वेगळं मानलं की तो दिसेनासा झालाच म्हणून समजा. इतकं त्याचं आपल्याशी ऐक्य असतं. म्हणून आपली मिठाची बाहुली जेव्हा पाण्यात उतरताना स्वतःचं रूप सोडते तेव्हाच ती समुद्रमय होऊन जाते.

समर्थ दुसऱ्या श्लोकात हा ऐक्याचा अनुभव कसा येईल ते सांगत आहेत. ते म्हणतात हा राम आपल्या हृदयातच अगदी आपल्या जवळ आहे. पण हे अंतिम सत्य आपल्याला शोधल्याशिवाय सापडत नाही. वास्तविक ही अंतर्यात्रा आहे. मारुतीने सीतेचा शोध करावा तसं हे नाही. आपलंच आहे पण आपल्याला सापडत नाही म्हणून आपल्याच ठिकाणी शोधायचं आहे. स्वस्वरूप असा हा राम सर्वव्यापक, अखंड, शाश्वत, त्रिकालातीत असा आहे. त्यामुळे तो येथे आहे आणि तेथे नाही असं म्हणता येत नाही. वास्तविक आपली व रघुराजाची अखंड भेट ही होतच असते. पण आपण जेव्हा आपला मीपणा सोडून देऊ तेव्हाच ही भेट शक्य आहे. कारण आपण ईश्वराशिवाय राहूच शकत नाही. पण हा ईश्वर आपल्याला समजत नाही हीच आपली अडचण आहे.

कारण माणसाचा अहंकार हे असुरी प्रकृतीचे लक्षण असल्यामुळे परमार्थातला तो सर्वात मोठा अडथळा आहे. मीपणा हा विभक्तपणा निर्माण करतो म्हणून तो सोडला पाहिजे. असा उपदेश आपल्या मनाला समर्थ करीत आहेत.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**भूते पिंड ब्रम्हांड हे ऐक्य आहे । परी सर्व ही सस्वरूपी न साहे ।**
**मना भासले सर्व काही पहावे । परी संग सोडूनि सूखी रहावे ।।१८७।।**
**देहेभान हे ज्ञानशस्त्रे खुडावे । विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे ।**
**विरक्तीबळे निंद्य सर्वे त्यजावे । परी संग सोडूनि सूखी रहावे ।।१८८।।**

समर्थ पहिल्या श्लोकात सांगतात की पिंड म्हणजे जीव आणि ब्रम्हांड म्हणजे इतर सृष्टी ही दोनही एकाच शक्तीचं प्रकटीकरण आहे. फक्त ते पंचमहाभूतांच्या स्वरूपात आणि गुणधर्मातून प्रकट होत असतं.ही पंचमहाभूतं म्हणजे जमिन, पाणी, वारा, अग्नी आणि अंतराळ या स्वरूपात असतात. पण स्वस्वरूपाच्या ठिकाणी जीवाला यातलं काहीही दिसत नाही. म्हणजे जाणवत नाही. म्हणून मग जरी आपल्या इंद्रियाना या वस्तू जाणवल्या तरी मुळात त्या मिथ्या म्हणजे भ्रामक म्हणून पहाव्या. पण ज्याला खरं सुख पाहिजे असेल, ईश्वराचं सुख पाहिजे असेल तर त्याने या सर्व जगांची व त्यातल्या वस्तूंची आसक्ती सोडली पाहिजे. त्याचा मानसिक संग सुटला पाहिजे. मग ती वस्तू व्यावहारिक गरज म्हणून राहिली तरी चालण्यासारखं आहे. पण उद्या ती गरज संपली किंवा आपली मानसिक आवड बदलली तरी आपल्याला त्याचं दुःख होता कामा नये. आपल्या आतल्या आनंदाला कुठे धक्का बसता कामा नये.

समर्थ दुसऱ्या श्लोकात आपल्याला सांगतात की आपण आपल्या देहापुरतेच मर्यादित आहोत असं न समजता आपण अनंत म्हणजे या मर्यादित विश्वापेक्षा कितीतरी मोठे आहोत असं समजावं. आपल्या शरीराचं आपल्याला असलेलं भान हे व्यम्वहार करण्यापुरतं तात्कालिक आहे म्हणून व्यवहार संपला की आपण शरीरापुरतेच न रहाता आपण अनंत आहोत असा विश्वव्यापी भाव धारण करावा आणि ईश्वराची भक्ती करावी. या विश्वातील वस्तूसंबंधी आपल्या मनात विरक्ती धारण करावी. विशेषतः शास्त्रात ज्या गोष्टी त्याज्य सांगितल्या असतील त्याचा शारिरीक त्याग करावा. अशा तऱ्हेने ज्याला शाश्वत सुख हवं असेल त्याने या विश्वातील सर्व वस्तूंचा शारिरीक किंवा मानसिक त्याग केला पाहिजे. आता अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा शारिरीक त्याग केल्यावर माणसाला जगणं अशक्य होईल. म्हणून त्यांचा मानसिक त्याग करावा व इतर सर्व गोष्टींचा शारिरीक त्याग केला पाहिजे असं समर्थ सांगतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



## मंगळवार

**मही निर्मिली देव तो वोळखावा । जया पाहता मोक्ष तत्काळ जीवा ।**
**तया निर्गुणालागी गूणी पहावे । परी संग सोडूनि सूखी रहावे ॥१८९॥**
**नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टीभर्ता । परेहूनि पर्ता न लिंपे विवर्ता ।**
**तया निर्विकल्पासी कल्पीत जावे । परी संग सोडूनि सूखी रहावे ॥१९०॥**

समर्थ माणसाला या श्लोकात मुळाकडे कसं जावं, अगदी मुळातून विचार कसा करावा ते शिकवतात. ते म्हणतात की या पृथ्वीवर माणूस जन्माला येतो, काही काळ रहातो आणि त्यालाही मग पृथ्वी सोडून द्यावी लागते. पण ज्या पृथ्वीवर आपण इतके अवलंबून असतो ती पृथ्वी ज्या देवाने निर्माण केली त्या देवाला आपण जाणावं, की ज्या देवामुळे आपल्याला मोक्ष मिळू शकतो. हा देव कसा आहे? हा देव मुळात निर्गुण, निराकार असा आहे. पण आपल्या इंद्रियाना तर वस्तूंचे फक्त गुणधर्म समजतात तर या गुणधर्माचा निर्माता मुळात निर्गुण ईश्वरच आहे. म्हणून या वस्तूच्या गुणधर्मातून आपण त्याला जाणण्याचा प्रयत्न करावा. पण हे वस्तूचे गुणधर्म सोडून द्यावे. त्याना चिरकाल मनात स्थान देऊ नये तर त्याना तात्पुरते स्थान द्यावे मात्र त्यांचा मनातून त्याग करावा आणि सुखी रहावे. कारण कुठल्याही गोष्टीचा कायमचा संग सोडल्याशिवाय माणसाला शाश्वत सुख मिळत नाही. समर्थ दुसऱ्या श्लोकात आपल्याला असं सांगतात की परमात्म्याचं मूळ स्वरूप कार्यकारणभावाच्या पलीकडे आहे. त्यामुळे तो सृष्टी निर्माण करतो व तिचं पालन करतो हे सृष्टीपुरतंच खरं आहे. पण सृष्टी ही त्याच्यावर भासणारं विवर्त आहे. जसं मृगजळ हे वाळवंटाला स्पर्श करत नाही. पण भ्रामकपणाने वाळवंटावर आहे असं वाटतं. ते इतकं खरं वाटतं की हरणं त्या भ्रामक पाण्याच्या मागे लागून मैलोन्मैल वाळवंट तुडवीत पळत असतात. ईश्वर तसाच आहे. तो निर्विकल्प आहे. पण त्याची काहीतरी कल्पना केल्याशिवाय तो आपल्या बुध्दीला समजणार कसा? म्हणून त्याची रामस्वरूपात कल्पना करावी आणि ज्याला शाश्वत सुख पाहिजे असेल त्याने या सृष्टीचा व त्यातील वस्तूच्या आवडत्या गुणधर्माचा त्याग करून सुखात रहावं म्हणजे वस्तूच्या गुणधर्मांचा उपयोग करून झाल्यावर त्यांचा मनातून त्यागच करावा व आपलं मन मोकळं, रितं, रिकामं ठेवावं असं समर्थ सांगतात.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## बुधवार

**देहेबुध्दिचा निश्चयो ज्या टळेना । तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना ।**
**परब्रम्ह हे मीपणे आकळेना । मनी शून्य अज्ञान हे मावळेना ।।१९१।।**
**मना ना कळे ना ढळे रूप ज्याचे । दुजेवीण ते ध्यान सर्वोत्तमाचे ।**
**तया खूण ते हीण दृष्टांत पाहे । तेथे संग निःसंग दोनी न राहे ।।१९२।।**

मीं देहच आहे हा निश्चय ज्याच्या मनात कायमचा ठिय्या मारून असतो त्याला परब्रम्हाचं ज्ञान कधीही होणं शक्य नाही. कारण देह हा अनात्म असल्यामुळे मी देहच आहे ही भावना मी आत्मा आहे या भावनेच्या बरोबर उलट असते. म्हणून मी देहच आहे ही भावना उराशी घट्टपणे बाळगून मग युगानुयुगे प्रयत्न केला तरी आत्मज्ञान होणं शक्य नाही. आपण नेहमी असं पहातो की हजारो माणसातील एखादाच देवाच्या नादी लागतो. अशा हजारो भक्तांपैकी एखादाच खरा देव समजून घेण्याचा प्रयत्न करतो. अशा हजारो लोकांपैकी एखादाच देहबुध्दी मारायला तयार होतो. म्हणून तो आत्मज्ञानी होतो. निष्ठेने साधन करून देहबुध्दी मृतवत झाली की आत्मज्ञान उदय पावतं. मानवी मनाने मी वेगळा आहे अशी कल्पना केली की त्यातून अहंकार निर्माण होतो. त्यामुळे आत्मज्ञानरूपी परब्रम्ह झाकलं गेलं. म्हणून मीपणा म्हणजे देहबुध्दी असेतोपर्यंत वेगळेपण रहातं आणि वेगळेपण असेतोपर्यंत जीवाला आत्मज्ञान होण्याची यत्किंचितही शक्यता नाही.

समर्थ पुढील श्लोकात ईश्वराची आणखी खोलातली स्थिती सांगत आहेत. ते म्हणताहेत की ईश्वराची ही मूळ स्थिती मनाला कळण्यासारखी नाही. कारण आपलं मन हे अज्ञानाचं प्रमुख साधन आहे कारण द्रष्टा व दृश्य असा भेद करून मग पाहणे हा मनाचा स्वभाव असल्यामुळे वेगळेपणाशिवाय त्यास वस्तु आकलन करताच येत नाही. जेथे अनेक वस्तूंशी व्यवहार असतो तेथे आपलं मन उत्तम काम करते. परंतु परमात्मा हा एकच एक आणि सत्स्वरूप असल्यामुळे अपल्या मनाचा तेथे प्रवेशच होऊ शकत नाही. दृश्य वस्तूचं ध्यान करणं आपल्या मनाला कठीण जात नाही. कारण ते वेगळेपणाने करणं शक्य असतं. पण परमात्मस्वरूप अतींद्रिय व सूक्ष्म असल्यामुळे त्याचं ध्यान वेगळेपणाने करता येत नाही. वरं एखादी खूण दाखवून किंवा एखादा दृष्टांत देऊन ते स्वरूप समजावून द्यावं म्हटलं तर सारे संकेत व दृष्टांत त्या स्वरूपाची कल्पना देण्यास अगदीच अपुरे पडतात. उदा. संग म्हणजे आसक्ती ही कल्पना निःसंग म्हणजे अनासक्ती या कल्पनेच्या सापेक्ष आहे. पण परमात्मा सर्व सापेक्ष कल्पनांच्या पलीकडे आहे. म्हणून तिथे संग व निःसंग दोन्ही राहून होत नाही.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ॥ मना सज्जना ॥



गुरूवार

**नव्हे जाणता नेणता देवराणा । न ये वर्णिता वेदशास्त्रापुराणा ।**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा । श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥१९३॥**
**वसे हृदयी देव तो कोण कैसा । पुसे आदरे साधकू प्रेष्ण ऐसा ।**
**देहे टाकिता देव कोठे रहातो । परी मागुता ठाव कोठे पहातो ॥१९४॥**

समर्थ सांगतात की माणूस दोन विश्वामध्ये जगत असतो. एक भौतिक जग त्याच्या देहाचे म्हणजे दृश्य वस्तूंचं आणि दुसरं जग त्याच्या संकल्पनानी भरतेलं असतं दृश्य जग हे सीमित व मर्यादित असतं. पण अदृश्य जग अमर्याद व असीम असतं. माणसाच्या साऱ्या संकल्पना सापेक्ष असतात. सापेक्षता आली की संबंध आलाच. पण परमात्मा सर्व संबंधाच्या पलीकडे आहे या कारणाने शब्दाने त्याचं वर्णन करता येत नाही. त्यामुळे चार वेद, सहा शास्त्रं, अठरा पुराणं आणि श्रुती त्याचं वर्णन करता करता थकून गेल्या पण त्याना त्याचा अंत लागत नाही. ज्याप्रमाणे सूर्य साक्षीपणाने जीवाचे व्यवहार पहात असतो, त्याप्रमाणे आत्मा साक्षीपणाने जीवाचे व्यवहार पहात असतो.

समर्थ दुसऱ्या श्लोकात साधकाच्या शंकेचं वर्णन करतात. माणूस जन्मास कोठून येतो? त्यांच्या जीवनात दुःख का असतं? आणि मृत्युनंतर त्याचं काय होतं? प्रत्येकाच्या हृदयात देव वास्तव्य कसं करू शकतो? शिवाय देह पडल्यावर हा देव कोठे रहातो? त्याची स्थिती काय होते? त्याला पुन्हा देह मिळत असल्यास तो कसा, का व केव्हा मिळतो? इत्यादि अडचणी साधकाच्या मनात उभ्या रहातात. या शंकाना समर्थांनीच पूर्वी उत्तरं दिली आहेत. माणसांच्या अपुऱ्या इच्छा, वासना त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यायला लावतात. त्याच्या हातून मागील जन्मात घडलेलं पापच त्याला या जन्मी दुःख भोगायला लावतं. आणि मेल्यानंतर त्याचा जीवात्मा स्वर्ग किंवा नरक यामध्ये राहून मग पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतो. हे. असं रहाटगाडगं चालू असतं.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

वसे हृदयी देव तो जाण ऐसा । नभाचे परी व्यापकू जाण तैसा ।
सदा संचला येत ना जात काही । तयावीण कोठे रिता ठाव नाही ।।१९५।।
नभी वावरे जो अणूरेणु काही । रिता ठाव या राघवेवीण नाही ।
तया पाहता पाहता तेचि जाले । तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले ।।१९६।।

समर्थानी गेल्या श्लोकातील साधकांच्या प्रश्नाला स्वतःच या श्लोकात उत्तर दिलं आहे. ते म्हणतात की हा देव साधकांच्या हृदयातच असतो. पण तो साधकाचं हृदय व्यापून शिवाय त्याने सर्व आकाश व्यापलेलं असतं. त्यामध्ये साधकाचे देह येतात आणि जातात. कितीही देह आले आणि गेले तरी परमात्मस्वरूपात काही फरक पडत नाही. ते अगदी जसंच्या तसंच रहातं. ज्ञानी पुरुषाला हा सर्व विश्वाचा पसारा परमात्मस्वरूपच दिसतो. माणसाला चार देह असतात. स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण. मरणसमयी सूक्ष्मदेह स्थूलदेहातून कायमचा बाहेर पडतो.काही काळ तो त्या अवस्थेत काढतो. नंतर त्याची वासना अधिकाधिक तृप्त होण्यास योग्य असा स्थूल देह ज्या आईबाबांपासून मिळेल त्यांच्या पोटी तो जन्म घेतो. पण परमात्मा हा सर्वत्र असल्यामुळे त्याच्याशिवाय कोठेही मोकळी जागा नाही म्हणून तो कोठेही येत जात नाही.

समर्थ पुढील श्लोकात सांगतात की या आकाशात अनंत तारे दिसतात त्यांच्यात हायड्रोजन वायू व किरणोत्सर्गी धूळ असते. ते सर्व कण या ईश्वरीतत्वाने व्यापलेले असतात. त्याना तुम्ही स्वतंत्रपणे पाहू गेलात की मग द्रष्टा-दृश्यभाव उत्पन्न होऊन ते तुम्हाला वेगळे दिसू लागतात. म्हणून त्या स्वरूपाला पाहण्याचा अभ्यास केला तर पाहणारा तेच बनून जातो. या विश्वाच्या रचनेत वस्तू जेवढी सूक्ष्म तेवढी जास्त व्यापक असते. म्हणून सर्वव्यापक परमेश्वराचा अनुभव घ्यायचा असेल तर पाहणारा त्याच्यासारखाच सूक्ष्म व व्यापक होणं आवश्यक आहे. यात अखेर त्याचा जीवपणा मावळून शिवपणा येईल. हा विश्वव्यापी असतो. पण हादेखील मावळल्यावर तिथे फक्त परमशांती उरते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# || मना सज्जना ||



## शनिवार

**नभासारिखे रूप या राघवाचे । मनी चिंतिता मूळ तूटे भवाचे ।**
**तया पाहता देहबुध्दी उरेना । सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना ।।१९७।।**
**नभे व्यापिले सर्व सृष्टीस आहे । रघूनायेका ऊपमा ते न साहे ।**
**दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे । तया व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे ।।१९८।।**

समर्थ विश्वचालक, पालक आणि मालक असणाऱ्या राघवाचं वर्णन या श्लोकात करीत आहेत. या सगुण रामाचं रूप जरी माणसांसारखं असलं तरी त्याचं खरं रूप आकाशासारखं अनंत व विशाल आहे. आणि तो सर्वत्र आहे हे माणसाला प्रथम सद्गुरूकडून समजतं आणि मग स्वतःच्या अनुभवाने उमजतं. मग आपल्या संसाराचं मूळ जी आसक्ती-तिटकारा, म्हणजे राग-द्वेष तेच आपल्या मनातून निघून जातात. परमेश्वराच्या चिंतनामुळे म्हणजे तो सर्वत्र आहे, अनंत आहे अशा त्याच्या चिंतनामुळे माणसाची मी देहच आहे आणखी कोणी नाही अशी जी देहबुध्दी झालेली असते तिचा समूळ नाश होतो आणि आत्मबुध्दी उरते. या ईश्वराचं निर्गुण स्वरूप असं असतं की त्याचा अनुभव कितीही वेळा घेतला तरी माणसाची तृप्तीच होत नाही, पोट भरतच नाही.

समर्थ दुसऱ्या श्लोकात सामान्य माणसासाठी ईश्वराचं आणखी सूक्ष्म वर्णन करून सांगत आहेत. ते म्हणतात की साऱ्या विश्वाला आकाशाने व्यापले आहे पण त्याचाही कोठेतरी अंत आहेच कारण पंचमहाभूतापैकी ते एक आहे पण ईश्वराला तो अनंत असल्यामुळे ही उपमा पूर्णपणे लागू पडत नाही कारण आकाश व्यापक आणि सृष्टी आकाशाने व्यापलेली असा हा संबंध सांगता येतो व समजावून देता येतो. पण ईश्वर हा तसा नाही कारण तो सर्वव्यापक व एकमेवाद्वितीय असा असल्यामुळे त्याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणीही असू शकत नाही. त्याच्यात स्वगत, सजातीय आणि विजातीय असे भेद नसतात. उदा. हात, पाय हे स्वगत भेद आहेत, दोन झाडं हा सजातीय तर झाड व पशू हा विजातीय भेद आहे. पण ईश्वरात मात्र असे भेद नसतात. त्याच्या ठिकाणी आत बाहेर असं नसतं. मग तो केवळ व्यापक आहे असं कसं म्हणता येईल?

|| जय जय रघुवीर समर्थ ||



# ।। मना सज्जना ।।



## रविवार

अती जीर्ण विस्तीर्ण ते रूप आहे । तेथे तर्कसंपर्क तोही न साहे ।
अती गूढ ते दृढ तत्काळ सोपे । दुजेवीण जे खूण स्वामी प्रतापे ।।१९९।।
कळे आकळे रूप ते ज्ञान होता । तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था ।
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे । तो गे तोचि तो राम सर्वत्र आहे ।।२००।।

समर्थ या श्लोकात ईश्वराचं आणखी वर्णन करत आहेत. त्याच्या शुध्द स्वरूपाविषयी ते सांगत आहेत. ते म्हणतात की ईश्वराचं रूप अनादी, अनंत आहे. म्हणून ते अती जीर्ण म्हणजे सनातन आहे. शिवाय ते सर्वव्यापक आहे म्हणून ते अत्यंत विस्तीर्ण आहे. शिवाय ईश्वराच्या ठिकाणी कोठल्याही तर्काचा संपर्क चालत नाही. म्हणजे त्याच्या विषयी कितीही तर्क केला तरी त्याच्याशी संपर्क साधता येत नाही. थोडक्यात परमेश्वर म्हणजे एक अत्यंत गहन असं गूढ आहे पण हे गूढतत्व कळल्यावर साधकाने निराश होण्याची गरज नाही. कारण तो सर्वव्यापी असल्याने त्याच्या ठिकाणी दुसरा असूच शकत नाही आणि ही खूण आपल्याला स्वामी म्हणजे सद्गुरूंच्या सामर्थ्यामुळे समजते, उमजते म्हणजे अनुभवास येते.

समर्थ पुढच्या श्लोकात सांगतात की अशा तऱ्हेने ईश्वराचं ज्ञान झालं की हे ईश्वराचं अनादि, अनंत, अविनाशी, सर्वव्यापक रूप समजतं मग आपला साक्षीभावही आटून जातो. कारण ईश्वर सर्वव्यापक असल्यामुळे तो सर्वत्र आहे. मग माझ्या ठिकाणी साक्षीभावानं बघणंही शिल्लक कसं रहाणार? कारण तेही ईश्वरमय होऊन जातं. मग मनाचं उन्मन होतं.त्यातील सर्व विचार आटून जातात. मग मन निर्विचार होतं. कारण त्यतील शब्द कुंठित होऊन जातात. मन निःशब्द होऊन जातं. म्हणून मग साक्षी अवस्था जाऊन तुरीय अवस्था येते आणि मग साधकाला सर्वत्र रामच दिसू लागतो. 'अंदर राम, बाहर राम' अशी त्याची अवस्था होऊन जाते. साधकाने काहीही पाहिलं, काहीही केलं तरी त्याला सर्वदा रामाचंच स्मरण होतं. ही सगळ्यात वरची स्थिती असते.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## सोमवार

**कदा वोळखीमाजि दुजे दिसेना । मनी मानसी द्वैत काही वसेना ।**
**बहूता दिसा आपुली भेटि झाली । विदेहीपणे सर्व काया निवाली ।।२०१।।**

समर्थ या श्लोकापासून मनाच्या श्लोकात केलेल्या उपदेशाच्या उपसंहाराला लागले आहेत. आता शेवटचे पाच श्लोक शिल्लक आहेत. माणसाला त्याच्या इंद्रियांच्या माध्यमातून जगाची ओळख होते. त्यातल्या विविध वस्तू समजतात, त्या ओळखल्या जातात अशा तऱ्हेने त्याला विविधतेमुळे जगाची ओळख होते. त्यातच त्याला स्मृतीच्या मदतीने विसरलेलं आठवतं, हरवलेलं सापडतं, वेड्याचं वेड नाहीसं होऊन तो शहाणा होतो. पण भक्ताला मात्र कुठलीही गोष्ट पाहिली की ईश्वराचंच स्मरण होतं, त्याला त्याचीच आठवण होते. ईश्वराच्या ठिकाणी मुळात द्वैत नाही. विविधतेची अवस्था कल्पित आहे. ही बुध्दीची विविधतेची कल्पित अवस्था गेली व ईश्वराची ओळख पटली की अंतःकरणातून द्वैताचा निरास होतो. विविधता फक्त व्यवहारापुरतीच शिल्लक रहाते. ही जी ऐक्यातून ईश्वराची ओळख पटते, ही जी त्याची भेट होते ती भेट स्वस्वरूपाचीच आहे. मध्यंतरी काही जन्माचा बराच मोठा काळ अज्ञानदशेत गेलेला असेल. पण ईश्वराचं ज्ञान झाल्यावर अज्ञानदशेतील गोष्टीविषयी आवड रहात नाही. जसं मूल मोठं झालं की त्याला भातुकलीच्या खेळाची आवड रहात नाही तसं, किंवा मुळातच नसलेल्या बागुलबुवाची भीति वाटत नाही तसं. मगच या आत्मबुध्दीमुळे एरवी जे साधकाचं शरीर देहबुध्दीमुळे तडफडत होतं, वासनांमुळे विरविरीत व विसविशीत होत होतं, ते आता पूर्णपणे शांत होतं. या अवस्थेत शरीर इतरांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मार्गदर्शनासाठी, प्रगतीसाठी फक्त शिल्लक असतं. या व्यतिरिक्त एरवी ते शरीर शांतच झालेलं असतं, इतका अर्थ 'विदेहीपणे सर्व काया निवाली' या चवथ्या ओळीत आहे. आता या भक्ताला कोणतीही गोष्ट बध्द करू शकत नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



**मंगळवार**


**मना गूज रे तूज हे प्राप्त झाले । परी अंतरी पाहिजे यत्न केले ।**
**सदा श्रवणे पाविजे निश्चयासी । धरी सज्जनसंगती धन्य होसी ।।२०२।।**

समर्थ या श्लोकात सांगतात, हे मना, तुला हे ईश्वरप्राप्तीचं गुज मिळालं आहे. गुज म्हणजे गुप्त गोष्ट. हितगूज म्हणजे हित करणारी गुप्तगोष्ट. ईश्वर हा अव्यक्त असल्यामुळे इंद्रियाना समजणारा नाही. म्हणून त्यासाठी गुज हा शब्द समर्थांनी वापरलेला आहे. पण तो फुकट मिळत नाही. तर त्याच्या प्राप्तीसाठी उत्कट व तळमळीने साधना करावी लागते. म्हणजे आपल्या चित्तात जी अशुध्दी भरलेली असते ती काढून चित्त शुध्द करावं लागतं. त्यासाठी कष्ट किंवा प्रयत्न करावे लागतात. सामान्य माणूस त्याच्या वासना पुरवण्यासाठी ईश्वरभक्ती, संकटं दूर करण्यासाठी त्याची उपासना करत असतो. म्हणून तर प्रत्येक ईश्वरउपासनेच्या स्तोत्रात त्याची फलश्रुति सांगितलेली असते. म्हणजे हे स्तोत्र किती वेळा म्हटलं की म्हणणाऱ्याला काय मिळेल त्याचं वर्णन केलेलं असतं. याला ईश्वराची सकाम उपासना म्हणतात. पण निष्काम उपासनेमुळे मात्र चित्तशुध्दी होते. त्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे सदैव ईश्वराची प्राप्ती कशी करून घ्यावी याचं श्रवण करावं लागतं. मग त्यातून ईश्वरप्राप्तीचा निश्चय करावा लागतो. हा निश्चय मग श्रवणाने पुन्हा बळकट करावा लागतो. पण हे श्रवण कोणाकडून करावं तर संतसज्जनांकडून करावं. यासाठी त्यांची कायमची संगत जोडावी लागते. याकरता आपल्या समाजात सत्संग, कीर्तनं, प्रवचनं, भाषणं ठेवलेली असतात. शिवाय दीक्षा किंवा अनुग्रह देणारे सद्गुरू असतात. दीक्षा या शब्दाची व्याख्या अशी आहे, 'दीयते ज्ञानसद्भावं क्षीयते पशुवासना ।' जी सद्भावनेतून येणारं ज्ञान वाढवते आणि माणसातली पशुवासना क्षीण म्हणजे कमी करते तिला दीक्षा असं म्हणतात. म्हणून अशा संगतीने साधक धन्य होतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



### बुधवार

**मना सर्वही संग सोडून द्यावा । अती आदरे सज्जनाचा धरावा ।**
**जयाचेनि संगे महादुःख भंगे । जनी साधनेवीण सन्मार्ग लागे ।।२०३।।**

समर्थ या श्लोकात पुन्हा सज्जनसंगतीचं महत्व सांगत आहेत. ते म्हणतात, हे मना, तू सर्व प्रकारची विषयांची आसक्ती (संग) सोडून दे. कारण विषयासक्त होणं, विषयलोलूप असणं ही प्रगतीच्या मार्गातील धोंड आहे, तो मोठा अडथळा आहे. म्हणून सर्व विषयांची आसक्ती, आकर्षण सोडून द्यावं आणि अत्यंत आदराने, प्रेमाने फक्त सज्जनाच्या सहवासाची आसक्ती मात्र ठेवावी. आसक्ती, आसक्ती म्हणून वाईट नसते. पण ती किती आणि कशाची ठेवावी याच्यावर तिचं वाईटपण अवलंबून असतं. म्हणून आदरपूर्वक सज्जनांच्या संगतीची तळमळ असावी आणि ती दिवसेंदिवस क्षणोक्षण वाढत असावी. त्यामुळे अविवेक, अश्रध्दा, चांचल्य इ. दोष उत्पन्न होण्याचं भय रहात नाही. संतसत्पुरुष वत्सल, प्रेमळ व दयाळू असतात. ते प्रसंगी अधिकारभेदाने साम, दाम, दंड, भेद यापैकी एकाचा उपयोग करून साधकाचं कल्याण साधून देतात. यांच्या संगतीने साधकाचे बरेचसे श्रम कमी होतात. उदा. सन्मार्ग कोणता ते शोधावं लागत नाही. अनुभवी संत त्यांची ओळख सहज करून देतात. त्यामुळे हा की तो या गोंधळाने चाचपडत बसण्याची आपत्ती टळते. या सत्संगतीने पुन्हा पुन्हा जन्म घेण्याचं महादुःख टळतं. जन्म-मरणाचा चौऱ्यांशीचा फेरा टळतो आणि साधकाला मुक्ती मिळते. आणि साधकाचं जीवन सन्मार्गावर चालू रहातं. तेही कोठल्याही संकटाशिवाय, त्रासाशिवाय, कष्टाशिवाय, प्रयत्नाशिवाय आपोआप सुरळीत चालू रहातं यासाठी 'साधनेवीण' हा शब्द मुद्दाम वापरला आहे. म्हणजे साधना ही ज्याची त्याला करावीच लागते. पण ती सहजपणे होते ती कष्टाशिवाय आपोआप होते. आपण गाडीत बसलो की आपोआप आपल्या ठिकाणावर पोहोचतो तसं.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# ।। मना सज्जना ।।



## गुरूवार

मना संग हा सर्व संगास तोडी । मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ।
मना संग हा साधका शीघ्र सोडी । मना संग हा द्वैत निःशेष मोडी ।।२०४।।

सामान्य माणसाला असं वाटतं की संग, आसक्ती, लोलुपता, आकर्षण, ओढ याविषयी परमार्थात किंवा अध्यात्मात फार अतिरेकी भूमिका घेतली जाते. त्यामुळे काही जिज्ञासूना अशी शंका येते की सज्जनसंगती हीसुध्दा शेवटी संगतीच आहे ना किंवा मला मोक्ष मिळावा, ईश्वरप्राप्ती हवी हीसुध्दा कामनाच आहे ना दुर्गुण जावेत सद्गुण वाढावेत हीही इच्छाच होत नाही का? ही शंका जर आळशीपणातून निघाली असेल तर उत्तर द्यायची गरज नाही. पण एखाद्याला खरोखरच ही शंका आली असेल तर त्याचं उत्तर असं आहे. विषयांविषयी स्वभावतःच ओढ वाटत असल्यामुळे शास्त्रानी त्यावर सज्जनांची संगती धरा असा उपाय सांगितलेला असतो. हा संग इतर सर्व विषयसंगाना तोडून टाकतो. त्यामुळे विषयांचा संग सुटणं हे सज्जनसंगतीचं फलित किंवा परिणाम आहे. आता ही एक स्थिती आहे. ही मनाची स्थिती आपल्याला हवी असेल तर सज्जनसंगती ही धरलीच पाहिजे. ही साधकाला ताबडतोब मोक्षप्राप्ती किंवा ईश्वरप्राप्ती करून देते. तसंच ही साधकाला जन्ममरणाच्या फेऱ्यातून व संसारबंधनातून सोडवते. एक गृहस्थ पोट बिघडलं म्हणून डॉक्टरकडे गेला तेव्हा डॉक्टरने त्याला औषध देऊन काही खाऊ नकोस असं सांगितलं म्हणून याने जर औषधच घेतलं नाही तर पोटदुखीचा रोग बरा कसा होणार? तसं हा संग साधकाला द्वैताच्या विळख्यातून सोडवतो. कारण अधिकारी सद्गुरू, साक्षात्कारी संत, विनम्र साधक हे सर्व द्वैतातूनच वर आलेले असतात. आणि सर्व व्यवहार जरी देहरक्षणापुरताच केलेला असला तरी तो द्वैतातच मोडतो. पण संतसंग हा सर्व द्वैत मोडून साधकाला अद्वैतात प्रवेश देतो. मग तो जरुरीपुरता कोठेही राहू शकतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



# ।। मना सज्जना ।।



## शुक्रवार

**मनाची शते ऐकता दोष जाती । मतीमंद ते साधनायोग्य होती ।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी । म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ।।२०५।।**

मनाच्या २०५ श्लोकातला हा शेवटचा श्लोक म्हणजे उपसंहाराचाही उपसंहार किंवा अंताचेही टोक. मनाच्या श्लोकांच्या अभ्यासाची फलश्रुति आहे. हे २०५ श्लोकांचं लहानसं प्रकरण असलं तरी संपूर्ण समर्थ वाङ्मयाचं ते सार आहे. समर्थ वाङ्मय तसं प्रचंड आहे. समर्थांचा दासबोध तर सर्वांना माहितच आहे. त्यांचं वाङ्मय ही सोन्याची खाण आहे आणि मनाचे श्लोक ही सोन्याची लगड आहे, असं विनोबा म्हणत. सर्व समर्थ वाङ्मयामध्ये मनाचे श्लोक (मनोबोध) हे सोपेपणा सरसता, ठसठशीतपणा आणि उत्कृष्ट मार्गदर्शन यानी ठासून भरलेले आहेत. मनाच्या या २०५ श्लोकात क्रिकेटच्या भाषेत सांगायचं तर समर्थानी दोन शतके ठोकली आहेत. हे मनाचे श्लोक ऐकण्याचा परिणाम काय होतो? तर यांच्या आचरणाने माणसातील दोष नाहीसे होऊ शकतात. हे दोष अनेक प्रकारचे असू शकतात. मनाचे संकल्प-विकल्प, बुध्दीची चंचलता, इंद्रियाची विषयासंबंधी आसक्ती ही दोषांची मूळ स्थानं होत. त्यातून काम, लोभ, मद, मत्सर व क्रोध हे विकार निर्माण होतात. हे सगळे दोष नाहिसे होऊ शकतात. सर्वात सुरवातीला आपलं काय चुकलं ते यामुळे लक्षात येतं. त्यामुळे सुरवातीपासूनच हे दोष टाळता येतात. तसंच बुध्दीने मंद असलेले म्हणजे अज्ञानी लोक हे साधना करण्यास योग्य म्हणजे लायक होतात. कारण बुध्दीची तीक्ष्णता, निर्मलता प्रत्येक माणसात कमीअधिक असू शकते. ती सर्वांचीच सारखी असू शकत नाही. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ।' असं आपल्याकडे सुभाषितच आहे. या साधनेमुळे माणसाला ईश्वरज्ञान किंवा आत्मज्ञान आणि संसारातील विषयांच्या आसक्तीबद्दल वैराग्य आणि त्यासाठी आवश्यक असणारं बळ किंवा सामर्थ्य प्राप्त होतं. शेवटी समर्थ रामदास म्हणतात त्यावर विश्वास ठेवला की सामान्य माणसाला मुक्ती प्राप्त होते. इथे 'मना सज्जना' समाप्त होत आहे.

'श्रीराम कल्याणमस्तु'

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# ॥ मना सज्जना ॥



संकल्पना

**चंद्रकांत अनंत भोसेकर**

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥